# पुरुषोत्तम

अर्थात्

कै. रा. ब. रा. रा. काळे

यांचे

चरित्र

★

प्रथमावृत्ति १९३७
द्वितियावृत्ति १९७५

# पुरुषोत्तम

अर्थात्

## कै. रा. ब. रा. रा. काळे

यांचे

## चरित्र

थोर पुरुषांची चरित्रें म्हणजे त्या राष्ट्राचा इतिहास होय. –कार्लाईल

लेखक : चं. ह. पळणिटकर, सहसंपादक ऐक्य, सातारा

पुरस्कार : रँ. र. पु. परांजपे, एम्. ए. डी एस्सी. लखनौ

प्रस्तावना : प्रो. श्री. रा. पारसनीस, एम्. ए. सातारा

दिवंगत कर्मयोग्याला नम्र अभिवादन : न. गं. जोशी, एल्. एल्. बी. सातारा

प्रथमावृत्ति १९३७

द्वितियावृत्ति १९७५

किमत ४ रुपये

प्रकाशक :

श्री. प्रमिला गाडगीळ, कार्यकारी विश्वस्त
कै. रा. ब. रा. रा. काळे धर्मादाय विश्वस्त निधी.
१२९ ब, एरंडवणे;
पुणे-४

© श्री. प्रमिला गाडगीळ, कार्यकारी विश्वस्त
कै. रा. ब. रा. रा. काळे धर्मादाय विश्वस्त निधी

मुद्रक :

अ. कृ. कुलकर्णी, आनंद मुद्रणालय,
१८२ सोमवार पेठ, सातारा

## पहिल्या आवृत्तीतून

# पुरस्कार

कै. वा. न्या. मू. रानडे व कै. वा. ना. गो. कृ. गोखले यांच्याच मालिकेतले जे गृहस्थ महाराष्ट्रात व मुंबई इलाख्यात होऊन गेले त्यात कै. वा. रावबहादूर रावजी रामचंद्र काळे यांची प्रामुख्याने गणना केली पाहिजे. ते सातारा येथे चाळीस वर्षे उत्कृष्ट वकील होते एवढेच नव्हे तर त्या जिल्ह्याच्या सर्व चळवळीत ते पुढाकार घेत असत व गेली (१९३७ पूर्वीची) सुमारे वीस वर्षे कौन्सिलचे प्रमुख सभासद व सरकारविरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांचे नाव सर्व इलाखाभर प्रसिद्ध होते. त्यांच्यासारखा पुढारी कौन्सिलातून नाहीसा झाल्यामुळे आमच्या राजकारणाची पुष्कळच हानी झाली आहे.

मी विद्यार्थी असताना रावबहादुरांचे नांव उत्तम संस्कृत स्कॉलर व युनिव्हर्सिटीतील परीक्षक म्हणून ऐकत असे. पुढे त्यांची ओळख झाली व त्यांच्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रातील कार्याची माहिती झाल्यावर त्यांच्या-बद्दलचा माझा आदर द्विगुणित झाला. त्यानंतर कौन्सिलमधील सहकारी म्हणून त्यांच्याशी माझा पुष्कळ वर्षे निकट संबंध आला. तसेच आमच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक निस्सीम मित्र व आमच्या सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलचे शाळेचे आधारस्तंभ या नात्यामुळे त्यांच्याबद्दल मला कृतज्ञताही फार वाटत असे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक वगैरे बाबतीत त्यांची व माझी मते बहुधा एकसारखी होती; व ते ती स्पष्टपणे व शोधकवृत्तीने लोकांपुढे व सरकारात मांडीत असत. धार्मिक बाबतीत ते प्रार्थना समाजाचे अनुयायी असल्यामुळे माझ्यासारख्या बुद्धिवादी मनुष्याशी त्यांची मते अर्था-तच जुळत नसत. परंतु त्यामुळे आमच्या मैत्रीत काहीही बिघाड आला नाही.

देशाची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून सर्व दिशेने प्रयत्न केले पाहिजेत, आपली चळवळ एकांगी असता कामा नये ही रानडेप्रणीत राजनीति (सार्व-जनिक जीवन प्रशाला) त्यांना पूर्णपणे मान्य होती व त्यांची सर्व कृत्ये या विचारसरणीची उत्तम साथ देतात. स्वदेशीचा पुरस्कार, स्थानिक संस्थातील

कार्य, औद्योगिक प्रगति, सार्वजनिक व सुधारलेले शिक्षण, सामाजिक सुधारणा विशेषतः स्त्रीशिक्षण या सर्व बाबीतील त्यांची कामगिरी फार महत्त्वाची होती. राजकारणात लिबरलपक्षाचे ते मोठे आधारस्तंभ होते व पुण्यातील लिबरल फेडरेशनचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले विस्तृत भाषण फार महत्त्वाचे आहे. त्यात राष्ट्राची प्रगति व्हावयास जातीय निवाड्याची धोंड वाटेतून गेली पाहिजे हे त्यांनी उत्तम रीतीने दाखविले आहे. नवीन राज्य-पद्धति कशी व किती अपुरी व काही अंशी प्रतिगामी आहे याचेही त्यात त्यांनी सुंदर विवेचन केले आहे. तरीही हल्ली ते हयात असते तर अधिकार-ग्रहणाबद्दल त्यांचे मत कायम असते यात मुळीच शंका नाही. ते नवीन कौन्सि-लात असते तर त्यांच्यासारखा योग्य मंत्रि दुसरा मिळाला नसता. खरोखर पूर्वीच त्यांना मंत्रिपद मिळाले पाहिजे होते. परंतु कौन्सिलात जातिनिष्ठ लोकांचा भरणा असल्यामुळे खऱ्या राष्ट्रीय वृत्तीच्या गृहस्थाला हा मान मिळाला नाही. यात त्यांच्यावर वाईटपणा न येता कौन्सिलरांचीच खरोखर शोभा झालेली आहे.

हल्लीच्या समाजसत्तावादाच्या काळात रावबहादुरांनी घालून दिलेले धोरण फार अनुकरणीय आहे. वकिलीत त्यांस चांगला पैसा मिळाला पण त्याचा उपयोग स्वतःच्या चैनीकडे न करिता तो सार्वजनिक कार्याकडे लाव-ण्याचे जे त्यांनी उदाहरण घालून दिले आहे ते फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या औदार्याची साक्ष पुणे व सातारा येथील कित्येक लोकोपयोगी संस्था देत आहेत. अशा तऱ्हेने आपल्या संपत्तीचा विनियोग करणारे जर पुष्कळ लोक असतील तर वर्गकलह वगैरे प्रश्न बिकट होणार नाहीत व ते सामोपचाराने सुटतीलही.

अशा अनेक दृष्टींनी रावबहादुर काळ्यांचे चरित्र उपयुक्त असून त्याचे यथार्थ चित्र प्रस्तुत पुस्तकात लेखकाने कुशलतेने रेखाटले आहे. त्यांच्या प्रथम वर्षश्राद्धाच्या दिवशी हे चरित्र पुस्तक प्रसिद्ध करून ग्रंथ-कर्त्याने जी उपयुक्त कामगिरी केली आहे तिच्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करितो.

**र. पु. परांजपे**, लखनौ

# प्रस्तावना

ऐक्याचे सहसंपादक श्री. चं. ह. पळणिटकर यांनी अत्यंत परिश्रम–पूर्वक प्रस्तुतचे चरित्र लिहिले आहे व याबद्दल ते खरोखरीच अभिनंदनास पात्र आहेत. श्री. पळणिटकर हे आज कित्येक वर्षे वर्तमानपत्राच्या धंद्यात पडलेले आहेत. त्यानी मुंबईस असताना 'चाबूकस्वार' आणि 'करमणूक' ही वर्तमानपत्रे कै. अ. ब. कोल्हटकर यांचेनंतर स्वतःच्या संपादकीय जबाबदारीवर चालविलेली आहेत. वर्तमानपत्री लेखनाला काहीसे तात्का–लिक स्वरूप असते तथापि त्याची किंमत कमी असते असे म्हणता येणार नाही. सातान्याला 'ऐक्य' पत्राचे सहसंपादक झाल्यापासून त्यांनी 'ऐक्य' आकर्षक करण्याच्या बाबतीत घेतलेले परिश्रम आणि दाखविलेली योजकता चिकित्सक वाचकांच्या सूक्ष्म दृष्टीला परिचित आहे. श्री. पळणिटकर यांनी वर्तमानपत्रातील लेखनकार्य संभाळून निरनिराळ्या विषयांवर जे स्पर्धेचे निबंध लिहिले आणि जी बक्षिसे पटकावली त्यामुळे त्यांचे नाव महाराष्ट्रीय वाचकांच्या पुष्कळ परिचयाचे झाले आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी आतापर्यंत असे निदान चौदा तरी निबंध लिहिले आहेत आणि त्यातील बारा निबंधांना पहिल्या नंबराची बक्षिसे मिळाली आहेत. या निबंधाचे विषयही इतके विविध आहेत की या सर्व विषयांवर पहिल्या नंबरचे लेखन श्री. पळणिटकर कसे करू शकतात याचे आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही. त्यांच्या शिक्षणाच्या मानाने त्यांचे वाचन एखाद्या पदवीधरालाही लाजवील इतके विस्तृत आहे. अखंड वाचन आणि परिश्रमपूर्वक लेखन यामुळेच त्यांना हे यश पुष्कळशा प्रतिकूल परिस्थितीत संपादिता आले असे मला वाटते.

'ऐक्य' पत्राशी संबंध आल्यापासून रा. ब. काळे यांच्याबरोबरही श्री. पळणिटकर यांचा परिचय घडला; आणि तेव्हापासून त्याना चरित्र–नायकाबद्दल आदरभाव वाटू लागला. प्रागतिकांचा या जिल्ह्यातील एकमेव अग्रणी असा हा सातान्याचा सूर्य गेल्यावर्षी याच सुमारास ( १७ जानेवारी १९३६ ) अस्तंगत झाला. तेव्हा प्रस्तुत चरित्र लिहिण्याची कल्पना श्री. पळणिटकरांना स्फुरली आणि ते उद्योगास लागले. वास्तविक पाहाता रा.

ब. काळे यांचा जीवनक्रम साकल्याने किंवा फार मोठ्या अंशाने पहाण्याचे भाग्य त्यांना लाभले नव्हते. परंतु एकदा कार्य अंगावर घेतल्यावर परिश्रम–पूर्वक माहिती गोळा करण्याच्या उद्योगास ते लागले आणि त्यांच्या निरपेक्ष परिश्रमाची मधुर फळे आज वाचकांच्या हाती पडत आहेत.

चरित्रलेखनाच्या निरनिराळ्या पद्धती आजकाल उपलब्ध आहेत. नीतिबोध करण्याचे एक साधन या दृष्टीने चरित्रनायकाच्या जीवनाकडे कित्येक पाहतात. ज्या कालात आणि परिस्थितीत चरित्र–नायक जन्म घेतो तिला अवास्तव महत्त्व देण्याचा मोह कित्येकांना आवरत नाही. काही लेखक चरित्रनायकांच्या वैचारिक जीवनाचे स्तोम माजवतात. सर्व या प्रकारात चरित्रलेखनाचा मला जो प्रकार इष्ट वाटतो त्याची व्याख्या एका इंग्लिश टीकाकाराने "The faithful portrait of a Soul in its adventures through life" अशी केली आहे आणि श्री. पळणिटकर यांनी लिहिलेले प्रस्तुतचे चरित्र या कसोटीस बव्हंशी उतरते रा. ब. काळे यांनी ज्या चळवळी केल्या, कौन्सिले वगैरे ठिकाणी जे कार्य केले, ज्या संस्था स्थापिल्या व पोषिल्या त्यांचे यथार्थ कथन आणि परिचय करून देण्याचा जसा यशस्वी प्रयत्न केलेला प्रस्तुत चरित्रात आढळतो तसेच त्यांचे व्यक्तिगत तत्वज्ञान, धर्मविषयक विचार आणि जगाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोन यांची ओळखही करून दिलेली आहे. ही हकिगत देताना श्री. पळणिटकरांना अधिकृत अशा संपा–दित किंवा संकलित माहितीवर विसंबावे लागले आहे हे उघड आहे. तथापि हे कार्य त्यानी शक्य तितकी तादात्म्यवृत्ती ठेवून केले असल्याचे वाचकांच्या लक्षात येईल.

रा. ब. काळे यांच्या यशाचे बीज मला त्यांच्या धर्मप्रवण वृत्तीत दिसते. ते स्वतः न्या. रानडे याजप्रमाणे एकेश्वरी पंथाचे होते. ईश्वराच्या आस्तिक्यावर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती. तथापि ही आस्तिक्य बुद्धी त्यांच्या धर्मदृष्टीचे एक अंग होते. वारकरी सांप्रदायातही ही निष्ठा दिसून येते. परंतु जनसेवा ही ईश्वर सेवा, लोकसंग्रहार्थ आणि लोकहितार्थ कर्मे करीत राहणे, ही गीताप्रणीत कर्मयोगाची शिकवण सर्वत्र आस्तिक्य बुद्धी–

प्रधान सांप्रदायाना पटलेली असते असे नाही. कित्येक वेळा भक्तीयोग निष्क्रियता आणि निवृत्ती याकडे झुकतो. कर्मयोगाच्या अधिष्ठानावर उभारलेला भक्तियोग कार्यप्रवण होतो. रा. ब. काळे यांची धर्मदृष्टी भक्तियोग आणि कर्मयोग यांच्या मनोहर मिश्रणाने बनलेली होती. त्यांच्या भावनामय अंतःकरणाला भक्ती आकर्षून घेत होती तर त्यांच्या कर्तृत्वशक्तीला कर्मयोगाची शिकवण प्रोत्साहन देत होती. रा. ब. काळे यांच्या यशस्वी जीवनक्रमाचे बीज याठिकाणी सापडते असे मला वाटते व त्याचे प्रत्यंतर या चारित्र्याच्या वाचनाने वाचकांनाही येईल असा भरंवसा वाटतो.

रा. ब. काळे यांचे वाङ्मयीन स्मारक उभारून श्री. पळणिटकर यांनी त्याची स्मृती चिरकालीन करून ठेवली आहे. पुढील पिढीला. रा. ब. काळे ही व्यक्ती आणि त्यांचे कार्य यांची ओळख या चरित्रग्रंथाने चांगली होईल आणि त्या करिता महाराष्ट्रातील तरुण पिढी श्री. चं. ह. पळणिटकर यांना दुवा दिल्याखेरोज राहाणार नाही अशी महाराष्ट्र वाचकांतर्फे ग्वाही देऊन हे चार प्रास्ताविक शब्द, संपवितो.

न्यू इंग्लिश स्कूल
ता. २६–१–३७

श्री. रा. पारसनीस
सातारा

# शिष्टाचार

क्रांतिवादी 'भगतसिंगा' नंतर आज उत्क्रांतिवादी 'पुरुषोत्तम' वाचकांच्या हाती देताना लेखकाला विषादमिश्रित आनंद होणे स्वाभाविक आहे आता जाता जाता आभार मानावयाचे ते पुस्तकाला पुरस्कार लिहिल्याबद्दल, तो शब्द खर्चून मिळवून दिल्याबद्दल व पुस्तकास प्रस्तावना दिल्याबद्दल (अनुक्रमे) रँ. र. पु. परांजपे, प्रि. ग. स. महाजनी व प्रो. श्री. रा. पारसनीस यांचे; आठवणी दिल्याबद्दल ना. खा. ब. डी. बी. कूपर आदि सर्व आठवणीदात्यांचे; माहिती पुरविल्याबद्दल कन्या शाळा वगैरे संस्थांच्या श्री. वि. आ. मोडक प्रभृती चालकांचे; आपापल्या संस्थांचे अहवाल वगैरे पाठविल्याबद्दल भारतसेवक समाज व गोखले इकॉ. अँड पॉलि. इन्स्टिटयूट वगैरे संस्थांचे; साहित्य पुरविल्याबद्दल साप्ताहिक प्रभा प्रभृती वृत्तपत्राचे; रावबहादुरांची कुडली दिल्याबद्दल होराभूषण दीक्षित यांचे; घरगुती माहिती पुरविल्यादद्दल श्री. के. व्ही. चाफेकर यांचे.

प्रतापगंज, गोखले वाडा,
दि. २९-१-३७

चं. ह. पळणिटकर
सातारा

# अनुक्रमणिका


**ग्रंथपूर्व पृष्ठे**

१) पुरस्कार ३, ४
२) प्रस्तावना ५, ६, ७
३) शिष्टाचार ८
४) दुसऱ्या आवृत्तीसंबंधी थोडेसे १०
५) दिवंगत कर्मयोग्याला नम्र अभिवादन ११,१२

**ग्रंथ पृष्ठे**

१) विषयप्रवेश १
२) रावबहादुरांची भाग्यशाली कुंडली ३
३) जन्म व कुलवृत्त ७
४) उच्च शिक्षण व अध्यापन १०
५) कौटुंबिक माहिती १४
६) वकिलीचा व्यवसाय व सरकारी नोकरी १९
७) रावबहादुरांनी चालविलेले कांहीं खटले २४
८) चरित्रनायकाची भूमिका व तत्त्वज्ञान. २८
९) राजकीय कामगिरीला प्रारंभ ४९
१०) काँग्रेस व रा. ब. काळे ५६
११) कौन्सिलातील कार्याचे अल्प दिग्दर्शन ६०
१२) प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीतील कार्य ७१
१३) दाता भवति व न वा ७४
१४) आठवणी व आख्यायिका १०७
१५) चरित्रनायकाची वाङ्‌मयसेवा व मतप्रणाली १२०
१६) संस्थानी प्रजेची केलेली कामगिरी १२९
१७) औद्योगिक कार्य १३०
१८) चरित्राचा समारोप १३१

**परिशिष्टे**

१) कै. रा. ब. काळे व्यक्तिमत्व १३५
२) रा. ब. रा. रा. काळे विश्वस्त निधी १३९
३) रयत शिक्षण संस्था सातारा १४१
४) गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे १६०
५) रा. ब. काळ्यांची सामाजिक दृष्टी १६७
6) An Independent observation 169

टीपा १७१

सूची १७३

# दुसऱ्या आवृत्तीसंबंधीं थोडेसें

कै. रा. ब. रावजी रामचंद्र काळे यांचे चरित्र इ. स. १९३७ साली प्रथम प्रसिद्ध झाले. अलिकडे त्याच्या प्रति दुर्मिळ झाल्या असल्याने ही आवृत्ती "रा. ब. रा. रा. काळे धर्मादाय विश्वस्त निधी" मार्फत प्रसिद्ध होत आहे. या आवृत्तीत कालमानानुसार जरूर ते खुलासे घातले आहेत; व परिशिष्टातील मजकूर नवा आहे.

सुमारे अर्ध शतकापूर्वी सातारा जिल्ह्याची ज्यांनी सर्वतोपरी सुधारणा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला व ज्यांना "Makers of Satara' असे नामाभिदान मिळाले त्यांत कै. रा. ब. काळे यांची गणना होत असल्याने हे चरित्र भविष्याच्या घडणीचा पाया म्हणून तरुण पिढीस मार्गदर्शक होईल असे वाटते.

केसरी, समर्थ, अभ्युदय ही वर्तमानपत्रे, पुण्याची गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनमिक्स, साताराची रयत शिक्षण संस्था यांचे कडून मिळालेल्या माहितीबद्दल विश्वस्त निधी कृतज्ञ आहे. कराडचे समाज-भूषण, श्री. पु. पां. तथा बाबुराव गोखले यांनी वेळोवेळी केलेल्या सहाय्या-बद्दल आभारी आहोत. तसेच श्री. न. गं. जोशी यांनी "जे नम्र अभिवादन" केले आहे त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

आनंद मुद्रणालय, सातारा यांनी ठराविक मुदतीत सुबक छपाई करून दिल्याबद्दल त्यांचेही आभारी आहोत.

१२९ ब एरंडवणे,
पुणे ४

प्रमिला गाडगीळ
मॅनेजिंग ट्रस्टी
कै. रा. ब. काळे धर्मादाय विश्वस्त निधी

# दिवंगत कर्मयोग्याला नम्र अभिवादन

कै. रा. ब. काळे यांच्या चरित्राची प्रथमावृत्ती त्यावेळचे ऐक्याचे उपसंपादक व नंतरचे संपादक कै. पं. ह पळणिटकर यांनी रा. ब. काळयांच्या निधनानंतर अल्प काळातच लिहिली व ती ऐक्य संपादन मंडळाने प्रकाशित केली. त्या मंडळातील अवशिष्ट असणारा एक व रावबहादुरांच्या निकटवर्ती अनुयायांच्या पैकी एक, या दोन्ही दृष्टींनी आज काही लिहू शकेन, असा मी एकच उपलब्ध असल्यामुळे, त्यांच्या कन्या, श्री ताईसाहेब गाडगीळ यांनी या ग्रंथात काहीतरी माझे चार शब्द असावेत अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून मी हे नम्र अभिवादन करीत आहे.

या पुस्तकाची प्रथमावृत्ति प्रसिद्ध झाल्यास ३५ वर्षाहून जास्त दिवस लोटले. रावबहादुरांच्या निधनासही सुमारे चाळीस वर्षे होत आली अशा परिस्थितीत त्यांच्या या चरित्राची पुनरावृत्ती काढून इतिहासजमा झालेल्या घटनांची उजळणी करण्याचे प्रयोजन काय असा विचार मनांत येणे स्वाभाविक आहे. पण या प्रयत्नाकडे अगदी वेगळ्या दृष्टीने पहावयास हवे असे मला वाटते. या चरित्राच्या वाचनाने रावबहादुरांच्या कर्तृत्वातील ज्या पैलूंचे तरुण पिढीला दर्शन व्हावे असे मला वाटते, ते म्हणजे त्यांच्या सर्व कर्तृत्वाचे अधिष्ठान असलेली कर्म–योगाची बैठक ही होय. रावबहादूर अत्यंत बुद्धिवान विद्यार्थी व विद्याव्यासंगी होते, निष्णात कायदेपंडित होते. त्यांनी वकिलीचा व्यवसाय करून अमाप द्रव्यार्जन केले. सामाजिक व राजकीय क्षेत्रात बहुमोल कार्य केले आणि Maker's of Satara म्हणून मागील पिढीतील ज्या नेत्यांचा निर्देश करण्यात येतो. त्यांच्यात अग्रस्थान भूषविले. या सर्व गोष्टी या पुस्तकाच्या वाचनाने सुस्पष्ट रीत्या दिसून येणार असल्या तरी तरुण पिढीच्या दृष्टीने आज त्यांना काहीसे गौणस्थान आहे पण त्यांच्या या कर्तृत्वाचे मूळ अधिष्ठान, जी कर्मयोग्याची मानसिक बैठक होती तिचे यथायोग्य दर्शन या पुस्तकात परिशिष्ठवजा संग्रहित केलेल्या नव्या मजकुराने व्हावे हे या पुनरावृत्तीच्या प्रकाशनाचे सर्वाधिक महत्त्व आहे असे मला वाटते.

लौकिक, सामाजिक, राजकीय या सर्व बाबतीत यशस्वी झालेले अनेक नेते व कार्यकर्ते होऊन गेले व आजही आहेत, पण यशस्वी जीवनांत जे जे संपादिले ते माझे नाही, ते समाजाच्या कारणी लागले पाहिजे, या दृढभावनेने ज्यांनी आपले जीवन व्यतीत केले व ते प्रत्यक्ष कृतीने चिर-स्मरणीय केले अशा थोड्या महाभागांचे मालिकेत रावबहादुराना स्थान प्राप्त झाले आहे हेच त्यांच्या चरित्र लेखनाचे मुख्य फलित होय असे मी मानतो आणि त्याचे यथार्थ दर्शन या चरित्राच्या वाचनाने तरुण पिढीचे काही जणांना जरी झाले तरी त्यांच्या कन्येने या चरित्राची पुनरावृत्ती काढण्याचे जे कार्य केले आहे ते सफल होईल अशी माझी धारणा आहे. कै. रा. ब. काळे यांच्याबरोबर त्यांचा निकटवर्ती अनुयायी या नात्याने कार्य करण्याचे भाग्य मला सुमारे १५-१६ वर्षे लाभले व त्यामध्ये त्यांच्या विचारधारेची बैठक जवळून अभ्यासता आली त्यातून त्यांच्या जीवनाचे मला समजलेले जे रहस्य आहे ते हे होय, आणि एवढ्यासाठी मी हे चार शब्द लिहून त्या दिवंगत कर्मयोग्याच्या चरणी मी माझे हे नम्र अभिवादन समर्पित आहे.

पुणे
७-१-१९७५

नरहर गंगाधर जोशी.

मूळ चरित्राचे सर्व हक्क लेखक यांचे स्वाधीन आहेत.
- मॅ. ट्रस्टी
रा. ब. काळे धार्मिक विश्वस्त निधि.



कै. रा. ब. रावजी रामचंद्र काळे

जन्म ८ ऑगस्ट १८६८ मृत्यु १७ जानेवारी १९३६

# पुरुषोत्तम

अर्थात्

# रा. ब. रा. रा. काळे

जीवनचरित्र

## विषयप्रवेश

### अरविंद, रानडे व काळे

सुप्रसिद्ध योगिराज अरविंद बाबू यांनी आपल्या एका लेखात, कै. न्या. मू. म. गो. रानडे यांच्या संबंधाने एकदा असे उद्‌गार काढले होते की, "सुधारक, देशभक्त, अर्थतज्ज्ञ इत्यादि नात्यांनी न्या. रानडे यांस महाराष्ट्र जो एवढा मान देतो त्याचे कारण काय, असा प्रश्न एखाद्या परदेशस्थ गृहस्थाने विचारला असता त्याला एकदम उत्तर देणे जरा जड जाईल. त्यासाठी ज्या चळवळीशी, संस्थाशी, व व्यक्तीशी त्यांचा आत्मा व विचार निगडित झाले आहेत अशा अनेक चळवळीकडे, संस्थाकडे आणि व्यक्तीकडे आपणास बोट दाखवावे लागेल; व ज्यांना त्यांच्यामुळे प्रेरणा मिळाली व जे त्यांचेच कार्य सध्या पुढे चालवीत आहेत त्यांच्याकडे आपल्यास वळावे लागून, शेवटी त्या प्रश्नाचे उत्तर प्रति सवालात आपणास असे द्यावे लागेल की, न्या. मू. रानडे नसते तर महाराष्ट्र आज कोठे असता, व महाराष्ट्राखेरीज आजचा हिंदुस्थान तरी कोणत्या स्थितीत असता?" महाराष्ट्राच्या ठिकाणी सातारा जिल्हा, परदेशस्थाच्या ठिकाणी परप्रांतस्थ व हिंदुस्थानच्या ठिकाणी महाराष्ट्र अशी शब्दयोजना करून अगदी हाच

अभिप्राय ज्याच्या सार्वजनिक जीवनास तंतोतंत लागू करिता येईल असा महाराष्ट्रातील अगदी अलीकडील सार्थनामा पुरुषोत्तम म्हणजे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रागतिक आणि सार्वजनिक धुरीण, व त्याच रानड्यांचे सच्छिष्य कै. रा. ब. रा. रा. काळे हा होय.

## जीवनदाता सूर्य

सातारा जिल्ह्यातील कै. दादासाहेब करंदीकर व कै. रा. ब. काळे ही जोडी अखिल महाराष्ट्रात चंद्र-सूर्य म्हणून विख्यात होती. चंद्र म्हणजे कला आणि सूर्य म्हणजे जीवन; परंतु महाराष्ट्रांतर्गत सातारा जिल्हा आज तरी ( सन १९३७ ) नुसता कलाहीनच नव्हे तर जीवनहीनही झाला आहे. रा. ब. काळे यांच्या आयुष्याचे जो जो परिशीलन करावे तो तो त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणाने आणि शरीराच्या प्रत्येक कणाने समाज–सुधारणेचाच विचार व तदनुसार आचारोच्चार केला असल्याचे आढळून येते. ज्याने आपले तन देशासाठी वाहिले तो पुरुषसिंह एकवार धन्य होय ! ज्याने आपले तन आणि मन ही दोन्ही समाजासाठी अर्पिली तो पुरुषश्रेष्ठ द्विवार धन्य होय ! ! परंतु ज्याने आपले तन, मन व धन ही सारी आपल्या बांधवाच्या अभ्युदयार्थ वेचिली तो पुरुषोत्तम त्रिवार केवळ धन्यच नव्हे तर वंद्यही होय ! ! ! रावबहादुर ही महद्व्यक्ती या तिसऱ्या सर्वोच्च वर्गातील होती.

## ‘ पुरुषोत्तम ’ कोणाला म्हणावे ?

पुरुषोत्तमलक्षण सांगताना “यो लोकत्रयमाविश्य विभर्त्यव्यय ईश्वरः” असे गीताकाराने पंधराव्या अध्यायातील पुरुषोत्तमयोगात सांगून ठेवले आहे. जो ईश्वर आणि अद्वैत मानतो तो उत्तम पुरुष अथवा पुरुषोत्तम होय, हे गीताकाराचे लक्षण व हा गीताप्रतिपादित गुण चरित्रनायक रावबहादुर काळे यांना चांगला लागू पडतो. जो स्वगुणे कीर्तिमंत होतो तो पुरुषोत्तम होय हे सुभाषितही त्यांना उत्तम लागू पडते. ते ज्या प्रार्थनासमाजाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते होते त्या प्रार्थनासमाजधर्माचे तर ईश्वर आणि अद्वैत हे

वैशिष्ट्यच आहे. किंबहुना प्रार्थनासमाजवाद्यांनी पुरुषोत्तमाचा गुण व उत्तम पुरुषाचे लक्षण "ईश्वर आहे व तो एकच आहे" असे ब्रीद पत्करून, तद्दर्शक "एकेश्वरी" या शब्दाने गीतेपेक्षाही अधिक सुटसुटीतपणे व थोडक्यात व्यक्त केले आहे असेही लिहावयास हरकत नाही. ईश्वर आहे, व तो एकच आहे, असे म्हटल्यावर द्वैत राहिलेच नाही, अर्थात् एके प्रकारे अद्वैत म्हणजेच ईश्वर असेही म्हणावयास व मानावयास काही हरकत नाही. रावबहादुर हे समर्थसाहित्याचे विशेष अभ्यासी व व्यासंगी असल्याचे सर्वांना सुपरिचितच आहे. समर्थांनी आपल्या ग्रंथराज दासबोधात उत्तम पुरुषाची जी अनेक लक्षणे सांगितली आहेत. त्यातील काही अशी आहेत:– "ऐक्यतेसी फोडूं नये, विचारेंविण बोलूं नये, संतसंग खंडूं नये, विद्याभ्यास सोडूं नये, केल्याविण सांगूं नये, आपला पराक्रम." पुढे समर्थ म्हणतात– "प्रयत्न पुरुषें सांडूं नये, कष्ट करितां त्रासूं नये, कोणाचा उपकार घेऊं नये, घेतला तरी राखूं नये, परपीडा करूं नये, विश्वासघात." समर्थांनी पुरुषोत्तमाच्या गुण आणि लक्षणवर्णनात यानंतर तर अगदी बहारच केली आहे. ते लिहितात:– "व्यापकपण सांडूं नये, पराधीन होऊं नये, आपले ओझे घालूं नये कोणा एकासी ॥ बोलिला बोल विसरूं नये, प्रसंगीं सामर्थ्य चुकूं नये, निंदाद्वेष करूं नये, सत्य मार्ग सोडूं नये, असत्य पंथें जाऊं नये, कदा अभिमान घेऊं नये, असत्याचा" इतकेच नव्हे तर "अपकीर्ति ते सांडावी, सद्कीर्ति वाढवावी, विवेकें दृढ धरावी, वाट सत्याची." चरित्रनायक पुरुषोत्तमाचा या गुणांवर कसा आणि किती हक्क होता याची उत्कृष्ट साक्ष म्हणजेच त्याचे सारे सार्वजनिक आयुष्य ही होय.


## रावबहादुरांची भाग्यशाली कुंडली

### जन्मकाल

शके १७९०, श्रावण कृष्ण ८, शनिवार, रेवती तृतीय चरण, ता. ८ ऑगस्ट १८६८ रात्री, स्थानिक वेळ ११–४१, जन्मस्थळ विटे (सातारा) अक्षांश १७, रेखांश ७४.

### जन्मकाळची सायन भावचलित कुंडली

अग्निराशीत ५ ग्रह
वायुराशीत २ ,,
पृथ्वीराशीत ० ,,
जलराशीत ४ ,,
केंद्री २ ,,
पणफर ५ ,,
आपोक्लीम ४ ,,




### १९३५–३६ ची दिनवर्ष ग्रहस्थिति

राहु सिंह २२; नेपच्यून मेष १५; हर्शल कर्क १७; शनि धनु ३; गुरु मेष ७; मंगळ सिंह ६; सूर्य तुला २१; शुक्र कन्या ६; बुध वृश्चिक १६; चंद्रतुला ६ ते १९ अंश.

### मृत्यु ता. १७ जानेवारी १९३६ त्यावेळचे ग्रह

सूर्य मकर २६; चंद्र वृश्चिक ५; मंगळ मीन २; बुध कुंभ १५; गुरु धनु १५; शुक्र धनु १६; शनि मीन ७; हर्शल वृषभ १; नेपच्यून कन्या १६; राहु मकर १२ अंश.

### कुंडलीवर्णन

कै. रावबहादुरांचा जन्म मिथुनरास क्षितिजावर असताना झाला. ही बुधाची राशि आहे. ही राशि लग्नी असताना जन्मणारी मनुष्ये विद्याव्यासंगी, लेखनवाचनाची आवड असणारी, भाषाशास्त्रज्ञ, सुस्वभावी, उदार व विचारी असतात असे ग्रंथात वर्णन आहे. ते रावबहादुरांचा चरित्रस्वभाव, विद्याव्यासंग व दानधर्म यांस हुबेहूब लागू पडते. मिथुन राशीच्या सहाव्या

उगवत्या अंशाचे वर्णन असे आहे– "It indicates a person of learning, sound reason, dispassionate judgement, elegant manners. The native will succeed in his duties and profession and will become famous and popular. He will be rich and live to a good age." हे वर्णनही त्यांना तंतोतंत लागू पडते. ईश्वरास व्यक्तीकडून जें कार्य करवून घ्यावयाचे असते तद्दर्शक क्षणास तिला तो जन्मास घालतो असे यावरून दिसते. तेव्हा ती व्यक्ती जन्मास घालण्याचा ईश्वरी संकेत केवळ फलज्योतिष शास्त्रच दाखवू शकते. ह्या मिथुन राशीत लग्नी मंगळ पडल्याने काळ्यांच्या आयुष्यक्रमात घडाडी, उदारपणा, निर्भयता व मनाचा मोकळेपणा दिसून येतो. लग्नेश बुध तृतीय स्थानी नवमेश–दशमेश अशा शनीच्या त्रिकोणस्थानी अगदी अंशात्मक पडल्याने म्हणजे शनिबुधशुभदृष्टिसंबंधामुळे त्यांना कायद्यात निष्णातता प्राप्त झाली. पंचमेश व लग्नेश बुध हा पराक्रमात शनीच्या शुभदृष्टीत पडल्याने बुद्धिमत्ता व उत्तम विद्यार्थी दशा ह्यास जसा तो कारण झाला तसा गुरु चंद्र नेपचून ह्या तीन ग्रहांचा लाभस्थानातला युतियोग त्यांना संस्कृतात स्कॉलरशिप्स मिळवून देण्याला, संस्कृत परीक्षकाच्या मानाला, फेलोशिपला व भाषाप्रभुत्वाला कारण झाला. बुद्धिमत्तेस मिथुन लग्न व तृतीयस्थ बुध कारण झाला तर विद्यार्थी स्थितीतल्या लौकिकास गुरुचंद्रयुति कारण झाली. दशमस्थान कार्यकर्तृत्वाचे आहे. तेथे कुंभराशि स्वामी शनि हा कायदा दर्शवितो. ह्या शनीचा व लग्नेश बुधाचा त्रिकोण दृष्टियोग झाला व लग्नी मिथुन ह्या वक्तृत्व राशीत मंगळ दशमभावारंभापासून बरोबर एकशेवीस अंशावर पडला, हे दोन योग त्यांस स्वतंत्र वकिलीच्या धंद्यात पडण्यास कारण झाले. पराक्रमस्थानी सिंह या राजराशीत सूर्य व लाभस्थानी गुरुचंद्र हा त्रिकोण सरकारी वकिली व रावसाहेब व रावबहादुरी देण्यास कारण झाला. लोकमान्यांची हीच गुरुचंद्रयुति भाग्यस्थानी होती, म्हणून स्थानमहात्म्यामुळे ते केवळ लोकमान्य झाले. रावबहादुरांचे गुरुचंद्र लाभस्थानी द्वितीयस्थानी सूर्याच्या शुभ दृष्टीत असल्याने व कर्मस्थानी शनि या सेवावृत्ति ग्रहाची राशि पडल्याने रा. ब. काळे हे सरकारी वकिली करीत होते तथापि गुरुचंद्र युतीने लोकमान्यता मिळवून सूर्यचंद्र त्रिकोणामुळे ते राजमान्यही झाले. ह्यामुळेच त्यांना "नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" असे म्हणावे लागते व या योगास कारण केवळ सूर्याचा

गुरु चंद्राशी पराक्रम-लाभ या स्थानातून त्रिकोण झाला हेच होय. तृतीयस्थ बुध व लग्नी मिथुनस्थ मंगळ यामुळे त्याजकडून ग्रंथनिर्मिति झाली. गुरु चंद्र धर्मभाग्यस्थानी पडल्याने लोकमान्यांनी गीतारहस्य लिहिले तर लाभ-स्थानाच्या गुरुचंद्रनेपच्यून त्रयीमुळे रा. ब. काळे यांनी धर्मार्थदीपिका लिहिली. रा. ब. काळ्यांचा लोकलबोर्ड, म्यु. कमिट्या, कायदे कौन्सिले ह्यांच्याशी सन्मानकारक संबंध येण्यास कुंभ ही एकादश स्थानदर्शक राशी दशमस्थानी कर्मकेंद्र पडली हे एक कारण, एकादश स्थानाचा स्वाभाविक स्वामी शनि हा लग्नेश बुधाशी त्रिकोणात पडला हे दुसरे, व खुद्द एकादश स्थानी गुरुचंद्रनेपच्यून हे सूर्याच्या त्रिकोणात पडले हे तिसरे व महत्त्वाचे बलिष्ठ कारण होय. ह्यामुळे त्यांचा अनेक सार्वजनिक संस्थांशी संबंध आला व ते त्या संस्थांचे चालक, आश्रयदाते व सूत्रधार झाले. ते कट्टे समाज व धर्म-सुधारक व कार्यकर्ते होण्यास धर्मस्थानाची मकर राशि व ह्या राशीचा स्वामी शनि बुधाच्या शुभ दृष्टीत पडला हे कारण झाले. शुक्र, हर्शल व गुरुचंद्र ह्यांचा केंद्रयोगही ह्या शनिबुधत्रिकोणाच्या धार्मिक व सुधारक वृत्तीत भर घालण्यास कारण झाला. लग्नस्थ मंगळाचे धडाडीने त्यांच्या-सारखा कर्ता, सुधारक व पुढारी लाभला. कर्क या प्रपंचसुखाच्या राशीत, शुक्राजवळ हर्शल हा पुत्रकारक गुरुच्या केंद्र दृष्टीत पडला व स्वाभाविक पंचम स्थानदर्शक सिंह राशीत आत्मतत्वकारक सूर्याजवळ सुखस्थानी राहु पडला व तो पुत्रशोकास कारण झाला. सारांश जसे चरित्र तशीच हुबेहूब ग्रहपरिस्थिती आहे, ह्यावरून ईश्वराचे दूरदर्शित्व व फलज्योतिषाची सत्यता कोणासही पटेल. 'घडलेल्या गोष्टी कोणीही जुळवून दाखवील, यात काय कौशल्य ?' असे कोणी म्हणेल, पण हेही काम बिकट आहे. ग्रंथ अगोदरच ग्रहवर्णने लिहून गेलेले असतात. तेव्हा त्या त्या वस्तुस्थितिदर्शक ग्रहांचाच संबंध शास्त्रशुद्ध कुंडलीत कसा लागू पडतो हे ग्रंथातील नियमास व फलास अनुसरून सिद्ध करणे कुशलतेचे काम आहे व अशी अनेक उदाहरणे गतानुभव व ग्रह ह्यांचा मेळ घालून सोडविता आली तर अगदी नवीन-उदाहृणावरूनही भविष्य वर्तविण्याची हातोटी सहजसाध्य होईल. वैद्यकीय शाखेत असेच प्रथम प्रयोग नाही का करीत ? का प्रत्येक हॉस्पिटलात उदाहरणादाखल सजीव मनुष्याचा उपयोग करतात ?

### दिनवर्षपद्धतीने कालनिर्णय

आता दिनवर्ष पद्धतीनें कुंडलीवरून चरित्राचे महत्त्वाचे काल वर्तवणे झाल्यास दशम बिंदु कुंभ २६, शनि वृश्चिक २९, अंतर ३ वर्षे, यावेळी रावबहादूर रावजी रामचंद्र काळे यांची माता कैलासवासी झाली. दशम बिंदु कुंभ २६ व जन्मकाळचे चंद्र नेपच्यून गुरु मेष १४ ते १७, अंतर ५० ते ५२ अंश, म्हणजे वयाचे बावन्नाव्या वर्षी कै. काळे हे रावबहादुर व मुंबई कायदे कौन्सिलचें सभासद झाले. दशम बिंदु कुंभ २६ हा मीन १६ होऊन मूळ शुक्रांशी त्रिकोणात २० वर्षांनी येतो, १८६८+२० म्हणजे १८८८ मध्ये तें B. A. झाले. १९१३ मध्ये तें रावसाहेब झाले, त्यावेळी लग्न बिंदूवर हर्शल शुक्र, व दशम बिंदूजवळ गुरु चंद्र होतें. वार्षिक दशम बिंदु मीन २९, शनि वृश्चिक २९, वय ३४ ला दशमेश शनीचा प्रोग्रेसिव्ह दशम भावारंभाशी त्रिकोण झाला, म्हणजे ह्यावेळी १९०२ मध्ये ते प्रथम सरकारी वकील झाले.

### गोचर ग्रहांची फले

आता गोचर ग्रहांची फले पाहता असे दिसते की १९०२ मध्ये ते सरकारी वकील होतांना शनि भाग्य स्थानी मकर राशीत गुरु दशमस्थानी कुंभराशीत होता. १९१३ मध्ये ते रावसाहेब होताना शनि लग्नी व गुरु भाग्यात होता. १९२० मध्ये शनि–गुरु दोन्ही ग्रह पंचम स्थानाचे प्रारंभी व हर्शल दशम स्थानी असता ते कौन्सिलर झाले. सारांश जन्मकाळी ज्या ज्या राशीत व ज्या ज्या स्थानात जसे जसे ग्रह पडले तसा तसा त्यांचा ठसा, त्यांची छाप जशी चरित्रात दिसून येते तशीच भविष्यकाल वर्तविण्याच्या पद्धतीप्रमाणे, दिनवर्ष पद्धतीने व गोचर ग्रहाप्रमाणेही त्या त्या वेळच्या ग्रहाची राशि स्थान स्थितीची फळे कालानुक्रम व महत्त्व दर्शवितात.

## जन्म व कुलवृत्त

### जन्म व कुलवृत्तांत

कै. रा. ब. काळे यांचा जन्म ता. ८ ऑगस्ट १८६८ रोजी श्रावण मासात गोकुळाष्टमीस रोहिणी नक्षत्री, रात्री ११॥ च्या सुमारास सातारा

जिल्ह्यात विटे येथे श्री. नारायणराव बापट यांच्या घरी झाला. त्यांच्या मातोश्रींचे नाव सौ. जानकीबाई व पित्याचे नाव श्री. रामचंद्रपंत असे असून कै. काळे हे या उभयतांचे सर्वात कनिष्ठ व लाडके चिरंजीव होत. रावबहादुरांना प्रथमपासूनच कौटुंबिक सौख्याचा लाभ विशेष झालेला दिसत नाही. कारण त्यांच्या मातोश्री त्यांच्या वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षीच कालवश झाल्या श्री. रामचंद्रपंतानी कालांतराने द्वितीय संबंध केला होता. या द्वितीय संबंधापासून यमुना व शंकर अशी दोन अपत्ये पैकी श्री. शंकरराव हे कैलासवासी झाले असून मुलगी यमुना ही पुण्यात असते. तिचे ज्यांच्याशी लग्न झाले ते लिंब-गोवे येथील श्री. श्रीधरपंत गाडगीळ हेही आता कैलासवासी झाले आहेत. मातृछत्र नष्ट झाल्यानंतर त्याचे लालनपालन काही वर्षें त्यांच्या वडील बहिणीने व पुढे काही वर्षे त्यांच्या चुलतीने केले. बेळगावचे श्री. के. व्ही. चाफेकर पोलीस सब इन्स्पेक्टर यांच्या मातोश्री म्हणजेच कै. रा. ब. काळे यांची ज्येष्ठ भगिनी व कै. जानकीबाईचे अगदी प्रथमापत्य होय. तिचे आज (१९३७) सुमारे ८५ वर्षांचे वय आहे. कै. रा. बा काळे यांच्या कुटुंबातील बहुतेक मंडळींनी याप्रमाणे दीर्घायुष्य उपभोगिलेले आहे, व आजही काही उपभोगीत आहेत. साष्टांग नमस्कार न घालताही रावबहादुरांची प्रकृती जवळजवळ अखेरपर्यंत, त्यांना अशक्त प्रकृती तरुणांनी साष्टांगच नव्हे तर सर्वांग नमस्कार घालावेत अशी सशक्त व खणखणीत होती. त्यांचे बालपण वडलांच्या निरतिशय प्रेमामुळे एकंदरीने सुखात गेले. त्यांच्या जन्मकाली त्यांचे वडील श्री. रामचंद्रपंत हे विटे येथे फडणीस म्हणजे अव्वल कारकून होते; व त्यानंतर काही दिवसांनी त्यांना रत्नागिरीची मामलेदारीही मिळाली होती. त्यांनी पेन्शन घेतले ते या मामलतीनंतरच होय. 'ट्रान्सलेशन Lessons in English Transaltion चे कर्ते कै. गोविंदराव काळे हे रावबहादुरांचे ज्येष्ठ बंधु होत. ते प्रथम औरंगाबाद कॉलेजचे प्रिन्सिपाल व नंतर हैद्राबाद शिक्षणखात्याचे इन्स्पेक्टर होते. कै. जानकीबाईंना एकूण आठ अपत्ये झाली. त्यापैकी हे दोघे बंधू व त्यांची वडील बहीण इतकीच काय ती अखेरपर्यंत हयात होती आणि आज तर त्यातील फक्त एक वरील वडील बहीणच काय ती उरली आहे. श्री. गोविंदराव हे आपल्या वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी ( १५ डिसेंबर १९१५ ) रावबहादुरांच्या येथील गावातील राहत्या वाड्यात

कैलासवासी झाले, व त्यांचे चिरंजीव व अ. प. प्रॉसिक्यूटर श्री. आबासाहेब काळे हेही काही वर्षांपूर्वी (१९३३) कैलासवासी झाले.

## प्राथमिक शिक्षण

रावबहादुरांना ए. बी. सी. चे धडे कै. गोविंदरावांनी घरीच दिले व याप्रमाणे त्यांचे तीन इयत्ताचे इंग्रजी शिक्षण काही घरीच व काही वडलाबरोबर फिरतीत झाल्यानंतर मग त्यांनी सातारा हायस्कूलात प्रवेश केला. येथे रावबदादुर हे इंग्रजी चौथ्या इयत्तेत असताच व औंधचे श्रीमंत राजेसाहेब बाळासाहेबपंत प्रतिनिधी हे पहिल्या इयत्तेत असताच था दोघांचा प्रथम परिचय झाला. हायस्कूलमधील त्यांचे सहाध्यायी म्हणजे श्री. जनुभाऊ वैद्य व वामनराव मुळे इत्यादि होत. त्यांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यास ज्या शाळेत झाले तीच शाळा पुढे इंग्रजी शाळेत रुपांतरित होऊन तदनंतर ती डी. ई. सो. ला जोडण्यात आली. साताऱ्यातील सुप्रसिद्ध न्यू इंग्लिश स्कूल या संस्थेचा ही शाळा हा पाया होय.

## मौजीबंधन व विवाह

सातव्या वर्षी पेठ नेरले येथे रावबहादुरांचे मौजीबंधन आणि तदनंतर वयाच्या अकराव्या वर्षी पंढरपूरला त्यांचे लग्न झाले. श्रीमंत बुधगावकराचे खाजगी कारभारी श्री. तात्यासाहेब दातार मिरजकर यांची कन्या श्री. मनुबाई या त्यांच्या पत्नी होत. त्यांचे सासरचे नाव श्री. सौ. सत्यभामाबाई असे असून विवाहकाली त्यांचे वय अवघे ६ वर्षांचे होते. रावबहादुरांचा व सत्यभामाईचा जोडा मोठा खासा जमला होता. दोघेही कर्तृत्ववान्, दोघेही यत्नवादी, दोघेही व्यवस्थित व नियमित, आणि दोघेही रुबाबदार! अशा रत्नं समागच्छतु कांचनेन नामक अपूर्व योगामुळे, गृहस्वास्थ्य व गृहसौख्य यांचा या दंपत्त्यास सामान्यतः उत्तम लाभ झाला. रावबहादुरांनी पुढे सार्वजनिक कार्यक्षेत्रातील रणांगणावर ज्या अनेक यशस्वी लढाया मारल्या, त्यांचे मूळ त्यांना प्राप्त झालेल्या या कौटुंबिक सुखात व प्रापंचिक समाधानातच आहे. त्यांचे घराणे जरी अलीकडे जिल्ह्यातील पुसेगावी स्थायिक झाले होते तरी रावबहादुरांचे मूळ गाव कोकणातील राजापूर तालुक्यातील

मणसगाव हे होय. त्यांच्या घराण्यातील पारंपारिक कुलदैवताचे नाव व्यापारेश्वर असे असून महाकाली ही त्यांची कुलदेवता आहे.

## 'पुरुषोत्तमा' चे 'रावजी' कसे झाले?

काळयांचे जे नाव आज सर्वांस ठाऊक आहे ते रावजी असे आहे हे खोटे नव्हे परंतु त्यांचे पाळण्यातले खरे नाव पुरुषोत्तम असे होते, ते वडलांचे सगळ्यात आवडते असल्याने त्यांस लाडिकपणाने रावजी, राव, राववा, असे म्हणण्यात येत असे; व त्यातच अखेर रावजी हे त्यांचे नाव कायम झाले, व तेच शेवटपर्यंत राहिले. आपली ही दोन्ही नावे आपल्या कृतीने आणि कीर्तीने रावबहादुरांनी सार्थनामे केली यात मात्र शंका नाही. त्यांच्या निकटवर्ति मित्रमंडळीतील त्यांचे नाव रावसाहेब असे होते व आप्तमंडळीतील त्यांचे नाव तात्यासाहेब असे होते. रावबहादुरांना ३ मुली व ४ मुले अशी सात अपत्ये झाली त्यापैकी बॅ. राजारामपंत ऊर्फ बाबासाहेब काळे हे परवापर्यंत (सन १९२५ पर्यंत) विद्यमान होते, व श्री. सौ. सुशीलाबाई ऊर्फ ताईसाहेब (सौ. प्रमिलाबाई धनंजयराव गाडगीळ) या कुलभूषणा म्हणून सांप्रत सर्वास सुपरिचित आहेत.

# उच्च शिक्षण व अध्यापन

## साताऱ्याहून पुण्यास

रा. ब. काळे यांचे दुय्यम शिक्षण सातारा हायस्कूलच्या नंतर विश्रामबागेतील पूना हायस्कूलमध्ये झाले. शाळेतील हुषार व मेहनती विद्यार्थ्यांत त्यांची नेहमी अग्रस्थानी गणना होत असे, व त्यांनी तो आपला लौकिक पुढे कॉलेजात आणि नंतर वकिलीच्या धंद्यातही कायम ठेविला होता. रावबहादुरांना संस्कृत विषयाची प्रथमपासूनच फार गोडी असे. अनेक संस्कृत श्लोक व उतारे त्यानी मुखोद्गत केले होते, व व्याकरणाची सूत्रेही त्यांच्या जिव्हाग्री वास करीत असत. संस्कृतमधील त्यांच्या प्राविण्यामुळे त्यांना १८८५ साली मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेतील दुसरी जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली. या वर्षी पहिली शिष्यवृत्ति पुणे न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी

नाशिकचे श्री. नीळकंठ पाटणकर वकील यांनी पटकाविली होती. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाल्यानंतर सतत चार वर्षे जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति ते पटकावीत होते, व पूना हायस्कूल मागे पडले होते. रा. ब. काळे यांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाल्यामुळे त्यांच्या बरोबरच पुन: पूना हायस्कूलचा लौकिक वाढला. त्यांची बुद्धिमत्ता कशी तीव्र होती याचे तत्कालीन प्रत्यंतर म्हणजे मॅट्रिकचे परीक्षेत कोणालाही उमजली नाही ती 'भवानीपति' या शब्दातील भाषाशास्त्रदृष्ट्या असलेली चूक त्यांनी स्पष्ट करून दाखविली; व त्यामुळेच त्यांचा संस्कृत परीक्षेत दुसरा नंबर येऊन त्यांना सदरील जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. तैलबुद्धीबरोबर त्यांचे वागणेहि संभावित व कळकळीचे असल्याने प्रि. सेल्बी, प्रो. भांडारकर व इतर प्रोफेसर यांचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम असे.

## स्वतंत्र विचाराचा छोटा मासला

संस्कृतमधील आपला पहिला नंबर श्री. पाटणकरांनी प्रीव्हिअसमध्ये कायम ठेविला. परंतु काळ्यांनी त्यांना डेक्कन कॉलेजात इंटरमध्ये मागे टाकले; व १८८७ मध्ये वरजीवदास माधवदास स्कॉलरशिप व १८८८ मध्ये बी. ए. मध्ये पहिला वर्ग मिळवून संस्कृतमध्ये अत्युच्च गुण मिळविल्याबद्दल भाऊ दाजी प्राईझ मिळविले. रावबहादुर मॅट्रिक परीक्षेचे वेळी अवघे १६।१७ वर्षांचे होते. यावेळची त्यांची एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. एकदा ते असेच जेवायला बसले होते, इतक्यात तेथल्या बाकीच्या बहुतेक धर्मठरुवांनी "तुम्ही धर्मभ्रष्ट झाला, धर्मभ्रष्ट" असा एकाएकी एकच गिल्ला केला. कारण काय, तर रावबहादुर जेवावयाला ओवळ्यानेच बसले होते, सोवळे नेसले नव्हते! परंतु लगेच त्यांनी या आक्षेपकांस त्या तरुण वयातही तेथल्या तेथेच असे रोखठोक उत्तर दिले की, 'असल्या बहुविध बाह्याचारास सनातनधर्म समजणे हीच मुळी चूक होय. धर्माच्या अंतरंगाच्या यथार्थ ज्ञानाचा अभाव हेच या घोटाळ्याचे कारण आहे.' स्वतंत्र विचार म्हणून ज्याला म्हणतात तो इतक्या अल्प वयापासूनच चरित्रनायकात कसा उदित झाला होता याचा या गोष्टीपासून बोध घेण्याजोगा आहे.

## रावबहादुर प्रोफेसर का झाले नाहीत ?

डेक्कन कॉलेजात काळे बी. ए. झाले त्यावेळी पुण्याचे बॅ. आप्पासाहेब गाडगीळ हे मॅट्रिक झाले होते. व पुढील वर्षी ते काळ्यांचे विद्यार्थी होते. हल्ली पेन्शनर असलेले डिस्ट्रिक्ट जज्ज सरदार बापूसाहेब काळे हे काळे यांचे त्या वेळचे सहाध्यायी होत. पुढे पुण्याचे डेक्कन व मुंबईचे एलफिन्स्टन या दोन्ही कॉलेजात काळ्यांना 'दक्षिणा फेलो' शिप्‌चा मान मिळून त्याच मुदतीत एलफिन्स्टन कॉलेजात संस्कृत लेक्चररचे व पुढील काही मुदतीत संस्कृत प्रोफेसराचे कामही त्यांनी केले. त्यांच्या त्या वेळच्या विद्यार्थ्यांपैकी मुंबई सरकारचे माजी शिक्षणमंत्रि श्री. भास्करराव जाधव हे एक होत. या अध्यापनाच्या काळात त्यांनी बाणभट्टाचे 'हर्षचरित्' इंग्रजी टीपा देऊन प्रसिद्ध केले होते. पुढे १८९१ मध्ये त्याच्या उत्तरार्धाच्या टीपा देण्याचे काम श्री. ना. गो. चाफेकर सर न्यायाधीश औंध, यांच्याकडे गेले; व तेव्हा-पासूनच या दोघांचा परिचय झाला. औंधचे श्रीमंत राजेसाहेब हे डेक्कन कॉलेजात गेले त्यावेळी काळे फेलो असून त्यांनीच त्यांना शाकुंतल, रघुवंश इत्यादि काव्ये शिकविली आहेत. त्याचप्रमाणे मुंबईचे माजी न्यायमूर्ति व अखिल भारतीय महिला विद्यापीठाचे चॅन्सेलर श्री. सी. सुं. पाटकर यांसही ते एलफिन्स्टन कॉलेजात फेलो होते. ते मोठे आस्थेवाईक अध्यापक होते. नीट तयारी केल्याखेरीज ते वर्गावर जात नसत, व त्यामुळे अखंड व सबंध तास ते विद्यार्थ्यांना व्याख्यानात गुंतवून ठेवीत. अस्खलित वक्तृत्वाची कलाही त्यांनी साध्य केलेली होती यानंतर अध्यापनाचा व्यवसाय सोडून व एल्. एल्. बी. ची डिग्री घेऊन त्यांनी सन १८९२ पासून साताऱ्यास वकिली करण्यास सुरुवात केली. तथापि त्यानंतरही युनिव्हर्सिटीत इंटरमिजिएट व बी. ए. या परीक्षांसाठी संस्कृतचे परीक्षक होण्याचा मान त्यांना अनेकदा मिळाला. अन्य व्यवसायात पडल्यानंतरही हा मान मिळाल्याचे त्या काळातील त्यांचे उदा-हरण विशेष उल्लेखनीय होय. वस्तुतः यावेळी रावबहादुरच एलफिन्स्टन कॉलेजात कायमचे प्रोफेसर व्हावयाचे, पण आपल्या चिरंजीवांसाठी प्रो. भांडारकर यांनी रावबहादुरांपेक्षा विशेष प्रयत्न केल्याने ती जागा पुढे त्या चिरंजीवांना मिळाली. पण यामुळे एक मोठा फायदा झाला, व तो म्हणजे काळ्यांना मिळालेली महाराष्ट्राची राजकीय प्रोफेसरशिप हा होय. त्यांच्या–

बरोबर पदवी घेणारात त्यावेळी बॅरिस्टर वेलिनकर हे होते. काळयांनी साताऱ्यास सुरू केलेली वकिली जरी धूम धडाक्याने चालू लागली तरी त्यांनी आपल्या अध्ययनास मात्र रजा दिली नाही.

## चारित्रनायकाची अप्-टु-मिनिट ज्ञानलालसा

रा. ब. काळयांच्या उज्वल चारित्र्याला असे अष्टच काय पण अनेक पैलू असून त्यांनी ते आमरण कष्ट करून संपादिलेले आहेत. त्यांच्या इतके संस्कृताचे दांडगे व खोल व्यासंगी आजच्या पुढाऱ्यातही थोडेच आढळतील. रावबहादुरांसारखे ज्ञानार्जनी मनुष्यही थोडेच. ज्ञान हा जसा संपत्संपादनाचा मार्ग आहे, तसाच ज्ञान हा विपत्संहारणाचाही मार्ग आहे. मनुष्याच्या सुप्त शक्तीची परिस्फुटता एक ज्ञानच करू शकते, मनुष्याला स्वतःची जाणीव एक ज्ञानच करून देते, आणि मनुष्याला निसर्गावरही विजय मिळवून देण्याची संधि एक ज्ञानच प्राप्त करून देऊ शकते. अशा ज्ञानाचे रावबहादुर हे एक मोठे उपासक आणि आराधक होते आणि असे कोणते उपास्य दैवत अगर आराध्य दैवत आहे की, जे उपासकाच्या निःसीम उपासनेला व आराधकाच्या असीम आराधनेलाही पावत नाही ? ज्ञानाचा कण मग तो कोठेही असो, सभेत असो, वाचनालयात असो, प्रवासात असो अगर चर्चेत असो, असेल तेथून तो टिपुन घेण्यात रावबहादूर एक क्षणही व्यर्थ घालवीत नसत. या बाबतीत ते अगदी अप्-टु-डेटच नव्हे तर अप्-टु मिनिट होते ! विवेकानंदांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'आपले सामर्थ्य मर्यादित आहे ही कल्पना आपल्यास झुगारून देता आली, तर सर्व गोष्टी याच क्षणी साध्य करणे आपल्यास शक्य आहे. कालावधीचाच प्रश्न असेल, तर आपले सामर्थ्य वाढवून कालाची गति कमी करणे आपल्या हाती आहे. संगमरवरी दगड कसा तयार होतो हे शोधून काढून एका शास्त्रज्ञाने बारा वर्षाच्या अवधीत तसा दगड तयार केला. असला दगड बनविण्याला सृष्टीला कित्येक शतकांचा काल लागतो. कित्येक शतकांनी सृष्टीकडून होणारी गोष्ट मनुष्याने, अवघ्या एक दीड दशकाच्या अवधीतच सिद्ध करून दाखविली, ती केवळ ज्ञानाच्या सामर्थ्याने होय.' रा. ब. काळे यांनी ज्ञानाच्या बळावरच धन संपादिले, मान संपादिला,

इतकेच नव्हे तर महाराष्ट्रीय समाजात स्वतःला महत्त्वाचे विशिष्ट स्थानही संपादिले !

## कौटुंबिक माहिती

### सौ. सत्यभामाबाई काळे


पतीच्या नावावर पत्नीचे नाव होणे ही गोष्ट सामान्य आहे, पण पत्नीचे नाव स्वतंत्रपणे चमकणे ही गोष्ट असामान्य आहे. कै. सौ. सत्यभामाबाई ऊर्फ वहिनीसाहेब काळे या अशा असामान्य स्त्रीवर्गात ठळकपणे शोभून दिसत असत. रा. ब. काळे यांच्यासारख्या सदैव व सर्वथैव कार्य-व्यापृत असलेल्या प्रगतिशील पुढारी पतीचे पत्नीपद त्यांनी अलंकृत केले, आणि अंगीकृत मर्यादित कार्य पार पाडले यातच त्यांची ही असामान्यता प्रतीत होते. स्वावलंबी स्त्रीवर्गाची सिद्धता करणे, एवढेच कार्य व ध्येय त्यांनी आपल्यापुढे ठेवले होते. साताऱ्यातील कन्याशाळा व सेवासदन (म्हण-जेच हल्लीचे सौ. सत्यभामाबाई काळे स्त्रीशिक्षणमंदिर) ही त्यांच्या या महत्त्वाकांक्षेचीच फुले फले होत. 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ' असे कालिदासाने फक्त काव्यातच सांगितले, परंतु सौ. सत्यभामाबाईंनी ते कृतीतही आणून दाखविले. रा. ब. काळे यांच्या आज-वरच्या जनसेवेचे निम्मे श्रेय अगर या यशातील प्राप्तीचा अर्धा वाटा सौ. सत्यभामाबाईंचा आहे व त्यांचे प्राणहरण करणाऱ्या काळाला त्यांचे हे यश-हरण तरी खास करता येणार नाही. विवाहसमयी त्यांची स्थिती सर्वस्वी प्रतिकूल होती. अल्प वय, जुने वळण आणि सामान्य आर्थिक परिस्थिती अशा त्रिविध संकटात त्यांनी आपली सांसारिक आयुष्यनौका लोटली. ही नौका पैलतीरी सुरक्षितपणे पोचावयाला हवी असेल तर तिचे वल्हे शिक्षणाचे आणि तिचे शीड जुन्या-नव्याच्या समन्वयाचे असले पाहिजे, असे त्यांना यानंतर अल्पावधीतच कळून आले. मूळचे यत्किंचितही शिक्षण नसता, त्या पुढे शिक्षित झाल्या, व त्यांचे मूळचे आचार-विचार जुन्या तऱ्हेचे असता, नवे आचार-विचार त्यांच्याशी सख्य व स्नेह करू लागले; याचे कारण हे असे आहे. स्वावलंबनात्मक स्त्रीशिक्षण हेच आपले जीवितकार्य त्यांनी का

ठरविले, याचा उलगडाही यामुळे चांगला होईल. आपल्या घरी होणारी प्रार्थना समाजाची प्रवचने असोत, स्वतः महिला समाजाकरिता काढलेली व्याख्यानमाला असो, आर्यांग्लवैद्यक विद्यालयाचा सवाल असो, ( रयत शिक्षण संस्थेचे ) शाहू बोर्डिंगचे कार्य असो, मॅटर्निटी होमचे काम असो, इंटरनॅशनल फेलोशिपसारख्या बंधुभाववर्धक संस्थेला कसली जरूर लागो, कन्याशाळेची काही अडचण निघो, अस्पृश्योद्धाराची गोष्ट निघो, किर्लोस्कर बंधूचा विषय असो, स्वदेशी प्रदर्शनाची गडबड असो, ऐक्यसंपादन मंडळाची बाब असो अथवा सेवासदनाचा प्रश्न असो, या प्रत्येक गोष्टीत त्या जरूर तर जातीने व मेहनतीने लक्ष घालीत व शक्य तो सहाय्य पण करीत. राव-बहादुरांच्या सर्व सार्वजनिक कार्यात आपल्यावर पडलेला बोजा त्या हौसेने उचलीत, इतकेच नव्हे; तर तो समाधानकारकपणे पारही पाडीत. रावबहा-दुरांचे आजचे ( लौकिक ) वैभव फार थोर होते खरे; परंतु त्यांचे हे कालचे (गृह) वैभव त्याहूनहि थोर होते. संसारदेवतेची समाजहितबुद्धीने समारा-धना करताना सत्यभामाबाईंनी आपली बाजू पतीपेक्षा कोणत्याहि प्रकारे व कोणत्याही क्षेत्रात कमी पडू दिली नाही. प्रयत्नप्राप्त शिक्षणाने त्या 'जुने ते सारेच सोने नव्हे, व नवे ते सगळेच हवे असे नव्हे' अशा सुवर्णमध्यसाध-काच्या भूमिकेवर अधिष्ठित झाल्यानेच त्यांना या सर्व गोष्टी शक्य झाल्या. सेवासदनाच्या कार्याध्यक्षपदावरून किंवा कन्याशाळा नियामक मंडळाच्या सभासदपदावरून त्यांनी जे कार्य केले नसेल ते या सहचारिणीपदावरून केले आहे. व म्हणूनच ते अमोल आहे. त्यांच्या प्रेमलतेची व सच्छीलतेची अगर त्यांच्या उदारतेची व सुगुणतेची साक्ष सातार्‍यातील एखाद्या पोरापासून तो एखाद्या थोरापर्यंत सर्वजण सारख्याच अहमहमिकेने देऊ शकतील. सेवासदन ही संस्था त्यांना कन्येसारखी वाटत असे; व मृत्यूशय्येवर असताही त्या तिच्या कार्याची व क्षेमाची चौकशी करीत; एवढेच नव्हे तर मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर जेव्हा या शाळारूपी कन्येच्या संसाराची सर्व व्यवस्था नीट लागली किंवा त्यांनी लावली तेव्हा कोठे त्यांच्या चित्ताला शांतता लाभली. ध्येयाचा ध्यास किंवा इष्टकार्याचा पाठलाग म्हणतात तो हा होय. या दांप-त्याचा अर्धशतकाचा संसार म्हणजे परस्पर सहकार्य व साहचर्य या द्विगुणांनी युक्त अशा समाजकार्याचा संसार होय. परस्पर उत्तेजन हाच या परस्पराचा

प्राण होता. सौ. सत्यभामाबाई ज्या दिवशीं आजारी पडल्या, त्याच दिवशी रावबहादुर इस्लामपूरच्या रयत परिषदेच्या अध्यक्षस्थानाची जबाबदारी पार पाडण्यासाठी तेथे गेले होते; भर आजारातही युनिव्हर्सिटी, म्युनिसिपालिटी, कायदेमंडळे किंवा अन्य मंडळे वगैरे कामे त्यांना सतावीतच होती आणि सौ. वहिनीसाहेबांच्या प्रत्यक्ष मृत्युप्रसंगी तर किर्लोस्कर बंधूवरील किर्लोस्कर मॅनेजिंग एजन्सीचे कमिशन व किर्लोस्कर मासिकाचे धोरण याबाबतच्या अन्याय्य काहुराचा प्रतिकार कसा करावा, या विवंचनेत ते व्यग्र झाले होते. पण तरीही सौ. वहिनी–साहेबांनी त्याबद्दल कधी असमाधानदर्शक असा एक शब्दही काढला नाही व रावबहादुरांच्या कामात अडथळे आणून घोटाळे केले नाहीत. खरी समरसता आणि पुरी तन्मयता ती हीच नव्हे काय? अशा प्रसंगी त्या जाणत असत की, रावबहादुर तनाने आपल्या सन्निध नसले, तरी मनाने अगदी जवळच आहेत, किंबहुना त्यांचे व आपले कार्य परस्पर–पोषक असल्याने ते या कार्यरूपदृष्टया तनाने देखील आपल्यापासून बिलकुल दूर नाहीत. सुशिक्षित, सुस्वभावी व एकमेव पुत्राच्या चिरवियोगा–नंतर रावबहादुरांवर असलेल्या ध्येयभक्त व कार्यनिष्ठ पत्नीच्या मृत्यूची आपत्ति यावी, याचा अर्थ रावबहादुर जी एक जगच्चालक चिच्छक्ति मानीत व समजत, ती त्यांच्या जनसेवेची पूर्ण कसोटी पहात त्यांची सत्वपरीक्षा घेत होती इतकाच आहे. सौ. सत्यभामाबाई या उद्योग, उत्साह आणि उत्कर्ष यांची प्रत्यक्ष मूर्ति कशा होत्या, पतीला उत्साह देऊन आणि स्वतः उद्योग करून त्यांनी आपल्या संसारात आनंद कसा निर्माण केला, समाज-संसाराचाही उत्कर्ष कसा केला हे त्यांच्या चरित्रापासून व चारित्र्या–पासून निःसंशय शिकण्याजोगे आहे. मनुष्याचे खरे स्मारक म्हणजे एखादा पुतळा अगर सभास्थान किंवा शिष्यवृत्ति नसून त्याला प्रिय असलेले व लोकप्रियही झालेले कार्य अखंडितपणे आणि अविरतपणे जास्त जोमाने चालू ठेवणे हे होय. सौ. सत्यभामाबाईंचे सत्य स्मारक अशानेच होणार आहे. अशा स्मारकाला स्थलमर्यादा नसते आणि कालमर्यादाही नसते हे लक्षात ठेवून जर या कामी विशेषतः स्त्रीसमाज उद्युक्त होईल, तर सौ. वहिनीसाहेबांच्या व त्याबरोबरच रावबहादुरांच्या आत्म्यालाही खचित अत्यानंद होईल हे



कै. सौ. सत्यभामाबाई काळे
( मृत्यु १२-७-१९३४ )



सौ. सत्यभामाबाई काळे, रा. ब. काळे, चि. अजित गाडगीळ,
सौ. प्रमिलाबाई गाडगीळ, चि. सुलभा गाडगीळ, धनंजयराव गाडगीळ

निःसंशय होय. पति सरकारी नोकरी करीत असता पत्नी स्वराज्य व स्वदेशी असल्या विशेष विषयावर व्याख्यान देऊ शकते ही विस्मयजनक घटना एका पुरुषोत्तमाच्या सरकारी वकिलीच्या अंमदानीतच होऊ शकली. साताऱ्यातील १९०८ सालच्या दहशतीच्या काळातील चळवळीचा चित्रपट ज्यांच्या मनश्चक्षूपुढे अद्याप छायेसारखा पुसट का होईना पण उभा असेल त्यांनाच कै. सौ. सत्यभामाबाई काळे या सौ. सत्यभामाबाई आगाशे व कु. मथुराबाई जोशीप्रभृति स्त्रीकार्यकर्त्यांसह महिलाजनात स्वदेशीमुळे स्वराज्य असल्या विषयावर कशी समर्पक व प्रचारक स्वरूपाची व्याख्याने देत असत याचे स्मरण होईल. अशा रीतीने ही सत्कार्यरता सुगृहिणी शके १८५६ च्या आषाढ शुद्ध एकादशीस ता. १२-७-१९३४ रोजी कैलासवासी झाली. त्या सेवासदनाच्या सुपरिंटेंडेंट व सदनाच्या संचालक मंडळाच्या सेक्रेटरी होत्या. काळे दांपत्याचे हे एक वैशिष्ट्य आहे की त्यांनी आपापल्या थोर व श्रेष्ठ निकट आप्त मंडळींची यथायोग्य स्मारके करून त्यांच्या नैतिक ऋणातून आपली मुक्तता करून घेतलेली आहे. सौ. सत्यभामाबाईंनी याच दृष्टीने सेवासदनासाठी आपल्या सासूबाईंच्या–कै. सौ. जानकीबाईंच्या स्मारकार्थ व स्मरणार्थ त्यांच्या नावाने ५०० रुपयांचा एक कायमनिधि करून ठेवला आहे.

## बॅ. बाबासाहेब काळे

कै. रा. ब. काळे यांचे एकमेव चिरंजीव बॅ. राजारामपंत उर्फ बाबा-साहेब काळे हे सातारा शहरातील अगदी पहिलेच बॅरिस्टर होत. या पिता–पुत्रांनी सातारा शहराला व जिल्ह्याला अनेक ठळक गोष्टीत याप्रमाणे प्रथम स्थानाचा मान मिळवून दिला आहे हे विशेष होय. १९२१ ते १९२५ पर्यंतचा काल विलायतेत विद्यार्जनात घालवून व बॅरिस्टरीच्या परीक्षेत उत्तम यश मिळवून बॅ. बाबासाहेब हे १९२५ साली परत स्वदेशी व स्वनगरी आले. त्यांचा आर्थिक व औद्योगिक प्रश्नाकडे आणि विषयांकडे जास्त ओढा होता, व त्या दृष्टीने त्यांनी पाश्चात्य राष्ट्रात आपले वास्तव्य असता परिश्रमपूर्वक अभ्यासही केला होता. या विषयातील आपल्या ज्ञानाचा सर्व जिल्ह्याला फायदा देऊन त्याची शक्य व योग्य ती सेवा करण्याचीही

त्यांची उत्कट इच्छा होती. परंतु विधिघटित वेगळेच होते. विलायतेत असता त्याना न्युरॅस्थेनियाने पछाडले होते, आणि तो विकार स्वदेशी आल्यावर अधिकच बळावला होता. हळव्या मनाच्या बाबासाहेबावर याचा विपरीत परिणाम झाला, आणि या विकारामुळे आपले सारे आयुष्य व्यर्थ जाणार असे त्याना राहून राहून वांटू लागले. शेवटी तो दुर्दिन एकदा उजाडला; आणि या अति विचाराच्या एका क्षणिक तीव्र लहरीत असताच त्यानी आपल्या वाड्यातील तिसऱ्या मजल्यावर ता. २४-८-२५ रोजी स्वतःवर पिस्तुल झाडून घेऊन आत्महत्या केली! ते दिवस गणेशोत्सवाचे होते; व त्यातील आपले एक प्रवचन आटोपून भोजनासाठीं बाबाला पहावयास गेलेल्या रावबहादुरांपुढे बाबाचे अत्यंत कारुणिक निधन वाढून ठेवलेले त्यांस दिसून आले; आणि ते भयंकर दृश्य पाहताच रावबहादुर केवळ हतबद्धच नव्हे तर जवळजवळ गतशक्तच झाले! बॅ. बाबासाहेब हे "एक एव गुणी पुत्रो भ्राजते नेतरे शतम् एकश्चंद्रस्त-मोहंति न चैवासंख्य तारकाः" या सुभाषिताला साजेसे एक रत्न होते. पण जनतेच्या भाळी विधीने त्याच्या चिरसहवासाऐवजी चिरवियोगाचेच लिखित लिहून ठेवले होते.

## श्री. सौ. प्रमिलाबाई गाडगीळ

श्री. सौ. प्रमिलाबाई गाडगीळ या रावबहादुरांच्या एकुलत्या एक कन्या असून त्या येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थिनी होत. येथील शिक्षणानंतर त्यांनी पुढे उच्च शिक्षण पण घेतले असून पुण्याच्या अनेक महिला विषयक सार्वजनिक कार्यात त्या उत्साहाने भाग घेत असतात, व आपले पती प्रि. ध. रा. गाडगीळ यांच्या कार्यात सहकार्य करीत असतात. त्यांचे माहेरचे नाव सुशीलाबाई असे असून आपल्या मधुवचनाने व वर्तनाने स्वकुल आणि स्वनाम त्यांनी सारखेच धन्य व सार्थ केले आहे. त्यांना सांप्रत (१९३७) एक कन्या व पुत्र अशी दोन अपत्ये असून मुलाचे व्यवहारातील नाव जरी अजित असे मोठे मार्मिक असले तरी त्याचे खरे नाव कै. वा. राजारामपत ऊर्फ बॅ. बाबासाहेब काळे यांचे स्मरणार्थ राजाराम असे ठेवण्यात आले आहे.

# वकिलीचा व्यवसाय व सरकारी नोकरी

## महर्षि देवेंद्रनाथ टागोर यांच्याशी परिचय

बी. ए. एलएल. बी. झालेले असे वकील साताऱ्यास प्रथमतः काळे हेच होत. व ते विशेष धडाडीचे असल्यामुळे त्यांच्या धंद्याचा जम लवकरच व उत्तम बसला. त्यावेळी सुप्रसिद्ध बंगाली गृहस्थ महर्षि देवेंद्रनाथ टागोर I. C. S. हे साताऱ्यास डिस्ट्रिक्ट जज्ज होते. रा. ब. काळे हे प्रार्थना-समाजिस्ट व श्री. टागोर हे ब्राह्म, यामुळे या दोघांची ओळख होऊन दोस्ती जमण्यास वेळ लागला नाही याचाही रा. ब. काळयांच्या उत्कर्षाला बरेच उपयोग झाला. अत्यल्प काळातच रा. ब. काळे यांची प्रमुख कायदेपंडित म्हणून गणना होऊ लागली; व प्रतोद पत्रावरील अब्रुनुकसानीच्या खटल्या-सारखे ("खटले" माहिती पहा) कित्येक महत्त्वाचे खटले या प्रारंभीच्या काळात त्यांनी चालविले. त्यावेळी साताऱ्यात प. वा. श्री. दादासाहेब करंदीकर हे वकील वर्गाच्या अग्रभागी होते. तसेंच ते राजकारणातही पुढारी गणले जात. पण दोन तीन वर्षातच साताऱ्यात दादांना हा प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला, व ही जोडी अगदी शेवटपर्यंत साताऱ्यात नामांकित वकील व कायदेपंडित म्हणून कौतुकास्पद रीतीने झुंज करीत राहिलेली होती. दादा आणि रावजी यांच्या स्वभावात फार अंतर असे. दादा जितके धिमे, तितकेच रावजी तापट; दादांचा स्वभाव फार खोल, तर रावजींचा स्वभाव अगदी सरळ; दादांना लोकसंग्र-हाची अजब कला साधलेली, तर रावजींच्या रागीट स्वभावाचा डंका सर्वत्र वाजलेला; दादा सनातनी समजले गेलेले, तर रावजी सुधारकात गणले गेलेले; दोघांचाही वकिली जमाना मोठा, व दोघांकडेही फौजदारी कामांची गर्दी; दादांचे कौशल्य साक्षीदारांच्या उलट तपासणीत व्यक्त व्हावयाचे, तर रावजींच्या कायदेपांडित्याचे प्रदर्शन समारोपाच्या भाषणात व्हावयाचे, असे प्रसंग सातारा जिल्ह्यातील अनेक कोर्टात अनेक वर्षे लोकांनी अवलोकिले होते.

## सरकारी वकिली व सेशन्स जज्जांचे उद्गार

पुढे सन १९०२ साली सातारा येथील सरकारी वकिलाची जागा मोकळी होताच ती काळयांना देण्यात आली; व त्यावेळेपासून सन १९२०

पर्यंत अव्याहतपणे त्यांनी ती जागा अलंकृत केली होती. सरकारी वकील म्हणून आपलीच निवड तत्कालीन नव्या वकिलातून कशी झाली हे सांगताना ते एके ठिकाणी म्हणतात – " मी आपण होऊन आता पर्यंत कोणत्याच गोष्टीचा हव्यास धरला नाही. सगळ्या गोष्टी मला आपल्या मिळत गेल्या. त्यांच्या प्राप्तीसाठी मी तशी यातायात अगर खटपट कधीच केली नाही. " सरकारी नोकऱ्याशी प्रागतिकांचे जणू लग्न लागलेले आहे असा त्यांजवर वेळी अवेळी अविचारपूर्वक आरोप करणाऱ्या आक्षेपी मंडळींना रावबहादुरांचे हे उद्‌गार म्हणजे चोख उत्तर आहे. आपल्या अमदानीत एकाही बॅरिस्टराची मोठमोठ्या महत्त्वाच्या व गुंतागुंतीच्या खटल्यातही थोडीसुद्धा मदत न घेता बॅ. ब्रॅन्सनसारख्या कैक विख्यात कायदेपंडितांशी सामना करून त्यांनी " सरकारी वकिली करावी व गाजवावी तर ती रावबहादुरांनीच " असा लौकिक मिळविला; आणि त्यांच्या नेमणुकीच्या वेळी " या जागेकरिता श्री. काळे यांच्यासारखा कायदेपंडित मिळत आहे हे सरकारचे सद्‌भाग्यच होय " असे सार्थोद्‌गार त्यांच्या वकिलीचे चातुर्यावर व कायदेकौशल्यावर मुग्ध होऊन तत्कालीन सेशन्स जज्जांनी काढले ! सरकारी वकील या नात्याने त्यांनी मिळविलेला लौकिक असामान्य होता. त्यांच्या अमदानीत अनेक महत्त्वाचे व गुंतागुंतीचे खटले त्यांना चालवावे लागले. डकेट केस, औंध कमिशन, शिगांवची दुहेरी खुनाची केस वगैरे खटले हे त्यांनी यावेळी चालविलेल्या गुंतागुंतीच्या खटल्यापैकी काही महत्त्वाचे खटले होत. सरकारी वकील या नात्याने त्यांचे सरकार दरबारी दांडगे वजन होते. श्रीमंत औंधकरांच्या वडलांच्या वेळेच्या खरसुंडीचे केसचे प्रसंगी, तसेच १९०४–०५ च्या औंध संस्थानवरील दुसऱ्या अशाच एका प्रसंगी खरी बाजू न्यायधीशापुढे अत्यंत जोरदार भाषेत मांडून त्यांनी या संस्थानची बाजू राखली आहे.

## एक अभिनव सूत्र : ' हक्कस्य पुरुषो दासः '

सरकारी वकील या नात्याने रावबहादुरांनी आपला जो सर्वत्र दरारा बसविला होता तो थोडक्यात लिहावयाचे तर अनुपमेय होता. सरकारी वकिलाला डी. एस्. पी. अगर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांच्या जवळजवळ बरोबरीचे अधिकार आहेत ही गोष्ट ते कधीच विसरले नाहीत. व म्हणूनच कोणासही

गौरकाय डी. एस्. पी. ला देखील 'माझ्या बंगल्यावर या' असे काळ्यांना उद्देशून म्हणण्याचा कधीच धीर झाला नाही; किंवा कोणीही जज्ज म्हणतो म्हणून रावबहादुरांनी कधीच खटला थांबवला नाही. कोणावरचा खटला थांबविणे अगर कोणावर तो भरणे हा सरकारी वकिलाचा अधिकार असल्याने या बाबतीत ते डि. मॅजिस्ट्रेटकडे सल्ला घेण्यासाठी म्हणून सुद्धा कधी चुकून गेले नाहीत. त्यांचा हा बाणेदारपणा केवळ सरकारी वकिलांनीच नव्हे तर प्रत्येक लहान थोर सरकारी नोकराने व अधिकाऱ्याने आचरण्यासारखा आहे. 'राजसेवक म्हणजे लांगूलचालक' असा त्या वर्गाला काहीसा सकारण तर काहीसा निष्कारण लागलेला कलंक रावबहादुरांसारखा एखादाच काढून टाकू शकतो, तें इतरांचे काम नव्हे. 'अर्थस्य पुरुषोदास:' हे विपरीत सूत्र एक प्राचीन भीष्माचार्य सांगून गेले, व त्यास 'सर्वे गुणा: कांचनमाश्रयंते' अगर 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' असे म्हणत अनुमोदन देणारेही त्यांचेमागून अनेक निघाले. परंतु 'हक्कस्य पुरुषोदास:' असे सुपरीत नवसूत्र सांगणारा रावबहादूर हा एक नवाच आधुनिक भीष्माचार्य निघाला. पोलीस सुपरिंटेंडेंटसारख्या अधिकाऱ्यालाही कामासाठी त्यांचे ऑफिसात अगर घरीच जावे लागे. एकदा तर एका इन्स्पेक्टरने काम समजून देत असता त्यांच्या समोर विडी पेटवली, त्याबरोबर त्यांनी त्या अधिकाऱ्यास आपल्या समोरून हाकून दिले. त्यांनी कधी गोऱ्या अधिकाऱ्याचाहि मुलाहिजा राखला नाही. अनेक वेळा त्यांचे सरकारी अधिकाऱ्यांशी खटकेच उडाले आहेत. अनेक खटल्यात ते सरकारी वकील असताना त्यांची देशभक्ति व सत्यप्रीति दिसून आली आहे. काही राजद्रोहाचे खटल्यात ते सरकारी वकील असताना शिक्षा झाल्याने त्यांचे विरुद्ध आक्षेप घेण्यात येई. एका कौन्सिलनिवडणुकीचे वेळी तर त्यांचा पाडाव करण्यासाठी या शस्त्राचा उपयोगही करण्यात आला. पण लोकांचे हे आक्षेप धादांत खोटे असताही असल्या टीकाकारांना त्यांनी कधीच समर्थनपर वगैरे उत्तरे दिली नाहीत. अशी टीका सहन करण्याला असामान्य धैर्य लागते. त्यांच्यासारख्या धडाडीच्या सरकारी वकिलाने पुरावा खोटा आहे असा स्पष्ट अभिप्राय दिल्याने पोलीस व सरकार कित्येकांवर खटले भरू शकले नाही.

### वचन आणि वर्तन यांतील ऐक्य

अशा तऱ्हेने सन्मान, लौकिक, व संपत्ति मिळवून दिलेली ही जागा त्यांनी मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणानंतर कौन्सिलात जाऊन लोकसेवेकडे वळण्याचे ठरविताच स्वत: होऊन सोडून दिली व त्यांच्या या सामान्य सेवेबद्दल सरकारने स्वत: होऊन स्वतंत्र जी. आर. काढून त्यांचा गौरव केला. १० वर्षे खाजगी वकिलीत घालविल्यावर त्यांनी एका विशिष्ट तत्वनिष्ठेने सुमारे २० वर्षे साताऱ्यात सरकारी वकिलीत घालविली खरी; परंतु खाजगी वकिलीत अलोट पैसा मिळत असताही त्यांनी सरकारी वकिलीचा हा काल घालविला आहे; आणि ती जागा सोडून देताना त्यांना कसल्याही आमिषाचा यत्किंचितही मोह पडला नाही या दोन्ही गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. मॉंटफर्ड सुधारणानंतरच्या पहिल्या कौन्सिलनिवडणुकीचे वेळी त्यांनी अशीच जाहीर घोषणा केली होती की, "मतदारांनी मला निवडून द्यावे, मी सरकारी वकिली सोडण्यास तयार आहे!" लगेच मतदारांनी त्यांना निवडून दिले, आणि त्यांनी तत्काल सरकारी वकिलीही वचनाप्रमाणे सोडून दिली! थोर म्हणवणारेही लोक याप्रमाणे वचन व वर्तन यात किती ऐक्य राखतात हे आपण रोज पहातच आहो! रावबहादुरांचे कायदेपांडित्य नुसत्या सरकारी वकिलीच्या क्षेत्रातच चमकले असे नाही. दिवाणी कायद्यातील त्यांचे निष्णातत्व तितकेंच सव्यसाचित्वाचे होते; व त्यामुळे त्यांची खाजगी प्रॅक्टिसही तितकीच दांडगी होती. वकिलीत त्यांना लक्ष्मीचाही चांगला लाभ झाला. वकिलीतील त्यांच्या यशाचे मुख्य बीज त्यांच्या पराकाष्ठेच्या मेहनतीत, स्वतंत्र स्वभावात व निर्भय वृत्तीत सामावलेले होते, असे म्हटले तरी चालेल. अशीलाचे काम कळकळीने करून न्यायाधीशाच्या मनावर आपल्या पक्षकाराच्या म्हणण्याचा न्याय्यपणा परिणामकारक रीतीने बिंबविण्याच्या कामी वकील रावबहादुरांनी अनेकदा अभिनंदनीय यश संपादन केले होते.

### महाराष्ट्रातील पहिले 'ओ. एस्.' चे ॲडव्होकेट

त्यांनी १९२१ नंतर तर सार्वजनिक कार्यास अधिक काल व स्थल मिळावे म्हणून वकिली अजिबाद सोडण्याचाच निश्चय केला होता, परंतु कै. दादासाहेब करंदीकर यांच्या आग्रहामुळेच ते या निश्चयापासून परावृत्त झाले.

पण यामुळे जनतेचे अहित न होता हित झाले हे सर्वांस ज्ञातच आहें. रा. ब. काळे हे " सुखंचमे शयनंचमे " या पद्धतीचे प्रागतिकाग्रणी नव्हते. कोणाही पट्टीच्या कायदेपंडितास हेवा वाटावा अशी चाललेली आपली वकिली त्यांनी नानाविध लोककार्यापायी आपण होऊन अलिकडे तर अगदीच संपुष्टात आणली होती यावरून ही गोष्ट चांगलीच स्पष्ट होते. रावबहादुरांच्या कायदेपांडित्यामुळे सातारा बारचे वजन व लौकिक इतका वाढला की, डिस्ट्रिक्ट जज्ज, मुनसफ यांच्यासारख्या न्यायाधीशाना त्यांना वचकूनच वागावे लागले. नाही तरी रावबहादुर हे वाकणारे नव्हतेच; तर वाकव-णारेच होते. या सव्यसाची कायदेपांडित्यामुळेच मुंबई हायकोर्टाने स्पेशल केस करून त्यांना " ओरिजिनल साईडचे ॲडव्होकेट " म्हणून नोंदून घेतले. हा मान अखिल महाराष्ट्रात रावबहादुरांनाच प्रथम मिळाला या एकाच गोष्टीवरून त्यांच्या कायदेकौशल्याची पूर्ण कल्पना येईल.

## वकिलीच्या व्यवसायाचे धोरण

रावबहादूर हे जसे कायदेपंडित होते, तसेच ते सत्यनिष्ठही होते. खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणे, हाच वकिलाचा व्यवसाय असे पुष्कळांकडून पुष्कळ प्रसंगी म्हणण्यात येत असते, परंतु ते नित्य सत्य नाही. खऱ्याचे खोटे अगर खोट्याचे खरे होते, किंवा केले जाते, पण खरे ते खरेच, त्यास खोटे होता येणार नाही; व खोटे ते खोटेच, त्यासही खरे करिता येणार नाही, अशी वकिली लढविणे हेच कोर्टाच्या रणांगणात उभ्या ठाकलेल्या लढाऊ वकिलाचे काम ! रावबहादूर जे वकील होते ते अशाप्रकारचे होते; व त्यांची वकिली होती, तीही अशा प्रकारचीच होती ! जे सत्य नाही ते न्याय्यच नव्हे, अगर जे न्याय्य नाही ते सत्यच नव्हे, असे रावबहादुरांचे मत होते. आणि म्हणूनच ते कालाधीन होईपर्यंत त्यांना नामांकित वकिलाचे पद यशस्वितेने भूषविता आले. वकिलीचा व्यवसाय करणाऱ्यांना हे माहितच आहे की, न्यायाधीशाची आरोपी हा अपराधी आहे की नाही याबद्दलची खात्री नैबंधिक व नैतिक अशा दोन्ही प्रकारांनी व्हावी लागते. म्हणजे एखादा आरोपी अपराधी आहे की नाही हे निर्णयार्थ निश्चित करिताना, न्याय-पतीची आरोपी अपराधी आहे अशी नुसती नैतिक खात्री होऊन भागत नाही

तर त्याची नैबंधिक म्हणजे कायदेशीर खात्रीही व्हावी लागते. तशी ती बिनतोड पुराव्याच्या अभावी न झाल्यास न्यायाधीशाला संशयाचा फायदा देण्यासाठी, पिंजऱ्यातला मनुष्यरूपी आरोपी पोपट सोडून द्यावा लागतो, अशी खात्री झाली. पण नैतिक खात्री झाली नाही, तरीही देखील वस्तुतः भागत नाही. एखादे वेळी तर कायदाच इतका स्थूल स्वरूपी असतो (आणि म्हणूनच बहुधा ‘ कायदा म्हणजे गाढव ’ असा वाक्प्रचार प्रवर्तित व प्रसृत झाला असावा) की, फासावर लटकलेल्या मनुष्यावर यमदूताचे जे पाश पडलेले असतात, तेही त्यांना दूर करावे लागतात. “ कायद्यात फक्त ‘फासावर द्यावे ’ एवढेच शब्द आहेत, ‘ मरेपर्यंत फासावर द्यावे ’ असे शब्द नाहीत ” असा मार्मिकपणे मुद्दा लढवून, एका कायदेपंडिताने एका फाशीची शिक्षा झालेल्याची फाशी वाचविली व म्हणूनच पुढे या स्थूल कायद्याला ‘ मरेपर्यंत फाशी ’ असे सूक्ष्म रूप देण्यात आले, ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. पुरावाच काय पण प्रत्यक्ष कायदाही कसा बिनतोड व रोखठोक असावा लागतो हे येथे देण्याचे कारण इतकेच की, काळ्यांनी सार्वजनिक वा अन्य स्वरूपाचे जे जे खटले चालविले, ते ते सर्व या धोरणानेच चालविले. त्यांनी न्यायाधीशाची नैतिकच काय पण नैबंधिक खात्रीही करून देण्याचे नेहमी शक्य ते सर्व प्रयत्न केले, व म्हणूनच ते अतुल्य वकील ठरले.

## रावबहादुरांनी चालविलेले काही खटले

### रावबहादुरांना प्रसिद्धि देणारा खटला

रा. ब. काळे यांनी चालविलेल्या महत्त्वाच्या खटल्यांची माहिती मनोरंजक व मनोद्बोधक होण्यासारखी असल्यामुळे त्यांच्या पक्क्या आठवणीत असलेल्या दोन खटल्यांची त्यांनी एकदा जी माहिती दिली ती अशी– प्रथम ते आपल्या वकिली पेशाविषयी बोलताना म्हणाले:– “ मी या पेशात पडण्यापूर्वी थोडेफार लेखन करीत असे. पण पुढे या पेशात एकदा पडल्यावर त्याकडे माझे दुर्लक्ष होऊ लागले. कारण वकिलीच्या आनुषंगिक असलेली सार्वजनिक कामे मला चुकविता येईनात, व त्या सर्वांतून वेळ काढून लेखन करणे अशक्यप्राय झाले.” पुढे ते म्हणाले–“ धंद्यात माझा जम सुरवातीपासूनच जरी चांगला बसत चालला होता तरी सातारा जिल्ह्यात निघ–

णाऱ्या 'प्रतोद' या वृत्तपत्राच्या खटल्यापासून त्याला विशेषच चांगले स्वरूप प्राप्त झाले. त्या खटल्यात मी इस्लामपूरच्या 'प्रतोद' च्या संपादकांच्या बाजूने काम पहात असे. ह्या खटल्याची हकिकत थोडक्यात अशी आहे की, 'फेगन नांवाच्या एका फॉरेस्ट ऑफिसराने अस्वल म्हणून त्याजवर गोळी झाडली असता ती एका बाईला लागून तिला मरण आले. या प्रकाराबाबत 'प्रतोद' पत्राने बरेच सडकून लिहिले; व तो मजकूर सरकारच्या नजरेस येताच त्यांनी त्या ऑफिसरला 'प्रतोद' पत्रावर खटाला भरून आपली अब्रू साफ करून घेण्यास सांगितले. त्याबरहुकूम फेगनने खटला भरला, व श्री. दादासाहेब करंदीकरांना आपल्या बाजूचे वकीलपत्र दिले.

## मला 'प्रतोद' च्या खटल्याचे महत्त्व का वाटते?

मी वकिली सुरू करून नुकतेच एक वर्ष झाले होते; व ज्यूनिअरच्या मानाने माझी प्रगतीही बरीच झाली होती. मला वकीलपत्र घेण्याबद्दल संपादकांनी विचारले, व श्री. दादासाहेबांसारखे प्रतिस्पर्धी होते तरी मी कबुली देऊन कामाला सुरुवात झाली. काम मि. फॉसेट (जे पुढे हायकोर्ट जज्ज झाले) नावाच्या मॅजिस्ट्रेटपुढे चाललेले होते. त्याठिकाणी माझ्या युक्तिवादाचा काही परिणाम न होता आरोपी संपादकांना ५०० रु. दंड करण्यात आला. या फॉसेट साहेबांनी या खटल्याचे १०० पानी निकालपत्र लिहिले होते. त्यांचा संपादकाविरुद्ध वाईट ग्रह व्हावयाचे कारण असे आहे की त्यांनी 'फेगनसाहेब त्या बाईच्या मरणास कारणीभूत झाला' ह्या वाक्याचे भाषांतर इंग्रजीत ' became the Cause-fiend of that woman ' असे केले, व त्यातील fiend या शब्दाने मॅजिस्ट्रेट बिथरले. अर्थात याच्यावर मी सेशन्स जज्जांपुढे अपील सादर केले. सेशन्स जज्ज मि. वॉकर नांवाचे गृहस्थ होते. त्यांच्यापुढे खटला चालावयाचा, पण मी असे म्हणणे मांडले की, 'आपण येथीलच युरोपियन गृहस्थ असल्यामुळे आपल्याकडून पूर्वग्रहनिरपेक्ष असा निकाल होईल हे जनतेला पटणार नाही, तरी आपण हा खटला हायकोर्टापुढे पाठविल्यास बरे होईल.' त्यांना माझे म्हणणे पटले, व त्यांनी हायकोर्टाकडे तो खटला रवाना केला. हायकोर्टाने कायद्याच्या दृष्टीने गुन्हा झाल्याचा निकाल दिला; पण दंड मात्र कमी केला. त्या काळात या असल्या

खटल्यांना विशेष महत्त्व होते, व सार्वजनिक दृष्ट्या माझी माहिती याच खटल्यापासून लोकांना विशेष झाल्यामुळे मला या खटल्याचे महत्त्व साहजिकच जास्त वाटते.

## चार कादंबऱ्या लिहिता येण्याजोगा खटला

यानंतर मला अलीकडे जो दुसरा एक खटला महत्त्वाचा वाटला तो तीन खुनाचा होय. या खटल्याच्या वेळी मी पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून काम करीत असे. या खटल्यातून इतक्या चमत्कारिक गोष्टी बाहेर आल्या की, त्यांच्या सहाय्याने दोनचार कादंबऱ्या तरी सहज लिहिता आल्या असत्या, व अजूनही येतील. कारण त्या खटल्याचे एक भले जाडेजुडे पुस्तकच तयार झाले आहे. या खटल्याची हकीगत पुढीलप्रमाणे आहे– सातारा जिल्ह्यात काही दिवसापूर्वी फार विचित्र पद्धतीने पैसे उकळणारी एक टोळी होती. हे लोक आजूबाजूच्या शेतकऱ्यांकडून दमदाटी करून पैसे उकळीत, व त्यांनी जर ते पैसे दिले नाहीत तर शेते पिकल्यावर पिकांची नासधूस करून सूड उगवीत. एवढेच करून ते थांबत नसत; तर आपल्या आप्तवर्गीयांपैकी काहींचा खून करून त्याचा आळ आपल्या विरुद्ध पक्षीयावर ते घालीत. अशा त्यांच्या या कृतीला काही इसम बळी पडले. एक दिवस पापाचा घडा भरला, व ही सगळी टोळी काळ्या पाण्यावर रवाना झाली. या टोळीपैकी एका इसमाने आपली सात वर्षांची मुलगी दगडावर आपटून ठार मारली व त्याचा आळ आपल्या शत्रूवर घातला. पण त्यावेळी पुरावा सबळ नसल्यामुळे त्याचा डाव फसला, व ते निरपराधी लोक दोषमुक्त ठरले.

## बहिणीचा जीव घेणारे नरराक्षस

दुसऱ्या खेपेला या लोकांनी विशेष खबरदारी घेतली. त्यांच्यापैकी एकाने आपल्या बहिणीला ठार मारले व त्याबद्दल सहा सात जणावर खटले भरण्यात आले. मागल्या वेळेला खटला सुटल्यामुळे यावेळी विशेष खबरदारी घेऊन पुरावा बिनतोड करण्यात आला होता; यामुळे त्या बिचाऱ्या सात जणांना शिक्षा झाली. नशीब एवढेच की, त्या सर्वांना फाशीची शिक्षा न होता काळ्यापाण्याची झाली अर्थात् यावेळी, मागची केस बुडाली तर ह्या–

वेळी जिंकली म्हणून या टोळीला थोडे बरे वाटले. आरोपीच्या वकिलाच्या मानाने आम्हा पब्लिक प्रॉसिक्यूटरांना खटल्याचे सुहेरसुतक कमी असते. आरोपीच्या वकिलांच्या मनावर जे एकप्रकारचे दडपण असते ते आमच्यावर नसते. मला हे स्वानुभवावरून माहिती आहे की, मी ज्यावेळी आरोपीच्या बाजूने काम चालवीत असे त्यावेळी काही काही वेळा मला रात्रीची झोप येत नसे. पब्लिक प्रॉसिक्यूटरच्या बाबतीत घडलेल्या गोष्टी नीट रीतीने मांडल्या की त्यांच्यावरील जबाबदारी संपते. पण अशा परिस्थितीतही काही काही वेळा वाईट वाटण्याचे प्रसंग येतात; व तशातलाच एक प्रसंग या शाबीत झालेल्या खटल्यानंतर तीन वर्षांनी उद्‌भवलेल्या खुनाच्या खटल्यात आला.

## वीस हजार रुपयांची नुकसानभरपाई

एका इसमाच्या भावाचा खून झाला होता, व त्या संबंधात खूप लोकांवर खटले भरण्यात आले होते. या आरोपीपैकी काही फरारी झाले होते व खटल्याचे काम लांबणीवर पडू लागले होते. दरम्यान बऱ्याच नागरिकांनी या टोळीच्या कारवाईसंबंधी डि. मॅजिस्ट्रेटला पत्रे पाठवून हा खटला बनावट असल्याची तक्रार केली. तेव्हा सी. आय. डी. ला बोलावून त्यांच्याकडे ह्या गुन्ह्याची चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले. ह्या गुप्त पोलिसांनी टोळीचा तलास लावला. ते एकंदर १५ लोक होते. आता मोठी चमत्कारिक परिस्थिती उत्पन्न झाली. याच लोकांच्या साक्षीवरून मागल्या खेपेस आरोपींना शिक्षा झाली होती. आता त्या सगळ्या साक्षी खोट्या ठरवून मागल्या खटल्याचा निकाल फिरवावयाची वेळ आली होती; म्हणजे आपल्याच तोंडाने आपले म्हणणे खोटे म्हणण्याची पाळी आली होती.

## पूर्वीचा निकाल फिरविण्याचा प्रसंग

योगायोग असा की, पूर्वीचा खटला ज्यांनी चालविला तेच न्यायाधीश पुन: येथे बदलून आले होते. त्यांच्यापुढे खटला चालवावा की नाही असा पोलिसांना प्रश्न पडला. पण मी त्यांच्यापुढेच खटला चालविण्यास सांगितले, कारण त्यामुळे न्यायदानास मदत होणार होती. शेवटी खटला त्याच न्यायाधीशासमोर कित्येक महिने चालून त्या सर्व लोकांना जबर शिक्षा देण्यात

आल्या. त्यांच्यापैकी दोघांनी आपल्या कृत्यांचा कबुलीजबाब दिला, व त्याच न्यायाधीशाला आपला पूर्वीचा निकाल चुकला म्हणून शेरा मारावा लागला. हायकोर्टानेही हा निकाल मान्य केला. वैयक्तिक मानापमानाच्या दृष्टीने जरी ही नामुष्कीची गोष्ट होती तरी न्यायाकडे लक्ष देऊन आम्हाला खटला जोराने चालवावा लागला. मागील खटल्यातील निकाल फिरविल्यामुळे ज्या बिचाऱ्या निरपराधी गृहस्थांना काळ्या पाण्यावर जावे लागले होते त्यांना सोडणे क्रमप्राप्त झाले. त्याप्रमाणे मी खटपट करून त्या लोकांना सोडविले; एवढेच नव्हे तर त्यांना २० हजार रुपये नुकसानभरपाईदाखल देण्याची सरकारला विनंती करून त्याप्रमाणे त्यांना ते मी मिळवूनही दिले. या खटल्याचे चांगले ७१८ शे पानांचे पुस्तक तयार झाले आहे. या खटल्याइतका चमत्कारिक परिस्थिती उत्पन्न करणारा व गुंतागुंतीचा खटला माझ्या अवलोकनात तरी दुसरा आला नाही."

## चरित्रनायकाची भूमिका व तत्वज्ञान

रावबहादुरांची राजकीयादि क्षेत्रांतील कामगिरी इतकी विविध आहे की, तिचे सारांशात विवेचन करण्यासाठीही एक स्वतंत्रच ग्रंथ लिहावा लागेल. मुलाचे पाय जसे पाळण्यात दिसतात, तद्वत् व्यक्तीचे पाय तिच्या कृतीत दिसतात, असे त्यांच्या या क्षेत्रातील अष्टपैलू कर्तृत्वावरून म्हणावे लागते. तथापि ज्या भूमिकांवरून व तत्वज्ञानावरून त्यांनी ही विविध क्षेत्रातील कामगिरी पार पाडली त्या भूमिकांचा व तत्वज्ञानाचा प्रथम परिचय करून देणे हे त्यांच्या पुढील चरित्रकथनास-व वर्णनास सौकर्य व सौलभ्य येण्याच्या दृष्टीने इष्ट होईल. राजकारणात ते प्रागतिक पक्षाचे अनुयायी होते, आणि धर्मकारणात ते प्रार्थनासमाजाचे अनुयायी होते. प्रागतिक पक्ष हा या जिल्ह्यात बद्धमूल झालेला संघटित राजकीय पक्ष आहे. थोडा विचार करणाऱ्याला हे कळून येईल की उत्क्रांत स्थिती हीच जगताची नित्यावस्था आहे व प्रगत स्थिती हीच विश्वाची चिरावस्था आहे. प्रसंगी क्रांतीने उत्क्रांतीवर विजय मिळविल्यासारखा दिसला, नव्हे मिळविला तरी तो तात्कालिक होय. पुनः त्या क्रांतीला उत्क्रांतीपुढेच नमावे लागते व खरे विधायक कार्यही उत्क्रांतीकडूनच घडत असते, किंबहुना उत्क्रांतीखेरीज क्रांति संभवूच शकत

नसल्याने उत्क्रांती ही माता व क्रांती ही सुता होय असेच म्हणावे लागते. आणि म्हणून ज्याने एका हाती उत्क्रांतीचे निशाण घेतले आहे व दुसऱ्या हाती प्रगतीचे कंकण बांधिले आहे ते प्रागतिक आणि उत्क्रांतिकारक तत्वज्ञानच या झुकानेवाल्यांच्या झुकत्या दुनियेत दीर्घकाल टिकणारे आहे. प्रसंगी वेगवान अश्वाचाही लगाम खेचावा लागतो. नाहीतर नाशाचा प्रसंग उद्भवतो असे जे डीन इंगने म्हटले आहे, तेच प्रागतिकांचे राज-कारणातील कार्य आहे. दूरदृष्टी, पूर्ण शिस्त, दीर्घ अनुभव, खोल ज्ञान, सूक्ष्म बुद्धी, अंध व्यक्तिनिष्ठेऐवजी दृढ तत्वनिष्ठा, तात्कालिक फलापेक्षा चिरकालिक फलावर दृष्टी, सत्कार्यसातत्य, हीन व दीन जनांबद्दल कळकळ आणि तळमळ, विध्वंसक कार्यापेक्षा विधायक कार्याचा पुरस्कार, अव्यवहार्य, असंभाव्य व अशक्य गोष्टीऐवजी व्यवहार्य, संभाव्य व शक्य गोष्टी करण्या-कडे ओढा, सर्वांगीण सुधारणा, विविध विषयांचा बहुविध अभ्यास, अनु-दारतेचा, अप्रामाणिकतेचा व असहिष्णुतेचा त्याग आणि उदारतेचा, प्रामा-णिकतेचा व सहिष्णुतेचा स्वीकार इत्यादि अनेक वैशिष्टये कायम आहेत तोवर प्रसंगी प्रागतिक पक्ष जाईल पण प्रागतिक तत्व कायम राहील; व वेळी प्रागतिक व्यक्ति जाईल परंतु प्रागतिक नीति कायम राहील.

## जिल्ह्यातील प्रागतिक पक्षाची वैशिष्ट्ये

जे प्रगती करणारे तेच खरेखुरे प्रागतिक, जे सर्वप्रकारे उदार तेच खरेखुरे उदारमतवादी, जे सुधारणा घडविणारे तेच खरेखुरे सुधारक व जे अती तेथे माती असे होऊ देत नाहीत तेच खरेखुरे समर्थवर्णीत नेमस्त आणि रा. ब. काळे हे अशाच श्रेष्ठ कोटीतील प्रागतिक, उदारमतवादी, सुधारक नेमस्त होते. काळे यांचे व्यक्तिमत्व हे नेमस्त महाराष्ट्राचे-विशेषत: सर्व सातारा जिल्ह्याचे नैतिक तेज व राजकीय बल होते. प्रागतिक पक्ष म्हणजे वयस्क लोकांचा पक्ष हे अन्य स्थानी कदाचित् सत्य असेल; पण संस्थानासह या जिल्ह्यातील प्रागतिक पक्षात मात्र तरुणच अधिकसंख्य आहेत. आणि रावबहादुरांची सत्यप्रीति हीच या अधिक संख्येची जननी आहे. सातारा जिल्ह्यातील प्रागतिक पक्षाची इतर जिल्ह्यातील प्रागतिक पक्षाहून अनेक वैशिष्टये आहेत आणि ती जिल्ह्यातील प्रागतिकेतर प्रमुखांनीही अनेकवार

मान्य केली आहेत. या जिल्ह्यातील प्रागतिक पक्ष अंधभक्त नाही तर प्रसंगी प्रमुख स्वपक्षीयावरही प्रखर टीकास्त्र चालविणारा व त्यास अधिक लोकसन्मुख करणारा आहे. आणि सर्वात मुख्य म्हणजे हे की, आपला उदारमतवाद या पक्षाने राष्ट्रीय शिक्षण, मद्यपाननिरोधन व सत्याग्रहांदोलन इत्यादि अनेक आंदोलनात प्रत्यक्षाप्रत्यक्ष आचारातही आणलेला आहे. या त्याच्या धोरणामुळेच पुण्यासारख्या महाराष्ट्र केंद्रस्थानातील विचारवंत थोर लोकही 'ऐक्यवृत्तीने कार्य करण्याचा धडा सातारा जिल्ह्यापासूनच विशेषतः साताऱ्यापासूनच शिकावा' असे नित्य उद्‌गार काढीत असतात.

## न्या. मू. रानडे यांचा सहवास व अनुयायित्व

न्या. मू. रानडे यांची पुण्यतिथी हिंदुस्थानभर साजरी होत असली तरी साताऱ्यास ती साजरी होण्यात वरील दृष्टीने विशेष औचित्य आहे. कारण सत्य आणि प्रामाणिकपणा हेच रानड्यांच्या चरित्राचे सार असून रावबहादुर हे या दृष्टीने त्यांचे खरे शिष्य होत. रानड्यांची खरी परंपरा पुण्याच्या भारतसेवकसमाजाव्यतिरिक्त जर अन्यत्र कोठे चालू असेल, तर ती साताऱ्यातच आहे असे यामुळेच म्हणावे लागते. अराष्ट्रीय वृत्ती जोराने फैलावत असताही या परंपरेच्या अधिष्ठानामुळेच राष्ट्रीय वृत्ती सातारा जिल्ह्यात आज जोराने वाढत आहे. रानड्यांशी विद्यार्थी दशेपासून रावबहादुरांचा सहवास झाला होता व त्यांनी रानड्यांच्या बरोबरीने कामेही केलेली आहेत. रावबहादुरांनी अविश्रांत काम करण्याचा व रिकामटेकडे-पणाने गप्पा मारून वेळ न घालवण्याचा धडा अगर कित्ता रानड्यांपासूनच घेतला आहे. रा. ब. काळे हे एके ठिकाणी म्हणतात—'न्या. मू. रानडे यांनीच आपल्याला कार्यप्रवण केले व त्यांच्याच स्फूर्तीने मी येथे डिस्ट्रिक्ट लिबरल असोसिएशन काढली.' उलटपक्षी न्या. मू. रानडे यांचेही रावबहादुरावर अत्यंत प्रेम होते. आणि याची एकच पण ठळक साक्ष द्यावयाची झाली तर अशी देता येईल की ज्यावेळी रावबहादुरांनी साताऱ्यास पहिली सामाजिक प्रांतिक परिषद ( इ. स. १९०० ) भरविली व कै. दादासाहेब करंदीकर यांनी मतभिन्नता असताही तिला मान्यता दिली त्यावेळी न्या. मू. रानडे यांना फारच आनंद झाला आणि स्वतः त्यावेळी रुग्णशय्येवर असताही सदर

परिषदेस रावबहादुरांच्या निमंत्रणाप्रमाणे अगत्याने उपस्थित होऊन त्यांनी त्या आनंदाचा प्रत्ययही आणून दिला !

### राष्ट्रहानी करणारे वादविवादी पुण्यात्मे !

रा. ब. काळे ह्यांच्या सर्वांगीण कारकीर्दीविषयी जे कोणी थोडासा विचार करितील त्यास हे अल्प प्रयासाने कळून चुकेल की, रा. ब. काळे हे न्या. मू. रानडे ह्यांचे सर्व बाबतीत एकनिष्ठ अनुयायी होते, एवढेच केवळ नव्हे तर 'आपण त्यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न करीत आहो' असेही ते वारंवार म्हणत असत. रानड्यांनी सुरू केलेल्या सर्व चळवळीशी त्यांचा निकटचा संबंध असून रानड्यांच्या चारित्र्याचा त्यांच्या चरित्रावर अत्यंत परिणाम झाला होता; व सातान्यास त्यांच्या येथेच न्या. मू. रानडे ह्यांचा मुक्काम असे. सातान्यास रानड्यांचे शेवटचे धर्मपर व्याख्यान झाले असता त्यांनी एकदोन थोर माणसांच्या कार्याविषयी ज्यावेळी उल्लेख केला त्यावेळी काळे कसे गहिंवरले ते त्यांचे ४० वर्षांचे स्नेही सुप्रसिद्ध सुबोधपत्रिकाकार श्री. द्वा. गो. वैद्य प्रभृति कित्येक मंडळींनी स्वत: पाहिले होते. इतकेच नव्हे तर रावबहादुरांच्या मनावर या व्याख्यानाच्या झालेल्या परिणामाबद्दल त्यांचे नेहमी बोलणेही होत असे. 'रानड्यांसारखा महात्मा आपल्या देशाला लाभला, पण ह्या कपाळकरंट्या देशाला त्यांची योग्यता कळली नाही; तात्कालिक वादविषयक गोष्टींना नसते व भलते महत्त्व देऊन त्यांच्याविषयी गैरसमज उत्पन्न करण्याचे, पुण्य ज्यांनी संपादिले त्यांनी ह्या देशाची अत्यंत थोर हानी केली आहे' असे ते आपल्या मित्रांपाशी नेहमी म्हणत असत. रानड्यांच्या विषयींची त्यांची पूज्यबुद्धि त्यांनी योग्य रीतीने वेळोवेळी प्रत्ययास आणून दिली होती, व रानड्यांना राजकारणाचा जो मार्ग मान्य होता, त्याच मार्गाचे त्यांनी निर्धाराने अनुकरण करून कौन्सिलमध्ये व कौन्सिलबाहेर, आपल्या गावी व जेथे ते जातील तेथे रानड्यांचेच राजकारण पुढे चालवले होते.

### चरित्रनायकाची उदार व उदात्त धार्मिक मते

धर्माबद्दलचे रावबहादुरांचे विचार अत्यंत उदार होते. स्मृतिग्रंथ हे परिवर्तनीय आहेत, व त्यांनाही कालमान पाहवे लागते असे त्यांचे मत होते;

व त्यांचे हे मत होते म्हणूनच ते मान्य करावयाचे असा प्रकार नसून खुद्द सर्वश्रेष्ठ अशा मनुस्मृत्याधारेच त्यांनी आपले हे मत सिद्ध केले आहे. धर्माचे ते दोन प्रकार मानीत असत. पहिला प्रकार म्हणजे शाश्वत तत्वाचा अपरिवर्तनीय सनातन धर्म व दुसरा प्रकार म्हणजे परिवर्तनीय धर्म. हाच वस्तुतः खरा स्मार्त ऊर्फ वर्णाश्रम अगर आचारधर्म; आणि याच कसोटीवर त्यांनी आपले वरील मत बनविलेले होते. पूर्वकालीन धर्मव्यवस्थेत जातीभेद नव्हता. इतकेच काय, पण वेदग्रंथात देवालयांचा देखील उल्लेख नाही. देवालये ही बुद्धकालानंतरची आहेत; व अस्पृश्यता तर नाहीच नाही, असे त्यांनी शास्त्राधारेच अनेकवार दाखवून दिलेले आहे. वेदप्रामाण्याच्या बाबतीत ते ज्ञानेवरपंथी होते, म्हणजे वेदातील शाश्वत भाग त्यांना ज्ञानेश्वराप्रमाणे संमत आणि पसंत होता. तथापि त्यांना सर्वात भक्ती, ज्ञान व कर्म अशी त्रिविध बैठक असलेला भागवत धर्म ( की ज्याला ते वैदिक धर्मवृक्षाचे मधुर फल असे म्हणत ) विशेष प्रिय असे. याचे कारण एकच; व ते म्हणजे ज्या गीतेचा त्यांनी सतत प्रत्यही ४५ वर्षे अभ्यास केला त्या गीतेतील व भागवतधर्मातील तत्वांची समान भूमिका हे होय. " कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन " हाच कर्मसंदेश या दोघांनीही दिलेला आहे आणि धर्म व राजकारण यांच्या आवश्यक परस्परसंबंधाचा विचार भागवतधर्मातही उत्तम केलेला आहे. भागवतधर्माची अधोमुख झालेली पताका उच्चमुख करण्यात समर्थ रामदासांनी ' अगदी कळस केला ' असे त्यांचे मत असे आणि याबद्दल ते त्यांना अत्यंत मान देत असत.

### हिंदुधर्माच्या जागतिक प्रसाराची मनीषा

जाता जाता खरा भागवतधर्म म्हणजे काय याचाही येथे ओझरता उल्लेख केला पाहिजे. वेदजनित भागवतधर्माच्या उत्पत्तीची खुद्द भागवतातच जी रम्य व सत्यकथा आहे ती अशी:- 'भक्ती नावाची एक स्त्री होती, आणि तिला ज्ञान व वैराग्य या नावाची दोन मुले होती. पण यात गंमत अशी होती की ही मुले वृद्ध होती, व त्यांची माता मात्र तरुण होती. या विचित्र स्थितीचे तिचे तिलाच जेव्हा आश्चर्य वाटू लागले तेव्हा तिला असे उत्तर देण्यात आले की, आजच्या सनातनधर्माची अवस्था तुझ्या या मुलां-

सारखी आहे, यज्ञादि बाह्याचारांच्या बडेजावामुळे या ज्ञानवैराग्यासारखी सनातनधर्माला वृद्धस्थिती प्राप्त झालेली आहे, आणि म्हणूनच त्याला सांप्रत तुझ्यासारख्यांची- तारुण्याची आवश्यकता आहे !' मोक्षदायक, स्वजनतारक व सर्वसंग्राहक असा हा भागवतधर्म असून ज्ञान-कर्मपूर्वक (ईश्वराची) भक्ती करावयाची हे या धर्माचे मुख्य सूत्र आहे. हा धर्म ( प्राप्तजन्माप्रमाणेच ) पुनर्जन्माचे (अर्थात पूर्वजन्माचेही) व सर्वव्यापक परमेश्वराचे अस्तित्व मानतो, व अशा ज्ञानदृष्टीने, ईश्वरार्पण बुद्धीने व सेवावृत्तीने नित्यनैमित्तिक कर्तव्यपालनाच्या रुपाने परमेश्वराची परमोपासना जरूर तर पुनर्जन्मही घेऊन करावयाची, असे या भागवतधर्म तत्वज्ञानाचे थोडक्यात सार आहे. हिंदुधर्म हा विश्वधर्म असल्यामुळे त्याचा जगभर फैलाव करण्यासाठी हिंदु-धर्मप्रेमाने अंतःकरण उचंबळून येऊन रावबहादूर रुग्णशय्येवर असता पुनः पुनः म्हणत असत की, 'या आजारातून उठल्यावर आपण हिंदुधर्म हा विश्वधर्म आहे हे पटविण्यासाठी जगभर जाणार व जॉइंट पार्लमेंटरी कमि-टीने हिंदुधर्मासंबंधी जे अनुदार उद्गार काढले आहेत ते त्यांना परत घ्यावयास लावणार !' इतकी त्यांची हिंदुधर्मनिष्ठा जाज्वल्य होती.

## जिल्ह्यातील प्रार्थना समाजाचा इतिहास

रा. ब. काळे हे प्रार्थनासमाजिस्ट कसे झाले हे पाहण्यापूर्वी, प्रथम या समाजाची या जिल्ह्यातील पूर्व पीठिका व परंपरा बघितली पाहिजे. कऱ्हाड येथे श्री. ज. दा. दीक्षित हे प्रथमच मुन्सफ होऊन गेले होते. त्यांच्या येथे एक लहानसा प्रार्थनासमाज चालू होता. श्री. सत्येंद्रनाथ टागोर साताऱ्यास डि. ज. असताना येथील समाज एकदम भरभराटीस आला होता, व त्याचे संस्थापक श्री. सीतारामपंत जव्हेरे ह्यांना त्यावेळी श्री. टागोर यांचे सर्व बाबतीत सहाय्य झाले होते. डि. जज्ज साहेबांच्या भोवती पुष्कळ वकील लोक जमा झाले; परंतु ब्राह्मसमाजापेक्षा ब्राह्मधर्माने ज्यांना आपल्याकडे ओढले व कार्यासही लाविले त्यात रा. ब. काळे हेच त्यावेळचे उदयोन्मुख वकील होते, कारण, श्री. टागोरसाहेब येथून पेन्शन घेऊन गेल्यावर समा-जाची पूर्वीची मोठी जागा रिकामी पडू लागली; साहेबांना खूष करण्यासाठी व त्यांच्या घरातील मंडळींचे दर्शन घेण्यासाठी येणारी माणसे दूर झाली;

वकील लोक घरी बसू लागले व त्यांना उपासनेस यावयाला वेळ मिळत नाही अशी स्थिति आली; परंतु रावजी रामचंद्र व सीतारामपंत जव्हेरे हे मात्र दृढ राहिले. त्यांनी मोठी जागा सोडली, व रावबहादुरांच्या घरीच समाज भरू लागला. व सीतारामपंत साताऱ्यास होते तोवर जव्हेरे, काळे, रा. ब. जोशी व त्यांची कन्या मथुराबाई ह्यांनी प्रार्थनासमाजाची ध्वजा येथे चांगल्याप्रकारे फडकत ठेविली. याप्रमाणे रावबहादुर हे या प्रार्थनासमाजाचे सभासद झाले व त्यास अखेरपर्यंत चिकटून राहिले, कारण त्यांचा असा दृढ विश्वास होता की, 'प्रार्थनासमाजाचा धर्म हाच खरा सनातन धर्म होय,' इतकेच कायपण त्यांनी साताऱ्याच्या समाजाचे नाव देखील "सनातन धर्म प्रार्थनासमाज" असे ठेवले होते.

## प्रार्थना समाजाला मान्य असलेली उच्च तत्वे

प्रार्थना समाजास मान्य असलेली धर्मतत्त्वे म्हणजे 'परमेश्वराने हे सर्व जग उत्पन्न केले, तोच एक खरा देव, त्याशिवाय दुसरा देव नाही. तो नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंदमय, निरावयव, निराकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्ती, कृपानिधी, प्रेमस्वरूप, परमपवित्र, पतितपावन असा आहे. २. केवळ त्याच्याच उपासनेच्या योगे येथे व परलोकी शुभ प्राप्त होते. ३. त्याच्यावर प्रीती, पूज्यबुद्धी व अनन्यभाव ही ठेवून त्याप्रमाणे त्याचे मनन, भजन, पूजन करणे व त्यास प्रिय अशी कृत्ये करणे हीच त्याची खरी उपासना होय. ४. मूर्ती व इतर जड पदार्थ यांची पूजा किंवा प्रार्थना करणे हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे. ५. परमेश्वर सावयवरूपाने अवतार घेत नाही व कोणताही एक ग्रंथ साक्षात ईश्वरप्रणीत किंवा सर्वांशी प्रमाण नाही. ६. सर्व मनुष्ये एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, म्हणून भेद न राखिता परस्पराशी बंधुभावाने वागावे, हे ईश्वरास प्रिय आहे आणि हे मनुष्याचे कर्तव्य आहे.' या तत्वानुसार रा. ब. काळे यांच्या घरी दर रविवारी संध्याकाळी प्रार्थनेस मंडळी जमत असत त्यांच्या पत्नी कै. सौ. सत्यभामाबाई या उपासनेस कधीही चुकत नसत. श्री. वि. रा. शिंदे हे येथे असताना कौटुंबिक उपासना प्रत्येकाच्या घरी चालविण्याचा त्यांनी उपक्रम सुरू केला होता, व या प्रत्येक प्रसंगास काळे हजर असत.

## प्रार्थना समाजधर्म हाच हिंदुधर्माचा कळस !

न्या. मू. रानड्यांचे ध्येयसर्वस्व जनतेपुढे ठेवणारी संस्था महाराष्ट्रात फक्त प्रार्थनासमाज हीच एक आहे अशी त्यांची दिवसेंदिवस खात्री होत चालली होती; व आपल्या सामर्थ्यानुसार त्या ध्येयास अनुसरून ते वागतही होते. सातार्‍याचा समाज मोडल्यानंतर ते लगोलग पुणे अगर मुंबई समाजाचे सभासद झाले नव्हते, परंतु समाजाच्या ध्येयानुसार व्याख्याने द्यावयाची व ते ध्येय लोकापुढे ठेवावयाचे तर त्या संस्थेशी आपण संलग्न असले पाहिजे म्हणून १९३४ साली प्रतिज्ञा घेऊन ते मुंबई समाजाचे जाहीर रीतीने सभासदही झाले. ही कर्तव्यबुद्धि त्यांच्यात जागृत असल्यामुळेच वाई येथील प्रा. स. उत्सवात प्रो. न. र. फाटक ह्यांच्या व्याख्यानाच्या वेळी त्यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले व यावेळचे त्यांचे अध्यक्षीय भाषण हेच प्रार्थनासमाजासंबंधाचे त्यांच्या हातून घडलेले अखेरचे कार्य होय. Mr. J. N. Farquhar यांनी १९१३ साली प्रसिद्ध केलेल्या आपल्या Crown of Hinduism या ग्रंथात ख्रिस्तीधर्म हा हिंदुधर्माचा कळस आहे असे जे उद्‌गार काढले होते ते, प्रार्थना समाज धर्म हाच हिंदुधर्माचा कळस आहे अशा रीतीचा सोपपत्तिक, ऐतिहासिक व पारंपारिक दृष्टीने सिद्धांत मांडून, खोडून काढण्याचे रावबहादुरांनी केलेले कार्य अमोल आहे. प्रा. स. धर्मावर त्यांचा इतका दृढ विश्वास होता की, प्रा. स. धर्म नाही ते स्वराज्यच अगर ती लोकशाहीच नव्हे असे ते म्हणत.

## रावबहादुरांचे राजकीय तत्वज्ञान

येथवर चरित्रनायकाच्या भूमिकेचा विचार केला. आता त्याचे राजकीय व अन्य तत्वज्ञान कोणते हे पाहणेही अवश्य असल्याने, रावबहादुरांनी १९३४ साली अ. भा. प्रागतिक परिषदेच्या पुण्याच्या १६ व्या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदावरून जे अलीकडील काळात सर्वात अधिक महत्त्वाचे भाषण केले, त्यातीलच प्रमुख भाग त्यांच्याच शब्दात देणे बरे. ते म्हणतात- " सन १९१८ साली मोठ्या कष्टाने आणि नाईलाजाने प्रागतिकांना काँग्रेसमधून फुटून निराळी संघटना करावी लागली. प्रागतिक पक्षाच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी त्याने माँटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणांचा विचार केला, त्या

वेळेपासून काँग्रेसने अनेकप्रकारे नागमोडी राजकारण केले; परंतु मला सांगण्यास अत्यंत समाधान वाटते की, सोळा वर्षापूर्वी प्रागतिक पक्षाने ज्या सनदशीर व पार्लमेंटरी मार्गाचा अवलंब केला होता, त्याच मार्गावर सरते-शेवटी आज काँग्रेसला यावे लागले आहे. या अवधीत प्रागतिक पक्षास देशबांधवांच्या गैरसमजुतीमुळे आणि विशेषत: ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. दिसण्यात जरी विरोधाभास दिसला तरी ही गोष्ट खरी आहे की, हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांच्या धोरणा–मुळेच पुष्कळास जहाल मार्गांचा अवलंब करावा लागला. हे सर्वांस माहीतच आहे की सायमन कमिशनवर हिंदी माणसे न घेतल्यामुळे त्या कमिशनवर राष्ट्राने बहिष्कार घातला, आणि कमिशनपुढे कसलाच पुरावा देण्यात आला नाही. त्या कमिशनने जो पुरावा गोळा केला तो अपुरा, जातिविशिष्ट धोरणाचा, आणि काही तरी विकृत स्वरूपाचा असाच आहे. या कमिशनचे सर्वच सभासद परकीय अतएव देशातील खरी परिस्थिती ओळखणारे नस–ल्याने त्याने केलेल्या शिफारसी वस्तुस्थितिविपर्यास करणाऱ्या अशाच होत्या. त्या शिफारसींची वासलात राष्ट्राने, आणि विशेषत: प्रागतिक पक्षाने कशी लावली, हे महशूरच आहे; परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, जॉइंट पार्ल–मेंटरी कमिटीने आपल्या रिपोर्टात ह्याच शिफारसींचा विचार केला असून आपल्या सूचनांसही त्यांनी त्याच आधारभूत धरल्या आहेत.

## राज्यकर्त्यांच्या जातिनिष्ठ धोरणाचा समाचार

या रिपोर्टच्या विसाव्या पॅरिग्राफचे शेवटी अशी तक्रार करण्यात आली आहे की, 'निरनिराळ्या जातीत एकमेकांविषयी वाटणारा अविश्वास आणि विरोध, आज कैक वर्षे चालू असलेले हिंदु-मुसलमानातील तंटे आणि जाति-भेद ही सारी लक्षात घेऊनच जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्वाचा पुरस्कार यावेळी करणे क्रमप्राप्त झाले आहे.' या प्रकरणाचा १८९२ पासूनचा इतिहास बघता हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले यांनी १९०८ साली मुसलमा–नांना जरूर तितके प्रतिनिधी देण्याचे तत्व मान्य करतेवेळी निराळे मतदारसंघ देण्याच्या बाबतीत मात्र जबरदस्त शंका प्रदर्शित केली आहे, असे दिसून येते. सदर रिपोर्टातील पुढील उताऱ्यावरून आजच्या परिस्थितीवर आपल्यास

पुष्कळच प्रकाश पाडता येण्यासारखा आहे. आज आपण जबाबदार राज्य–पद्धतीच्या सुमधुर कालात वास्तव्य करीत आहोत, त्यामुळे तर सदरचा उतारा जास्तीच उपयुक्त होणार आहे. "मोर्लेमिंटो सुधारणात दिसून येणाऱ्या जातवारीच्या प्रश्नाचा विचार करताना पुढील तीन मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत. पहिली गोष्ट हल्लीची पद्धती ही पूर्वीच्याच जातवारीच्या व वर्ग–वारीच्या निवडणुकीचे तत्व योग्य प्रकारे अमलात आणण्याचे साधन आहे. यापूर्वी याबाबतीत जी योजना अमलात होती ती तितकीशी समाधान–कारकप्रकारे काम देणारी नाही, असे दिसून आल्यानेच हा फरक करावा लागत आहे. दुसरी गोष्ट अशी की, यापूर्वी जातवारीच्या तत्वावर होणाऱ्या निवडणुकीत संख्येच्या मानाने जातींना जास्त महत्त्व देण्यात आले होते. आणि तिसरी गोष्ट ही की, कौन्सिलांची पुनर्घटना हिंदुस्थानात पार्लमेंटरी शासनपद्धति प्रस्थापित करण्यासाठी मुळीच योजलेली नाही." जर यामधून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या हिंदुस्थानात पार्लमेंटरी शासनपद्धती सुरू कर–ण्याचा सूर वहात असेल, तर व्यक्तिशः मला त्याबद्दल एक अक्षरसुद्धा बोलावयाचे नाही. ता. २१–२–१९१८ च्या पत्रामधील पॅरिग्राफ ११ मध्ये मुंबई सरकारने जातवारीचे तत्व त्यांना मान्य नाही असे स्पष्ट लिहिले आहे. मॉंटेग्यु–चेम्सफर्ड रिपोर्ट म्हणतो की, "जातवारीचे मतदार संघ, मागील इतिहासाने व अनुभवाने मिळालेल्या धड्याच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे वर्गवारीच्या गटांना नागरिकत्वाचे शिक्षण न मिळता पक्षोपक्षांचे खूळ मात्र जास्त पसरते. आणि यामुळे पूर्वीच्याच भेदांना जास्त वाव मिळतो. यास्तव कोणत्याही प्रकारे जातवारीचे मतदारसंघ स्वराज्याच्या तत्वास विरोधी व त्याच्या मार्गात अडथळाच करणारे होत! अर्थात या पद्धतीचा कोणत्याही प्रकारे फैलाव झाल्यास त्यापासून उत्पन्न होणारे तोटे अगदी उघड आहेत."

### नव्या प्रयोगाची वेळ अद्याप आली नाही काय?

साऊथबरो कमिटीने जातवारीच्या मतदारसंघाबद्दल केलेल्या रिपोर्टी–संबंधी हिंदुस्थान सरकारने व्यक्त केलेल्या खलित्याच्या मतांचा विचार हिंदी राज्यघटनेच्याबद्दल पाठविलेल्या मसुद्याच्या ५ व्या पॅरिग्राफ (१८ ते २४)

मध्ये आला आहे, त्यात म्हटले आहे की, " रिपोर्टात म्हटल्याप्रमाणे जातवार निवडणुकींचे तत्व आम्हासही त्याज्यच वाटते. परंतु, या परिस्थितीत त्या टाकून देणे इष्ट नाही असे आमचे मत आहे. दुसऱ्या कोणत्याही रीतीने जबाबदार राज्यपद्धतीचा मार्ग यत्किंचितही आक्रमण्याची हिंदुस्थानची आज तयारी नाही व या मार्गाने अचुकपणे त्या इष्ट ध्येयासही पोचता येणे शक्य नाही. तथापि, अल्पावधीतच जातीभेदाचा बीमोड होऊन हिंदुस्थानात एकच सर्वसाधारण मतदारसंघ निर्माण होवो एवढीच सदिच्छा आम्ही या ठिकाणी रिपोर्टाप्रमाणेच व्यक्त करून ठेवतो. " सन १९२७ साली मद्रास येथील राष्ट्रीय सभेने राखीव जागासहित संयुक्त मतदारसंघाची मागणी केली. त्याचवेळी कलकत्ता येथे भरलेल्या मुस्लीम लीगने मद्रास काँग्रेसचा तो ठराव बहुतांशी ग्राह्य मानला. हिंदुमहासभेची मागणी स्वतंत्र मतदार-संघ नष्ट व्हावेत म्हणून एकसारखी चालू आहे. सर्वपक्षीय 'नेहरु रिपोर्टा' तही स्वतंत्र मतदारसंघ त्याज्य ठरवून हिंदुस्थानात सर्वत्र संयुक्त मतदारसंघ स्थापन व्हावेत असेच प्रतिपादण्यात आले आहे. आणि हिंदी प्रागतिक सभे-नेही आजपर्यंत आपल्या सर्व सभातून स्वतंत्र मतदारसंघ नष्ट करण्यात यावेत म्हणून एकसारखी मागणी केली आहे. आजपर्यंतच्या आपल्या अनु-भवाने आपल्याला जे शिकविले आहे ते हेच की, स्वतंत्र मतदारसंघामुळे आपसातील भेद बळावून जातीजातीत वैमनस्य वाढत जात आहे. इ. सन १९२८ साली मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात उघड उघड कबूल केले आहे की, 'सन १९१९ सालापेक्षा हल्ली जातिभेदांनी भयंकर स्वरूप धारण केले आहे.' सन १९२४ सालच्या रिफॉर्म्स इन्क्वायरी कमिटीने स्वतंत्र मतदारसंघाच्या विरुद्ध आपले मत दिले आहे. परंतु सखेदाश्चर्याची गोष्ट ही की, स्थानिक संस्थामधूनही हीच स्वतंत्र मतदारसंघाची पद्धत सुरू करण्यात आली आहे. या पद्धतीचा आज २४ वर्षे प्रयोग सुरू असून त्यावरून एकच गोष्ट सिद्ध झाली आहे की, अल्पसंख्यांक व बहु-संख्यांक याजमध्ये त्यामुळे कोणत्याही प्रकारे सलोखा वाढलेला नाही. मग मी म्हणतो, आता दुसरा एखादा प्रयोग करून पाहण्याची वेळ अजूनही आली नाही काय ?

## सरकार ट्रस्टींचे कर्तव्य पार पाडीत नाही

'संयुक्त' व 'स्वतंत्र' मतदारसंघाबद्दलच्या प्रश्नाची चर्चा गेली पाच वर्षे सारखी चालू असून, स्वतंत्र मतदारसंघाची पहिल्याने तळी उचलणारे देखील आता कबूल करीत आहेत की, 'स्वतंत्र मतदारसंघ लोकशाहीच्या तत्त्वास विरोधी व जबाबदार राज्यपद्धतीला विघातक आहेत' परंतु मुसलमान अल्पसंख्यांकाच्या हितसंरक्षणार्थ ते जरूरच आहेत, असेही प्रति–पादन करण्यात येत आहे. पण ह्या चुकीच्या पद्धतीने त्यांचे हितसंरक्षण कसे होणार राम जाणे! लखनौ अॅक्ट ज्या योजनेचा भाग समजला जात होता, ती योजनाही सर्वस्वी त्याज्य तरी मानली पाहिजे किंवा ग्राह्य तरी धरली पाहिजे. शिवाय ती योजना सुद्धा तात्पुरतीच होती. मी क्षणभर असे धरून चालतो, की जातीजातीत सन्माननीय समेट घडू शकला नाही, पण तेवढ्या-वरून सरकारांनी जो निर्णय दिला तो रास्त आहे असे म्हणता येईल काय? सरकारचा निर्णय कच्च्या पायावर उभारलेला आणि लोकशाहीच्या तत्वाला सर्वस्वी विरोधी असाच आहे! आपणास नेहमी सरकारच्या वतीने ऐकविले जाते की, 'सरकार हिंदुस्थानच्या प्रजाजनांचे ट्रस्टी आहेत.' सरकारचे हे म्हणणे जर खरे मानले, तर ट्रस्टींचे कर्तव्य सरकार योग्य तऱ्हेने बजावते, असे या निर्णयावरून आपणास म्हणता येईल काय? ट्रस्टी ज्यांचे हित पाहणार आहेत, त्यापैकी काही अज्ञान व काही सज्ञान आहेत, असे समजून आपण जर कोणत्याही ट्रस्टींचे कर्तव्य काय आहे हे पाहू गेलो, तर आपणास असे दिसून येईल की, ट्रस्टी या दोन्ही प्रकारच्या लोकांचे हित पाहणारे असले पाहिजेत व त्या सर्वांचेच गटाने हित पाहणे हेच त्यांचे खरे कर्तव्य आहे. अर्थात, त्यातील काही लोकांच्या लहरीखातर व त्यांची मनधरणी करण्यासाठी बाकीच्या लोकांचे हित गमावून एकंदर गटास विघातक असे वर्तन ट्रस्टींना केव्हाही करता येणार नाही. सरकारासही हाच न्याय सर्वस्वी लागू पडतो. मग सरकारच्या या करणीचे समर्थन कोणास कसे करता येणार? "फोडा आणि झोडा" असाच सरकारचा शिरस्ता आहे, असा सरकारवर लोकांचा प्रथमपासून आक्षेप आहे. अशा स्थितीत जातिभेदांचे पाप नाहीसे करण्यापेक्षा ते वाढविण्याचाच मार्ग सरकारने पत्करल्यावर

हिंदुस्थानच्या लोकांची मने सरकारच्या हेतूविषयी साशंक होऊन सरकार व प्रजाजन यांची दिलजमाई होणे जास्त बिकट झाल्यास त्यात काही नवल आहे काय ?

## सुधारणांचे कडू कारले !

प्रस्तुत रिपोर्टात ब्रिटिशांच्या दृष्टीने लोकसत्ता म्हणजे काय याचा ऊहापोह केला असून त्या प्रकाराची पार्लमेंटरी पद्धत हिंदुस्थानास लागू करण्यास कोणकोणत्या हरकती व अडथळे आहेत याचा विचार केला आहे, मी म्हणतो, सरकारला या अडचणी आणि हे अडथळे आजच दिसून आले असे थोडेच आहे ? या गोष्टी पूर्वीपासूनच सरकार समजून आहे ! आपणाला सरकार आजपर्यंत स्वराज्याचेच धडे देत आले आहे, असेच प्रत्येक सुधारणेच्या वेळी सरकारतर्फे आपणास सांगण्यात येत असे. सरकारने दिलेल्या या आश्वासनांच्या उघड उघड विरुद्ध असेच सरकारचे हे म्हणणे नाही काय ? जातवार मतदारसंघाची दुष्ट पद्धत सुरू ठेवून आणि त्यातल्या त्यात अल्पसंख्याकांच्या हितसंरक्षणाच्या नावाखाली अनेक संरक्षणे देऊन सरकार आपल्याला खरोखरच स्वराज्याच्या ध्येयमार्गांनी नेत आहे काय ? का वास्तविकरीत्या ज्याला स्वराज्य हे नावही शोभणार नाही, अशा कोणत्या तरी भलत्याच आडमार्गाला सरकार आपणास नेत आहे ? ही सरकारची ( घटना ) ह्या देशाच्या लोकांच्या खऱ्याखुऱ्या हिताकरताच आहे, असे आपणास सांगितले जात आहे; पण इतक्या गोष्टी स्पष्टपणे दिसत असताना त्या सांगण्यावर कोण बरे विश्वास ठेवील ? सुधारणा समाधान मानण्या इतक्या पुरेशा आहेत की नाहीत हाही प्रश्न इतकासा महत्त्वाचा नाही; परंतु, अशा सुधारणांना गोंडस नावाची कितीही साखर चोळली तरी त्यातील कटुपणा केव्हाही नष्ट होणार नाही असेच दिसून येत नाही काय ? यावरून सरकारच्या प्रामाणिक हेतूविषयी जबरदस्त शंका घेण्यास जागा नाही, असे कोण म्हणेल ?

## आश्वासन व आचरण यातील अंतर !

इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकून त्यात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित केल्यानंतर त्यांचे पहिले कर्तव्य हिंदी लोकांना स्वराज्याला लायक करण्या—

साठी खरे व योग्य प्रकारचे शिक्षण देणे हे होते. निदान हिंदी लोकांच्या पूर्वपार उच्च संस्कृतीनुसार त्यांच्या ठिकाणी स्वराज्याबद्दल स्वाभाविकपणे आकांक्षा उत्पन्न होऊन त्या लोकमताच्या द्वारे प्रकट होऊ लागल्यावर तरी सरकारनी त्या मार्गास लागावयास पाहिजे होते. लोकांच्या या आकांक्षा स्वाभाविकच आहेत, ही गोष्ट आता सर्वांनाच कबूल झाली आहे. ब्रिटिश मुत्सद्दी आपणाला दूरदर्शी म्हणवितात, मग त्यांनी स्वार्थबुद्धी व आकुंचित दृष्टी याचा त्याग करावयास नको होता काय? कारण त्यावाचून हिंदी लोक आणि इंग्रज यामध्ये सलोखा वाढणे शक्य तरी आहे काय? आणि त्यांनी अशाप्रकारे सर्व हितसंरक्षक धोरण स्वीकारावयास नको होते काय? पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, नव्या घटनेत या प्रकारच्या प्रयत्नांचा मुळीच मागमूसही लागत नाही. हिंदी लोकांच्या आपसातील मतभेदाचा मोठा थोरला बागुलबुवा करून आपण वाजवीपेक्षा जास्त मागण्या करतो आणि त्यांनी देऊ केलेल्या योजनांच्या जागी व्यवहार व उपयुक्त अशा विधायक योजनाही सुचवीत नाही, अशी ओरड ब्रिटिश लोक आपणाविरुद्ध करतात. या बाबतीत, त्यांचे पदरात माप घालण्यासारखे आपणास पुष्कळच बोलता येईल. गोलमेज परिषदेचा इतिहास ज्याचे स्मृति पटलावर कायम आहे त्याला याबद्दल काही निराळे सांगावयास नको! राऊंड टेबल कॉन्फरन्स-मध्ये निष्पन्न होणाऱ्या मागण्यांच्या तत्वावरच सुधारणांच्या कायद्याची उभारणी होईल याबद्दल वेळोवेळी सरकारकडून देण्यात आलेल्या अभि-वचनाकडे आपली दृष्टी वेधली म्हणजे बस्स आहे! शुभ्रप्रत्रिकेनेही सर्व अभिवचने पोकळ ठरली तरीही जॉइंट पार्लमेंटरी कमिटीच्या हिंदी सभासदांनी त्यात काही विधायक फरक सुचविले. हिंदी प्रागतिक पक्षाच्या सहकारेच्छेचे हे प्रत्यक्ष प्रमाण होय. भिन्न ज्ञातीय व भिन्न हिताच्या प्रति-निधींनी एकमुखी मागणीही केली, तथापि, याही एकमुखी मागणीस शुभ्र-पत्रिकेने पूर्णपणे धुडकावून दिले. जॉ. पा. कमिटीचा हा रिपोर्ट कॉन्झर्व्हेटिव्ह इंग्रजांचा कल कसा सांभाळता येईल, याच आस्थेने काळजीपूर्वक लिहिला गेला आहे त्यात हिंदी प्रागतिक पक्षाचीही संपूर्ण मागणी मुळीच येऊ शकत नाही. मग हिंदुस्थानच्या इतर राष्ट्रीय पक्षांची गोष्टच नको! परंतु याही मागणीची वाट सरकारने याप्रमाणे लावली आहे. यावरून एकच गोष्ट सिद्ध

होते की, हिंदी लोक काही मागू लागले की, इंग्रजांना साधेल तितक्यांदा एकमुखी मागणीची ढाल इंग्रज पुढे करतात. परंतु तीच एकमुखी मागणी इंग्रजांच्या हितास विरोधी आहे असे दिसले की तेही म्हणणे ते मानीनातसे होतात.

## स्वराज्याचे खेड्याच्या चावडीतील बीज

जातवारीचे तत्व लोकसत्तेच्या ध्येयाला सर्वस्वी विघातक असून त्यामुळे आपले अतोनात नुकसान झाले आहे. स्वराज्याच्या मूलभूत तत्त्वाचा ते सर्वथैव नाश करणारे आहे. रिपोर्टाच्या १२० पॅरिग्राफमध्ये असे विधान आहे की, ' हिंदूखेरीज बहुतेक सर्व जातींचा या निर्णयास पाठिंबा आहे ' पण हे विधान वस्तुस्थितीशी सर्वथैव विपर्यस्त आहे ! रिपोर्टाची सर्व पाने चाळा, त्यात आपल्याला इथून तिथून एकच सूर ऐकू येईल व तो हा की, " हिंदुस्थान स्वराज्याला लायक नाही. स्वराज्याचा कारभार चालविण्याच्या पात्रतेचे बीजच त्यात रुजलेले नाही. यामुळे हे स्वराज्याचे नवे बीज हिंदुस्थानात नव्याने लावताना संरक्षणाची पदोपदी अत्यंत जरूरी आहे. " ही विचार-सरणी अनुसरणारांनी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहे असे म्हणावे लागते. स्वराज्याची मूलभूत कल्पना बीजरूपाने खेडेगावच्या चाव-डीत सापडते. गावचावडीचा योग्य कारभार फक्त हिंदुस्थानातच दिसून येतो. तो इतका की, हिंदुस्थानावर अनेक प्रकारच्या राजसत्ता होऊन गेल्या तरी गाव-चावड्यांचा बीमोड हिंदुस्थानात होऊ शकला नाही; इतकेच नव्हे परंतु, मुसलमानी आमदानीत त्याकडे जरी पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते तरीही पेशव्यांच्या कारकीर्दीत त्यांचा पुनरुद्धार झाल्यावाचून राहिला नाही. या गोष्टीचा विचार केला म्हणजे स्वराज्याच्या कारभाराचे बीज हिंदुस्थानात नव्याने लावावयाचे आहे असे म्हणणाराचेच हसे होईल यात शंका नाही. पेशव्यानंतरचा पहिला इंग्रज अंमलदार एल्फिन्स्टन याने ती गावचावडीची पद्धत कायम ठेवण्याचा प्रयत्नही केला. परंतु मध्यवर्ती इंग्रज अधिकारी सत्तेकडून त्याला तसे करण्यास अडथळा झाला; यामुळे तो प्रयत्न त्यास सोडून द्यावा लागला. मि. एम. एस. फॅक्स याने अवशिष्ट पेशवे दप्तराचा अभ्यास करून त्यापासून एकंदर १८ धडे घेण्यासारखे आहेत असे कबूल

केले आहे. त्यात तो शेवटी म्हणतो, 'खेडेगावच्या चावडीमध्ये स्वराज्याचा कारभार करण्याची आश्चर्यकारक कार्यक्षमता वास्तव्य करीत आहे ही गोष्ट हिंदुस्थानने विसरता कामा नये.' इ. स. १९३१ साली मार्चमध्ये प्रसिद्ध झालेल्या मुंबई इलाख्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या अहवालात असा कबुली जबाब आहे की, "काही कालापर्यंत हिंदुस्थानच्या पुष्कळ भागात स्थानिक स्वराज्यसंस्था अस्तित्वात असून त्यांना राजसत्तेकडून प्रोत्साहन दिले जाई. आणि काही ठिकाणी तर असे दिसून आले की निवडणुकीची तत्वेसुद्धा हिंदुस्थानच्या लोकास पूर्णपणे अवगत होती." रिपोर्टात ज्या जात्यंधतादि प्रकारच्या अडचणींचा उल्लेख आहे; त्या प्रकारच्या अडचणी इतर देशातही होत्या व आहेत. परंतु तेथेही अमेरिकेतील कॅनडाच्या राज्यपद्धतीसारख्या पद्धती सुरू करून त्या अडचणी दूर करता येऊ शकल्या. डिस्काऊट पायसच्या भाषेत कॅनडामधील अडचणी सांगणे झाल्यास असे म्हणता येईल की, "या देशात नोहेस्कोशियापासून पॅसिफिक समुद्रापर्यंत पूर्वपश्चिम अफाट विस्ताराचा जसा पसारा होता, तसाच भाषावैचित्र्याचा व रीतिरिवाज व कायदेकानू यांचाही गोंधळ होता. देशातील एकतृतीयांश लोक फ्रेंच बोलणारे असून त्यांचे कायदे रोमनलॉप्रमाणे होते, तर राहिलेले लोक इंग्रजी कायदा पाळणारे होते."

## मराठा राज्याच्या वेळची संयुक्त संघटना

कोणत्याही राज्यपद्धतीत शांतता व सुरक्षितता भंग होण्याची भीती फक्त परस्परविरोधी व हेकट अशा दोन जातींच्या अस्तित्वामुळेच उत्पन्न होते. कॅनेडियन राज्यपद्धतीच्या यशाची गुरुकिल्ली पुढील गोष्टीत आहेः तेथे सर्व सत्ता मध्यवर्ती कायदे मंडळाच्या हातात देण्यात आली आहे. न्यायदानाच्या सर्व शाखा मध्यवर्ती सत्तेच्या आधीन असतात. फक्त हुकमतीसारख्या काही साध्या बाबतीत त्याना प्रांतिक सत्तेशी संबंध ठेवावा लागतो. तसेच प्रत्यक्ष दिलेल्या नाहीत अशा सर्व सत्ता व अधिकार प्रांतिक सरकारकडे न राहता मध्यवर्ती डोमिनियनकडे राहतात. हिंदुस्थानातही अनेक भिन्न प्रकारचे लोक असल्याने त्यांच्यात अडचणी उपस्थित होणे साहजिक आहे. अर्थात समर्थ अशा मध्यवर्ती सत्तेसहित कॅनडामधील हीच ध्येये हिंदुस्थानच्याही राज्य

घटनेचे वेळी पुढे ठेविली पाहिजेत. हिंदुस्थानची जमीन व वीज ही स्वराज्याचा कारभार चालविण्यास पूर्णपणे योग्य आहेत. खेडेगावच्या चावड्यातून हिंदुस्थानात खऱ्या लोकशाहीचे शुद्ध बीज आपणास मिळू शकते. तसेच मराठ्याच्या संयुक्त संघटनेच्या राज्य पद्धतीत हिंदुस्थानच्या संयुक्त राज्य घटनेचे बीज आपणास पहावयास सापडेल. तेव्हा, त्याही व स्वराज्याच्याही बीजाची जोपासना व वाढ एवढ्या मोठ्या हिंदी प्रजेच्या हिताच्या दृष्टीने मातेच्या काटेकाळजीने वरिष्ठ सत्तेनेच केली पाहिजे. 'मोंगलामागून इंग्रजांचा अंमल हिंदुस्थानात सुरू झाला' हे म्हणणे चुकीचे आहे. न्या. मू. रानडे यांच्या इतिहासातील एक उतारा या ठिकाणी उधृत धरणे अप्रस्तुत होणार नाही. त्यावरून या विधानाच्या खोटेपणावरही प्रकाश पडणार असून हिंदुस्थानच्या संयुक्त राज्यघटनेलाही हिंदुस्थान कसा योग्य आहे ते विशद होणार आहे. न्या. मू. रानडे म्हणतात:–"आपणाला बरेच वेळ सांगण्यात येते की मोंगलांच्या पाठोपाठी इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानात सुरू झाले; परंतु, हे खरे नाही. इंग्रजाचे राज्य होण्यापूर्वी हिंदू राजे हिंदुस्थानावर राज्य करीत होते. या हिंदु राजांनी मुसलमान राजांचा जुलूम नाहीसा केला होता. ग्रँड डफ याने आपल्या इतिहासात मराठ्यांच्या इतिहासाकडे विशेष लक्ष दिले असून त्याबद्दल त्याने अगदी सार्थ असे पुढील उद्गार काढले आहेत. 'आपणापूर्वी हिंदुस्थानात राज्य करणारे हिंदू असून ते दिवसेंदिवस सामर्थ्य संपन्न बनत होते. असे होता होताच दिव्य साहसी वीर शिवाजी भोसले उदयास आला. बंगाल व कॅरोमाँडल किनाऱ्याचा प्रदेश याखेरीज इतर भागात इंग्लिशांना ज्यावर विजय मिळाला ते मुसलमान सुभेदार नसून हिंदु राजे होते. या हिंदु राजांनी आपले स्वातंत्र्य प्रथापित केले होते. या हिंदु राजामध्ये मराठ्यांच्या संयुक्त राज्य संघाच्या राजांचे स्थान इतिहासात पहिल्या प्रकारचे आहे!' यावरून असे दिसून येईल की, मराठ्यांचा इतिहास म्हणजे संयुक्त संस्थानचा इतिहास होय! पेशवे व मोंगल बादशहा यांचे जेते म्हणून इंग्रज सरकार साम्राज्य सत्ता चालवीत आहे. तरीही अनेक संस्थानातील मराठ्यात इतरत्र दिसून न येणारे सामर्थ्य आजही वास करीत आहे. आजचे हे स्वाभिमानी स्वरूप भावी संयुक्त राज्य

घटनेच्या हिंदुस्थानात कोणासही स्वतःच्या कर्तव्याची जाणीव करून देईल. अर्थात त्या संयुक्त राज्य घटनेत राष्ट्रीयत्वाच्या तत्वावर अधिकाराची विभागणी होऊन सार्वभौम सत्तेशी सत्तेशी सर्व घटक एकाच समतेच्या बंधाने बांधले गेले पाहिजेत." ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानिक या दोघानांही न्याय्य अशा तत्त्वावरील फेडरेशनला या लिबरल फेडरेशनची मान्यता आहे. हिंदी संस्थानिक म्हणजे पूर्वीच्या संयुक्त राज्य संघाचे अव-शिष्ट घटकच आहेत. त्यांनी आपली राज्यसत्ता कायम ठेंवतानाच आजच्या लोकशाहीच्या काळास अनुसरून जरूर त्या सुधारणा घडवून आणण्याची आपली जबाबदारी ओळखून तसे करण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे इंग्रज सरकारनीही वेळेचा अपव्यय न करता शक्य तितक्या लवकर इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेचे अधिकार हिंदुस्थानास देऊन संस्थानिकांना त्या फेडरेशनमध्ये सामील करून घेण्याची खटपट करावी. आणि तसे झाले म्हणजे हिंदी प्रजाजनांना व संस्थानिकांना एकोप्याने अखिल हिंदुस्थानच्या हितार्थ झपाटयाने प्रयत्न करता येईल. पूर्वीच्या काळी राजे लोक शौर्य, पुरुषार्थ, चांगल्या गोष्टींचा पुरस्कार, विद्या, संगीत, व कला यांचा परामर्ष घेऊन प्रजेचे हित हेच आपले ध्येय समजून चालत. आजच्या काळात त्यांना कलासंवर्धन, कालमानाने आज सर्वात जास्त महत्त्व आलेल्या उद्योगधंद्यांची व व्यापाराची वाढ, आणि घरगुती धंद्यांचे संशोधन यांचा परामर्ष घेऊन हिंदुस्थानचे व आपल्या प्रजाजनांचे हित साधता येणारे आहे.

## स्वातंत्र्यतत्वावरील 'लिबरॅलिझम'

जे. पी. सी. च्या रिपोर्टीचा पॅरिग्राफ म्हणतो की, "हिंदुस्थानात सर्वगामी अशा प्रकारची राजकीय मतांची संस्था नाही. आहेत त्या सर्व संस्था निरंतराच्या पक्षोपक्षांच्या दृष्टीने पाहणाऱ्या आहेत. हे पक्षभेदही धोरणाच्या सामान्य विषयावर उत्पन्न होणाऱ्या भेदावर निर्माण झाले नसून, त्यांची उभारणी बहुतांशी जातितत्वावर झालेली असते. त्यात लिबरल पक्ष हाच मुख्य पक्ष आहे. जहाल अगर विध्वंसक पक्षाच्या पेक्षा हा लिबरल पक्षच काही अंशी सुधारणावादी पक्ष आहे. हा पक्ष समजण्यापेक्षा तो मनाचा एक धर्मगुण मानला पाहिजे." प्रो. हॅरॉल्ड लॅस्की यांचे भाषेत 'लिबरॅलिझम'

ची व्याख्या अशी होते की, 'ध्येयवादापेक्षा मनोव्यापाराच्या द्योतकास हा शब्द लागू पडतो. त्यात स्वातंत्रेच्छेचा समावेश होत असून त्याच इच्छेचा वरपगडा असतो. यामुळे विघातक मताकडे कानाडोळा करणे-नव्हे त्याची पूर्ण हेळसांड करणे त्यास क्रमप्राप्तच असते आणि हाच गुण मनुष्य जातीत क्वचित सापडणारा परंतु अत्यावश्यक असतो.' स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग अनेक असू शकतील; परंतु त्या सर्वात खात्रीचा व कार्यक्षम असा "लिबरॅलिझम" हाच मार्ग आहे. त्याची उभारणी स्वातंत्र्याच्या तत्त्वावर झालेली आहे. तथापि स्वातंत्र्याचे तत्वाप्रीत्यर्थ कायदा, सुरक्षितता व न्याय यांची पायमल्ली होऊ देणे या पक्षाला मानवणार नाही; कारण, समाजधारणेस या गोष्टी अत्यावश्यक आहेत. अशा प्रकारच्या उदात्त तत्त्वावरच बंगालमध्ये राजा राममोहनराय आणि मुंबई इलाख्यात कै. न्या. मू. म. गो. रानडे यांनी या पक्षाच्या सर्वव्यापी कार्यास सुरुवात केली. तीच कामगिरी मि. बद्रुद्दिन तय्यबजी, नौरोजी, सर फिरोजशहा मेहता, बेझंटबाई, आणि ना. गोखले यांच्यासारख्या थोर विभूतींनी त्याच तत्वावर पुढे चालू करून तिचा विस्तार वाढविला. अर्थात प्रागतिक पक्ष एखाद्या नव्या तत्वावर उभारलेला नाही. 'राष्ट्रीय प्रागतिक पक्षा' च्या या संघटनेचा मुख्य हेतु हा की, हिंदुस्थानास शक्य तितक्या लवकर विधायक मार्गांनी स्वराज्य म्हणजे स्वायत्ततापूर्ण स्वराज्य आणि डोमिनियन स्टेटस मिळवून देणे. "राष्ट्रीय" या शब्दात विशिष्ट जात, पंथ अगर समाज असा अर्थ अभिप्रेत होऊ शकत नाही. "संघ," "फेडरेशन" या शब्दात सर्व प्रकारच्या सुधारणावादी पक्षांचा समावेश होऊ शकतो. आपल्याला स्वातंत्र्याची सुप्रभात लवकरच उजाडण्याची आशा आहे. ते स्वातंत्र्य नुसत्या विधायक टीकेच्या भडिमाराने प्राप्त होणार नाही. यामुळे, या प्रागतिक पक्षाचे आद्य तत्व असेच ठरून गेले आहे की, शक्य तोवर सरकारशी सहकार करून जरूर त्या ठिकाणी विरोध करणे इष्ट आहे. कै. लोकमान्य टिळकांच्या अनुयायांनीसुद्धा याच मार्गाचा अवलंब केला; परंतु त्याला फक्त 'प्रतियोगी सहकार' असे नवे नावच देण्यात आले आहे असे करण्याचा हेतु इतकाच की त्या वेळी नव्यानेच प्रसृत झालेल्या 'असहकार' या तत्वापासून आपला पक्ष वेगळा आहे असे गणले जावे.

## ' सरकारवरील माझा विश्वास पार उडाला ! '

कै. रानडे यांनी त्यांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या अलौकिक दूरदर्शित्वामुळेच पुण्याच्या 'सार्वजनिक सभे' त दक्षिणी मराठा संस्थानिकांचा समावेश करून घेतला व त्यांच्याही वतीने कार्य करण्यास सुरुवात केली. पुण्याची ही 'सार्वजनिक सभा' म्हणजे दक्षिण हिंदुस्थानातील सर्वात जुनी अशी राजकारणास वाहिलेली संस्था होय. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी, सेवासदन, ग्रामोद्धारार्थ स्थापन झालेल्या संस्था या सर्वांनी केलेली अमोलिक कामगिरी जनतेपुढे आहेच. तात्पर्य " लिबॅरलिझम " म्हणजे हिंदुस्थानच्या भूमीत पाश्चात्यांनी लावलेले नवे बीज नसून ते पूर्वापारच आमच्यात वास करीत आहे हे उघड आहे. प्रागतिकपक्षाची तत्त्वे दिवसेंदिवस बळावत असून इतर संस्था व पक्ष यांच्यातही त्यांच्याबद्दल आस्था व आवड उत्पन्न होऊन त्या मार्गांनी त्यांचीही जागृती झालेली आहे. या पक्षांनी प्रागतिकपक्षात आपणास सर्वस्वी समाविष्ट करून घेतलेले नाही ही गोष्ट खरी आहे. अर्थात, या पक्षांची तत्त्वे सैल आहेत; कारण विघातक अगर जहाल यांना प्रागतिकपक्षात जागाच नाही, प्रागतिकपक्षाची धडपड मंद नव्हे; परंतु धिम्या मार्गांनी मिळणाऱ्या सुधारणाकरताच सारखी चालू आहे व असणार. सरकारच्या आतापर्यंतच्या धोरणावरून तर आता याच पक्षाच्या तत्त्वाचा जास्त अवलंब करणे जरूर झाले आहे. लोकांच्या डोळ्यात कोणत्याही पक्षाचे महत्त्व त्याच्या कामगिरीवरून व त्या पक्षाने सरकारवर मिळविलेल्या वर्चस्वावर भरत असते. मॉंटफोर्ड सुधारणांच्या वेळी मॉंटेग्यूसाहेब हिंदुस्थानात होते तोपर्यंत सरकारचे धोरण प्रतियोगी होते. परंतु त्यांच्या पाठीमागे ते धोरण बदलून प्रागतिक, राष्ट्रीय, जहाल, सहकारवादी आणि असहकारवादी या सर्वांनाच सरकार ठेचू पहात होते व आहे. तथापि, लॉर्ड बर्कनहेडसारख्या हटवाद्यालाही कबूल करावे लागले की, ' हिंदुस्थानचे भवितव्य सुधारण्याचे सामर्थ्य प्रागतिक पक्षात आहे.' आणि तरी देखील प्रागतिकपक्षाच्या कार्यास सरकारची सहानुभूति मुळीच लाभलेली नाही. इतकेच नव्हे, तर प्रागतिक पुढाऱ्यांच्या सल्ल्यासही सरकारने धाब्यावर बसविले आहे, फार कशाला सरकारने अरेरावीचाच अवलंब तेवढा केला आहे. कौन्सिलमधील माझ्या

बारा वर्षांच्या अनुभवाने माझा सरकारवरील विश्वास पार उडून गेला आहे. सरकार तोंडाने म्हणते की, आम्ही हिंदुस्थानास बरोबर योग्य मार्गांनी नेत आहोत; परंतु सरकारची कृती मात्र स्वार्थ व जातिभेद यांचे भूत उठविण्याचीच आहे, अर्थात यामुळे चिरस्थाई व सर्वव्यापी तत्त्वांचा प्रसार केव्हाही थांबलाच पाहिजे !

## प्रागतिक पक्षाची सुवर्णमध्यवादी भूमिका

प्रागतिक पक्षाचा कार्यक्रम म्हणजे सर्वव्यापी अशा मध्यवर्ती पक्षाचा सर्वांगीण कार्यक्रम आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक वगैरे सर्व क्षेत्रे या पक्षाच्या कार्याने व्यापिली आहेत. तो कार्यक्रम जसा सनातनी अगर जुने ते सोने म्हणणाऱ्या पक्षाला खपणार नाही, तसाच तो नव्यासही रुचणार नाही कारण या दोन्ही टोकांमधून त्याला मार्ग आक्रमण करावयाचा आहे. इतर पक्षांशी साधल्यास सहकार्य करून आपल्या कार्याची दिशा ठरविली तर आपल्याला पुष्कळच कार्य साधता येण्यासारखे आहे. अर्थात आपणापुढे सामाजिक, आर्थिक, आणि यासारखे इतर पुष्कळच अवघड प्रश्न उभे राहणारे आहेत. त्यांच्या सोडवणुकीसाठी आपणास खेडेगावात जागृती करून आधुनिक काळानुसार सामाजिक व धार्मिक मतांतरे घडवून आणली पाहिजेत, त्यात विशेषतः स्त्रियांचे हक्कासंबंधी कायद्याच्या मार्गांनी आपणास सुधारणा घडवून आणणे क्रमप्राप्त असल्याने, त्याच दृष्टीने जास्त प्रयत्न करणे जरूर आहे. परिस्थित्यनुरूप चालीरीती व रिवाज यांत फरक करून घेण्याची हिंदुधर्माची पूर्व परंपरा आहे. शेतकऱ्यांची स्थिती, त्यांचा कर्जबाजारीपणा, पराकाष्ठेचे दारिद्र्य आणि मध्यम व खालच्या वर्गीतील वाढत्या प्रमाणातील बेकारी यासारख्या प्रश्नांचा अगोदर विचार व्हावयास पाहिजे. ग्रामोद्धार व हरिजनोद्धार यासाठी विधायक कार्यक्रम आखून लिबरल पक्षामार्फत निघालेल्या व निघणाऱ्या संस्थांचे कार्यक्षेत्र व्यापक व उपयुक्त करणे आपले काम आहे. मतदानाची किंमत व त्या हक्काचा उपयोग याचे, निःस्वार्थी सर्वपक्षीय हिताच्या दृष्टीने विचार करणाऱ्या माणसाची निवड करता येऊन जातिभेदास वाव राहू नये अशा प्रकारे लोकांना शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याला संरक्षणात्मक कायदे करिता येत

नाहीत. यामुळे स्वदेशीप्रसाराने आपले उद्योगधंदे सुधारणेही अत्यावश्यक आहे. यामुळे आपल्या यशाची जरूर ती तयारी आपण निश्चयात्मक रीतीने करू शकू, अशी मला दृढ आशा वाटते. या देशात आत्यंतिक समाजसत्तावाद व निरीश्वरवाद यांना जागा नाही. सरकारने लोकांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न न केला तर मात्र देशात अनवस्था माजेल." जॉ. पा. क. चा रिपोर्ट ही जरी तात्कालिक गोष्ट असली, तरी तिजवरील रावबहादुरांचे हे सडेतोड व बिनतोड भाष्य अगर तिजवरील त्यांचे हे साधार व सुंदर विवेचन ही गोष्ट मात्र त्यांचे व त्यांच्या पक्षाचे अंतिम राजकीय ध्येय व निश्चित धोरण यांचे ज्ञान होण्याच्या दृष्टीने चिरकालिक आहे यात शंका नाही. यातील जातिनिर्णयावरील त्यांची टीका ही सुप्रसिद्ध मॉडर्न रिव्ह्यूकर्ते श्री. रामानंद चतर्जी यांच्या तोडीची किंबहुना काही बाबतीत त्याजपेक्षाही सरस आहे, अशी अनेक प्रमुख राजकीय मुत्सद्यांनी व धुरीणांनीही कबुली दिली आहे, एवढी एकच गोष्ट तिच्या सुरसतेची साक्ष पटविण्यास पुरेशी आहे. हिंदुस्थानची आजवर या जातीने कशी माती केली आहे, याचा स्पष्ट आदर्श म्हणजे ही टीका होय व विचारी भारताच्या साध्य-साधनावर पाडलेला सर्चलाईट म्हणजे हे भाषण होय.

## राजकीय कामगिरीला प्रारंभ

### कौन्सिलादिकांतील कामगिरीचे व्यवहार्य धोरण

रा. ब. काळे यांनी, स्थानिक स्वराज्य संस्था अगर निरनिराळी संस्थानी व ब्रिटिश कायदे मंडळे यातून अध्यक्ष, चेअरमन व प्रमुख सभासद या नात्याने जी नानाविध लोकोपकारी कार्ये केली, त्यांस एकच कसोटी लावता येईल. अथेनियन युवकांनी आपल्या निवडणुकीच्या वेळी अशी जाहीर घोषणा केली होती की, 'लबाडीचे अगर नामर्दपणांचे एक कृत्य करून, आम्ही आमच्या जिल्ह्याची ( अगर शहराची किंवा प्रांताची ) अपकीर्ती करणार नाही. त्याचप्रमाणे आमच्या बांधवांना दगा देऊन व त्यांना दुःखात सोडून, आम्ही निघूनही जाणार नाही. आमच्या ध्येयासाठी व जिल्ह्यातल्या पवित्र वस्तूसाठी, आम्ही एकएकटे व सर्व मिळून लढू. आमच्या जिल्ह्याच्या

कायद्यांना मान देऊन आम्ही त्यांचे पालन करू आणि आमच्या वरिष्ठांपैकी ज्यांचा कल ते रद्द करण्याकडे किंवा मोडण्याकडे असेल, त्यांच्या मनात त्याबद्दल आदर उत्पन्न करण्याचा आम्ही प्रयत्न करू. नागरिकांच्या कर्तव्या-विषयी लोकात जागृती उत्पन्न करण्याचा आम्ही प्रयत्न करू, आणि या सर्व मार्गांनी आम्ही आमच्या जिल्ह्याचा मोठेपणा उत्तरोत्तर वाढवून, आमच्या वडलांनी हा जिल्हा जसा आमच्या स्वाधीन केला, त्यापेक्षा अधिक लौकिक-वान व अधिक सुंदर असा तो आम्ही आमच्या पुढच्या पिढीच्या हवाली करू ' या प्रतिज्ञेनुसारच रा. ब. काळे यांनी आपली संस्थांतील कर्तव्ये पार पाडली आहेत. हे कोणासही-असलेच तर त्यांच्या शत्रूसही-मान्य करावे लागेल. इ. स. १९३४-३५ च्या सुमारास जगातील अग्रेसर अशा अमेरिका राष्ट्राच्या न्यूयॉर्क नामक विश्वभूषण नगराच्या मेयरच्या जागी, जेव्हा एफ्. लागार्डिआ या अत्यंत लोकप्रिय गृहस्थाची निवडणूक झाली, तेव्हा त्याने आपल्या आभारपर भाषणात आपली मार्गदर्शक तत्त्वे व आपली शहरकार-भाराची धोरणे यासंबंधाने असे उद्‌गार काढले होते की, ' आमच्या कार-भाराचा पहिला महत्त्वाचा नियम म्हणजे निवडणुकीच्या अगोदर ज्या गोष्टी आम्ही करू म्हणून म्हटले, त्या आता निवडून आल्यावर करणे हा आहे. आमचे शहर अगर कोणतेही शहर कोणा एका व्यक्तीचे किंवा व्यक्ति-समूहाचे नसून ते सर्व लोकांचे आहे. म्हणून ज्याक्षणी माझी निवडणूक झाली, त्याचक्षणी न्यूयॉर्क लोकांच्या ताब्यात आले आणि ते शांततेत त्यांच्या पूर्ण ताब्यात राहवे म्हणून त्यांना योग्य मार्ग दर्शविणे व खबरदारी घेणे हे या क्षणापासून माझे कर्तव्य आहे.' न्यूयॉर्क मेयरच्या या उद्‌गाराचा कै. रा. ब. काळे यांच्या उपरिनिर्दिष्ट संस्थातील कर्तृत्वाला कस लावताना, त्यात फारच थोडा बदल करावा लागेल.

## यशश्चंद्राला लागलेले गालबोट

मॉंटफर्ड सुधारणा येण्यापूर्वीच्या मोर्ले-मिंटोप्रणीत मुंबई कायदे-कौन्सिलात इ. स. १९११ मध्ये सातारा जिल्ह्यातर्फे फक्त कै. श्री. दादासाहेब करंदीकर हे सभासदत्वाच्या हक्काने काही काळ बसले होते. परंतु मॉंटफर्ड सुधारणा कायद्यानुसार सुरू झालेल्या व अत्यल्पांशाने का होईना पण लोकसत्ता

प्राप्त झालेल्या इ. स. १९२०–२१ च्या पहिल्या मुंबई कौन्सिलात, सातारा जिल्ह्यातर्फे जे कूपर–आढाव प्रभृति लोक निवडून गेले, त्यात रा. ब. काळे हे प्रमुख होत. या निवडणुकीसाठी श्री. भाऊसाहेब सोमण प्रभृति काही मंडळी टिळक डेमॉक्रॅटिक स्वराज्य पक्षातर्फे उभी राहणार होती, परंतु त्याच-वेळी कॉंग्रेसने आपला प्रख्यात पण अयशस्वी कौन्सिल बहिष्कार पुकारल्या-मुळे त्यांनी कॉंग्रेसची आज्ञा पालन करण्यासाठी म्हणून आपली उमेदवारी माघारी घेतली होती. रा. ब. काळे यांची मात्र एकीकडे हृदय आणि दुसरी-कडे कर्तव्य अशी विचलित स्थिती नव्हती, तर त्यांच्या ठायी ही दोन्ही एकरूप झालेली होती. इ. स. १९२३ साली स्वराज्य पक्षातर्फे झालेल्या निवडणुकीत श्री. भाऊसाहेब सोमणांना पहिल्या नंबरचे व खा. ब. कूपर आणि पहिल्या कौन्सिलमधील सरकारनियुक्त श्री. जाधव यांस त्या खालचे यश आले आणि रावबहादुरांना अपयश आले खरे, परंतु पुढे कौन्सिलात व बाहेर ज्या काही घटना झाल्या, त्यायोगे जे सिद्ध झाले ते हेच की ‘ यावेळी रा. ब. काळे हे कौन्सिलात असणे अत्यंत अवश्य होते ’ आणि म्हणूनच रा. ब. काळे यांच्या कौन्सिलातील आजवरच्या यशश्चंद्राला हा अपजय म्हणजे गालबोटासारखा होय असे म्हणता येते.

## अपयशाच्या कारणांची मीमांसा

रावबहादुर हे करवाढीच्या धोरणाचे पुरस्कर्ते आहेत, असा यावेळी प्रतिपक्षाकडून जिल्हाबोर्डातील लोकलसेस वाढीची ढाल पुढे करून, खोटाच मतप्रचार करण्यात आला खरा; परंतु अखेरीस कौन्सिलात काही ब्राह्मणे-तर व स्वराज्यपक्षीय सभासदांनीच मुग्ध राहून, घरी बसून अगर निघून जाऊन शेतसारावाढीच्या सरकारी धोरणाची एक प्रकारे पाठराखणी केली, ही गोष्ट कोणासही दृष्टीआड करिता येणार नाही. रावबहादुरांच्या यावे-ळच्या अपयशाचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे कौन्सिलप्रवेशवादी स्वराज्यपक्षाची स्थापना व त्या पक्षाचा वाढता जोर हे होय. वस्तुतः स्वराज्यपक्षाची स्थापना हे रा. ब. काळे, डॉ. परांजपे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष थोर मंडळींनी केलेल्या कौन्सिलप्रवेशाच्या आंदोलनाचेच फळ होते, परंतु कोणतीही नवीन लाट निघाली की गतानुगतिकत्वाने तिजबरोबर वहात

जाणाऱ्या भावनाविवश जनतेला इतका सुविचार सुचत नाही. शिवाय रावबहादुर हे प्रागतिक पक्षाचे उमेदवार असल्याने, व त्या पक्षाचा कार्यक्रम स्वराज्यपक्षासारखा तिरस्कार-धिक्कार–बहिष्कार वगैरे प्रकारचा भडक अगर कडक नसल्याने, असल्या कार्यक्रमाची चटक लागलेल्या भाबड्या जनतेला स्वराज्यपक्षस्थापनेसारख्या वेळी तरी प्रागतिक पक्षाचा कार्यक्रम मिळमिळीत वाटावा, हे अगदी साहजिक होय. रा. ब. काळे हे पहिल्यांदा जिल्ह्याचे आणि दुसऱ्यांदा मुंबई विश्वविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून पुनः इ. स. १९२६ व ३० मध्ये निवडून आले. यावेळचे त्यांचे तिसऱ्या कौन्सिलातील सहकारी म्हणजे श्री. देशपांडे-जाधव, व पुढे श्री. देशपांड्यांनी तत्कालीन अकारण दडपशाहीच्या निषेधार्थ दिलेल्या राजिनाम्याच्या मुदतीत सरदार पाटणकर हे आणि चौथ्या कौन्सिलातील कूपर-आचरेकर–शिंदे आणि कूपरसाहेब स्थानिक स्वराज्यमंत्री (आता फडणिस) झाल्यावर त्या मुदतीत इ. स. १९३४ मध्ये श्री. भाऊसाहेब सोमण हे होत.

## रावबहादुरांना न मिळालेले प्रधानपद

रा. ब. काळे यांची कौन्सिलात कार्य करण्याची पद्धती ‘लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न स्वतः संपादन केलेल्या माहितीवरून तयार करावयाचे व लोकांकडून मागवून ते कौन्सिलात विचारावयाचे आणि लोकहितदक्ष राहून सरकारी यंत्रातूनच निघालेल्या माहितीवरून, सरकारी कारभाराच्या चुका सरकारच्या नजरेस आणावयाच्या अशी असे. विशेषतः दरवेळी काळे यांनी, सरकारवर असाच मोर्चा वळविला. त्यांचा अभ्यास सर्वगामी असल्याकारणाने, त्यांचा हा चौफेर आणि सनदशीर हल्ला विधायक व विघातक स्वरूपाचा झाला.’ ( जागृत सातारा ) जसे खा. ब. कूपर यांना स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्रिपद व ना. जाधव यांना इ. स. १९२३ साली शिक्षण व इ. स. १९२८ साली कृषि मंत्रीपद मिळू शकले तसे ते रा. ब. काळे यांनाही मिळावयास वस्तुतः काहीच हरकत नव्हती, उलट अधिक पात्रता, श्रेष्ठता व मान्यता या दृष्टीने त्यांच्याच त्यावर हक्क होता. पण ते त्याना न लाभण्याचे कारण ते त्यांच्या ‘यातायातीत व खटपटी’त पडले नाहीत, कारण ती त्यांची प्रवृत्ती व स्वभावच नव्हता हे

तर झालेच, परंतु 'सातारा जिल्ह्यातर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधीत सरकारला ही करंदीकर, काळे, देशपांडे, सोमण इत्यादी मंडळी जवळ करण्याची बुद्धि ( त्यांच्या कौन्सिलातील शुद्ध लोकहितपर कामगिरीमुळे ) कशी व्हावी ? ती झाली असती तरच नवल !' ( पु. पां. गोखलेकृत जागृत सातारा )

## मुंबई प्रांताचा हिंदी फॉक्स : काळे

रा. ब. काळे यांना न मिळालेल्या मंत्रीपदासंबंधी, लिहिताना, इंग्लंडातील एका तत्सम इतिहासाचे साहजिकच स्मरण होते. ब्रिटिश पार्लमेंटात ज्यावेळी पिट् हा प्रधान मंत्री होता, त्याचवेळी फॉक्स हा विरोधी पक्षाचा पुढारी होता, पण योग्यता व समर्थता असूनही फॉक्सला मंत्रीपद कधीच दुरूनही शिवले नाही. आणि याचे कारण केवळ त्याचे विरोधी पक्षाचे नेतृत्व हे होय. जरी फॉक्सला प्रधानपदावर विराजमान होता आले नाही, तरी त्याने धुरीणपदावरून राष्ट्रीय दृष्टया केलेल्या उपयुक्त सत्कृत्याचे व शतकृत्याचे गोडवे इंग्लंड देश अद्यापही गात आहे व त्याचे न फिटणारे ऋण मान्य करीत आहे या बाबतीत गार्डिनर म्हणतो- 'It was not Pitt but Fox, who was the real hero. Fox, who spent his life in hopeless opposition and struck that great note of liberty, that has been the soul of English Liberalism for a century.' रा. ब. काळयांच्या बाबतीत मुंबई इलाख्यापुरते हेच उद्‌गार यथार्थतेने काढता येतील. आपल्या पायापाशी एकादाच नव्हे तर दोनदा येऊन पडलेली मुंबई प्रांताची दिवाणगिरी आपल्या विशिष्ट धोरणामुळे-आपल्या करारी व बाणेदार वृत्तीमुळेच आपल्या प्रत्यक्ष हाती येत नाही, हे पूर्णपणे ठाऊक असूनही रा. ब. काळे यांनी जर काही सोडले असेल, तर ती पिट्चा प्रतिस्पर्धी फॉक्स याच्याप्रमाणे दिवाणगिरी सोडली पण आपली करारी वृत्ती आणि सत्पक्षाला व सत्तत्वाला सदैव व सर्वथैव जोराचा पाठिंबा देण्याची आग्रही प्रवृत्ती कदापी सोडली नाही !

## कै. वा. बॅ. बॅपटिस्टा यांचा अनर्थकारक व्यर्थ शब्दच्छल

मुंबई कौन्सिलची इ. स. १९२६ सालची जिल्हा प्रतिनिधित्वाची निवडणूक रावबहादुरांनी, मुख्यतः सारावाढीला व बेकारीला आळा घाल-

ण्याच्या मुद्यावर लढविली. सारावाढीस विरोध हेच या निवडणुकीचे धोरण ठरविण्यास त्यावेळी आणखीही एक बलवत्तर कारण होते व ते म्हणजे याकाली नव्या तरमबंदीमुळे जी काही निष्कारण सारावाढ झाली होती, तिची विशेष झळ सातारा जिल्ह्याला लागलेली होती, अर्थात् जिल्ह्याचा प्रतिनिधी म्हणून कौन्सिलात जाऊ इच्छिणाऱ्या रावबहादुरांनी, याच प्रश्नावर मुख्य भर द्यावा हे योग्यच होते. मी सारावाढ कमी करविण्याचा कसून प्रयत्न करीन, असे जाहीर आश्वासन यावेळी उभ्या असलेल्या पंचकडीपैकी फक्त एका रावबहादुरांनीच दिले होते आणि यातच त्यांचे मनोधैर्य व शेतकऱ्यांबद्दलचा कळवळा व्यक्त होतो. याचवेळी केसरीनेही त्यांच्या उमेदवारीस पाठिंबा दिला होता; व प्रागतिक, राष्ट्रीय आणि प्रतिसहकार अशा तिन्ही राजकीय पक्षांतर्फे ते उभे होते. इतकेच नव्हे तर महत्त्वाच्या मुद्यांवरील मतभेद नष्ट होईल तर आपण या निवडणुकीनंतर ( निवडणुकीत मते मिळविण्यासाठी काही तरी आश्वासन म्हणून नव्हे ) कॉंग्रेसचेही सभासद होऊ व तिचे धोरण बदलून घेण्याचा प्रयत्न करू असे देखील त्यांनी आश्वासन दिले होते. कॉंग्रेसने पुकारलेला कौन्सिल बहिष्कार त्यांना सर्वस्वी नापसंत व नासंमत होता आणि म्हणूनच ते व त्यांचा प्रागतिक पक्ष हे " जो लोककल्याण साधावयास निघाला, त्याच्या कपाळी अपमान व उपहास हा ठेवलेलाच आहे " या अर्थाच्या कै. देवलांच्या पद्यात म्हटल्याप्रमाणे लोकनिंदा सोसूनही कौन्सिलात गेले व तेथे जो काही अल्पस्वल्प देशसेवा करिता आली तिच्या बलावर 'कॉंग्रेसचे कौन्सिल बहिष्काराचे धोरण किती घातक होते व तेथे जर याहूनही अधिक कार्य झाले नसेल, तर त्याला कॉंग्रेसचे हे धोरणच कसे कारण झाले ' हे सिद्ध करू शकले. यावेळी डॉ. परांजपे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार कै. बॅ. बॅपटिस्टा हे साताऱ्यास प्रथमच आले होते आणि त्यांनी 'केवळ पक्ष पहा, गुण मुळीच नको ' असला अयोग्य मतप्रचार ( की जो हल्लीहि कॉंग्रेसचे कित्येक प्रमुख लोक करीत आहेत ) चालविला होता. कै. बॅ. बॅपटिस्टा यांचे म्हणणे असे की, 'आमच्यात ( म्हणजे प्रतिसहकारवाद्यांत ) व प्रागतिकात आम्ही सुधारणांचा शक्य तो उपयोग करून घ्यावा म्हणतो तर प्रागतिकपक्ष त्या यशस्वी करून दाखवाव्यात असे म्हणतो, हा फरक आहे, ' परंतु सुधारणा यशस्वी केल्या नाहीत, तर त्यांच्यापासून शक्य

तो उपयोग कोणता करून घेता येणार, हे मात्र त्यांनी मुद्दामच सांगितले नाही; किंवा आपण असेही समजू की, ते त्यांना समजलेच नाही! असा हा शब्दांचा खेळ होत होतच रावबहादुरांनी ही निवडणूक जिंकली. मात्र त्यासाठी त्यांना सर्व प्रागतिकेतर प्रमुख राजकीय पक्षांच्या दुटप्पी व दुहेरी धोरणावर हल्ले चढविताना बौद्धिक परिश्रम फारच घ्यावे लागले. या निवडणुकीच्या ऐन घाईत काँग्रेसचे सभासद होण्याचे गुळमुळीत आश्वासन दिल्यास यश येण्यास अधिक सोपे जाण्याचा संभव असताही आपल्या पदरी संधिसाधुत्वाचा दोष येऊ नये म्हणून त्याचा विचार निवडणुकीच्या निकालानंतर आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस अनुसरून करण्याची अट घालण्याचा त्यांनी जो करारीपणा दाखविला त्यातच रावबहादुरांच्या व्यक्तित्वाचे योग्य दर्शन होते.

## कोठे ३५ काँग्रेसमेंबर व कोठे ३५०० मतदार?

इ. स. १९२३ सालाप्रमाणेच १९२६ सालाची निवडणूकही याप्रमाणे मोठी दगलीची झाली. यावेळी उमेदवार हा लायखच असला पाहिजे असे नाही, असा रावबहादुरांच्या विरुद्ध मतप्रकाश कसा पाडण्यात आला, हे वर दिलेच आहे. त्यावेळी स्थापन झालेल्या नव्या राष्ट्रीयपक्षाचा उमेदवार उभा राहिल्यास, त्याच्या विरुद्ध प्रतियोगी पक्षाचा खास उमेदवार उभा करू नये, असे प्रतियोगी पक्षाने ठरविले असताही रावबहादुरांविरुद्ध प्रतियोगी पक्षाचा म्हणून एक उमेदवार ( की जो इ. स. १९२३ सालचे निवडणुकीत काँग्रेस पक्षीय सोमण यांजविरुद्ध उभा होता ) श्री. सोमण यानी माघार घेतल्यानंतर, काही विशिष्ट कारणाने व या जिल्ह्यात या पक्षाची शाखा नसताही उभा करण्यात आला व देशस्थ-कोकणस्थ हा घातक वादही काढण्यात आला. राजबंद्यांना फटके देण्याच्या ठरावास रावबहादुरांनी कौन्सिलात उचलून धरल्याचेही स्पेशल खोटे विधान करण्यात आले आणि पुढे या विधानाबद्दल ते करणाऱ्यांना दिलगिरी प्रदर्शित करावी लागली. या उमेदवारास काँग्रेसचा अधिकृत पाठिंबा नसताही 'काँग्रेस! काँग्रेस!! काँग्रेस!!!' म्हणून रावबहादुरांविरुद्ध जेव्हा कंठशोष करण्यात येत होता, तेव्हा सातारा तालुक्यात काँग्रेसचे ४७ व त्यातही वर्गणी देणारे फक्त ३५ सभासद होते! उलट त्याच तालुक्यातील मतदारांची संख्या मात्र ३०००-३५०० होती! या

लोकशाहीच्या युगात, वरील ३०–३५ जणांचे या ३०००–३५०० मत–दारांनी ऐकावे, अशी शुद्ध लोकशाहीच्या थेट विरुद्ध शिकवणूक यावेळी देण्यात येत होती.

## काँग्रेस व रा. ब. काळे

### बंधन कोणाचे मानावयाचे ?

रा. ब. काळे हे काँग्रेसला पूर्वी हजर रहात असत परंतु काँग्रेसने कौन्सिलादिकांच्या बाबतीत ' मँडेटस् ' देण्याचे धोरण आखल्यापासून त्यांनी तिचा संबंध सर्वस्वी तोडला. इ. स. १९२३ च्या कौन्सिल निवडणूकीत काँग्रेसच्या बळाचा प्रत्यय आला असताही काळ्यांनी इ. स. १९२६ सालची निवडणूक अनेकांनी अत्याग्रह केला तरी काँग्रेस सभासद होऊन लढविण्याचे यत्किंचितसुद्धा मनावर घेतले नाही, कारण त्यांना या बाबतीत काँग्रेसचे बंधन पाळावयाचे नसून, मतदारांचे बंधन पाळावयाचे होते. काँग्रेसचा ठराव आज्ञापक की अनुज्ञापक हा प्रश्न बाजूला ठेवला, तरी एक गोष्ट स्पष्ट आहे की, सारे कौन्सिल मतदार जोवर काँग्रेसचे ठराव बंधनकारक समजत नाहीत, तोवर कौन्सिल सभासदाने ( प्रत्येक्ष काँग्रेसपक्षीय कौन्सिल सभासदानेसुद्धा ) मतदारांचेच बंधन मानले पाहिजे. काँग्रेस की कौन्सिल हा प्रश्न स्वतंत्र आहे, व राष्ट्राच्या अंतिम राजकीय उद्दिष्टाच्या दृष्टीने तो निर्णीत होणे अवश्यही आहे. परंतु कौन्सिलमध्ये प्रवेश करावयाचे ठरविल्यानंतर मात्र हा वाद अप्रस्तुत होय. आणि ज्यांना कौन्सिलप्रवेशवादी होऊनही हा वाद लढवावयाचा असेल त्यांनी " आम्ही, कौन्सिलात ज्यांनी आम्हास निवडून दिले त्या मतदारांचे–सुद्धा ऐकणार नाही, फक्त काँग्रेसचेच एकू " अशी जाहीर घोषणा करून, निवडणुकीच्या रंगणात पाऊल टाकणे, हाच सरळ मार्ग आहे. काँग्रेसमत-दारापेक्षा कौन्सिलमतदार किती तरी जास्त आहेत, ही गोष्ट दृष्टीआड करूनही ज्या दिवशी काँग्रेसचे सारे मतदार कौन्सिलचेही मतदार असतील, अगर कौन्सिलचे सगळे मतदार काँग्रेसचेही मतदार असतील, त्यादिवशी स्वराज्याचीच स्थिती उत्पन्न होईल व काँग्रेस आणि कौन्सिल यांचे ऐक्य होईल अगर कौन्सिलची काँग्रेस किंवा काँग्रेसचे कौन्सिल होईल, असे येथे

आपल्याला म्हणता येईल, परंतु असे होत नाहीतोवर ही दोन्ही कार्यक्षेत्रे अलग ठेवणेच श्रेयस्कर आहे. काँग्रेसने कौन्सिलच्या बाबतीत अलीकडेच ही कजाग सासूची अगर सावत्र आईची भूमिका का पत्करली आहे, ते कळत नाही. काँग्रेसचे स्वातंत्र्याचे ध्येय मान्य करून कौन्सिलात जर राजनिष्ठेची शपथ घेता येते, तर फक्त मतदारबंधन मानणाऱ्या कौन्सिल भक्तासच काँग्रेसमध्ये स्थान का नसावे ? कौन्सिले म्हणजे मायागृहे असतील, तर तेथे चालणारे मानापमानादिकांचे बरेवाईट प्रकार काँग्रेसला अद्याप स्पर्शही करू शकले नाहीत, असे मुळीच नाही. असल्याच प्रकारच्या अंतःकलहाबद्दल बंगाल प्रांत हिंदुस्थानला आज कित्येक दिवस पुरला आहे आणि हे सारे कलह फक्त तत्वनिष्ठेचे, प्रामाणिकपणाचे व सत्यप्रीतीचेच आहेत, असे आज छातीवर हात ठेवून कोण सांगू शकत आहे ?

## ' मी काँग्रेसमन होईन पण केव्हा व कसा ? '

काळयांचा काँग्रेसशी विरोध होता, तो या व असल्याच अन्य मुद्यावर होय. म्हणूनच काँग्रेसचे बंधन आपल्यावर पडू नये एतदर्थ त्यांनी इ. स. १९२६ साली प्रथम कौन्सिलनिवडणूक उरकून घेतली आणि मग रीतसर काँग्रेसच्या सभासदत्वाचे पत्रक सशर्त भरून ते सातारा तालुका काँग्रेस कमिटीकडे पाठवून दिले. अधिकृत प्रतिनिधी म्हणून आपण जर काँग्रेसला जाऊ शकलो, तर काँग्रेसचे धोरण आपल्या मताप्रमाणे व मनाप्रमाणे बदलण्याचा आपल्यास प्रयत्न करिता येईल, हाच त्यांचा यात हेतु होता. काँग्रेसच्या यावेळच्या क्रीडमध्ये तिला कोणते ' स्वराज्य ' अपेक्षित आहे व ते स्वराज्य ती कोणते ' कायदेशीर व शांतताप्रधान उपाय ' अमलात आणून मिळवू इच्छिते हे संदिग्ध ठेवण्यात आल्याने काळयांनी सभासदपत्रिका भरताना ' आपण स्वराज्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहत दर्जाचे स्वराज्य समजतो व कायदेशीर आणि शांतताप्रधान उपाय म्हणजे सनदशीर उपाय समजतो ' असा आपला स्पष्ट खुलासा त्यात करून ठेवला होता. यासंबंधी तत्कालीन सातारा तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना लिहिलेल्या आपल्या विस्तृत पत्रात रावबहादुर हे वरील खुलाशानंतर पुढे लिहितात– ' काँग्रेस ही सर्व राष्ट्राचे सर्वसामान्य लोकमत व्यक्त करणारी संस्था असल्यामुळे, व

प्रत्येक प्रांताची परिस्थिती वेगवेगळी असल्यामुळे, प्रांतिक वा मध्यवर्ती कायदे-मंडळासंबंधीच्या धोरणात तिने कोणत्याही प्रकारे हात घालणे युक्त नाही. कारण काँग्रेस व कायदेमंडळ यांची कार्यक्षेत्रे भिन्न असून, काँग्रेसचें कार्य लोकमतास जागृत करून वळण लावण्याचे आहे, तसे कायदे-मंडळाचे कार्य सरकारशी झगडून, प्रस्तुत राज्यघटनेतील आपली जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडण्याचे आहे. शिवाय काँग्रेस व कायदे-मंडळ यांचे मतदार-संघही वेगळे असल्यामुळे, ज्या मतदारांचा काँग्रेसशी संबंध नसेल, त्यांच्या प्रतिनिधींवर काँग्रेसने आपले धोरण लादणे केव्हाही युक्त नाही. कायदे-मंडळातील व प्रत्येक प्रांतातील परिस्थिती दर घटकेस पालटण्याचा संभव असल्यामुळे, त्यातील प्रतिनिधींनी कोणते धोरण स्वीकारावे, हे ठरविण्याचा अखत्यार कालमानपरिस्थितीप्रमाणे त्या त्या प्रतिनिधीस व त्यांच्या त्यांच्या मतदारसंघास असला पाहिजे. म्हणून काँग्रेसने त्या तपशिलात न पडता सर्व-सामान्य लोकमत जागृत करून सार्वराष्ट्रीय प्रश्नावरच ते केंद्रीकृत करण्याचे कार्य करावे. यासाठी काँग्रेसने आपले ध्येय शक्य तितके उच्च ठेवावे, मात्र ते सर्वसंमत व व्यवहार्य होईल असे असावे; व त्याकडे राष्ट्रातील जनतेस हळू हळू नेण्याचे कार्य तिने करावे, कौन्सिलसारख्या बाबतीत, जेथे एखाद्या दुसऱ्या तपशिलामुळे तात्कालिक परिस्थिती एकदम पालटण्याचा संभव असतो, तेथे काँग्रेसने मुळीच लक्ष घालू नये. असे झाल्यास काँग्रेसमध्ये सर्व पक्षाचा समा-वेश होऊन काँग्रेसचे स्वरूप खरे राष्ट्रीय राहील. सर्वसंमत क्रीड मान्य केल्यानंतर, काँग्रेसच्या ठरावाचे सभासदावर शिफारशीपेक्षा जास्त बंधन असू नये. क्रीडला बाध न येता व काँग्रेसची शिफारस ध्यानात ठेऊन आपल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक मताप्रमाणे योग्य दिसेल तो आचार व विचार करण्यास प्रत्येक सभासदास मोकळीक असावी.'

## काँग्रेसने सहकार्य झिडकारिले !

या पत्रात, रा. ब. काळ्यांचा काँग्रेसकडे पाहण्याचा व कौन्सिलकडे पाहण्याचा दृष्टिकोण कोणता होता, हे तर प्रतीत होतेच, परंतु त्यातही ते कौन्सिलपेक्षा एक प्रकारे काँग्रेसलाच अधिक महत्त्व कसे देत, हे सुद्धा इतके प्रत्ययास येते की, त्यांच्या काँग्रेसभक्तीबद्दल काँग्रेसचा शत्रूही शंका घेऊ

शकणार नाही. तथापि ऐक्याच्या या अध्वर्यूंने पुढे केलेला हा सहकार्याचा हात सहकारितेचे वावडे असलेल्या व असहकारितेचे वेड लागलेल्या मंडळी-कडून, 'हा फॉर्म त्यातील विशिष्ट खुलाशामुळे रीतसर ठरत नाही, सबब परत' अशा सबबीवर झिडकारण्यात आला! यासंबंधाने काळ्यांनी महा-राष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडे विचारणा केली असता, तिने त्यांना असे कळविले की, 'शब्दाचा अर्थ ज्याने त्याने आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास आम्हाला किंवा कोणालाही हरकत घेता येणार नाही, सबब आपला फॉर्म मान्य करावा, असे आम्ही तेथील तालुका कॉंग्रेस कमिटीला कळवीत आहो.' याप्रमाणे सातारा तालुका कॉंग्रेस कमिटीकडे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडून लिहूनही आले, पण ज्या कॉंग्रेसमध्ये 'मँडेट्स्'चे इतके प्रस्थ माजले होते, तिच्याच एका वरिष्ठ प्रांतिक कार्यकारी शाखेचा निर्णय दुसऱ्या एका कनिष्ठ तालुका कार्यकारी शाखेने शब्दाचा खेळ करीत वरील-प्रमाणे धुडकावून लावला! 'अशी विशिष्ट स्पष्टीकरणे केल्याने 'क्रीडवर सही केली नाही असे होत नाही' असा कै. श्री. दादासाहेब करंदीकरां-सारख्या नामांकित कायदेपंडितांनी दिलेला अभिप्रायही व्यर्थ गेला. यावेळी से. बापटांच्या साम सत्याग्रह, शुद्ध सत्याग्रह इ. सत्याग्रहभेदाप्रमाणे कॉंग्रेस सभासद नसलेला साधा प्रतिसहकारी, कॉंग्रेससभासद असलेला खासा प्रति-सहकारी, असे अनेक भेदही निघाले होते. या वर्गवारीत रा. ब. काळे यांना खासे प्रतिसहकारी म्हणून श्री. केळकर यांनी मान्य केले असल्यामुळे, वस्तुतः त्यांच्यात व कॉंग्रेसानुयायी प्रतिसहकारी उमेदवार यांच्यात तर तम भाव केला जाणे इष्ट नव्हते. पण अशी अभिनंदनीय परि-स्थिती त्या निवडणुकीत असत्य, अप्रामाणिकपणा, बुद्धिभेद व सूक्तासूक्त मार्गांचे अवलंबन यांचे जे बंड माजले होते, त्यामुळे उत्पन्न होऊ शकली नाही. उमेदवाराने आपल्या निवडणुकीसाठी आदर्श मतप्रचार कसा करावा याचे रावबहादुरांनी यावेळी जे उदाहरण घालून दिले, ते मात्र यापुढे निवडणुकीच्या लढ्यात पडणाऱ्या अनेक सत्प्रवृत्त उमेदवारांना मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाही. प्रचाराचे वेळी मतदारांना त्यांच्या मता-धिकाराचे त्यांनी पटवून दिलेले महत्त्व, आणि आपल्या यशाच्या निश्चिती-

साठी काँग्रेससारख्या प्रबळ संस्थेचाही गैर फायदा घेण्यास त्यांचा असलेला विरोध या सर्व घटनांचे तात्पर्य हेच आहे.

## कौन्सिलातील कार्याचे अल्प दिग्दर्शन

### छोटे गोखले : रा. ब. काळे

त्यांचे राजकारण आरामशीर नव्हते, तर त्यात इतर कोणाच्याही कोणत्याही राजकारणाइतकाच राम होता. मुंबई कौन्सिलात, त्यांना मिळालेले लोकपक्षाचे अलीकडील पाऊण तपाचे अखंड नेतृत्व, अगर सातारा नगर-देवतेचे त्यांना-ते तिचे सरकारनियुक्त सभासद असताही-लागोपाठ दोनदा मिळालेले लोकनियुक्त अध्यक्षत्व हे त्यांच्या सहकार वृत्तीचे, निरलसतेचे, सहिष्णु व सरळ स्वभावाचे, बुद्धिचातुर्याचे, निःस्वार्थतेचे, राष्ट्रसेवेचे, त्यागाचे व तत्वनिष्ठेचेच द्योतक नव्हे काय ? मुंबई कौन्सिलात त्यांनी जसा इ. स. १९२८ साली सायमन कमिशनवरील बहिष्काराचा ठराव आणला, तसाच इ. स. १९३५ साली त्यांनी फर्मानी कायद्यांच्या सहाय्याने राज्यकारभार चालविण्याच्या घातक सरकारी तत्वाच्या निषेधार्थ तेथून बाणेदारपणाने आपल्या अनेक सहकाऱ्यांसह स्थानत्यागही केला, व जनतेला क्षणभर कै. वा. ना. गोखल्यांच्या एतद्विषयक निस्पृह आचरणाचे व उज्वल तत्वज्ञानाचे स्मरण करून दिले. या साऱ्या घटना त्यांच्या राजकारणात आराम नव्हता, तर राम होता याच्याच निदर्शक आहेत, यात संशय नाही.

### राजबंद्यांना मुक्त करा व फटक्यांची शिक्षा रद्द करा

रा. ब. काळे यांनी कौन्सिलात केलेल्या कार्याचे विवेचन विस्ताराने करावयाचे झाल्यास त्याला हे स्थळ अगदीच तोकडे व अपुरे पडेल. युनिव्ह-र्सिटी बिल दोषपूर्ण असताही त्यांनी, ते लोकहिताच्या दृष्टीने संक्रमण कालातील टप्पा म्हणून इतर लोकनियुक्त व सरकारी सभासदांच्या बरो-बरीने टीका सोसूनही उचलून धरले व ते मान्य केले, याचे कारण फक्त एकच, व ते म्हणजे विश्वविद्यालयासारख्या पवित्र व पक्षपंथनिर्लेप अशा केवळ शिक्षणसंस्थेतही जातवारीचे व अवास्तव मुस्लीम प्रेमाचे व त्यांच्या हक्काचे जे घातक तत्त्व येऊ पहात होते ते त्यांस अमान्य होते हे होय. ऐन

कायदेभंगाच्या वेळी देखील आरोपितांच्या न्याय मिळविण्याच्या व न्याय मिळण्याच्या सर्व वाटा बंद करणे, हे रावबहादुरांना सर्वस्वी नापसंत होते व म्हणून त्यांनी इ. स. १९३२ साली मुंबई कौन्सिलात जो फर्मानी कायदा पास झाला, त्यास जोराचा विरोध केला होता, व इ. स. १९३१ व १९३२ मध्ये सर्व राज्यबंद्यांस माफी त्यांस देऊन मुक्त करावे आणि वट हुकूमही मागे घ्यावे, असे ठराव पाठवून नैतिक विजय मिळविला होता. या तिन्ही प्रसंगी त्यांच्याशी जिल्ह्यातील प्रतिनिधीपैंकी फक्त श्री. आचरेकरांनीच काय ते सहकार्य करून त्यांना सहाय्य केले होते. या सर्व गोष्टींच्याही पूर्वी इ. स. १९२२ साली असहयोगाच्या अशाच ऐन आंदोलनात रा. ब. काळे यांनी "इंग्लंडात पहिल्या प्रतीच्या गुन्हेगारांना ज्या दर्जाची वागणूक देण्यात येते, त्या प्रकारे इकडील राजबंद्यांना वागविण्यात यावे व फटक्यांची शिक्षा रद्द करण्यात यावी" अशा अर्थाच्या ठरावास जोरदार पाठिंबा दिला होता, एवढेच नव्हे तर सरकारला यावेळी "लोकमताची सल्ला न घेता आपल्याच इच्छेप्रमाणे कारभार करण्याची सरकारी अधिकाऱ्यांची प्रवृत्ती आपल्यास सर्वस्वी नापसंत आहे" असे बजावण्यासही त्यांनी बिलकूल कमी केले नाही.

## काळ्यांच्या प्रयत्नाने शेतकऱ्यात झालेली जागृती

आर्डिनन्सेसबद्दल कौन्सिलात रावबहादुरांनी जे ठराव आणले, त्यावेळी त्यांनी "परराष्ट्रात हिंदुस्थानपेक्षाही अधिक कडक वटहुकूम काढण्यात येतात" या सरकारी विधानाचा व्यवस्थित व यथास्थित समाचार घेतला आणि इंग्लंडातील इ. स. १९२० मधील संपावेळच्या वटहुकूमाचे-राज्य–कर्त्यांच्या जातभाईंचेच उदाहरण देऊन त्यांनी असे स्पष्ट सिद्ध केले की, 'इंग्लंडात वटहुकूम पुकारल्यापासून, सात दिवसाच्या आत जरूर तर पार्ले–मेंटची खास बैठक बोलावून सुद्धा त्याच्यापुढे तो मंजुरीसाठी मांडण्यात येतो, म्हणजे तेथे ही सत्ता रयतेच्या प्रतिनिधींच्या हाती एकवटलेली असते, उलट आमच्या येथे सगळा अधिकार सेक्रेटरींच्या हातात असतो.' या वेळच्या कौन्सिलात रावबहादुरांनी जमीन सारावाढीच्या सरकारी धोरणाच्या निषे–धार्थ पहिल्याच (फेब्रुवारी १९२७ च्या) बजेट बैठकीत १ रुपया कपातीच्या सूचनेचा निदाव्यंजक ठराव मांडला होता; पण तो पास होऊ नये व सर–

कारचा शेतकऱ्यांचा कैवारीपणा कायम राहावा म्हणून बरीच खटपट करण्यात आली. तथापि रावबहादुरांच्या प्रोत्साहनाने यावेळी जिल्ह्यातून सारावाढीविरुद्ध हजारो अर्ज गेले असल्याने या गोष्टीचा नैतिक परिणाम व्हावयाचा तो झालाच. लोकहितसाधक कृत्यात सहकार व लोकहितविघातक कृत्यात असहकार हे रावबहादुरांचे कौन्सिलातील कामगिरीचे जे सर्वसामान्य धोरण होते तदनुसार लँडरेव्हेन्युकोड दुरुस्ती बिल, वतन अ‍ॅक्ट दुरुस्ती बिल, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड अ‍ॅक्ट दुरुस्ती बिल व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचे बिल ( इ. स. १९२० ते १९२३ ), जमीन तुकडेपट्टी बिल व युनिव्हर्सिटी बिल (१९२७), व प्रेसिडेन्सी एरिया (इमर्जन्सी) सिक्युरिटी बिल (१९२९), डिस्ट्रिक्ट व सिटी म्युनिसिपॅलिटीज व लोकलबोर्डस् अ‍ॅक्टस बिल याबाबतच्या सिलेक्ट कमिट्यावर; १९२० ते १९२३ च्या तिन्ही फिनन्स कमिट्यावर व कौन्सिल लायब्ररी कमिटी, मुसलमान वक्फ कमिटी व मुंबई प्रांत मतदान मर्यादा कमिटी यावर त्यांनी प्रामुख्याने उपयुक्त कामे केली असून युनिव्हर्सिटीच्या बेकारी चौकशी कमिटीवर व १९३१ च्या सदर्नमराठा रेल्वे सल्लागार मंडळावरही त्यांनी सभासदत्वाचे नात्याने महत्त्वाची कामे केली आहेत. ना. गोखले यांची बजेटावरील भाषणे व बिले आणि ठराव यातील बारकाया-कारवाया उलगडणारी अन्वेषणे जशी सदैव व सर्वथैव अभ्यसनीय व अतुलनीय असत, त्याच धर्तीवर रावबहादुरांची भाषणेही परिश्रमपूर्वक तयार केलेली, व अभ्यासूवृत्तीची दर्शक असत. देशी वैद्यकास पाठिंबा देणे, तसेच न्याय व अंमलबजावणी या खात्यांची फारकत करणे (१९२० ते २३) व प्राथमिक शिक्षकांच्या बोकांडी बसलेली २० टक्के कपात रद्द करणे (१९३२) यासंबंधीची ठरावादि रूपांनी झालेली त्यांची कामे उल्लेखनीय तर आहेतच परंतु त्यापेक्षाही अधिक महत्त्वाची त्यांची कामे म्हणजे त्यांनी १९३१ मध्ये वारसा हक्कावरील करास केलेला विरोध व गोध्र्याच्या दंग्यात श्री. वामनराव मुकादम यांच्यासारख्या प्रतिष्ठित नागरिकाच्या प्राणावर बेतण्याचा जो भयंकर प्रसंग आला होता त्याप्रकरणी त्यांनी श्री. भीमभाई नाईक यांच्या बरोबरीने लावलेला छडा ही नमूद करिता येतील.

## धार्मिक ट्रस्ट बिलाबद्दलचे प्रयत्न

हिंदूंच्या सार्वजनिक धार्मिक व धर्मादाय संस्थांच्या ज्या मिळकती आहेत त्यांच्या उत्पन्नाचा विनियोग मूळ हेतूप्रमाणे न होता त्यावर भलतेच लोक चरत असतात. या गोष्टीस आळा घालावा म्हणून रावबहादुरांचे फार दिवसापासून प्रयत्न सुरू होते. त्यासाठी सन १९२२ चे अखेरीस त्यांनी एक विस्तृत खाजगी बिल तयार करून हिंदुस्थान सरकारच्या मंजुरीस पाठविले होते; व ते हिंदुस्थान सरकारने लोकमत अजमाविण्यासाठी प्रसिद्ध पण केले होते परंतु ही मंजुरी मिळण्याच्या आधीच सदर कौन्सिलची मुदत संपली. पुढील त्रैवार्षिक मुदतीत त्यांनी आपल्या स्नेह्यांमार्फत ते कौन्सिलपुढे मांडण्याचा पुन्हा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही. त्यानंतर सन १९२६ साली फिरून निवडून आल्यावर पुन्हा पूर्वीच्या बिलास हिंदुस्थान सरकारची मंजुरी मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. याही वेळी सरकारच्या मंदगती धोरणामुळे त्यांना लवकर परवानगी मिळू शकली नाही; व अखेरीस तशा आशयाचे बिल मुंबई सरकारने स्वतःच आणण्याचे मुक्रर केले. हे बिल सरकारतर्फे मांडण्यात आल्यावर त्याला रा. ब. काळे यांनी सामान्य तत्वाबाबत जोराचा पाठिंबा दिला हे येथे मुद्दाम सांगणे नकोच तथापि जे ट्रस्ट फक्त हिंदु लोकांच्या उपयोगी पडत असतील त्यांनाच हे बिल लागू करावे असे जे त्यात एक कलम आहे त्या कलमाला दुरुस्ती जोडून 'जे धार्मिक ट्रस्ट असतील त्यातील हिंदु लोकांच्याच फक्त उपयोगी पडणाऱ्या ट्रस्टना हे बिल लावावे, व इतर जातींच्या धार्मिक ट्रस्टना हा कायदा लागू करावयाचा झाल्यास त्या जातींची संमति घेण्याचे जरी सरकारने कबूल केले असले तरी धार्मिक ट्रस्टखेरीज इतर ट्रस्ट असतील ते कोणत्याही समाजाच्या हिताचे असोत, त्यांना हा कायदा एकदम लागू व्हावा, त्या बाबतीत सरकारच्या हाती सत्ता राहू नये' असे रावबहादुरांचे या बिलाबाबत मत होते हे प्रसिद्धच आहे.

## कौन्सिलातील एक महत्त्वाचे भाषण

रा. ब. काळे यांची कौन्सिलातील अनेक भाषणे प्रसिद्ध आहेत व ती सगळीच वाचनीय आहेत. त्यांच्या अशा भाषणापैकीच त्यांनी १९२७ च्या

फेब्रुवारीत मुंबई कायदेमंडळाच्या बजेट बैठकीत बजेटावर केलेले एक भाषण पुढे दिले,आहे व त्यावरून त्यांची राज्यकारभाराविषयांची छाननी किती सूक्ष्म असे याची सहज कल्पना करिता येणार आहे. ते या भाषणात म्हण- तात:-' या कौन्सिलमध्ये एका हिंदी गृहस्थांना फिनॉन्स डिपार्टमेंटमध्ये सरकारी सभासद होण्याची अपूर्व संधी मिळाली ह्याबद्दल मला अतिशय समाधान वाटते. आज मला इतर सभासदांप्रमाणे त्यांचे अभिनंदन करावयाचे नाही किंवा त्याजवर टीकाही करावयाची नाही पण नामदार साहेबांचे भाषण वाचून मात्र कोणाचीही निराशा झाल्याशिवाय राहणार नाही. कारण त्यामध्ये ह्या इलाख्यातील वसुलाचे बाबतीतील त्यांचे धोरण समाधानकारक व भरभक्कम पायावर उभारलेले दिसत नसल्यामुळे व ते कोणत्याही प्रकारे नवीन तऱ्हेचे नसल्यामुळे निराशाजनक वाटते. ह्या इलाख्यातील वसुलाची स्थिती अत्यंत असमाधानकारक आहे. सुधारणांचा कायदा अमलात आल्या- पासून प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकामध्ये तूट दिसते. फिनॉन्स मेंबर हे सरकारने आजपर्यंत केलेल्या घोडचुकामुळे अशा कठीण परिस्थितीत सापडले आहेत याबद्दल आपणा सर्वांनाच त्यांचेबद्दल सहानुभूती वाटते. परंतु सेटलमेंटमुळे झालेला अन्याय दूर केल्याशिवाय या इलाख्यातील वसुलाची स्थिति सुधा- रणे शक्य नाही अशा आशयाचे त्यांचे विधान ऐकून मात्र जास्तच निराशा झाल्याशिवाय रहात नाही. दुसरा महत्त्वाचा प्रश्न माझ्या मते काटकसरी- संबंधाचा होय. आजपर्यंतच्या अंदाजपत्रकामध्ये हेच वरील दोन प्रश्न वरचेवर उद्भवले आहेस. मेस्टन सेटलमेंटमुळे वसुलासंबंधीचा घोटाळा उत्पन्न झाला असून तो अन्याय दूर केल्याशिवाय ही स्थिती सुधारणे शक्य नाही असे आपणाला पहिल्या सुधारणा कौन्सिलमध्ये सांगण्यात आले. ही काटकसर घडवून आणण्याकरिता एक खास सरकारी अधिकारी नेमावा असाही प्रश्न त्यावेळी निघाला, पण अशा नेमणुकीस कौन्सिलमध्ये जोराचा विरोध झाला. नंतर खर्चाचे प्रश्नासंबंधी वाटाघाटी करून त्याविषयी रिपोर्ट करण्याकरिता कौन्सिलातील सरकारी व बिनसरकारी सभासदांची एक कमेटी नेमावी असा ठराव मी आणला व त्या ठरावाला सरकारी सभासदांकडून कसून विरोध झाला असताना देखील तो बहुमताने पास होऊन त्याप्रमाणे काटकसर कमिटीही नेमण्यात आली.

## शिफारशींना वाटाण्याच्या अक्षता

या कमिटीने अधिकारी सभासदांचे मदतीने कामास सुरुवात केली पण रिपोर्ट तयार करण्यास थोडा अवधि लागला. तेव्हा काटकसरीचे तत्व ताबडतोब अमलात आणू नये व वसुलाची परिस्थिती आहे तशीच ठेवावी असे सांगण्यात आले. यामुळे सरकारास ह्यावर विचार करण्याकरिता जास्त अवधी देण्यात यावा असे कौन्सिलने ठरवून सरकारास अशा परि-स्थितीत अडथळा केला नाही. कोर्ट फी बिल् आणि स्टँप ॲक्ट अशी दोन कर बसवणारी बिले त्यावेळी कौन्सिलपुढे आली व त्यावेळच्या सभासदांनी इतर इलाख्याप्रमाणे त्यांना कायमची मान्यता न दर्शविता सरकारची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर व एकंदर परिस्थितीचा विचार कर-ण्यास २–३ वर्षांची मर्यादा घालून त्यानंतर ही बिले रद्द व्हावी अशा हेतूने त्या दोन्ही बिलांना मान्यता देण्यात आली. काटकसर कमिटीचा रिपोर्ट बाहेर येऊन कमिटीने केलेल्या सूचनांचा सरकार योग्य विचार व अम्मलबजावणी करील अशी त्यावेळी सभासदांना आशा होती. लवकरच काटकसर कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला व अपेक्षेप्रमाणे बऱ्या-चशा सुधारणाही सुचविण्यात आल्या. त्यापैकी काही वरिष्ठ जागा कमी करण्यासंबंधी असून त्याबाबत सरकारने काही सूचना अमलात आणण्याचे आश्वासन दिले व काहीवर अव्यवहार्य म्हणून शेरा मारूनही कमिशनचा निकाल होईपर्यंत काहीच करता येत नाही असे जाहीर केले. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणे सरकारी वरिष्ठ अधिकारीच्या जागा कमी केल्याशिवाय काटकसरीची कात्री चालणार नाही असे ठाम मत असणारा-पैकी मी एक आहे. उदाहरणार्थ, एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या सभासदांची संख्या वाजवीपेक्षा फाजील आहे. परंतु ४७ अ कलमाप्रमाणे सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना ही संख्या निश्चित करता येते. हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार यांनी एक मताने विचार करून प्रांतिक सरकारास पुरेसा पैसा कोठून मिळ-वावा हे ठरवले पाहिजे. ही गोष्ट शक्य नसेल तर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासदांची संख्या कमी करणे हा काटकसरीचा एक मार्ग आहे. सरकारने ह्या बाबतीत योग्य ती तजवीज करावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

## दिलेले हक्कही का बजावीत नाही?

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टातील कलम ९६ ड अन्वये नियम तयार करून हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांना काटकसरीचे बाबतीत योग्य ते कायदेकानू करण्यास सत्ता असावी अशी योजना करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, पब्लिक सर्व्हिसेस ॲक्ट मुंबई सरकारने ह्या कौन्सिलद्वारे तयार करावयाचा आहे. यावेळी नव्या राज्यघटनेत जास्त सुखकर व सोयीस्कर असे प्रांतिक नोकऱ्यांचे धोरण अमलात आणण्याविषयी प्रयत्न झाले पाहिजेत. ज्यावेळी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट पास करण्यात आला त्यावेळी वरिष्ठ, राखीव व सोपीव खात्याविषयी पुष्कळसे नियम करण्यात आले. तथापि कलम ९६५ प्रमाणे एकही नियम केला गेला नाही. त्या कलमान्वये हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांची नेमणूक करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांचेकडे सोपविण्यात आला आहे. ह्या सुधारणेकडे जावे तितके आपले लक्ष जात नाही. ह्याबाबबतीत ह्या कौन्सिलात सभासदांनी काय खटपट केली आहे असा माझा त्यांना प्रश्न आहे. नोकरशाहीला प्रांतिक सरकारच्या ताब्यात आणण्याचे धोरण स्वीकारणे हीच महत्त्वाची गोष्ट आपण अमलात आणली पाहिजे. चालू राज्यव्यवस्थेप्रमाणे सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा उत्तीर्ण होऊन नेमल्या गेलेल्या काही अधिकारी जागांचे संबंधाने आपणास काहीच बोलता येत नाही. परंतु गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाने नेमून दिलेल्या संख्येपेक्षा ज्या जागा अधिक असतील त्या अजिबात नाहीशा कराव्यात असे माझे मत आहे. ह्या जागांच्या भरतीकरिता पुरेसे लोक मिळत नाहीत असा इंग्लंडमध्ये बराच गवगवा झाला होता. येथील वातावरण परिस्थितीने बदलले गेल्यामुळे व सिव्हिल सर्व्हंटांना वेळही कमी मिळू लागल्यामुळे अर्थातच तिकडे सिव्हिल सर्व्हिसमध्ये शिरणाऱ्या लोकांची टंचाई भासू लागली. या परिस्थितीचा सरकारने अवश्य फायदा घेऊन तिकडील भरतीस आळा घालणे योग्य होते. तसा कायदा न केल्याने सिव्हिल सर्व्हिसमध्ये पूर्वीप्रमाणे एकसारखी भरती चालू राहिली आहे व पुढेही ती तशीच वाढत जाणार आहे.

## नोकऱ्यांच्या हिंदीकरणाची जरूर

आपणाला जबाबदार राज्यपद्धती हवी असेल व राज्यघटनेच्या अंतर्व्यवस्थेत आपला हात असावा असे वाटत असेल तर माझे मते नोकऱ्यांचे बाबतीत तावडतोब हिंदीकरण अमलात आणणे अत्यावश्यक आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट पास करण्यात हाच विशिष्ट हेतु होता व तो जरी प्रथमत: त्यामध्ये नव्हता तरी लवकरच जोडण्यात आलेल्या उपोद्घातामध्ये तो हेतु स्पष्ट केला गेला. परंतु सरकारने त्या अॅक्टच्या प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीमध्ये मूळ उपोद्घातच अजिबात गाळून टाकला आहे हे खरोखर दुर्दैव होय. वस्तुत: गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्टाचा अत्यंत महत्त्वाचा असा उपोद्घाताचाच भाग सरकारी आवृत्तीमध्ये का गाळला जावा हे समजत नाही. नोकरशाहीच्या हिंदीकरणाचा प्रश्न काटकसरीचे प्रश्नाशी अत्यंत निगडित आहे, असे माझे ठाम मत आहे व या हिंदीकरणामध्ये अमुक एक जात किंवा अमुक एक पंथ असा भेदभाव मानणे बरोबर नाही. या विधानाचा येथील आमदार विपर्यास करणार नाहीत असे मला वाटते. कारण हा काटकसरीचा मार्ग म्हणून मी सुचवीत आहे. परकीय लोकांचा नोकरशाहीत प्रवेश झाल्यामुळे ही राज्यव्यवस्था अत्यंत खर्चाची झाली आहे असे कै. दादाभाई नौरोजी वारंवार म्हणत असत. त्याचप्रमाणे १८८६-८७ सालचे अटकिनसनचे वेल्बी कमिशन, पब्लिक सर्व्हिसेस कमिशन व सर अब्दुल रहीम हे या कमिशनवर असताना त्यांनी लिहिलेली भिन्नमतपत्रिका या सर्वांचे नोकरशाहीचे स्वरूप प्रांतिक असावे व निरनिराळ्या खात्यातील नोकरांची भरती इंग्रज लोकांची न करता येथील लोकांची करावी असे स्पष्ट मत होते. यामुळे हिंदी नोकरांचा दर्जा सुधारून देशामध्ये सुबत्ता नांदू लागेल. त्यांच्या पगाराचे प्रमाण ठरवून टाकावे, अशातऱ्हेचा निरनिराळ्या कमिशनांचा स्पष्ट अभिप्राय असताना देखील ह्या बाबतीत काहीच प्रगती झालेली दिसत नाही. ह्याचे कारणही तितकेच स्पष्ट आहे. वरिष्ठ हुद्यावर असलेले सरकारी अधिकारी (म्हणजे ज्यांना सरकार असे म्हणता येईल असे लोक) आपल्या अधिकाराला कोणत्याही तऱ्हेने चाट न बसेल असेच धोरण स्वीकारीत असतात. आपली सत्ता कमी होईल असे साहजिकच त्यांना भय असते. परंतु रयतेवर

कराचा बोजा अधिक पडतो या गोष्टीची त्यांना फिकीर नसते. फिनॉन्स मेंबर साहेबांनी हे खर्चाचे चढते प्रमाण महायुद्धामुळे उत्पन्न झाले आहे असे जे विधान केले आहे ते दिशाभूल करणारे आहे, तरी हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार यांनी एकमत करून गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्टचा नोकर-शाहीच्या हिंदीकरणाचा मूळ उद्देश समाधानकारक रीतीने अमलात आणून काटकसर घडवून आणावी असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

**एक हजारावरील कामातील दोनच कामे चालू**

दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मुंबई सरकारचे उत्पन्नवाढीचा होय. ह्या बाबतीत सरकारने बॅकबे रेक्लेमेशनसारख्या मोठमोठ्या योजना अमलात आणून अत्यंत नुकसान करून घेतले आहे. उत्पन्नाची बाजू लंगडी असता सरकारने कालवे व अशाच उपयुक्त बाबी हाती न घेता अगडबंब योजना अमलात आणण्याचा प्रयत्न केला ही मोठी घोडचूक केली असेच म्हणणे प्राप्त होते. कोकणामध्ये समुद्राचे पाण्याने हजारो एकर जमीन प्रत्येक वर्षी समुद्रात वाहून जात आहे व तेथील शेतकरी वर्गही याची ओरड करीत आहे. सरकारने मनात आणल्यास बंधारे घालून ही जमीन त्यास रक्षण करता येईल. याकामी मदत करण्याला लोक तयार असता सरकार अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करीत आहे. कित्येक ठिकाणी पावसाच्या अभावामुळे पाण्याची टंचाई आहे व अशा ठिकाणी पाणीपुरवठ्याची योग्य तजवीज करणे सरकारचे कर्तव्य आहे. मुंबई इलाख्याचे मुख्य इंजिनियरसाहेबांचे गेल्या वर्षीचे रिपोर्टी-मध्ये मुंबई इलाख्याचे मध्य, उत्तर व दक्षिण भागात मिळून पूर्वीपासून योजलेली सुमारे १३३० लोकोपयोगी कामे सरकारचे दप्तरी आहेत असा उल्लेख आहे परंतु त्यापैकी फक्त दोनच कामे प्रत्यक्ष चालू आहेत! माझे असे ठाम मत आहे की सरकारने बॅकबे योजनेसारख्या मोठमोठ्या कामात पैसे न खर्चता जमिनीची सुधारणा करून त्या जास्त उत्पन्नाच्या कशा होतील या गोष्टीकडे पैशाचा विनियोग केला असता शेतकरीवर्ग व इतर रयत जास्त कर देण्यास केव्हाही कुरकुर करणार नाही. परंतु शेतकीकरिता जमीन न सुधारता सरकार फक्त सारावाढ करीत आहे. व म्हणूनच लोकही त्याविरुद्ध तक्रार करीत आहेत. अशा परिस्थितीत सुद्धा सरकारची उत्पन्नाची वाढ

होण्याची आशा आहे असे फिनॉन्स मेंबरचे म्हणणे आहे. परंतु ती रयतेवर जादा कर न लादता व्हावी असे मला वाटते. तरी सरकारने रेक्लेमेशनच्या छोटया योजना, कालवे व शेतकीची सुधारणा अशा बाबतीत जास्त सुधारणा करण्याचे मनात आणूनच उत्पन्नाची वाढ करावी हेच योग्य आहे.

## कौन्सिलातील आणखी एक स्थानत्याग

रावबहादुरांना जसे सरकारात दोष दिसत तसेच ते लोकातही दिसत. किंबहुना प्रागतिक पक्ष व इतर प्रमुख राजकीय पक्ष यांच्यात हे एक महदंतर आहे, आणि त्याचे कारण प्रागतिकांचा भर मुख्यत्वे विधायक व अप्रागतिकांचा भर विशेषत्वे विध्वंसक कार्यावर असतो हे आहे. यामुळेच प्रागतिकांना आपल्या लोकांचेही दोष दिसतात व इतर पक्षांना मात्र फक्त सरकारचेच तेवढे दोष दिसतात. एकाची दृष्टी वस्तुस्थितीकथनाची असते तर दुसऱ्याची अतिशयोक्तिवर्णनाची असते. उ.– दडपशाही कायद्यांच्या निषेधार्थ रावबहादुरांनी जसा कौन्सिलातून बाणेदारपणाने स्थानत्याग केला होता तसाच त्यांनी डॉ. सोळंकी यांच्या १९३२ मधील एका ठरावाच्या वेळीही केला होता. सदर ठराव असा होता की, 'हिंदूंच्या रूढीमुळे वा धार्मिक समजुतीमुळे स्पृश्यांबरोबर अस्पृश्यांना बसण्यास सरकार हुकमतीखालच्या किंवा म्युनिसिपल अगर लोकल बोर्ड यांच्या ज्या संस्थांत मज्जाव होत असेल त्यांना सरकारने आर्थिक मदत करू नये.' प्रस्तुत ठराव सरकारच्या फायद्याचा असल्याने तो साहजिकच तत्काळ पास व्हावा यात नवल नाही. पण नवल हे की, या ठरावास मान्यता दिल्याने आपले हरिजनप्रेम ठळकपणे उठून दिसेल हे ठाऊक असूनही रावबहादूर व त्यांचे हिंदु सहकारी यांनी मात्र या ठरावातील एका घातक तत्वाच्या निषेधार्थ स्थानत्याग केला ! त्यांचे म्हणणे असे की, 'अस्पृश्यतानिवारणाचा हा काही इष्ट व योग्य मार्ग नव्हे. कारण हिंदूतच अशा रूढी, समजुती आहेत व त्यांच्या संस्थातच दलितांना अशी बंदी होते असे नसून मुसलमान, युरोपियन, पारशी यांच्यातही अशा समजुती व रूढी आहेत आणि त्यांच्यातही इतर जातीयांना अगर धर्मीयांना बंदी होते, मग हिंदूवरच असली आग पाखडण्यात काय अर्थ ? आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सारे हिंदूच असतात असे थोडेच आहे ?'

## संयुक्त राष्ट्रीय पक्षाचे उपनेते व प्रणेते

कौन्सिलमध्ये संयुक्त राष्ट्रीय पक्ष स्थापन करण्याच्या कामी काळ्यांचे अत्यंत सहाय्य झालेले आहे; व ते प्रथम त्याचे तात्पुरते सेक्रेटरी, पुढे तीन वर्षे उपनेते व शेवटी पाच वर्षे प्रणेतेही होते. तसेच कौन्सिलच्या अध्यक्षपदासाठीही ते १९२७ मध्ये एकदा उभे होते. पण त्यात यशाचा संभव असताही श्री. देहेलवी यास संधि मिळावी म्हणून त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. कौन्सिलातील कामासाठी डिसेंबर १९२६ मध्ये काळ्यांचे प्रयत्नांनी वरील संयुक्त राष्ट्रीय पक्ष स्थापण्यात आल्यावेळी 'सदर पक्ष लोकहित विरोधक गोष्टीत सरकारला कसून विरोध करील आणि लोकहित साधक बाबीत कौन्सिलातल्या इतर संघांशी केव्हाही सहकार्य करील. सदर पक्षाचा हेतु जादा सुधारणा लवकर मिळविता येतील अशा रीतीने हल्लीच्या राज्यघटनेचा उपयोग करण्याचा असून प्रांतिक, जातिविषयक किंवा इतर भेदास अल्पही महत्त्व न देता, उलट ते होता होईल तो कमी करून बहुजनांच्या हितास पोषक असे कार्य कौन्सिलात व्हावे हा आहे' अशी या पक्षस्थापनेला उद्देशून घोषणा करण्यात आली होती. रा. ब. काळे हे सार्वजनिक पैशाची खाजगी पैशाइतकीच काळजी व आस्था बाळगीत असत आणि त्याचप्रमाणे स्वतःचा पैसा हाही सार्वजनिक कार्याकरिताच आहे असे ते समजत असत. यामुळेच कौन्सिलात ते ग्लॅडस्टनप्रमाणे "रिट्रेंचमेंट अँड रिफार्म" या सूत्राचा सतत पाठपुरावा करू शकले. ते जसे कर्तृत्वात व दातृत्वात ख्यात होते तसेच विद्वत्वात आणि वक्तृत्वातही विख्यात होते. अनभ्यासाबद्दल मुंबई कौन्सिलरांची सामान्यतः (अलीकडील) प्रसिद्धी आहे. परंतु तिजपासून मुक्त असलेल्या लोकनियुक्त सभासदात रावबहादुरांचे स्थान उच्च दर्जाचे आहे. परमतसहिष्णुता, खोल अभ्यास, अंतःकरणाची तळमळ आणि ओघवती ओजस्वी भाषा या गुणालंकरांनी त्यांची वक्तृत्वकला विभूषित झालेली असे. अशा एक ना दोन अनेक गोष्टीमुळेच ते तेथल्या राज्यदेवतेच्या दरबारात केवळ पहिल्या प्रतीचे मानकरीच नव्हे तर तीतील पहिल्या खुर्चीचे अधिकारीही होऊ शकले.

# प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींतील कार्य

## खर्च कमी करून निरक्षरता कमी होईल काय ?

देशोन्नतीच्या मूळ पायाच्या- प्रा. शिक्षणाच्या प्रसारासंबंधाचे रावबहादुरांनी केलेले विविध प्रयत्न तर लोकविश्रुतच आहेत. पुणे जिल्हा लोकलबोर्डाच्या विद्यमाने पुण्यास १९३२ साली महाराष्ट्रातील सर्व स्कूल-बोर्डाच्या प्राथमिक शिक्षण परिषदेचे जे तिसरे अधिवेशन भरले होते. त्याच्या अध्यक्षपदावरून रावबहादुरांनी केलेले भाषण आजही तितकेच मननीय वाटेल. या भाषणात त्यांनी १८५४ सालच्या खलित्याने जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी हिंदुस्थान सरकारवर कशी पडली, तेव्हापासून या बाबतीत काय काय उपक्रम झाले, व ते कितपत इष्टानिष्ट आणि योग्यायोग्य होते याचे साधार व सुंदर विवेचन केले आहे. १८८२ च्या शिक्षण कमिशनने व १९०४ साली हिंदुस्थान सरकारने सरकारी मदतीने चाललेल्या खाजगी शैक्षणिक संस्थांना उत्तेजन देण्याचे धोरण मान्य केले असताही सरकार त्याप्रमाणे कसे वागले नाही, विपत्कालातही सरकारी शिक्षण संस्थांचे अवाढव्य खर्च चालू ठेवून खाजगी संस्थांच्या ग्रँटमध्ये मात्र कशी पैशाच्या ओढाताणीच्या सबबीवर सरकारकडून अयोग्य कपात करण्यात आली, इतकेच नव्हे तर १९१०-११ साली ना. गोखले यांनी प्राथमिक शिक्षणाचे बिल पुढे आणले असता त्यालाही सरकारने कसा विरोध केला, इत्यादी अनेक बाबींवर या भाषणात उत्कृष्ट टीका करण्यात आली आहे. अखेरीस त्यांनी या भाषणात सरकारला असे स्पष्ट सांगण्यासही कमी केले नाही की, 'जर तुम्हाला देशातील निरक्षरता दूर करावयाची असेल तर तुम्ही शिक्षणाची सोयच उलट अधिक केली पाहिजे; खर्च कमी करणे हा त्याचा योग्य उपाय मुळीच नव्हे.' इंग्लंड रिटर्नड्च्या हुकमी तिकिटावर शिक्षण खात्यातही गलेलठ्ठ पगार देण्याच्या सरकारी धोरणावरही या इषाऱ्याच्या अखेरीस त्यांनी टीकेचे सणसणीत फटकारे ओढले आहेत. याखेरीज प्राथमिक शिक्षणाबाबतच्या चंदावरकर कमिटीवर, व तिच्या रिपोर्टाधारे करण्यात आलेल्या बिलाच्या चर्चेत व वरील परिषदेने लोकल अँथॉरिटीज्च्या शिक्षणाबद्दलच्या ग्रँटमध्ये ठराविक

मर्यादेपेक्षाही जी जास्त सरकारी कपात करण्यात आली तिची अयोग्यता दर्शविण्यासाठी निवडलेल्या शिष्टमंडळातही त्यांनी चांगले काम केले आहे.

## इंग्लंडात धार्मिक शिक्षण कसे मिळते?

'जनतेच्या शिक्षणाचा प्रश्न' या विषयावर 'ऐक्यात' त आठ उप–युक्त व चर्चात्मक लेख लिहूनही त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्कृत्य पार पाडले आहे. या लेखात त्यांनी इतर गोष्टीबरोबरच असेही प्रतिपादन केलेले आहे की, 'सरकारी सहाय्याने चाललेल्या खाजगी शिक्षण संस्थातून यापुढे तरी धार्मिक शिक्षणावरील बहिष्कार उठणे आणि उठविणे अत्यंत अगत्याचे आहे.' हिंदुस्थानात नानापंथ व धर्म आहेत, सबब त्या त्या पालकाकडून अशा शिक्षणास हरकत घेतली जाईल, व सरकारवर धार्मिक ताटस्थ्याच्या वचनभंगाचा आरोप येईल असे यावर कोणी आक्षेप घेतील तर त्यासही त्यांनी असे बिनतोड उत्तर देऊन टाकले आहे की, 'धार्मिक शिक्षण याचा अर्थ विशिष्ट धर्माचे शिक्षण असा नसून सर्वसामान्यपणे जगातील साऱ्याच धर्मात जी काही शाश्वत सत्य व सत् तत्वे असतात त्यांचे (म्हणजेच सर्वसाधारण नीतीचे) शिक्षण होय; आणि तेही फक्त खाजगी संस्थांतूनच द्यावयाचे आहे, सरकारी शैक्षणिक संस्थांतून नव्हे.' अर्थात वरील आक्षेपांना या उत्तरानंतर जागाच रहात नाही. इतके लिहूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी इंग्लंडात एकच ख्रिश्चन धर्म असताही त्यात अनेक परस्पर मतविरोधी पंथ आहेत पण तरीही तेथील संस्थानातून अशा रीतीचे शिक्षण मिळते आणि त्यातून ज्या पालकांना ते आपल्या मुलास द्यावयाचे नसेल त्यांना तेवढ्या वेळेपुरते आपल्या मुलास त्यापासून अलिप्त ठेवता येते असेही दाखवून दिले आहे. मात्र तेथे या सवलतीचा एकाही पालकाने फायदा घेतलेला नाही! त्यांचे दुय्यम शिक्षण सुधारणेसारखे काही ठराव तर असे असत की ते मांडण्या–साठी त्यांचीच-त्यांच्या त्या ठरावातील मूळतत्वावरील दांडग्या अभ्यासा–मुळे जरूर असे; व आजारादि कारणामुळे जेव्हा ते नाईलाजाने गैरहजर असत व जेव्हा त्यांचे हे काम अन्य सभासदांस साधत नसे तेव्हा ते ठराव कौ. च्या पुढील बैठकीपर्यंत त्यांचेसाठी खास राखून ठेविले जात.

## म्युनिसिपॅलिटीनंतर बोर्डाचा उपक्रम

१९१८ सालच्या शिक्षणाबाबतच्या पटेल अॅक्टप्रमाणे सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करणारी अगदी पहिली स्थानिक स्वराज्य संस्था जशी इलाख्यात सातारा म्युनिसिपॅलिटी हीच होती तसेच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास होताच मुंबई कौन्सिलच्या योजनेनुसार लोकलफंड वाढवून इलाख्यात सर्वांच्या आधी तत्कालीन बोर्डाचे प्रमुख सदस्य असलेल्या रावबहादुरांच्या परिश्रमाने फक्त सातारा जिल्हा लोकल बोर्डानेच जिल्हाभर सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचे निश्चित ठरविले होते, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. दुर्दैवाने पुढे सक्तीचे प्राथमिक शिक्षणच अंमलात न आल्याने पुढील १९२३ सालच्या कौन्सिल निवडणुकीत रावबहादुरांच्या विरुद्ध जिल्ह्यातील काही ठळक मंडळींनी शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या नावाखाली भयंकर काहूर माजविले, आणि ज्या शेतकऱ्यांच्या हितार्थ रावबहादुर आमरण जातीने त्यागपूर्वक झटले ते अडाणी शेतकरी मतदार या डावास फसल्याने रावबहादुरांच्या पदरी त्या निवडणुकीत अपयश आले !

## अफाट फाटक्या आकाशाला छोटे तुटके ठिगळ

प्रा. शिक्षणासाठी सरकार स्था. स्वराज्य संस्थांना जी ग्रँट देते तीत त्याने १९३२ साली काटकसर कमिटीच्या शिफारशीविरुद्ध शेकडा २० टक्के कपात करण्याचे व त्यायोगे आपल्या १४ कोट रुपयांच्या उत्पन्नातून अवघे २० लक्ष रुपये वाचविण्याचे ठरविताच म्हणजे फाटलेल्या अफाट आकाशाला फक्त एक फाटके तुटके ठिगळ लावण्याचा बेत करून तसे हुकूम सोडताच या कपातीच्या विरुद्ध व या हुकूमाच्या निषेधादाखल रा. ब. काळे यांनी मुंबई कौन्सिलात एक ठराव आणला होता व तो इतका समर्पक होता की, केवळ सर्व लोकनियुक्तच नव्हे तर साऱ्या सरकार नियुक्त सभासदांनीही तो एकमते पास केला होता ! असला स्पृहणीय विजय फारच थोड्या सदस्यांना व त्यांच्या विषयांना लाभत असेल. तसेच एकदा दुय्यम शिक्षणाच्या ग्रँटचे बाबतीतही सरकारने अशीच कपात करण्याचे ठरविले होते. व तेव्हाही रावबहादुरांनी असाच एक ठराव आणला होता व त्याचा परि-

णाम म्हणजेच तत्कालीन शिक्षणमंत्री रँ. परांजपे यांना सदर ग्रँट पूर्णपणे देणे शक्य झाले हा होय. या घटनेचेही यावेळी स्मरण होणे साहजिक आहे.

# दाता भवति वा न वा

## राजकीय संन्याशांची संस्था

ज्याचे अनुकरण यापूर्वी लाहोरकडे झाले व आता साताऱ्याकडे होत आहे त्या भारत सेवक समाजाबद्दल येथे दोन शब्द लिहिणे अवश्य आहे. युरोपातील अशा प्रकारच्या सोसायटयाच्या धर्तीवरील संस्थेची स्थापना करण्याची कल्पना ना. गोखल्यांच्या अंतःकरणात १८९७ च्या पूर्वीपासूनच होती, व त्यांनी रँ. परांजपे यांच्याजवळ इंग्लंडात वेल्बी कमिशनच्या कामा-निमित्त वास्तव्य असता बोलूनही दाखविली होती, असे परांजपेकृत गोखले चरित्रावरून दिसून येते. लोकमताला इष्ट वळण लावणारे, लोकांना राज-कारणाचे यथार्थ ज्ञान करून देणारे व सार्वजनिक आयुष्याचा दर्जा उच्च करणारे राजकीय संन्यासी तयार करणे हे या कै. वा. श्री. शि. ह. साठे यांचे हस्ते १२-६-१९०५ रोजी स्थापन झालेल्या संस्थेचे ध्येय आहे. कै. वा. श्री. गो. कृ. देवधर, श्री. न. अ. द्रवीड व श्री. अ. वि. पटवर्धन हे हिचे पहिले सभासद होत. या स्थापनेच्या पूर्वी दोनच वर्षे बंगल्यातील सुप्रसिद्ध कलाकुशल कादंबरीकार बंकिमचंद्र यांची सर्वत्र अत्यंत गाजलेली आनंदमठ नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली होती आणि तिच्यात अशा प्रकारच्या घर-दार, मालमत्ता व बायकामुले यांचा देशोद्धारार्थ संन्यास करणाऱ्या 'संतान संघा' चा प्रचार करण्यात आला होता. सदरील समाजाबद्दल 'स्वार्थत्याग बुद्धीच्या इतक्या अत्युच कोटीवर चढण्याचे सामर्थ्य फारच थोड्या लोकात असेल' असा हिंदुस्थानच्या हितशत्रुचे स्थान मिळविलेल्या सर व्हॅलेंटाईन चिरोल यांच्यासारख्यांनी संशय प्रगट करावा हे साहजिकच होय. कारण हा समाज साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या ध्येयावर विश्वास प्रगट करून स्वार्थ-त्याग आणि देशप्रेम या दोन तत्वावर निघाला व नेमक्या याच तीन गोष्टी त्यांना नको होत्या. हिंदी लोकांनी फार तर साम्राज्यांकित सुराज्यावर विश्वास व्यक्त करावा, इंग्लंडच्या हिताच्या दृष्टीने स्वार्थत्याग करावा, व

या दोन्ही गोष्टींना अनुरूप असे देशप्रेम दाखवावे अशी त्यांची मनीषा होती, परंतु समाजाची दृष्टी या तिन्ही बाबतीत केवळ हिंदुस्थानहिताचीच होती.

## रावबहादुरांची उघडली मूठही सव्वा लाखाचीच

चिरोलला ही गोष्ट मानवू नये हे नवल नव्हे, पण नवल हे की 'ही केवळ कादंबरीकल्पना आहे व म्हणून ती व्यवहारी जगात उतरणे अशक्य आहे' असे म्हणून नेमस्त जगतातील सर बिपिन बोस यांनी, इतकेच काय पण खुद्द सर फेरोजशहा मेथा यांच्यासारख्या मुंबईच्या सिंहानेही या संस्थेबद्दल सद्बुद्धीनेच का होईना पण आपण शंकित असल्याचे व्यक्त केले होते म्हणतात. तथापि या संशयात्म्यांना भारतसेवक समाजाने किती चोख उत्तर दिले आहे ते रावबहादुरांच्या सव्वालाखी देणगीने सर्वात उत्तम सिद्ध केले आहे. ही संस्था आज नानाविध क्षेत्रात बहुविध कार्ये करीत असून तिचे आजीव सेवकत्व प्राप्त होण्यासाठी प्रथम एका पंचवार्षिक सेवेची कसोटी ठेवण्यात आली आहे, व सभासदत्व स्वीकारताना सभासदाला सच्चारित्र्य-पालनादि सप्त प्रतिज्ञा कराव्या लागतात. पूर्वकालीन रामदास मंडळाचेच कार्य एक प्रकारे ही संस्था करीत आहे व सातारा जिल्ह्यानेही रावबहादुरासारखा एक राष्ट्रवीर याकामी पुरविला आहे. त्यांची झाकली मूठच सव्वा-लाखाची होती असे नसून उघडली मूठही सव्वालाखाची होती, आणि म्हणून त्यांच्यासंबंधी कोणीही आदराने व अगत्याने असेच म्हणेल की, "खरोखर लाख मरावेत पण लाखांचा पोशिंदा मरू नये."

## गोखले संशोधन मंदिर की काळे संशोधन मंदिर?

न्या. रानडे व ना. गोखले यांच्या प्रागतिक पक्षाची व तत्वाची ध्वजा भारत सेवक समाजाव्यतिरिक्त साताऱ्यात व महाराष्ट्रात अद्यापपर्यंत अन्यत्र कोठेही नाही अशी फडकत ठेवण्याची अतुल्य कामगिरी करण्यात त्यांचा पहिला नंबर लागेल. आपल्या गुरुतुल्य मित्राचे –ना. गोखले यांचे स्मारक करण्यासाठीच त्यांनी भारत सेवक समाजाला ही जंगी देणगी दिली पण उलट हे त्यांचेच चिरंतन स्मारक होऊन बसले! सव्वा लाखाच्या तर सोडाच पण सव्वा हजाराच्या देणगीसाठी सुद्धा संस्थेला आपले नांव देण्याची अट

घालणारे दाते पाहिले आणि भारत सेवक समाज चालकांनी "गोखले इन्स्टि-ट्यूट"च्या ऐवजी "काळे इन्स्टिट्यूट" हे नांव देण्याची सूचना केली असताही तिचा विचार देखील न करणारे व गोखल्यांच्याच धन्य आणि भाग्य नामाचा आग्रह धरणारे रा. ब. काळे यांच्यासारखे नि:स्वार्थी दाते बघितले म्हणजे दाता सुद्धा जन्मावा लागतो, तो बनविता येत नाही असे म्हणावेसे वाटते. पुण्याच्या (फर्ग्युसन कॉलेज टेकडी जवळील) भारत सेवक समाजाच्या पंचविसाव्या वाढदिवसानिमित्त ता. १२–६–१९३० रोजी 'दि गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स' ही संस्था रावबहादुरांच्या या सव्वा लक्षाच्या सुप्रसिद्ध उदार देणगीने स्थापन झाली.

### संस्थेच्या जन्माचे उद्दिष्ट

राजकारणातील व अर्थकारणातील महत्त्वाच्या प्रश्नांचे उच्च संशोधन करणे हा या संस्थेचा प्रमुख हेतु असून या संस्थेचे डायरेक्टर व संस्थेचे प्रिन्सिपॉल श्री. धनंजय रामचंद्र गाडगीळ हे आहेत. या संस्थेचे संशोधन–कार्य उद्दिष्टानुसार चालू असून तिजमध्ये सांप्रत मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. परीक्षेस बसणारे अनेक पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी व्याख्यानादिरूपे शिक्षण घेत असतात.भारत सेवक समाजाचे राजकारण व अर्थकारणविषयक वाङ्मयाचे अप–टु–डेटच नव्हे तर अगदी अप–टु–मिनिट संग्रह करणारे सुमारे २५,००० ग्रंथांचे जे संग्रहालय आहे त्याचा या संस्थेस व तिच्या विद्यार्थ्यांस वाचन व संदर्भ या दृष्टीने पुष्कळच फायदा होतो. या संस्थेला सभासदांची जरी आवश्यकता आहे, व ते मिळूही शकत आहेत, तरी अद्याप तिने आपला व्याप विशेष वाढविलेला नाही. याचे कारण एक तर ही संस्था तसे पाहता नवीनच आहे; व दुसरे म्हणजे तिची आर्थिक प्रतिकूलता अजून संपलेली नाही. सव्वा लक्षाच्या देणगीनंतरही तिला आर्थिक प्रतिकूलता भासावी याचाच अर्थ हे कार्य अत्यंत प्रचंड व बिकट आहे असा आहे.

### मंदिराच्या कार्यांचे अल्पदिग्दर्शन

संस्थेच्या कार्यकर्त्यात प्रि. गाडगीळ यांचेखेरीज श्री. व्ही. आर. गाडगीळ बी. एजी. (बॉम्बे), एम्. एस्.सी. (कॅलिफोर्निया) व

श्री. एल. व्ही. गोगटे बी. एस. ( एन्. कॅरोलिना ) हे सद्गृहस्थ आहेत. संस्थेचे रावबहादुर हे मुख्य दाते असून इतर अनेक दात्यांचेही तिला सहाय्य आहे व शेतकी–उद्योग इ. विविध व्यापक क्षेत्रातही विशिष्ट क्षेत्रांचे व व्यवसायांचे आर्थिक संशोधनदृष्टया अभ्यासादि प्रकारे तिचे कार्य चालू आहे. पुणे शहरातील फळबाजार व महाराष्ट्रातील मोटार वाहतूक या धंद्यांचे या संस्थेमार्फत परिश्रमपूर्वक आकडेवार संशोधन यापूर्वी करण्यात आले असून त्यांचे पुस्तक रूपाने प्रकाशनही झाले आहे. हल्ली या संस्थेने पुणे शहराच्या आर्थिक पहाणीचे काम शहर म्यु. टीच्या मदतीने हाती घेतले असून इंपिरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरकडून अपेक्षिलेल्या मदतीचे आश्वासन मिळताच चालू सालापासून सातारा जिल्ह्यातील निवडक व प्रातिनिधिक स्वरूपाचे क्षेत्र घेऊन त्याच्या तपशीलवार आर्थिक पहाणीचे कामही ही संस्था सुरू करणार आहे; व अशा रीतीने कै. रा. ब. काळे यांच्या देणगीचा फायदा त्यांनी आपली हयात व्यतीत केलेल्या सातारा जिल्ह्यासही प्रत्यक्षतः मिळू लागणार आहे. संस्थेच्या पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सला मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. ला. बसता येते. तद्वत् इतरही विश्वविद्या–लयाच्या बी. ए. ला बसता येते. पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्चच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप्सही ठेवण्यात आलेल्या असून विद्यार्थ्यांसाठी व संशोधकांसाठी संस्थेत जागेचीही चांगली सोय करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संस्थेने आता–पर्यंत चार महत्त्वाची पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. त्यातील पहिले पुस्तक 'दि सॅलरीज ऑफ् पब्लिक ऑफिशियल्स इन इंडिया' ( हिंदी अधिकाऱ्यांचे पगार ) हे असून दुसरा ग्रंथ 'इंपिरियल प्रेफरन्स फॉर इंडिया' (ओटावा कराराचे परीक्षण ) हा आहे. तिसरे उपरोल्लेखित पुस्तक म्हणजे 'ए सर्व्हे ऑफ दि मार्केटिंग ऑफ फ्रूट इन पूना' (पुण्यातील फळबाजाराची पाहणी) हे होय. चौथ्या उपरोल्लेखित पुस्तकाचे नांव 'ए सर्व्हे ऑफ मोटार बस ट्रान्स्पोर्टेशन इन सिक्स डिस्ट्रिक्टस् ऑफ् दि बॉम्बे प्रेसिडेन्सी' (महाराष्ट्रा–तील सहा जिल्ह्यातील मोटार बसेसच्या वहातुकीची पाहणी ) असे असून यातील पहिली दोन्ही पुस्तके प्रि. गाडगीळ यांनी, तिसरे प्रि. गाडगीळ व श्री. व्ही. आर. गाडगीळ यांनी व चौथे प्रि. गाडगीळ व श्री. गोगटे यांनी लिहिलेले आहे. या सर्व ग्रंथावर मुंबई सरकारच्या शेतकी खात्याचे डायरे–

क्टर डॉ. बर्न्स प्रभृतींनी व इंडियन जर्नल ऑफ इकॉनॉमिक्ससारख्या अनेक प्रसिद्ध आर्थिक विषयक नियतकालिकांनी उत्तम अभिप्राय दिले आहेत. 'अर्बन हँडिक्राफ्टस् ऑफ दि बॉम्बे-डेक्कन' ( दक्षिणेतील ग्रामोद्योग ) हें ५ वे पुस्तक त्याचप्रमाणे पुण्यातील छोटे धंदे व पुण्यातील ३४-३५ चे औद्योगिक प्रदर्शन यांच्या पाहणीचे रिपोर्ट ही पुस्तकेही लवकरच प्रकाशित होणार आहेत. संस्थेचा सांप्रतचा वार्षिक खर्च अंदाजे ८–९ हजार रुपये आहे.

## प्रि. ध. रा. गाडगीळ यांचा स्वार्थत्याग

या संस्थेचे प्रिन्सिपॉल श्री. धनंजयराव हे मुंबई युनिव्हर्सिटीच्या व भारतीय महिला विश्वविद्यालयाच्या सिंडिकेट व सिनेटादि अनेक शाखांचे व संस्थांचे सभासद असून लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट पुणे इ. संस्थांसही त्यांच्या ज्ञानाचा लाभ होतो. त्यांनी गोखले इन्स्टिटयूटसाठी फार मोठा त्याग केलेला आहे. त्यांचा जन्म नागपुरास १९०१ साली झाला व त्यांचे शिक्षण १९१० ते १९१५ पर्यंत तेथील पटवर्धन हायस्कूलमध्ये झाले. १९१८ ते १९२३ पर्यंत त्यांनी केंब्रिजच्या क्वीन्स कॉलेजात अभ्यास करून तेथील एम्. ए. एम्. लिट्. ही उच्च पदवी मिळविली. १९२४ ते १९२५ मध्ये मुंबई सरकारच्या आर्थिक खात्याचे असिस्टंट सेक्रेटरी म्हणून काम केल्यावर व पुढे त्या जागेचा राजिनामा दिल्यावर १९२५ ते ३० पर्यंत त्यांनी सुरतेच्या म. ठा. बा. कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून काम केले, परंतु गोखले इन्स्टिटयूटचे चालकत्व त्यास देण्याचे ठरतांच त्यांनी आपली ही प्रिन्सिपॉलची मोठ्या पगाराची व अधिकाराची जागा सोडून दिली व तेव्हापासून ते या संस्थेचे प्रिन्सिपॉल म्हणून पुण्याला स्थायिक झाले. त्यांनी उपरोक्त ग्रंथाखेरीज लोकशिक्षण लघु ग्रंथमालेद्वारे इंडस्ट्रियल एव्होल्यूशन ऑफ इंडिया, बॉम्बे लॅन्ड रेव्हेन्यु सिस्टिम, हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास वगैरे इंग्रजी-मराठी ग्रंथही लिहिले असून ते त्यांच्या अभ्यासामुळे, मार्मिकतेमुळे व सखोल विवेचनामुळे चांगले विद्वान्मान्य व लोकप्रिय झाले आहेत. त्यांचा रिझर्व्ह बँक वगैरे विषयांचाही दांडगा अभ्यास आहे. या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळात रा. ब. काळे, भारत सेवक समाज व संस्थेत काम करणारा अध्यापक वर्ग या सर्वांचे

प्रतिनिधी असतात आणि अशा या मंडळाकडून या संस्थेचा सर्व कारभार चालविला जातो.

## डे. ए. सो. च्या पहिल्या शाळेचे पहिले सहाय्यक

महाराष्ट्रात अल्पखर्चात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करण्याच्या उद्देशाने पुण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली, परंतु १८९९ पर्यंत पुण्यातील कार्य सोसायटीला पुरेसे पडत होते. मुख्य केंद्राची वाढ प्रथम झाली पाहिजे, मग शाखोपशाखाचा विस्तार आपोआप होतो. केन्द्राचे दृढीकरण करण्यात प्रारंभीचा काल गेल्यानंतर मूळ उद्देशानुसार महाराष्ट्रातील इतर ठिकाणी दुय्यम किंवा उच्च शिक्षणाची सोय करण्याचे कार्य स्वीकारण्याचे डे. ए. सोसायटीने ठरविले. सातारा हे पुण्याला जवळ; शिवाय साताऱ्याला परिस्थितीही अनुकूल. यामुळे सोसायटीच्या अनुशासक मंडळाने सातारा येथील मोडकळीस आलेली एक खाजगी शाळा ताब्यात घेण्याचे ठरविले आणि पुण्याबाहेरील महाराष्ट्रातील आपल्या कार्यास प्रारंभ केला. अशा रीतीने ता. ६ डिसेंबर १८९९ रोजी सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या कामास प्रारंभ झाला. रा. ब. काळे यांचा या शाळेशी अगदी प्रारंभापासून संबंध आला, ज्या ज्या ठिकाणी शाळा काढावयाची त्या त्या ठिकाणच्या वजनदार गृहस्थाचे एक सल्लागार मंडळ शाळेच्या चालकांना वेळोवेळी मदत करण्याकरिता नेमावयाचे असा सोसायटीचा प्रघात असे. त्याप्रमाणे साताऱ्याच्या शाळेकरिता जे सल्लागार मंडळ स्थापन झाले त्यामध्ये खालील नावे होती:- (१) रा. ब. वि. ना. पाठक एम्. ए. (२) श्री. ब. श्री. सहस्रबुद्धे (३) श्री. दादासाहेब करंदीकर (४) रा. ब. रा. रा. काळे. याप्रमाणे शाळेच्या जवळ जवळ प्रारंभापासून ती त्यांच्या मृत्यूपर्यंत रा. ब. काळे हे सल्लागार मंडळाचे सदस्य होते.

### चार रुपये व्याजात चाळीस हजारांची रक्कम

तथापि त्यांचे नाव शाळेच्या इतिहासात चिरकालीन राहण्यास त्यांचे नुसते सदस्यत्व कारणीभूत झालेले नाही. इतर दृष्टीनेही त्यांची शाळेला मदत झालेली आहे व तिचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक नेहमी केला जाईल.

शाळा स्थापन होऊन सहासात वर्षे झाल्यानंतर शाळेच्या दृष्टीने उद्भवलेला अत्यंत निकडीचा प्रश्न म्हटला म्हणजे शाळेकरिता इमारत बांधणे हा होता. शाळेच्या भावी उत्कर्षाच्या दृष्टीने शाळेला स्वतःची इमारत असणे अगदी जरूर होते. ही कल्पना सर्वांना पटत होती पण ती अमलात कशी आणावयाची हा प्रश्न सर्वांना बिकट वाटत होता आणि रा. ब. काळे यांचे वेळीच सहाय्य झाले नसते तर या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्यास किती कालावधि लागला असता हे सांगता येण्यासारखे नाही. कै. सीतारामपंत देवधर यांनी विनंती करताच रा. ब. काळे यांनी सवलतीच्या व्याजाने दहा हजार रुपये कर्जाऊ देऊ केले; एवढेच नव्हे तर शाळेच्या नावाने ते पोस्टल बँकेत ठेवून त्याप्रमाणे पुण्याच्या लाइफ मेंबरांच्या बोर्डाला कळविले परंतु एवढी रक्कम शाळेच्या इमारतीला पुरी पडण्याजोगी नव्हती. तेव्हा दहा हजाराऐवजी वीस हजार रुपयांची रक्कम देण्याचीही रा. ब. काळे यांनी आपली तयारी दर्शविली. व काही कायद्याच्या अडचणीमुळे पुढे तर असेही ठरले की रा. ब. काळे यांनीच इमारत बांधावी आणि सोसायटीने पैसे जमतील त्याप्रमाणे त्यांच्यापासून ती विकत घ्यावी. ही तडजोडही रा. ब. काळे यांनी उदार मनाने मान्य केली आणि शाळेच्या इमारतीच्या कामाला एकदाचा प्रारंभ झाला. १९०८–१९०९ सालच्या सोसायटीच्या अहवालात रा. ब. काळे यांच्या या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख आला आहे. रिपोर्टात असे लिहिले आहे की 'जागेची किंमत धरून साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या इमारतीस एकंदर ४६००० रुपये खर्च आला; यापैकी ३४००० रुपयांची रक्कम रा. ब. काळे यांनी केवळ ४ रुपये व्याजाने देण्याची कृपा केली नसती तर ही इमारत बांधण्याचा विचार अजिबात सोडून द्यावा लागला असता.'

## व्यक्तीपेक्षा संस्थेची गैरसोय जास्त विचारणीय

रा. ब. काळे यांनी इमारत बांधण्यास भरपूर द्रव्यसहाय्य केले एवढेच नव्हे तर ज्या जागी ही इमारत आहे ती जागाही योग्य किंमतीस सोसायटीस दिली. वास्तविक पहाता स्वतःकरिता ही जागा त्यांनी खरेदी केली होती. व ती शहराच्या मध्यभागी असल्यामुळे त्यांच्या धंद्याच्या दृष्टीने ती विशेष सोयीची होती. त्यावेळी तरी तशी सोयीस्कर जागा इतरत्र मिळण्याचा

संभव कमी होता. परंतु व्यक्तीच्या सोयी गैरसोयीच्या मानाने संस्थेच्या सोयी गैरसोयी अधिक महत्त्वाच्या हे तत्त्व त्यांना पूर्णपणे पटले असल्यामुळे त्यांनी स्वतःकरता हौसेने खरेदी केलेली जागा डी. ई. सोसायटीच्या स्वाधीन केली. रा. ब. काळे आणि न्यू इंग्लिश स्कूलचे आद्य सुपरिंटेंडेंट श्री. देवधर यांची राजकीय व सामाजिक मते बरीच जमत असल्यामुळे त्या दोघामधील स्नेहसंबंध विशेष दृढ असले तर आश्चर्य नाही. रा. ब. काळे यांनाही देवधरांच्या एकनिष्ठपणे कार्य करण्याच्या पद्धतीबद्दल अतिशय आदर वाटे. साहजिकच शाळेच्या बहुतेक महत्त्वाच्या कामकाजात रा. ब. काळे यांचा सल्ला घेतल्याखेरीज कै. देवधर पुढे पाऊल टाकीत नसत. रा. ब. काळे यांचे ज्येष्ठ बंधु श्री. गोविंदराव काळे (Lessons in English Translation या पुस्तकाचे कर्ते) हे श्री. देवधर यांचे जिवलग दोस्त होते. रा. ब. काळे यांच्याप्रमाणे श्री. गोविंदराव काळे यांचीही शाळेला पुष्कळच मदत झाली आहे. शाळेच्या लायब्ररीकरिता ३००० रुपयांची उदार देणगी त्यांनी दिली आणि त्याचवेळी रा. ब. काळे यांनीही तिला २००० रुपयांची देणगी दिली. सदरहू लायब्ररी म्हणजे या दोघा बंधूंचे संयुक्त स्मारक आहे. म्हणून लायब्ररीच्या खोलीत त्या उभयता बंधूंची तैलचित्रे लावण्यात आली असून तिच्यावर "काळे बंधूंची लायब्ररी" अशी अक्षरे असलेली संगमरवरी शिला बसविलेली आहे.

## रावबहादुरांच्या परिश्रमाने ग्रँट पूर्ववत सुरु झाली

कायद्याप्रमाणे शिक्षणखात्याकडून शाळेला जी वार्षिक ग्रँट मिळावयाची असते ती सबंधच्या सबंध मिळत नसे. १९२२-२३ साली शाळेला फक्त ६८३३ रु. च ग्रँट मिळाली. मागील सालापेक्षा ही ग्रँट जवळ जवळ दोन हजारांनी कमी होती. शाळेच्या चालकांनी योग्य अधिकाऱ्याकडे अर्ज करून या अन्यायाची दाद मागण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रा. ब. काळे मुंबई कौन्सिलचे सभासद होते. त्यांनी हा प्रश्न हाती धरून त्याचा पिच्छा पुरवला आणि त्यांच्याच प्रयत्नामुळे पुढील सालापासून पुनः पूर्ववत् म्हणजे पुरी ग्रँट मिळू लागली, आणि ती या बाबतीत सरकारचे धोरण बदलेपर्यंत चालू होती. कै. देवधर यांच्याप्रमाणेच त्यांच्यामागून न्यू इंग्लिश स्कूलचे जे जे

सुपरिटेंडंट झाले त्यांना त्यांना रा. ब. काळे यांचे मनोभावे सहाय्य होत आले आहे. शाळेबद्दल त्यांना आत्मीयतेची भावना वाटे. त्यांच्याकडे कोणीही मोठा पाहुणा आला की त्याच्या येथील कार्यक्रमात न्यू इंग्लिश स्कूलला भेट ही गोष्ट ठरलेलीच असे. डी. ई. सोसायटीलाही रा. ब. काळे म्हणजे आपला आधारस्तंभ वाटे. सोसायटीच्या कौन्सिलचे ते कित्येक वर्षे सभासद होते आणि त्यांचा कायदेशीर सल्ला कित्येक प्रसंगी सोसायटीच्या मार्गदर्शक झाल्याचे दाखलेही अनेक सापडतील.

## डॉ. कमलाबाई देशपांडे यांची प्रतिज्ञा !

रावबहादुरांनी पुण्याच्या भारतसेवक समाजास दिलेल्या सव्वा लक्ष रुपयांच्या देणगीच्या खालोखाल सातान्याच्या कन्याशाळेस दिलेल्या पंचवीस हजार रुपयांच्या वाड्याच्या देणगीचा क्रम लागतो. 'कन्या आल्या नाहीत तर बाकासाठीच पहिल्याने शाळा चालवू' अशा ईर्षेने डॉ. कमलाबाई देशपांडे ( अनाथ बालिका आश्रमाच्या आजन्म सेविका ) यांनी कन्याशाळेचे मुख्य अध्यापकत्व एक वर्षभर विनावेतन स्वीकारिले; आणि १९२२ च्या २२ ऑक्टोबरला कै. दादासाहेब करंदीकरांच्या बंगलीच्या माडीवर ही शाळा सुरू झाली. आरंभी सातारकरांच्या फक्त सहा मुली व भाऊबीजेच्या सुमुहूर्तावर जमलेली ६०० रुपयांची देणगी एवढेच या संस्थेचे भांडवल होते. १९१६ मध्ये स्थापन झालेल्या श्री. ना. दा. ठा. विद्यालयाचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या अशा शाळा ठिकठिकाणी काढण्याचा जो या संस्थेचा विचार होता त्यास मिळालेले मूर्त स्वरूप म्हणजेच सातारकरांच्या विनंतीवरून सुरू झालेल्या महिला विद्यापीठाच्या या पहिल्या शाळेचा उपक्रम होय. अशा रीतीने इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या मुलींची व्यवस्था झाली व ती व्यवस्थेच्या दुधात बहुसंख्य हिंदु कुटुंबांच्या मनोरचनेस योग्य अशा आखलेल्या शिक्षणक्रमाची साखर पडल्याने शाळेची लवकरच प्रगती होऊ लागली. दोनच वर्षांनी १९२४ मध्ये रजिस्टर्ड कन्याशाळा मंडळाची स्थापना करण्यात येऊन १९२५ साली विद्यापीठाकडे व खेरीज सरकारकडेही मान्यता व मदत मागण्यात आली; व १९२७ मध्ये आणि १९२९ मध्ये ती मिळालीही. १९२२ ते १९३४ च्या बारा वर्षांत शाळेला सुमारे २४ हजार रुपये देणग्या मिळाल्या, परंतु शाळेचा

वार्षिक खर्च शाळेच्या वार्षिक जमेत बसेनासा झाला. सारवणापासून सारी कामे करून जरी शाळेच्या शिक्षक-शिक्षिका वर्गाने हिंदी समाजाच्या स्त्री-सुधारणाविषयक अनास्थेवर "आपलेच दांत आपलेच ओठ" या न्यायाने पांघरूण घालण्याचा एकप्रकारे प्रयत्न केला आणि पुढील जागृतीमुळे तो थोडाबहुत यशस्वी झाल्याचे दिसले तरी तेवढ्याने शाळेच्या प्रपंचाचा व शिष्याच्या शिक्षणाचा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता.

### संकटग्रस्त 'कन्ये' ला कसे तारले?

आपल्या बी. ए. च्या नव्हे तर एम. ए. च्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करून या शाळेतील मुलींच्या ए. बी. पासूनच्या अभ्यासाकडे घरचे खाऊन लक्ष देण्याचे जरी डॉ. कमलाबाईंनी ठरविले, व पुढे त्याचा उपयोग होऊन स्वावलंबनाच्या पायावर उभ्या झालेल्या या शाळेतील अनेक मुली कित्येकांना घरचे खाऊ घालू लागल्या तरी यावेळी शाळेला पडलेला पेच सोडविण्यास तसाच डाव करणे जरूर झाले होते. त्यातच विद्यापीठास जंगी देणगी दिलेल्या ठाकरसी विश्वस्त निधीचे व्यवस्थापक व विद्यापीठ यांच्या दरम्यानच्या कलहामुळे शाळेची रुपये १२०० ची वार्षिक देणगीही थांबल्याने आणि अशा रीतीने या ग्रँटसह वर्षाचा सुमारे तीन हजार रुपयांचा खर्च कसा काढावा याची चिंता पडल्याने मोठीच आपदा उत्पन्न झाली. इतकी की १९३५ मध्ये तर शाळा बंद करावी असाही चालकात ( बद ) सूर निघू लागला. परंतु योगायोग वेगळाच होता. कन्याशाळेच्या प्रारंभापासूनच्या सल्लागार व सहाय्यकर्त्या कै. सौ. सत्यभामाबाई काळे यांच्या स्मारकार्थ व स्मरणार्थ एक उत्कृष्ट योजना करण्याचा रावबहादुरांचा बऱ्याच दिवसांपासूनचा विचार होता व त्यानेच या दुष्प्रसंगी उचल खाल्ली. व त्यामुळे त्याला सुप्रसंगाचे स्वरूप आले. त्यांनी अनाथबालिकाश्रमाशी विचार-विनिमय केला व अखेरीस अशी योजना निश्चित करण्यात आली की, "कन्याशाळा, सेवासदन, कन्याशाळा मंडळ वगैरे सर्व संस्था बंद करण्यात येऊन त्या 'कै. सौ. सत्यभामाबाई काळे स्त्रीशिक्षण मंदिर ( कन्याशाळा व महिलासदन ) ' या नावाने अनाथबालिकाश्रमाने चालवाव्या, त्यासाठी तिने दरसाल दोन हजार रुपयांची तूट दोन साल सोसावी व रा. ब. काळे

यांनी आपला शहरातील पॅलेस स्ट्रीटवरील मोठा राहता वाडा अनाथ-बालिकाश्रम मंडळीस बक्षीस द्यावा, आणि जोवर ही मंडळी साताऱ्यात कोणतेही स्त्री शिक्षणोपयोगी कार्य करील तोवर चिरस्थायित्वासाठी तो तिजकडेच राहवा."

## गोशाळांपेक्षां कन्याशाळांची जरूर

यात्रमाणे रावबहादुरांनी कन्यारूपी शाळेला जसे तारले त्याप्रमाणे अनाथ विधवाचे सहाय्यार्थ म्हणून १८९६ साली स्थापन झालेल्या व तद-नुसार आणि कालमानानुसार हा वेळपर्यंत कार्य करीत असलेल्या अनाथ बालिकाश्रमाने या शाळारूपी कन्येलाही तारले व आपले 'अनाथ-बालिका-आश्रम' हे नाव सार्थ केले. 'उद्धरेदात्मनात्मानम्' हे या नव्या संस्थेचे नवे ब्रीद असून तिचे कै. वा. सौ. सत्यभामाबाई ऊर्फ वहिनीसाहेब काळे यांच्या प्रथम श्राद्धदिनी म्हणजे आषाढ शु॥ ११ शके १८५७, ता. १२--७--१९३५ रोजी रावबहादुरांचे दीर्घकालीन परम स्नेही श्री. सी. सं. पाटकर, मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश व महिला विद्यापीठाचे चॅन्सेलर यांचे हस्ते नामकरण व उद्‌घाटन करण्यात आले. 'मातृभाषेतून ज्ञानविषयांचे शिक्षण घेऊन स्वसंस्कृती व स्वदेश याबद्दल योग्य प्रीती बाळगणाऱ्या तेजस्वी मुली तयार करण्याचे व वहिनीसाहेबांच्या सद्‌गुणाचे प्रतीक त्यांच्यात आढळण्याचे श्रेय रावबहादुरांच्या या आदरणीय व आचरणीय औदार्याला मिळेल' असा याप्रसंगी न्या. मू. पाटकर यांनी आशावाद प्रगट केला व वहिनीसाहेबांचें 'हिंदु गृहिणी या नात्याने त्यांचे जीवन आदर्श होते' असे वर्णन करून 'रा. ब. काळे यांनी आपल्या प्रिय पत्नीचे स्मारक म्हणून कन्याशाळेऐवजी एखादी गोशाळा उघडली नाही हे फार चांगले केले, मी गोरक्षणाच्या विरुद्ध नाही, पण या चालत्या बोलत्या परंतु शिक्षणाभावी चतुष्पाद गाईपेक्षाही काहीवेळा अनुकंपनीय स्थितीत आढळणाऱ्या मुलीबाळींच्या शिक्षणासाठी अर्थात् त्यांना खरेखुरे जीवन देण्यासाठी रा. ब. काळे यांनी हा वाडा दिला ही गोष्ट अधिक-स्याधिकंफलम् होय' असे सांगितले. रावबहादुरांच्या मुखावरील त्यावेळचे गांभीर्य व पावित्र्य अवर्णनीय होते. सौ. सत्यभामाबाईवरील त्यांच्या प्रेमाची तुलनाच करिता येणार नाही. सौ. सत्यभामाबाईच्या कैलास वासानंतर

आपणही दोन वर्षात कालावधीन होणार अशी त्यांनी आपली दृढ कल्पना करून घेतली होती; म्हणूनच त्यांनी कन्याशाळेस आपला राहता वाडा देण्याचे कार्य वेळेवरच करून टाकले. अखेर खरोखरच त्यांचे कल्पित फलित झाले ! यात त्यांची इच्छाशक्ति प्रत्ययास आली खरी पण त्यामुळे काही काल लोकांची मात्र किंकर्तव्यमूढ स्थिती झाली !

## बक्षीसपत्र तयार करण्याबद्दलची अधीरता

स्वत:च्या कन्येइतकेच त्यांचे कन्याशाळेवरही प्रेम होते. या नव्या संस्थेचे ते कायमचे उपाध्यक्ष होते व तत्पूर्वीही कन्याशाळेच्या व्यवस्थापक मंडळात ते होतेच, इतकेच नव्हे तर भारतीय महिला विद्यापीठाच्या सेनेट-वरही कन्या शाळेचे प्रतिनिधी म्हणून त्यांची अनेकवार निवडणूक झालेली आहे व तेथेही त्यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. डॉ. कमलाबाई देशपांडे या अनाथ बालिकाश्रमाच्या आजन्म सेविका व त्यांचे दीर कै. वा. वाग्भट हे रावबहादुरांचे उजवे हात ही परंपराही रावबहादुरांचे कन्याशाळेवरील प्रेम वृद्धिगत होण्यास कारणीभूत झाली असणे शक्य आहे. भारतीय महिला विद्यापीठाचे उद्दिष्ट हेच स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेचे कामी रावबहादुरां-चेही इष्ट असल्यामुळे व पीठास सरकारी मान्यता मिळाल्याखेरीज ते चांगले साधणारे नसल्याने त्यांनी या दिशेनेही प्रयत्न चालविले होते. त्यांची कन्या-शाळेतील स्वत:बरोबर सर्वांनाच सद्गदित करणारी प्रेमळपणाची प्रवचने ज्यांनी ऐकली असतील त्यांनाच त्यांची स्त्रीसमाज सुधारणेबद्दलच्या कळ-कळीची तीव्रता प्रतीत होईल. कन्याशाळेला द्यावयाच्या वाड्यासाठी बक्षीस-पत्र करण्याकरिता व त्यातील शब्दयोजना मनाप्रमाणे होण्याकरिता त्यांनी मुंबई कौन्सिलच्या बैठकीस जाण्याचेही एक दिवस लांबविले एवढेच नव्हे तर ता. ११-११-३५ रोजी येथील रजिस्टर कचेरीत उपस्थित झाल्यावर तेथे याकामी झालेला विलंबही त्यांच्या अधीर मनाने सहन केला. पण जेव्हा बक्षीसपत्रावर सही केली तेव्हाच त्यांनी कौन्सिल बैठकीसाठी सातारा सोडला ! इकडे सरकारात बक्षीसपत्र दाखल झाले व तिकडे अनाथ बालि-काश्रमाचा वाडा म्हणून म्युनिसिपॅलिटीत तो दाखलही झाला. योगायोग

असा की ते पुन्हा काही साताऱ्यास परत आले नाहीत. त्यांनी साताऱ्याचाच नव्हे तर जगाचाच संबंध सोडला !

## 'साताऱ्च्या तिजोरी' मधील देणगी

रावबहादुरांनी ज्या अनेक लहान मोठ्या देणग्या दिल्या त्यातच त्यांनी येथील श्री. भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेस दिलेली ११ हजार रुपयांची देणगीहि मोडते. श्री. पाटील यांनी १९१९ मध्ये ही संस्था स्थापन केली; व पुढे रावबहादुरांच्या सल्ल्यानेच तिचे रजिस्ट्रेशन होऊन त्यांच्या प्रयत्नामुळेच तिला रेकॅग्निशनही मिळाले. या संस्थेचे कार्यकारी मंडळात साताऱ्याचे बालराजे भोसले, नगराध्यक्ष रा. ब. मोतीलाल मुथा, सरदार बाबासाहेब पंडितराव, श्री. भाऊसाहेब कुदळे इ. ठळक मंडळी आहेत. व संस्थेच्या रूरल ट्रेनिंग स्कूलचे प्रिन्सिपॉल श्री. के. एस. दीक्षित, रि. डे. ए. इन्स्पेक्टर हेच संस्थेचे सेक्रेटरीही आहेत. रावबहादुरांनी मरहूम बादशहा पंचम जॉर्ज यांच्या रजतोत्सवाच्या दिवशी या संस्थेस रु. १००० रोख दिले व १० हजार रुपयांचा ट्रस्ट करून दिला, असे या संस्थेचे उद्दिष्ट तरी काय आहे असा कोणास प्रश्न पडेल. परंतु रावबहादुरांच्या दानाचे वैशिष्टयच हे आहे की त्यांनी नुसते दान कधीच कोणाला केले नाही, तर जे केले ते सत्पात्री व सत्कारणीच केले. बहुजनसमाजात साक्षरतेचा प्रसार करून थोड्या खर्चात बहुजनांना भरीव प्राथमिक व दुय्यम शिक्षण आणि धंदेशिक्षण देण्यासाठी ट्रेंड व स्वार्थत्यागी शिक्षक तयार करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. जनतेच्या शिक्षणाचा–राष्ट्रोद्धाराचा–मूलभूत प्रश्न ज्या अनेक रीतीपैकी एका रीतीने सोडविण्याची रावबहादुरांची इच्छा होती तिची पूर्ति करणारे हे उद्दिष्ट असल्यानेच त्यांचे मन तिकडे आकृष्ट झाले; व म्हणूनच त्यांनी या संस्थेस ही देणगी दिली. श्रीशाहू बोर्डिंगासाठी श्री. भाऊराव पाटलांनी जरी रावबहादुरांकडून एक पैही घेतलेली नसली तरी तिचा वचपा त्यांनी या स्ववर्णीत 'साताऱ्याच्या तिजोरी' मधून ही देणगी मिळवून भरून काढला आहे यात संशय नाही. ही देणगी रावबहादुरांना का द्यावी लागली, व श्री. पाटलांना हा उपक्रम का करावा लागला, याचे थोडक्यात पण बरे–चसे उत्तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अगर स्थानिक स्वराज्यसंस्थांतर्गत

शिक्षण संस्थांच्या कर्तव्यभ्रष्टतेतही आढळून येईल. बहुजन समाजाच्या शिक्षणाचे ध्येय या संस्थांना धडपणी गाठता येत नसल्यानेच जेथे जेथे याबाबत हयगय होत असेल तेथे तेथे या योजनेतील अल्पवेतनी पण ज्ञानी शिक्षक अशा शाळा काढणार आहेत. यामुळे सदर स्थानिक स्वराज्य संस्थांचे अगर स्था. स्व. संस्थांतर्गत शिक्षण संस्थांचे डोळे उघडले, व डोके ताळ्यावर आले तरी पुष्कळच कार्यभाग झाला असे होईल. इतकेच नव्हे तर शिक्षण कार्यातील व खात्यातील 'अव्यापारेषु व्यवहारा' सही थोडातरी पायबंद बसेल.

## पुरुषोत्तमाची दोन उपयुक्त स्मारके

रावबहादुरांच्या या देणगीचे दरसाल नुसते चारशे रुपयापर्यंत व्याजच संस्थेस मिळावयाचे असून संस्थेचा खर्च-अर्थात व्यापही-वाढत्या प्रमाणावर आहे, हे तिच्या ३००० रुपयांवरून ५००० रुपयांवर गेलेल्या बजेटावरून व तिने नुकत्याच हजार-दीड हजार रुपयास खरीदलेल्या दहा पंधरा एकर जमिनीवरून दिसून येईल. अशा प्रकारच्या संस्थांचा फिनलंड-मध्ये जो विशेष प्रसार झालेला आहे, त्या मानाने जरी या संस्थेचा अद्याप प्रसार झालेला नसला तरी तो लवकरच होईल असे तिच्या हल्लीच्या दोन शाळांवरून व लवकरच तिला मिळणाऱ्या कायमच्या सरकारी मान्यतेवरून म्हणावयास जागा आहे. खुद्द सरकारी शिक्षण खात्याच्या वरिष्ठाधिकाऱ्यांच्या मतेही अखिल मुंबई इलाख्यात अशा प्रकारची हीच एक संस्था आहे आणि अशा या अद्वितीय संस्थेचे अध्यक्षपद रावबहादुर हे हयात होते तोवर त्यांनी विभूषीत केले होते. वाचन व शिक्षण ही ज्ञानप्रसाराची दोन महत्त्वाची साधने होत. चरित्रनायकाच्या मृत्यूच्या त्रयोदशदिनी एक काळे स्मारक मोफत वाचनालय काढून सामान्य व उत्सुक जनतेला या संस्थेने यापैकी वाचन क्षेत्र उपलब्ध करून दिले; व त्यानंतर ता. ४।१०।३६ रोजी साताऱ्यास काळे स्मारक मोफत प्राथमिक शाळा काढून दुसरे शिक्षणक्षेत्रही पण संपादून दिले. रावबहादुरांची खरोखर हीच खरीखुरी स्मारके होत. आपले गुरु कै. वासी न्या. मू. रानडे, व पूज्य पुढारी कै. वासी ना. गोखले यांच्या मताप्रमाणे रयतेच्या सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न

समाधानकारक रीतीने सुटल्याशिवाय देशात खऱ्या लोकशाहीचा उदय कधीही व्हावयाचा नाही असा त्यांचा दृढ विश्वास होता. रयत शिक्षण संस्थेसाठी आपल्या मृत्युपत्रात स्वतंत्र पुरवणी घालून ट्रस्टची योजना कर–ताना त्यांनी आपला हा दृढ विश्वास खालील प्रमाणे मुद्दाम नमूद करून ठेविला आहे :–

## मृत्युपत्रात काय आहे ?

" भावी पिढीचे शिक्षण. विशेषत: खेड्यापाड्यातील जनतेचे शिक्षण चांगले झाल्याशिवाय त्यांची स्थिती चांगली सुधारणे शक्य नाही असे आम्हास अनुभवावरून वाटल्यामुळे सातारा येथे जी 'रयत शिक्षण संस्था' नावाची संस्था स्थापन झाली आहे तिच्या द्वारे कार्यक्षम शिक्षक तयार करण्याचे, व नवीन पिढीला त्यांच्याकडून शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य होण्याचा संभव आहे. म्हणून आम्ही प्रथमत: त्या संस्थेस एक हजार रुपये दिलेच आहेत. व संस्था उद्देशिलेला कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडील, व लोकोपयुक्त काम करील, तर त्या संस्थेस दरसाल काही तरी मदत करणे योग्य होईल. म्हणून त्यासाठी आमचे मिळकतीचे उत्पन्नातून ट्रस्टींनी ४०० रुपयापर्यंत खर्च करावा. मात्र तिचे व्यवस्थापक मंडळात आमचे ट्रस्टीपैकी एक प्रतिनिधी नेहमी असला पाहिजे " ( सदरील रु. ४०० चे उत्पन्न म्हणजे रावबहादुरांच्या सरकारी रोख्यात गुंतविलेल्या रकमेपैकी रु. १०,००० चे चार टक्क्याचे दराने होणारे व्याज होय ) या दृढ विश्वासामुळेच उच्च व दुय्यम शिक्षणाच्या प्रगतीबरोबरच, किंबहुना त्याहूनही अधिक त्यांना प्राथ–मिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी तळमळ लागून राहिली होती; व त्या कार्यासाठी देववेल तितकी मदत देण्यास ते सदैव तत्पर असत.

## रावबहादुरांचे सार्वजनिक मृत्युपत्र कोणते ?

आजकाल मृत्युपत्राचे अनेक प्रकार रूढ व दृढ होत आहेत. विदेशा–तील एक प्रख्यात कायदेपंडिताने आपल्या मृत्युपत्रात म्हटले होते– ' माझी १५००० पौंडांची मालमत्ता माझ्या गावच्या वेड्याच्या इस्पितळास देण्यात यावी. ज्या अशील लोकांच्या मूर्खपणामुळे मी ही एवढी संपत्ति मिळविली,

त्यांची अंशतः फेड व्हावी म्हणून मी असे करीत आहे. परंतु असले काही काळयाचे सार्वजनिक मृत्युपत्र नव्हे. कारण कोठल्याही सर्वोत्तम वकिलाला सुद्धा ज्यांच्या वकिली कलेचा आणि कौशल्याचा हेवा वाटावा त्या वकील रावबहादुरांनी अशील लोकांच्या मूर्खपणावर अलोट पैसा मिळविला असे म्हणणे, म्हणजे त्यांचा व त्यांच्या व्यवसायाचा निःसंशय अपमान करणेच आहे. एका सधन व सुविद्य अमेरिकन गृहस्थाने, आपल्या मृत्युपत्रात लिहिले होते- 'मी माझ्या मुलासाठी स्वतः मिळवून खाण्याच्या सुखाची देणगी ठेवीत आहे. तिचा त्यांनी यथेच्छ उपभोग घ्यावा.' तथापि असलेही त्यांचे मृत्युपत्र नव्हे. कारण महाराष्ट्राच्या व सातान्याच्या सुदैवाने, त्यांना प्रि. गाडगीळ यांच्यासारखे सुचरित व सुशिक्षित सधन जामात लाभले आहे. तेव्हा कुर्व-न्नपि न लिप्यते अशी त्यांची बनलेली अनासक्तिप्रधान पण समेटवृत्तिपोषक प्रवृत्ति हेच त्यांचे मृत्युपत्र ! कार्यरत असताच कालवश व्हावे, ही रानडे-सूक्ति त्यांच्या बाबतीत आजारातही जिल्हयातील सार्वजनिक कार्य, सातत्य व ऐक्यपूर्वक चालविण्यासाठी चाललेल्या विचारसृष्टीतील त्यांच्या योजना पाहता तंतोतंत खरी ठरली, हेच त्यांचे मृत्युपत्र ! देशाच्या सर्वांगीण सुधा-रणेसाठी त्यांचे अंतःकरण अत्यंत तळमळत होते, त्यासाठीच जणू त्यांनी पौष वद्य ८ शके १८५७ ला पुण्यास जामातगृही देह ठेवला हेच त्यांचे खरे मृत्युपत्र !

## दिवाणाला कार्यप्रवण करणारा सभासद

या कार्यासाठी या जिल्ह्यात प्रथमच स्थापन झालेल्या दुधगाव शिक्षण-मंडळाचे अध्यक्षपद स्वीकारून त्यांनी आपल्या एतद्विषयक कार्याची मुहूर्त-मेढ रोविली, व सातारा म्यु. मध्ये जुन्या पटेल ॲक्ट अन्वये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करून साऱ्या इलाख्याला अनुकरणीय उदाहरण घालून देण्याचे कार्यही त्यांच्याच पुढाकाराने झाले. रयत शिक्षणाच्या कार्याच्या प्रचारातच कै. वासी रा. ब. काळे व या संस्थेचे संचालक श्री. भाऊराव पाटील यांचा प्रथमतः संबंध आला, व या विचाराच्या एकवाक्यते-मुळेच ते परस्परांकडे प्रारंभी आकृष्ट झाले. श्री. भाऊराव यांनी स्वतःच

आपल्या एका भाषणात एकदा सांगितल्याप्रमाणे ते एका काळचे कट्टर सत्य-शोधक होते, पण इतर पुष्कळाप्रमाणे ते नामधारी, स्वार्थसाधु अगर द्वेषप्रेरित सत्यशोधक नव्हते तर विधायक लोककार्याचे खरे पुरस्कर्ते होते. म्हणूनच त्यांचे व कै. वासी रा. ब. काळे याचे सहमत व सहकार्य होऊ शकले, इतके की मॉंटफर्ड सुधारणातील पहिल्या निवडणुकीनंतर प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न जेव्हा कौन्सिलपुढे आला तेव्हा चंदावरकर कमिटीपुढे साक्ष देण्यापासून तो प्राथमिक शिक्षणाचा कायदा व त्याखालील नियम तयार होईपर्यंतच्या सर्व घडाघोडीत कै. वासी रा. ब. काळे यांनी जो महत्त्वाचा भाग घेतला, व डॉ. परांजप्यांना कार्यप्रवण करणारा सभासद म्हणून जे सर्टिफिकेट मिळवले, त्या सर्वात श्री. भाऊराव पाटील यांची त्यांना महत्त्वाची मदत झाली. त्यावेळी या कार्यासाठी एका जिल्ह्यात ३०० हून अधिक जाहीर सभा भरविणारा सातारा जिल्हा हा एकच एक जिल्हा होता; व ते कार्य श्री. भाऊराव पाटील यांनी इतक्या उत्साहाने केले की शिक्षणमंत्री डॉ. परांजप्ये यांनी त्यावेळी रा. ब. काळे यास मुद्दाम कळवून श्री. भाऊरावांची भेट घेतली होती, व त्यांचे कौतुक केले होते. याच्या उलट या कार्याबद्दल रा. ब. काळे यांनी आपल्या तडफेचा आणि वजनाचा जो उपयोग केला त्याच्यामुळेच आपण रावबहादुरांचे निस्सीम भक्त बनलो ही गोष्ट श्री. भाऊरावही अद्याप मोठ्या अभिमानाने सांगतात.

## चरित्रनायकाने केलेले आदर्श पितृस्मारक

रा. ब. काळे यांनी येथील प्रसिद्ध आयुर्वेद प्रसारक मंडळीचे सदस्य या नात्याने संस्थेची मोठीच कामगिरी केली आहे. सन १९१३ साली ही संस्था स्थापन झाली, व सन १९१६ साली ती रीतसर रजिस्टर करण्यात आली. हिच्या उत्पादकात जरी रावबहादुरांचा समावेश झाला नव्हता तरी सन १९१८ सालापासून ते संस्थेच्या नियामक मंडळात उपाध्यक्ष म्हणून होते. सन १९२० सालापर्यंत ते सरकारी वकील असल्यामुळे सल्लामसलत देण्याखेरीज ते कोणत्याच सार्वजनिक संस्थेत फारसा भाग घेत नसत. सन १९२१ ते १९२४ या सालात आयुर्वेद वैद्यक विद्यालयात अंतस्थ कलह होऊन साताऱ्यात वैद्यक शिक्षण देणाऱ्या

दोन संस्था अस्तित्वात आल्या होत्या. पण सन १९२५ मध्ये आर्यांग्ल वैद्यक विद्यालय व नूतन वैद्यक विद्यालय या संस्था फिरून एकत्र झाल्या या एकीकरणाचे श्रेय जरी प्रामुख्याने श्री. श्री. वि. तथा तात्यासाहेब जोशी (जिल्हा लोकल बोर्डाचे प्रसिद्ध अध्यक्ष) यांनाच आहे तरी या ऐक्याच्या कामी रावबहादुरांनी स्वतः बरीच खटपट केली, व या संस्थेत ते तेव्हापासून अधिकाधिक लक्ष घालू लागले. ऐक्यानंतरच्या पहिल्या नियामक मंडळात रावबहादुर काळे उपाध्यक्ष म्हणून निवडले गेले. सन १९२६च्या जुलै महिन्यात, म्हणजे ऐक्य झाल्यानंतर एकच वर्षाने, रावबहादुरांनी आपल्या वडिलांच्या नांवाने मोफत आयुर्वेदीय दवाखाना चालविण्याकरिता ३॥ टक्के व्याजाच्या रु. ५००० किंमतीच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा संस्थेला दिल्या, व ही व्यवस्था कायमची व्हावी याकरिता एक ट्रस्ट निर्माण करून "The Ramchandra Ballal Kale Memorial Charitable Ayurvedic Dispensary Fund" हे नांव त्या ट्रस्टला दिले व ट्रस्टची व्यवस्था Treasurer, Charitable Endowments, Bombay यांच्याकडे दिली. या उदार देणगीमुळे आयुर्वेद प्रसारक मंडळाला आज एक मोफत आयुर्वेदीय दवाखाना चालविता येत आहे. साताऱ्याच्या नगराध्यक्षपदावर विराजित झाल्यानंतर त्यांनी या दवाखान्याची ग्रँट असल्या आयुर्वेदीय दवाखान्यांची उपयुक्तता सभासदांस पटवून देऊन वाढवून दिली. आयुर्वेद या आपल्या जुन्या शास्त्राचे योग्य प्रकारे संशोधन होऊन आयुर्वेद चिकित्सेला महत्त्व प्राप्त करून देण्याकरिता ते शक्य ती खटपट करीत.

## आयुर्वेदावरील निस्सीम प्रेमाची फळे

या दवाखान्यात आयुर्वेदीय चिकित्साच व्हावी हा या देणगीचा प्रधान हेतु असून गरीबांना मोफत औषधोपचार व्हावा असा दुय्यम हेतु आहे. शिवाय योग्य संधी आल्यास आयुर्वेदीय चिकित्सा पद्धतीचे रुग्णालय सुरू करून देण्याचा रावबहादुरांचा विचार होता. सन १९२३ सालापासून आर्यांग्ल वैद्यक विद्यालयास जोडून एक शवच्छेदनगृह काढावे असे चालकांनी ठरविले, व त्याकरिता रीतसर परवानगी मागण्यात आली. १९२६ साली सरकारी परवानगी नाकारण्यात आल्यामुळे संस्थेला काही काळ ही योजना

बंद ठेवावी लागली होती. दरम्यानच्या काळात कौन्सिलात रावबहादूर काळे व श्री. भाऊसाहेब सोमण यांनी ह्या परवानगीबद्दल पुष्कळच खटपट केली होती. सन १९२६ जूनमध्ये रावबहादुर संस्थेचे अध्यक्ष झाले. ता. १२-१०-२७ रोजी रावबहादुरांच्याच खटपटीने त्यावेळचे शिक्षणमंत्री नामदार हरिलाल देसाई हे या संस्थेस भेट देण्यास आले होते. व त्यावेळी शवच्छेदनाची उपयुक्तता व संस्थेचे लोकोपयोगी कार्य रावबहादुरांनी नामदार साहेबांना पटवून देऊन पुनरपी शवच्छेदनाची परवानगी मिळविण्याची खटपट सुरू केली. व ती लगेच संस्थेला मिळालीही. सन १९३१ सालापासून हा विभाग सुव्यवस्थित सुरू झाला आहे. ता. १-११-१९२७ रोजी साताऱ्यात पहिलेच महाराष्ट्रीय वैद्यक शिक्षक संमेलन भरविण्याचे कामी त्यांनी सद्रव्य व सक्रिय पुढाकार घेतला. आर्यवैद्यकाच्या अभ्यासक्रमात व परीक्षात एकवाक्यता आणण्याचे प्रयत्नास त्यांनी शक्य ती मदत केली. अभ्यासक्रमात जरी एकवाक्यता आली आहे तरी परीक्षा एकत्र होणे अजून शक्य झालेले नाही. रावबहादुरांची ती एक इच्छा अपुरीच राहून गेली आहे. सन १९२६ पासून ते आ. प्र. मंडळाचे जे अध्यक्ष झाले ते अंतकालपर्यंत अध्यक्ष होते. आपल्या स्वतःच्या घरात ते आयुर्वेदीय चिकित्सेलाच प्राधान्य देत असत. अलीकडे ते आयुर्वेदास सरकारी मान्यता मिळविण्याची खटपट करीत होते; व त्याकरिता संस्थेला रुग्णालय, प्रयोगसाधने इत्यादींची जोड करून देण्याचाही त्यांचा विचार होता.

## 'संस्थेच्या इमारतीचे काय झाले?'

आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या व्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही सामान्य प्रश्नात देखील ते जातीने लक्ष घालीत असत. वसतिगृह काढण्याकरिता घर गहाण घेण्याचे कामात केवळ उपयुक्त काम म्हणूनच त्यांनी पुढाकार घेतला. संस्थेला कायमची इमारत व्हावी ही गोष्ट त्यांच्या सारखी ध्यानी मनी असे. शेवटच्या आजारात संस्थेचे सेक्रेटरी या नात्याने डॉ. भाऊराव आगाशे त्यांच्या समाचारास गेले असताना त्यांनी "संस्थेच्या कायमच्या इमारतीसंबंधाने काय झाले?" हाच त्यांना पहिला प्रश्न केला. अंतकाळच्या वेदना होत असताही त्यांची सार्वजनिक कार्यावरची दृष्टी जागती होती.

रावबहादुर हे जरी स्वभावाने तापट होते, व कार्यातील ढिलाई त्यांना सहन होत नसे, तरी कार्यकर्त्यांचे चीज त्यांच्या जवळच असे. चुकीची माफी करून चुका सुधारण्यास मदत करणारा व चांगल्या कामाबद्दल कौतुक करून पितृवात्सल्यपूर्ण शाबासकीचा हात पाठीवरून फिरवणारा संस्थेचा एक आधार म्हणजे रावबहादुर होत. त्यांच्या देखरेखीखाली सार्वजनिक काम करणे जितके जितके भीतिप्रद तितकेच बोधप्रदही असे, ही गोष्ट कोणाही काम करणाऱ्याच्या नजरेस येत असे. आयुर्वेद प्रसारक मंडळी ही संस्था वयाने जरी सज्ञान आहे तरी पसाऱ्याने अजून लहानच आहे. अशा संधिकाळात रावबहादुरांसारखा नेता हरपावा हे संस्थेचे दुर्दैव होय. रावबहादुरांच्या मृत्यूमुळे संस्थेचे छत्र कसे नाहीसे झाले आहे, व ती एखाद्या पोरक्या अर्भकाप्रमाणे असहाय्य कशी झाली आहे याची जाणीव संस्था चालविणाऱ्या डॉ. मो. ना. आगाशे प्रभृती खेरीज इतरांना क्वचितच येईल.

## वेस्टर्न इंडिया कंपनीच्या जागेसाठी केलेली खटपट

कै. वा. काकड्यांच्या वाड्यात येथे स्थापन झालेली वेस्टर्न इं. ला. इ. कंपनी ही संस्था श्री. राजेसाहेब फलटणकरांच्या भव्य व इतिहासप्रसिद्ध वाड्यात येण्यास केवळ रावबहादुरांचेच परिश्रम सर्वस्वी कारणीभूत झालेले आहेत. शिवकालीन बाळाजी आवजीच्या वंशजांचा हा वाडा आज ज्या कार्यासाठी उपयोगात येत आहे, व ज्यांनी तो या उपयोगासाठी प्रस्तुत संस्थेला प्राप्त करून दिला आहे, त्या कार्याबद्दल व त्या व्यक्तीबद्दल कोणीही निःसंशय आनंद व आदरच व्यक्त करील. १९१८ मध्ये म्हणजे जेव्हा कंपनीस स्वतःच्या मालकीच्या मोठ्या इमारतीची जरूर भासू लागली तेव्हा तिने रा. ब. रा. रा. काळे यांचेकरवी श्रीमंत फलटणकरांकडे वाड्याची मागणी केली. कारण श्री. रांगोळे यांच्या घराण्यात अर्धशतक चालत आलेल्या या वाड्यावर तत्काली सुमारे १० वर्षे श्रीमंत फ़लटणकरांची मालकी होती. रावबहादुरांची व राजेसाहेबांची भेट व चर्चा होऊन आपण कमीत कमी १८००० हजार रुपयास हा वाडा कंपनीस देण्यास तयार आहो असे श्रीमंतांनी उत्तर दिले. निघून पुरे अर्धे तपही न झालेल्या या कंपनीला इतक्या

जबर किमतीस त्यावेळी तरी तो घेता येणे अर्थातच शक्य नसल्याने कंपनीने आपल्यास ही किमत परवडत नाही असे कळविले.

## सहा हजार रुपयांची अप्रत्यक्ष मदत

या नंतर रावबहादुरांनी राजेसाहेबांची पुनः गाठ घेतली, व हा व्यवहार खरेदी विक्रीच्या व्यापारी स्वरूपाचा न समजता स्वकीयांनी चालविलेल्या सार्वजनिक हिताच्या संस्थेस सहाय्य करण्याच्या दृष्टीने त्याकडे पहावे, व म्हणून या बाबतीत अधिक सवलत देऊन संस्थानने हे श्रेय व यश मिळवावे, अशी त्यांना व संस्थानचे कारभारी श्री. एल. के. फणसळकर यांना त्यांनी शेवटची कळकळीने विनंती केली व सूज्ञ आणि समयज्ञ श्रीमंतांवर तिचा परिणाम होऊन अखेर त्यांनी हा वाडा संस्थेस आणखी ६ हजार रुपये कमी करून १२ हजार रुपयास विकत देऊन टाकला. म्हणजे त्यांनी एक प्रकारे संस्थेस ६ हजार रुपयांची देणगीच दिली, व ती रा. ब. काळे यांनीच स्वप्रयत्नाने देवविली असे लिहावयास काहीच हरकत नाही. सिंध-हैद्राबाद या भागात मागे जलप्रलयाने जनतेचे किती नुकसान झाले हे अजमावण्यासाठी मुंबई कौन्सिलने जी कमिटी नेमली होती तिचे तेही एक प्रमुख सदस्य होते, व ते काम करीत असताना त्यांनी कंपनीच्या हैद्राबाद शाखेचे उद्घाटन करून कंपनीची त्या भागात प्रसिद्धी होण्यास पूर्णपणे मदत केली. मध्यंतरी जरी संस्थेतील अधिकारारुढ मंडळींशी चरित्र नायकादि मंडळींचे संस्थेच्या सुधारणेसंबंधाने काही मूलभूत प्रश्नाबद्दल महत्त्वाचे वादविवाद झाले तरी त्यांचे संस्थेवरील प्रेम तिळभरही कमी झाले नाही. सदर संस्थेत चरित्रनायकाच्या पश्चात अलीकडे घडून आलेल्या काही सुधारणाच रावबहादुरांच्या तत्कालीन वादाचे मुद्दे बरोबर होते हे सिद्ध करण्यास पुरेशा आहेत. यापेक्षा या प्रश्नात अधिक खोल शिरण्याचे हे स्थळ, वेळ व काळ नव्हे.

## सेवासदनाला दिलेले स्वसदन

सेवासदन ही संस्था १९१९ साली कै. गो. कृ. उर्फ बाबासाहेब देवधर यांच्यामार्फत येथे लेडी ठाकरसी यांचे नांवे दरसाल ५०० रु.

देणगीचे आश्वासन मिळवून काढण्यात आली. तिचा उद्देश अनाथ व मध्यम वर्गातील स्त्रियांना स्वावलंबी व अविवाहित मुलींना सुगृहिणी करिता येईल असे विविध उपयुक्त शिक्षण देणे हा असून प्रथम काही दिवस ही संस्था कै. रा. ब. पाठक यांच्या पत्नी कै. वा. श्री. रखमाबाई पाठक व त्यांच्या स्नुषा सौ. यमुनाबाई पाठक यांनी एका व्यवस्थापक मंडळाच्या सल्ल्याने चालविली होती, पण पुढे काही कारणाने संस्थेचा कारभार पाहणे त्यांना अशक्य झाल्याने रावबहादुर व कै. सौ. वहिनीसाहेब यांनी व्यवस्थापक मंडळातील सदस्यत्व कायम ठेवून सदनाची सूत्रे आपल्याकडे घेतली, व नवे कार्यकारी मंडळ बनवून आपल्या मंगळवारातील घरात त्याची व्यवस्था केली. तेव्हापासून या सदनाचा सुमारे ५०० स्त्रियांनी व मुलींनी फायदा घेतला आहे.

### उच्च शैक्षणिक संस्थांतील कार्य

विद्यापीठाच्या नव्या घटनेनुसार सन १९२९ साली रा. ब. काळे हे विद्यापीठाचे फेलो (सभासद) निवडून आले, आणि तेव्हापासून अखेरपर्यंत त्यांनी आपले सभासदत्व कायम टिकविले. अखेरपर्यंत ते विद्यापीठाच्या लॉ फॅकल्टीच्या अभ्यासक्रमबोर्डाचे सभासद होते. ते विद्यापीठाचे फेलो या नात्याने विद्यापीठाच्या कारभारात फार बारकाईने लक्ष घालीत असत. आणि सिनेटच्या बैठकीतील चर्चेतही भाग घेत असत. डेक्कन कॉलेजची इमारत शिक्षणकार्यार्थ विद्यापीठाला संपादन करून देण्याच्या कामी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते व दाव्यातून विद्यापीठाने अंग काढून घेईपर्यंत त्यांनी पुण्याच्या कोर्टात विद्यापीठातर्फे ऑनररी कामही केले होते.

### वुईलिंग्डन कॉलेजला केलेले सहाय्य

ते डे. ए. सोसायटीचे एक थोर व उत्साही हितचिंतक होते. सन १९२५ साली ते या सोसायटीचे पेट्रन झाले; व सन १९२० नंतर ते संस्थेच्या कौन्सिलचे सभासदही होते. त्यांनी डे. ए. सो. च्या प्रत्येक संस्थेला या ना त्या रीतीने सहाय्य केले आहे. सांगलीच्या वुईलिंग्डन कॉलेजला त्यांनी दिलेली १००० रुपयांची देणगी हीही या गोष्टीची साक्ष देऊ शकेल.

## मसुराश्रमासाठी सहा हजार रुपयांचा आश्वासित चेक !

कौन्सिलमध्ये त्यांच्या सूचनेचा सरकारला नेहमीच सहानुभूतिपूर्वक विचार करावा लागे. याचे प्रत्यंतर सातारा जिल्ह्यातील श्री. विनायकबुवा मसूरकर यांच्यावर ओढवलेल्या प्रसंगी त्यांची सरकारने जप्त केलेली सर्व मालमत्ता परत मिळवून देण्यासाठी काळ्यांनी जे प्रयत्न केले, त्यात आपणास पहावयास मिळते. ' केवळ रा. ब. काळे यांच्यासारखा पुढारी मसूरकरांतर्फे मध्यस्थी करण्यास पुढे सरसावला, म्हणूनच त्याजवरील जप्ती उठविण्यात आली, " असे एका प्रमुख अधिकाऱ्याने त्यावेळी एका जबाबदार गृहस्थास सांगितले होते व खुद्द श्री. मसूरकर महाराज व त्यांचा आश्रम हेही याचे श्रेय बव्हंशांनी चरित्रनायकासच देतात. सातारा येथील मिलिटरी लोकांच्या बराकी सरकारने विकावयास काढल्या तेव्हा कै. दादासाहेब करंदीकर, कै. रा. ब. काळे, श्री. भाऊसाहेब सोमण वगैरे मंडळींनी मसूरच्या आश्रमाला या बराकी मिळाव्यात म्हणून किती तरी मेहनत घेतली व ४०,००० रुपये एका दिवसात मिळविण्याची आश्वासनेही लोकांकडून घेतली. यावेळची लिहिण्यासारखी गोष्ट म्हणजे बराकी मिळाल्या तर जवळ जवळ देणगीदाखल ६,००० रुपयांचा चेक फाडण्याचे आश्वासन रावबहादुरांनी त्याच क्षणी दिले होते ही होय.

## तीन संशोधन मंडळांसाठी केलेले परिश्रम

पुण्याचे रानडे अर्थशास्त्र संशोधन मंडळ, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ व गोखले अर्थशास्त्र आणि राजकारण संशोधन मंडळ या तिन्ही सुप्रसिद्ध संस्थांना व त्यांच्या मुख्य कार्यकर्त्यांना ( मुंबई विश्वविद्यालयाचे प्रोफेसर म्हणून ) मुंबई विश्वविद्यालयाची मान्यता मिळवून देण्याचे बहुतेक श्रेयही रावबहादुरांनाच आहे. केवळ या एका मान्यतेमुळेही त्या त्या संस्थांचे काम कितीतरी सुकर, एवढेच नव्हे तर प्रगतिपरही झाले आहे.

## शौर्यवान व विद्वान्, आणि वक्ता व दाता

' शतेषु जायते शूरः, सहस्रेषुच पंडितः, वक्ता दशसहस्रेषु, दाता भवति वा न वा ' म्हणजे शंभरांत एखादा शूर, हजारात एखादा पंडित,

व दहा हजारात एखादा वक्ताही सापडेल परंतु दाता मात्र त्या शंभरातच काय, हजारातच काय व दहा हजारातच काय, पण त्यापुढच्याही अपरिमित संख्येत तरी प्राप्त होईल की नाही याची शंकाच आहे, असे एका सुभाषितकाराने म्हणून ठेविले आहे. टॉलस्टॉयच्या एका सुप्रसिद्ध उद्‌बोधक गोष्टीच्या आधारे पाहिले तर मनुष्याला खरोखर जास्तीत जास्त ६ फूट लांब व ३ फूट रुंद इतकीच काय ती अखेर ( अर्थात मृत्यूनंतर ) जागा लागते. आपण ज्या शरीराचे जन्मभर चोचले केले ते शरीर देखील आपल्याबरोबर येत नाही, मग पुत्रादि आप्त परिवार आणि मित्रादि इष्ट परिवार येण्याचे तर दूरच राहिले ! हे सर्व ठाऊक असूनही दर एक मनुष्याचे योग्यायोग्य मार्गे चाललेले संपत्संपादनाचे अविरत व नानाविध परिश्रम पाहिले म्हणजे या सुभाषिताच्या सत्यतेची शेकडा शंभरच नव्हे तर शेकडा १०१ टक्के प्रचीति येते. पण त्यालाही रावबहादुरांसारखा अपवाद असतोच. आज हा सुभाषितकार विद्यमान असता तर शंभर, हजार अगर दहा हजार लोकात शूर, पंडित व वक्ता तर त्यास सापडलाच असता परंतु साताऱ्याच्या अवघ्या २५ हजार लोकातच रावबहादुरांसारख्या नुसत्या या बाकीच्या तिन्ही गुणांनी अलंकृत असलेलाच नव्हे तर दातृत्वानेही युक्त असा गृहस्थ निघालेला पाहून त्याला खचित धन्यता वाटली असती.

## देशसेवेची कसोटी एकच आहे काय ?

रावबहादुरांच्या शोचनीय निधनानंतर त्यांचे अनेकांनी अनेक प्रकारे वर्णन केले. कोणी त्यांचा रागीट स्वभाव पाहून त्यांना साताऱ्याचे फिरोजशहा मेथा म्हटले, कोणी त्यांचे अपूर्व दातृत्व बघून त्यांना साताऱ्याचे कर्ण व पं. मोतीलाल नेहरू हे अभिधान दिले, कोणी त्यांची धर्मपर प्रवृत्ति व सर्वांगीण समाजसुधारणेचा हव्यास पाहून त्यांना साताऱ्याचे रानडे व गो. कृ. देवधर म्हणून संबोधले, कोणी त्यांची अभ्यासू वृत्ति व सडेतोडपणा पाहून त्यांना साताऱ्याचे गोखले म्हणून उल्लेखिले, कोणी त्यांना साताऱ्याचा कोहिनूर तर कोणी साताऱ्याचा तारा ठरविले, कोणी त्यांना साताऱ्याचा हिरा तर कोणी साताऱ्याचे रत्न म्हणून नाव दिले तर कोणी त्यांना जिल्ह्याचे अद्वितीय

पुढारी म्हटले. या प्रत्येकाच्या विधानात व निदानात अल्पांशाने का होईना पण सत्यांश आहे हे त्यांचे चरित्र व चारित्र्य ज्ञात असणारास सहज कळून येईल. जिल्हा आणि प्रांतपुढाऱ्याच्या वाट्याला असे भाग्य क्वचितच येते. जिल्ह्याची अशुद्ध व प्रवाहकुंठित झालेली सार्वजनिक जीवनगंगा विशुद्ध व प्रवाही ठेवण्यासाठी चरित्रनायकाने जितके अविश्रांत परिश्रम घेतले आहेत तितके या जिल्ह्यात अन्य कोणीही घेतलेले नाहीत. त्यांच्यापासून ज्या अनेक गोष्टी घ्यावयाच्या त्यापैकी परमतसहिष्णुता ही महत्त्वाची गोष्ट होय. देश-भक्तातला कीटक तेवढा मी, बाकीचे झाडून सारे देशद्रोही कंटक ही नीच प्रतीची, फक्त पुरुषाधमालाच शोभणारी अहमन्यतेची भाषा त्यांना कधीच मंजूर नव्हती. मीच काय तो खरा आणि इतर सारे खोटे हे म्हणणे जितके निंद्य व निषेध्य तितकेच हेही होय असे त्यांचे ठाम मत होते. ज्याला ज्याची आवड आहे आणि जे करण्याला ज्याला सवड आहे ते त्याला करू द्या असा त्यांचा सार्वजनिक जीवनातला दंडक होता. समर्थांच्या केवळ वाक्पाटवापेक्षा असमर्थाच्या यःकश्चित् सुकृतीचेही कौतुक करण्यास ते सदैव तयार व तत्पर असत. कारावास हीच देशसेवेची एकमेव कसोटी मानली तर पूर्वीच्याच काय पण खुद्द आजच्याही कित्येक नामवंत देशभक्तांना त्यांच्या सिंहासना-वरून तावडतोब खाली खेचावे लागेल अशी वस्तुस्थिति आहे. आणि जे फासावर लटकतात त्यांच्या दृष्टीने या कारावासी लोकांना तरी काय किंमत आहे ? या पंथातले लोक या सांप्रदायाला तर उघड तृणवत् लेखतात! जगातल्या असल्या पहिल्या प्रतीच्या अज्ञतेला रावबहादुरांनी कधीच जागा दिली नाही. कारावासाइतक्याच उपहास-विपर्यास याही देशसेवेच्या महत्त्वाच्या कसोट्या आहेत आणि त्यापैकी सरकारपक्षीयत्वासारख्या नीच व भयंकर आरोपातूनही चरित्रनायक सहीसलामत बाहेर पडलेला आहे हे पूर्वीच्या अनेक प्रकरणातून वाचकांना स्पष्ट आढळून येईल.

### पुरुषोत्तमाचे सूर्यत्व व व्यक्तित्व

जिल्ह्याला त्यांनी स्वतःबरोबरच आणलेले वैभव, महत्त्व, वजन, दरारा व मान केवळ त्यांच्या अंगच्या गुणांमुळे नाही; व त्यांचे 'सूर्यत्व' ही त्यात नाही. त्याचे उगमस्थान त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे; ते त्यांच्या

चारित्र्यात आहे. या गृहस्थाच्या सद्सद्विवेक बुद्धीला-सर्वत्र, समत्व पाहण्याच्या वृत्तीला जे पटेल त्याचा तो कोणत्याही परिस्थितीत निर्भयपणे, चिकाटीने व कसल्याही अडचणींना न जुमानता पुरस्कार करील, पिच्छा पुरवील व त्याची हरप्रयत्नाने तड लावल्याशिवाय सोडणार नाही; याच्या उलट जे त्याला प्रामाणिकपणे असत्य व व्यक्तिनिष्ठाप्रेरित वाटेल त्याचे तो तितक्याच निर्भयपणे, चिकाटीने व हरप्रयत्नाने निर्दलनही केल्या-वाचून रहावयाचा नाही, असा त्यांचेविषयी प्रत्येकास भरंवसा वाटत असे. रा. ब. काळे यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या या वृत्तीतच साठविलेले आहे; व त्यांचे 'सूर्यत्व' ही तिच्यातच आहे. या वृत्तीला जर त्यांनी महत्त्वाकांक्षेची थोडीतरी गवसणी घालून किंचित् मुरड देण्याचे मनात आणिले असते तर एकदाच नव्हे तर दोनदा त्यांच्या हाताशी आलेला दिवाणगिरीचा मोका ते कधीच गमावते ना; व कदाचित् गुणबलाने व दैवयोगाने सरकारी कृपेतील त्याहीपेक्षा वरिष्ठ जागेचा मान त्यांनी हल्लीच्या आधीच या जिल्ह्याला कमावून आणिला असता. रावबहादुरांचे दुसरे व्यक्तिमत्व म्हणजे त्यांना जी शिकवण पटली, ती त्यांनी अंगी बाणवली; व कितीही संकटपरंपरा अगर सन्मानपरंपरा कोसळली व आली तरी अखेरपर्यंत अव्याहत आचरणात ठेविली हे होय. त्यांच्या कर्तृत्वाला जे तेज होते व ज्या कर्तृत्वामुळे त्यांनी या जिल्ह्यालाही तेज व चारित्र्य प्राप्त करून दिले होते, त्याला कारण त्यांचे हेही एक व्यक्तिमत्व होते यात बिलकुल संशय नाही.

## चरित्रनायकाचे मनूच्या भाषेतील अतिदान

या देशातील कित्येक सच्चे देशभक्त असे आहेत की ते देशासाठी एकदा सोडून अनेकदा कारावास पत्करतील पण त्यासाठी सधनता उतू चालली असताही व ती पूर्वार्जित असताही कडोसरीची दिडकी देण्याचेही त्यांच्या जिवावर येईल, त्यात त्यांना कारावासापेक्षाही अधिक कष्ट होतात. असल्या देशभक्ताच्या दृष्टीने काळ्यांच्या दातृत्वाकडे पाहिले तर ते सवाई देशभक्त ठरतील. त्यांनी मुठीनेच नव्हे तर पाटीने जो पैसा दिला तोही असा तसा किंवा पूर्वार्जित नव्हे तर दारिद्र्याच्या गर्तेतून वर येत असता स्वतःच्या निढळाच्या घामाने, प्रामाणिकपणाने व अपूर्व बौद्धिक कौशल्याने मिळविलेला

दिला, अर्थात् त्याचे महत्त्व निरतिशयच होय. दिला तोही अशातशासाठी– आज उगवून उद्या स्मृतिनष्ट होणाऱ्या पावसाळी सहस्र कामासाठी–नव्हे तर, जे कार्य स्वराज्यातही चालणार आहे किंबहुना तेव्हा तर त्याची जास्तच जरूर आहे अशा गोखले संस्थेसारख्या हिंदुस्थानातील अद्वितीय संस्थेच्या संशोधनादि सत्कार्यासाठी दिला. म्हणूनच त्यांच्या दानाला मनूने कलियुगा–साठी वर्णिलेल्या अतिदानाचीच एक उपमा शोभते व कित्येकांनी त्यांना ती दिलीही आहे. श्री. भाऊराव पाटील जेव्हा जेव्हा अडचणीत असत तेव्हा तेव्हा त्यांनी त्यांस सांगावे की, 'तुह्मी मला मध्यरात्री हांक मारा, मी तुमच्या संस्थेच्या मदतीस तयार आहे' आणि एकदा तर असे म्हणूनच ते थांबले नाहीत, तर त्यांनी त्यांचेपुढे खरोखरच १००० रुपयेही ठेवले ! स्थितप्रज्ञ कोणास म्हणावे असे अर्जुनाने श्रीकृष्णास विचारले असता श्रीकृष्णाने स्थित–प्रज्ञाचे वर्णन करण्यासाठी गीतेचा एक अध्याय खर्चिला, पण विसाव्या शत–कातील स्थितप्रज्ञांचे वर्णन करावयास बसले तर रावबहादुरांसारख्या वसु–धैव कुटुंबकम् वृत्तीच्या लोकसेवकाकडे–विसाव्या शतकातल्या या खऱ्या संन्याशाकडे बोट दाखविले म्हणजे सहज भागणारे आहे. सत्य हाच त्यांचा धर्म असे व सत्य अनेक प्रसंगी अप्रिय असले तरी त्यांना ते सर्व प्रसंगी प्रिय असे. केवळ वर्णात गोरा म्हणून वर्तनात तोरा मिरविणाऱ्या अनेक गोऱ्या आणि बड्या अधिकाऱ्यांना ते नमवू शकले व आपले हक्क बजावून घेऊन आपली स्वातंत्र्यवृत्ति राखूच नव्हे तर दाखवूही शकले याचे कारण त्यांचे हे सत्यवादित्वच व तत्वप्रियत्वच होय.

## समाजाची मानस–पुत्राच्या ठायी स्थापना

राजसेवक हा प्रजासेवक कधीच होऊ शकणार नाही ही गैरसमजूतही त्यांनी आपल्या आदर्श व खुद्द कट्टया काँग्रेसभक्ताच्या भाषेत क्रांतिकारक उदाहरणाने नाहीशी केली. प्रयत्न न करता चालून आलेली पब्लिक प्रॉसि–क्यूटरची जागा पत्करून त्यांनी जशी सरकारची चांगली वकिली केली तशीच वयाच्या पन्नाशीनंतर त्यांनी स्वखुषीने ही जागा सोडून, जिल्ह्या–तील जनतेच्या विचारांचे प्रवर्तकत्व घेऊन व जनता ही देवता कल्पून तिचीही त्यापेक्षाही अधिक चांगली वकिली केली. जवाहरवरील प्रेमामुळे,

मोतीलाल राष्ट्रसेवेकडे वळले तद्वत् धनंजयावरील–जामातावरील–लोभामुळे रावजी हे देशसेवेकडे वळले असोत वा स्वयंस्फूर्तीने वळलेले असोत पण एवढे मात्र खरे की पुत्रवियोगानंतर त्यांनी तत्वप्रेमामुळे दत्तक घेतला नाही तर साऱ्या समाजासच मानसपुत्र कल्पिले व त्याचे हितार्थ तनमनधन वेचिले. " लोकांना जर मी पाहिजे आहे आणि त्यांचा माझ्यावर विश्वासही आहे तर माझ्या हातून होईल ती व तितकी त्यांची सेवा करणे हे माझे कर्तव्यच आहे " या त्यांच्या भावनेत व आचारात त्यांचे जीवनवैशिष्ट्य आहे. रागाच्या भरात आपण जे बोललो ते अयोग्य होते व त्या बोलण्याने आपण दुसऱ्यास अकारण दुःख दिले अशी त्यांची खात्री पटताच ते तितक्याच त्वरेने पश्चात्तापदग्ध होत व क्षमायाचना करीत व हा गुण त्यांनी आपल्या कै. पाठक मास्तरापासून उचलला होता. रानडे म्हणताच काळ्यांच्या डोळ्यात जसे चटकन् पाणी येई तद्वत् काळे म्हणताच नेत्रद्वयात अश्रुबिंदू उभे राहणारे व अशा थोर पुरुषोत्तमाबद्दल मला जन्मभर अभिमान वाटेल असे म्हणणारे अनेक भाग्यशाली लोक त्यांनीही आपल्या कर्तबगारीने उत्पन्न करून ठेवले आहेत. सारांश संकुचित विद्यार्थीदशेत जसे ते फर्स्टक्लास फर्स्ट येत तसेच नंतरच्या विस्तृत विद्यार्थीदशेतही ते फर्स्टक्लास फर्स्ट असत. त्यांना आणखी काही काळ आयुष्य लाभते तर अ. भा. प्रा. परिष–देच्या स्वागताध्यक्षपदाप्रमाणे तिच्या अध्यक्षपदाचा बहुमानही त्यांना खचित लाभला असता इतकी त्यांनी प्रागतिक महाराष्ट्राचे प्रांतिक पुढारी म्हणून (अ. भा. प्रा. परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद वगैरे अनेक नात्यांनी) थोर कामगिरी करून ठेवलेली आहे व साताऱ्याचे नाव नुसते अखिल महा–राष्ट्रीयच नव्हे तर अखिल भारतीयही करून ठेवले आहे.

## काळे हे स्वभावाने कठोर की कोमल ?

रा. ब. काळे यांचा स्वभाव जात्या तापट खरा ! त्यातून त्याना असत्याचा, अधर्माचा व बेशिस्तीचा मनस्वी तिटकारा; तशात कोणतीही गोष्ट सिद्ध करण्याच्या तऱ्हापैकी क्रमविरुद्ध पद्धतीची तऱ्हा त्यांना अधिक प्रिय, म्हणजे स्वमत हे त्याविरुद्ध मताच्या दोषाविष्काराने बरोबर ठरवण्याच्या कल अधिक आवडता; यामुळे त्यांच्याकडे गेलेला मनुष्य

त्यांच्यापासून काही तरी सत्य लपवीत आहे किंवा लटपटपंची लढवीत आहे असे त्याना वाटले की ते चटकन चिडत व त्याच्यावर तुटून पडत. यामुळे त्यांचेकडे जाण्यास सहसा कोणी धजत नसत, कित्येकांनी त्यांना कठोर व चढेल असेही ठरवून टाकले होते आणि काहीनी तर त्यांचे पदरी अव्याव- हारिकपणाही बांधला होता ! त्यांच्या स्वभावाची व आवडीनावडीची वरील प्रकारची ठेवण लक्षात घेतल्यास त्यांच्या संतापाचे मूळ सात्विक भावनेच्या मिळणाऱ्या धक्क्यात होते असे दिसून येईल. तसेच असल्या कार्यसाधु व्यवहार कुशलतेचा त्यांना मनस्वी तिटकारा होता व तो तापट वृत्तीमुळे कठोर शब्दांनी न आवरला जाता व्यक्त होत असे असेही दिसून येईल. एरव्ही कोणीही आपले काम किंवा दुःख सरळपणाने त्यांपुढे मांडल्यास त्यांचे अंतःकरण द्रवत असे व त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रूधारा वहात असत आणि त्यांचे कळकळीचे सहाय्यकर्ते होत, हा अनुभव अनेकांनी घेतला असेल यावरून असत्याच्या व बेशिस्तांच्या बाबतीत रावबहादूर कठोर व कर्दन- काळ भासत तर सत्याच्या, धर्माच्या आणि शिस्तीच्या सरळ वृत्तीचे बाबतीत पूर्ण चहाते व कनवाळू सहाय्यकर्ते बनत. त्यांच्या स्वभावातील सकृद्दर्शनी परस्परविरुद्ध दिसणाऱ्या वृत्तीची अशीच संगती लावणे बरोबर ठरेल.

### अविश्वासाचे चुकीचे तत्वज्ञान

प्रागतिकांचा सरकारवर फार विश्वास असतो असा जो त्याजवर वेळी अवेळी एक अवाच्य भाषेत प्रतिपक्षीयांकडून आक्षेप घेण्यात येत असतो त्याला काळयांनी आपल्या अ. भा. लि. फे. च्या स्वागताध्यक्षीय भाषणात ‘ कौंसिलातील माझ्या बारा वर्षाच्या अनुभवावरून सरकारवरील माझा विश्वास पार उडाला आहे ’ अशा शब्दात स्पष्ट उत्तर दिले आहे. तथापि राजसत्ता परकीय असली तरी तिजवर विश्वास टाकू नये हे तत्व- ज्ञानच मुळात चूक आहे. राजसत्ता जनतेवर विश्वास टाकीत नाही असा आक्षेप घेणाऱ्यांनी आणि ज्यांना या विषमतापूर्ण जगतात विश्वबंधुत्व नांदणे शक्य वाटते त्यांनी तर ते मुळीच प्रतिपादता उपयोगी नाही. एकमेकांनी एकमेकांवर केव्हाच-काहीच विश्वास टाकला नाही तर जगाचाच काय पण एखाद्या जातीचाही किंबहुना एखाद्या जनाचाही क्षणभर

देखील कारभार चालणे शक्य नाही. तेव्हा आपल्या विश्वासाचा सदुपयोग होतो की दुरुपयोग होतो एवढेच यात मुख्य पहावयाचे असते व त्याप्रमाणे आपल्या राजकारणाला वळण लावावयाचे असते. काळयांचा सरकारवर ( म्हणजेच प्रागतिकांचा विद्यमान परकी सत्तेवर ) इतका पूर्ण व अचल विश्वास खरोखरच असता, तर त्यांच्या तोंडून याच प्रसिद्ध भाषणात " अराष्ट्रीय जातिनिष्ठेसारख्या भयंकर चिजेशी हिंदुस्थानची पहिली भेट या परकी सत्तेनेच करून दिली आहे " अशाप्रकारचे स्पष्टोद्‌गार निघतेच ना अगर केवळ विद्वत्व व कर्तृत्व एवढ्याच भांडवलावर पण स्वतःच्या सरळ, स्पष्ट व राष्ट्रीय वृत्तीला यत्किंचितही धक्का न देता त्यांना ज्या रावबहादुरादि पदव्या मिळाल्या त्याबद्दलही ते कधीच बेफिकीर राहते ना ? मवाळ म्हणजे दिवाण म्हणून नित्य हिणविणाऱ्यांनी आपल्या स्वपक्षीय जातभाईंचे राजकीय कुलशील जरा बारकाईने तपासून पाहिले तर त्यांना असे स्वच्छ दिसून येईल की नेमस्तांनी जितक्या कर्तव्य कठोरतेने व स्वाभिमानाने ही अगर असलीच अन्य श्रेष्ठ पदे अलंकृत केली, बहिष्कृत केली अगर नाकारली तसे कार्य अन्य कोणा राष्ट्रीयाला सहसा करिता आले नाही. तथापि काळयांच्या बाबतीत हा प्रश्नच उत्पन्न होत नाही. त्यातून त्यांना हे एकदाच नव्हे तर दोनदा पुढे चालून आलेले पद कशाही स्थितीत घ्यावयाचेच असते तर त्यांस ते पूर्ण शक्य होते.

## रावबहादुरांनी खरोखरच बहादुरी गाजविली

"१९३४ साली रा. ब. काळे यांच्या अध्यक्षतेखाली इस्लामपुरास भरलेल्या सर्वपक्षीय सातारा जिल्हा रयत परिषदेत 'सारा व सेस ही ५० टक्के तरी कमीच झालीच पाहिजेत' असे सरकारला बजावणारा ठराव झाला होता. या प्रसंगी स्वदेशीतून निर्माण होणारे स्वयंनिर्णयाचे स्वराज्य (तत्त्व) बहुजन समाजात त्याच्या जीवनाशी एकरुप करण्याचा प्रयत्न करण्यात आला " हे उद्‌गार लेखकाने केलेल्या गुणगायनाचे नसून काँग्रेससारख्या चरित्रनायकाच्या विरुद्ध पक्षातील एका जबाबदार कार्यकर्त्याचे व तेही जागृत झालेल्या साताऱ्यामधील ( श्री. पु. पां. गोखले कराड ) आहेत एवढे नमूद केल्यावर काळयांच्या कर्तबगारीचे वेगळे वर्णन करावयास नको. १९२०

साली स्थापिलेल्या जिल्हा लिबरल लीगचे, १९२४ मध्ये नगरला भरलेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेचे, कन्याशाळा–सेवासदन–रयतशिक्षण संस्था यांचे गांधीपुरस्कृत हरिजन-सेवा–संघाच्या जिल्हा शाखेचे व महाराष्ट्र गोसंवर्धन परिषदेचे अध्यक्ष, सातारा इतिहास संशोधन मंडळाचे व सातारा सोशल रिफॉर्म असो. चे संस्थापक, सातारा म्युझियममधील ऐतिहासिक संग्रहाचे जीवनदाते, कऱ्हाडच्या १९२३ च्या प्रांतिक प्रागतिक परिषदेचे व १९०१ साली साताऱ्यास भरलेल्या पहिल्या प्रांतिक सामाजिक परिषदेचे स्वागताध्यक्ष, पुण्याच्या डेक्कन सभेचे सभासद सारांश जिल्ह्यात व बाहेर सहसा कोणतीही चळवळ व संस्था अशी नाही की जीत ते या ना त्या नात्याने अंशभागी नाहीत; उलट यातील कित्येक आंदोलने व संस्था म्हणजेच त्यांचे सारे जीवन आहे. सरकारने त्यांची सार्वजनिक सेवा व कार्य बघून त्याना जरी रावसाहेबी व नंतर रावबहादुरी दिली नसती तरीही लोक त्यांची कामगिरी पाहून असेच म्हणते व म्हणतातही की, " रावजीनी खरोखरीच बहादुरी गाजविली ! "

### काळ्यांचे मत हेच बहुसंख्य गटाचे मत

या जिल्ह्यातील प्रागतिक पक्षाचे स्थान देशातील प्रागतिक पक्षातील पुरोगामी व जहाल गटात ( Leftists ) आहे. सर चिमणलाल सेटलवाड प्रभृतीच्या नेतृत्वापेक्षा ने. नामदार शास्त्री व श्री. चिंतामणि यांच्या नेतृत्वावरच त्यांचा अधिक विश्वास आहे. थोडक्यात म्हणजे कार्याच्या व धोरणाच्या धडाडीत व सडेतोडपणात त्यांच्यात व कॉंग्रेस कार्यकर्त्यातील नेमस्तात ( Rightists ) प्रत्यक्ष व्यवहारात फारसा फरक आढळून येत नाही. कै. वासी रा. ब. काळे यांनी आपल्या नेतृत्वाने या पक्षाला जिल्ह्यात जी प्रथा घालून दिलेली आहे ती अशी आहे व यामुळे स्वाभाविकपणेच राष्ट्रीय वृत्तीबद्दल आदर बाळगणाऱ्या जिल्ह्यातील सर्वसाधारण जनतेत या पक्षातील कार्यकर्त्यांविषयी इतर राष्ट्रीय कार्यकर्त्याइतकाच आदर आहे; त्यांनी व्यक्त केलेले मत अगर स्वीकारलेले धोरण हे जसे जिल्ह्यातील प्रागतिक संघाचे अधिकृत मत अगर धोरण म्हणून मानले जाई, तसेच ते बहुसंख्य पण अनामिक गटाचे संकलित मत आणि संमत

धोरण समजले जावे, असा सामान्यतः जिल्ह्यातील जनता व अधिकारी वर्ग यांचा अलिखित संकेत असे.

## काळ्यांची कौन्सिलकार्यांत काँग्रेसवर कडी

'कै. वा. रा. ब. काळे यांची गेल्या १२ वर्षातील कौन्सिलातील कामगिरी अवर्णनीय होती. काँग्रेसच्या प्रतिनिधीच्या अभावी कौन्सिलात त्यांनीच ते प्रतिनिधित्व केले असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाला तर त्यांचा फार उपयोग होण्याचे दिवस आले होते. काँग्रेसला प्रत्यक्ष मिळून जे कार्य होणार नाही ते त्यांनी गेल्या काही काळात केले आहे व हा त्यांच्या आयुष्याचा विशेष आहे आणि हें कित्येकाना अप्रिय वाटणारे पण निस्संदेह सत्य आहे' असे उद्गार पुरुषोत्तमाच्या निधनानंतर जिल्ह्यातील एका छोटया पण कट्टया काँग्रेस-पत्रानेच (अभ्युदय–कराड) काढले आहेत, आणि कट्टर विरोधकाच्या पहिल्या नंबरच्या प्रशंसापत्रकापेक्षा दुसरी चांगली शिफारस ती कोणती? कौन्सि-लातील व कौन्सिलबाहेरील कार्य हे परस्परपोषक आहे असे त्यांचे ठाम मत होते आणि म्हणूनच की काय कौन्सिल अगर त्याच्या कमिटया यांच्या बैठकींना हजर राहण्यात त्यांनी अगदी रेकॉर्ड केले होते. या जिल्ह्यात व इलाख्यात सर्वत्र गाजलेल्या तासगाव कोर्ट प्रकरणी व सोलापूर मॉर्शल लॉ प्रकरणी त्यांनी हे कोर्ट पुनः सुरू करण्याची खटपट करून व या मार्शल लॉ चा कडक निषेध करून तसेच राजकीय सुधारणांची व्यापक योजना अंमलात आणण्याचा प्रत्यक्ष ठराव आणून आणि विधवेला तिच्या नवऱ्याच्या उत्पन्नाचा भाग मिळावा असा ठराव आणण्याचा मनोदय योजून ( मनोदय म्हणण्याचे कारण या ठरावास परवानगीच मिळाली नाही! ) त्यांनीं कौन्सिलात जे कार्य केले आहे तेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

### जे मला मान्य नाही ते मी करणार नाही!

प्रागतिकांनी काँग्रेसमध्ये जाऊन प्रतिसहकार पक्षाच्या मदतीने तिचे धोरण अमृतसर काँग्रेसच्या वेळच्या धोरणाप्रमाणे सर्वसंग्राहक करण्याची खटपट करावी व देशास योग्य वळण लावण्यास मदत करावी अशी विचार-

सरणी १९२६ साली प्रागतिक पक्षापैकी बऱ्याच तरुण मंडळींची झालेली होती व या तरुण पक्षाचे नेतृत्व अर्थात् रा. ब. काळे यांचेकडे होते. परंतु पं. मोतीलाल नेहरू प्रभृति काँग्रेसपुढाऱ्यांच्या ऐक्यविघातक वृत्तीमुळे रावबहादुरांचा हाही प्रयत्न व्यर्थ गेला. १९२४ चे सुमारास मुंबईस जी एक सर्वपक्षीय परिषद भरविण्यात आली होती तिच्यात रावबहादुरांनी प्रागतिक संघाच्या कौन्सिलच्या सभेत पास झालेल्या व अ. भा. प्रा. संघाच्या कौन्सिलने मान्य केलेल्या ठरावाचा उल्लेख करून असे म्हटले होते की, 'जर काँग्रेस असहकारितेसारखा अव्यवहार्य कार्यक्रम सोडील, सुताच्या वर्गणीसारख्या असंभाव्य अटी काढील, साध्य व साधन याबाबत सनदशीर मार्ग स्वीकारील, काँग्रेसबाहेर कौन्सिलात अगर अन्यत्र होणाऱ्या लोकसेवेला मान्यता देईल आणि अशा रीतीने काँग्रेसबाह्य संघटित राजकीय पक्षास आपले प्रतिनिधि काँग्रेसला पाठविणे शक्य होईल तर आपण आपल्या पक्षासह पुनरपि काँग्रेसला अवश्य मिळू ' याच प्रसंगी त्यांनी असेही सुचविले होते की, काँग्रेसमध्ये काँग्रेसमधीलच फक्त कार्य करणाऱ्यांचे एक व काँग्रेसबाहेरीलही काम करणाऱ्यांचे एक अशी दोन मंडळे काढावीत व त्यांच्या त्यांच्या प्रमुखांकडे ती ती कामे कशी करावयाची हे सोपविण्यात यावे. तथापि ध्येया-धोरणाचे बाबतीत बारा वर्षात तेरा प्रकार केलेल्या काँग्रेसपक्षीयांना हा समेट अर्थातच रुचला नाही, मात्र काँग्रेसचे आजचे पार्लमेंटरी बोर्ड ही याच सूचनेच्या उत्तरार्धाची परिणति आहे. जी गोष्ट आपल्यास अयोग्य वाटे व अमान्य असे तीत रावबहादुर चुकूनही भाग घेत नसत. मुंबई कौ. च्या १९३२च्या बजेट बैठकीचे वेळी त्यांनी असे स्पष्ट सांगितले होते की 'जादा कर बसविण्यास लोकपक्षाची व त्याच्या पुढाऱ्याची काडीमात्र संमति मिळणार नाही.' तरीही फिनॅन्स बिलाचे प्रथम वाचन बहुमताने पास झालेच व ते सिलेक्ट कमिटीकडे देण्यात येऊन रा. ब. काळे यांसही सि. क. मध्ये घेण्यात आले. विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याचा या सात्विक व तात्विक असंतोष अशा प्रकारे शमणे शक्य नव्हते. यावर रावबहादुरांनी एकच उत्तर दिले की, 'माझा आणि माझ्या पक्षाचा या बिलाला विरोध आहे आणि अशा प्रकारच्या अमान्य बिलाच्या सि. क. मध्ये काम करणे मला मुळीच मान्य नाही.' याप्रसंगाला उद्देशूनच

पुण्याच्या एका नामांकित नियतकालिकाने तेव्हा 'रा. ब. काळे हेच या कौन्सिलचे खरे प्रातिनिधिक पुढारी असून बजेटाची यथार्थ कल्पना फक्त त्यांसच आहे' असे सार्थ उद्‌गार काढले होते.

# आठवणी व आख्यायिका

## ( ना. खा. ब. डी. बी. कूपर, फडणिस मुंबई सरकार यांची आठवण )

### मी सार्वजनिक कार्यात कसा पडलो ?

मी धंद्यात पडलो तेव्हापासून स्वतःच्या पायावर उभे राहूनच मला माझ्या धंद्याचा जम बसवावयाचा असल्यामुळे, आपल्या धंद्यापलीकडे कोणत्याही सार्वजनिक भानगडीत पडू नये असे मला मनापासून वाटत असे. कोणत्याही प्रकारच्या इतर व्यवसायांशी म्हणजे क्लब–खेळणे वगैरेशी माझा कसलाच संबंध नसे. सतत धंद्याच्या मागे काल खर्ची घालणे हाच काय तो माझा व्यवसाय असे. १९०५ साली धंद्याच्या निमित्ताने सरकारी अंमलदारांशी माझा निकट संबंध आला व ओळखीही बऱ्याच झाल्या. त्यावेळी साताऱ्यास श्री. भिडे हे हुजूर डेप्युटी कलेक्टर होते. त्यांचे मनात मला सार्वजनिक कामास जुंपावे असे नेहमी असे. एके दिवशी रा. ब. काळे व श्री. भिडे हे सदाशिव पेठेतील कै. वा. डॉ. देशपांडे यांच्या घरातून बाहेर पडले. इतक्यात मी टांग्यातून परत चाललो असता माझी व त्यांची गाठ पडली. तेव्हा श्री. भिडे मला म्हणाले–'अहो कूपर, सध्या १८९५ सालानंतर दहा वर्षांनी बेंच मॅजिस्ट्रेट नेमण्याबद्दल नवीन यादी तयार होत आहे, आणि त्या यादीत मी तुम्हाला बेंच मॅजिस्ट्रेट नेमण्याबद्दल शिफारस करणार आहे. तेव्हा तुम्ही आता नाही म्हणू नये. आपले आता उत्तम चालले आहे, लोकात ओळखीही झाल्या आहेत, तेव्हा तुम्ही सार्वजनिक कामाची टाळाटाळ करून यापुढे चालावयाचे नाही.' मी त्यांना म्हटले–'मला ही उठाठेव नको. धंदा व सार्वजनिक काम यांच्यात मेळ नाही. स्वतःचा धंदा पाहवा हेच मला योग्य ती भानगड मला नको.' त्यावेळी श्री. भिड्यांच्या बरोबर रा. ब. काळेही

होतेच. त्यांनी हे भाषण ऐकिले, व सार्वजनिक कार्यात का पडले पाहिजे याबद्दल मोठ्या आदराने, कळकळीने व आपलेपणाचे भावनेने त्यांनी मला त्यावेळी उपदेश केला. आणि तेव्हापासून मी सार्वजनिक कार्याला जुंपलो गेलो. सबब सार्वजनिक कार्याची दीक्षा रा. ब. काळे यांनीच मला दिली तेव्हा माझ्या स्थित्यंतराचे श्रेय रा. ब. काळे यास दिले असता वावगे होणार नाही असे मला वाटते व ही गोष्ट मी नेहमी आठवितो.

## मी खानबहादुरांचा शत्रु नव्हे

सन १९२० पासून सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक कार्यक्षेत्रात कै. वा. रा. ब. काळे व विद्यमान ना. खा. कूपर यांच्यात "एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" असा संबंध क्वचितच आला असेल; उलट कौन्सिल, लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिटी इत्यादी क्षेत्रात परस्पर पक्षभेदच दिसून आले. ( येथे कोणाचे धोरण किंवा पक्ष योग्यायोग्य हा प्रश्न नाही ) या पक्षभेदामुळे उभयतांच्या धोरणात छत्तिसाचा आकडा असून ते परस्परांचे द्वेष्टे आहेत असाही कित्येकांचा समज असे. या समजुतीने काही लोक रावबहादुरांचे मन खानबहादुरांविषयी कलुषित करण्याचा प्रयत्न करीत असत. ( असाच प्रकार खानबहादुरांकडेही होत असेल किंवा नसेल हे सांगण्याचे येथे कारण नाही ) असलाच एक प्रसंग एकदा माझ्यापुढे आला होता, तो पुष्कळास बोधप्रद वाटेल. एकदा बोर्डाकडील एका शिक्षकाची शिक्षेदाखल गैरसोयीची बदली झाली होती. त्या शिक्षकाने आपल्या बदलीचे खरे कारण न सांगता रावबहादुरांना " माझा अमक्या बाबतीत आपल्याशी असा संबंध आहे तो नसावा, म्हणून ही गैरसोयीची व नुकसानीची बदली केली आहे " अशी समजूत करून टाकली होती. त्यामुळे रावबहादुरांना वाईट वाटून हे प्रकरण विशेष प्रयत्नाने धसास लावण्यात व उजेडात आणण्यात ते गढले होते. त्यावेळी विशेष माहितीसाठी त्यांनी मला बोलावून सर्व गोष्टी विचारल्या; मी त्यांना सदर शिक्षकाने आपला गैरसमज केला आहे, अमक्या बाबतीत त्याची चूक झालेली आहे निरपराधी असताना त्याला शिक्षा दिलेली आहे असे नाही, झालेल्या दोषाबद्दल शिक्षा द्यावयाची की एकदा दया दाखवावयाची हा भाग वेगळा,

इत्यादि प्रकारे माहिती दिली. त्याबरोबर ते म्हणाले-' पाहिलेत, लोक कसे कावेबाज आणि बेजबाबदार असतात ते ! क्षुल्लक स्वार्थासाठी विद्य- मान परिस्थितीचा असा फायदा घेण्यात व माझ्यासारख्यास अखेर तोंडघशी पाडण्यात यांना काहीच दिक्कत व किमत वाटत नाही की काय ? आलेल्या माणसांची पारख करणे हे मोठेच काम होऊन बसते हेच खरे. या अशा लोकांना आम्हा उभयतात दुष्ट संबंध उत्पन्न व्हावेत अशी इच्छा असते, की मी आणि खानबहादूर परस्परांचे शत्रू आहोत असा त्यांच्यात समज नांदतो ? मी खा. ब. कूपर यांचेवर निष्कारण व नसते दोषारोप कसा करू शकेन येवढा साधा विचारही या लोकांच्या डोक्यात येत नाही; व त्याना सार्वजनिक चारित्र्याची ओळख अद्यापि होत नाही हे दुर्दैव होय. ' रावबहादुरांची मनोभूमिका या उद्गारावरून किती उच्च दर्जाची होती व प्रतिपक्षीय समजल्या जाणाऱ्या खानबहादुरांसंबंधी व अन्य प्रति- पक्षीया विषयीही त्यांचे मन कसे होते व असे याची कल्पना कोणासही सहज येईल.

## ( शाहू बोर्डिंगचे चालक श्री. पाटील यांची आठवण )

### तुम्ही राजिनामा का देत नाही ?

सरकारी वरिष्ठाधिकाऱ्यांनी आपल्या ठराविक चाकोऱ्या सोडून लोकात मिळाले-मिसळले पाहिजे अशी रावबहादुरांची नेहमी शिकवण असे. आणि तदनुरूप सातारा जिल्ह्यात व त्याच्या आसपास त्यांनी ना. परांजपे, ना. सर हिदायतुल्ला व ना. सर चुनीलाल-कावसजी इ. अनेक दिवाणादि अधिकाऱ्यांना हिंडविले आहे हे विशेष आहे. सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाच्या आंदोलनाचे काळी तर त्यांनी रँ. परांजप्यांसारख्या दिवाण असलेल्या आपल्या प्रमुख स्वपक्षीय सहकाऱ्यासही असा रोखठोक सवाल विचारला होता की, " जर तुमच्याकडून हे सक्तीच्या मोफत प्राथ- मिक शिक्षणाचे कार्य होत नसेल तर तुम्ही सरळ आपल्या जागेचा-प्रधान- पदाचा राजीनामा का देत नाही ? " असल्या कृत्यांना किती मनोधैर्य व सामर्थ्य लागते हे ज्यांना समजत असेल त्यांनाच त्यातील मर्म कळून येईल.

## ( श्री. भा. द. कुदळे-एक प्रसिद्ध जिल्हा पुढारी यांच्या आठवणी)

### स्वार्थ व सत्य यांचा झगडा

मुंबई कायदेमंडळाच्या एका निवडणुकीच्या वेळी मी, आणखी तीन चार गृहस्थ व रा. ब. काळे असे एकदा एका तालुक्याच्या गावी गेलो होतो. अगोदर दिलेल्या सूचनेप्रमाणे तालुक्यातील काही गावाचे काही प्रमुख लोक तेथे जमलेले होते. सर्वांशी मतासंबंधी वाटाघाटी झाल्यानंतर ते लोक निघून गेले; पण एक पाटील घोटाळत राहिलेले दिसले. शेवटी त्यांनी आमच्यापैकी एका गृहस्थास बाजूस नेऊन " माझ्या पाटिलकीसंबंधातील निकाल रावबहादूर वशिल्याने माझ्यासारखा करून देतील तर मी गावची मते त्यांना देऊ शकेन, करिता त्यांना याबद्दल विचारून पहा " असे त्याला सांगितले. ' त्यांच्याकडून हे काम अशा रीतीने होणार नसेल तर ते साधून देणाऱ्या दुसऱ्या उमेदवाराच्या पदरी ही मते टाकावयाची आहेत. तथापि रावबहादुरांकडूनच ते होण्यात स्वार्थ साधून तीर्थ घडल्याचे श्रेय मला लाभणार आहे ' अशी उमेदवाराला भ्रमात पाडणारी व लोभनीय वाटणारी कानगोष्ट साळसूदपणे सांगण्यास पाटील चुकले नव्हतेच. पाटलानी हा आपला मतलबी डाव अडल्या गरजवंतापुढे आपल्यापरीने छानदार रीतीने टाकला खरा ! पण हा नारायण अडला तरी गाढवाचे पाय धरील की त्याला आणि आपल्याला काठीने झोडपून काढील याबद्दल या नारायणाच्या कोपाची अल्पस्वल्प ओळख असल्याने पाटलानी ज्यांच्याकडे ही कामगिरी सोपवली होती त्या गृहस्थांना रावबहादुरापुढे पाटलांचे हे म्हणणे मांडण्याचे धैर्य होईना ! उलट रावबहादुरांच्याच हिताचा-मिळणाऱ्या मताचा-लोभही सुटेना ! अखेर हिय्या करून पाटलांचे म्हणणे रावबहादुरांना त्यांनी सांगितले व त्यांचे ते सांगणे संपते न संपते तोच संतापाने उसळून (आणि अशा संतापाच्या वेळी परिचितांच्या परिचयाच्या त्या आवाजाने म्हणजे सभोवतालच्या लोकांना भयभीत व गर्भगळित करणाऱ्या स्वराने गर्जून ) रावबहादुर म्हणाले-' काय ? काय ?? वशिला ??? असले दुष्कृत्य मी कधीही करणार नाही; व माझ्या मतासाठी खोटे आश्वासनही मी कधीच

देणार नाही. ' पुढे आवाज उतरून किंचित् शांतपणाने पण गंभीरतेने ते बोलले-' मतदारांनी मिळालेल्या मताधिकाराचा उपयोग का व कसा करावयाचा या संबंधात योग्य दिशा दाखविण्याचे कार्य माझ्या उमेदवारीमुळे थोडे जरी साधले तरी त्याचे महत्त्व मला निवडणुकीतील यशापेक्षाही अधिक वाटणार आहे! फार काय ? पण मतदार जागृत होऊन त्यांना आपल्या मताधिकाराचा सदुपयोग करण्यास माझी उमेदवारी पुष्कळ अंशी कारणीभूत झाल्याचे श्रेय मला मिळाले, आणि मग मला निवडणुकीत अपयश आल्याचे पहावे लागले तरीही मला वाईट वाटेल अशी कल्पनासुद्धा आपण मुळीच करून घेऊ नका! ' इतके म्हणून ते जरासे थांबले; व मलाही या आठवणीची पुढील हकीकत न सांगता येथेच थांबावयाचे आहे. कारण स्वार्थासाठी वाममार्ग पत्करण्यापेक्षा स्वार्थावरच पाणी सोडणे उत्तम ही रावबहादुरांची अभिरुचि यावेळी प्रत्ययास येऊन अशा स्वार्थत्यागाने लोकाना इष्ट वळण देण्याचे शिक्षण त्यांना किती प्रिय महत्त्वाचे वाटत असे याचा बोध या आठवणीच्या येवढ्या हकिकतीवरूनही होणार आहे व माझा मुख्य हेतु तेवढ्याने सफल होत आहे.

## ( श्री. गो. अ. रानडे वकील यांच्या आठवणी )

### मला सार्वजनिक कार्यात राबवा

सार्वजनिक कार्याची दीक्षा घेतल्यानंतर रावसाहेबांना पैसे मिळविण्याच्या धंद्याचा मनापासून कंटाळा आला होता. ' ही कामे करण्याबद्दल मला भीड न घालता सार्वजनिक कामात मला राबवून घ्या ' असे ते आम्हाला नेहमी सांगत असत.

### माझे मन शांत झाले

पुत्रवियोगानंतर दक्षिण हिंदुस्थानची रावसाहेबांनी सफर केली. यावेळी रावसाहेबांची शारीरिक व मानसिक स्थिति अत्यंत शोचनीय झाली होती. ते दौऱ्याहून परत आल्यानंतर त्यास आम्ही भेटावयास गेलो असता रावसाहेबांनी आम्हाला सांगितले- ' बंगलोरास ना. शास्त्री यांची गा

पडल्यापासून माझे मन शांत झाले आहे, व आपण आता सर्वथैव सार्वजनिक कामात व्यग्र होणार आहो.'

## मुसलमान पुरुषांपेक्षा मुसलमान स्त्रिया जास्त राष्ट्रीय

सायमन कमिशनचे साक्षी घेण्याचे काम चालू होते. त्यावेळी मुसलमान स्त्रियांनी साक्षीत स्पष्ट सांगितले की, 'आम्हाला स्वतंत्र मतदार संघ नको!' रावसाहेबांना यामुळे फार आनंद झाला व त्यांनी ही हकीकत आमचे समक्ष ना. भुतो यांचेपुढे काढून त्यांना म्हटले :- 'तुमच्या स्त्रिया देखील तुमच्यापेक्षा अधिक व्यापक दृष्टीच्या व राष्ट्रीय बाण्याच्या आहेत.' अर्थात् ना. भुतो यांना मुसलमानांचा मागासलेपणा कबूल करावा लागला!

## रावबहादुरांचा स्वदेशीचा अभिमान

कोणताही स्वदेशी माल चांगला निघाला म्हणजे रावसाहेबांना फार अभिमान वाटे. एकदा चांगल्या स्वदेशी बिस्किटांचा नमुना दाखविण्याकरता रावसाहेबांनी आम्हा काही स्नेह्यांना अवेळी चहा पिण्याचा आग्रह केला. बिस्किटे साधारण बरी होती. पण 'उत्तम इंग्रजी बिस्किटांपेक्षाही ही बिस्किटे जास्त चांगली आहेत' असे जेव्हा रावसाहेब म्हणू लागले तेव्हा त्यांच्या समाधानाकरता एकमेकांकडे पाहून मिस्किलपणाने माना डोलविणे आम्हास भागच पडले!

## सरकारच्या नैतिक दर्जाचा प्रश्न

एका इलाखाधिपतींनी एका बड्या संस्थानिकांची एका सार्वजनिक भाषणात एकदा खूप प्रशंसा केली. त्या संस्थानिकांचा अनैतिक चारित्र्याबद्दल पुष्कळच गवगवा झाला होता. काही दिवसांनी इलाखाधिपतींशी झालेल्या मुलाखतीत रा. ब. काळे यांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, 'असल्या भाषणांनी सरकारचा नैतिक दर्जा लोकांच्या दृष्टीने कमी होतो!' इलाखाधिपतींनी अर्थात् राजकारणाची सबब सांगून वेळ मारून नेली! जे राजकारण सर्वमान्य नैतिक पायावर उभारलेले नसेल ते राजकारण रावसाहेबांना केव्हाच पटले नाही.

## निवडून दिल्याने काम संपत नाही

निवडणुकीचे वेळी न होणाऱ्या गोष्टी करू म्हणून थापा मारणारांच्या बेजबाबदारपणाबद्दल त्यांना जसा संताप वाटे तशीच अशा थापांना फस–णाऱ्या अडाणी मतदारांबद्दलही रावसाहेबांना दया वाटे. 'प्रामाणिक बुद्धीने माझ्या शक्त्यनुसार मी तुमची सेवा करीन' एवढेच रा. ब. मतदारांना सांगत. 'निवडून दिले म्हणजे तुमचे काम संपले नाही, तर तुम्ही वेळोवेळी मला बोलावून तुमच्या अडचणी कळविल्या पाहिजेत' असेही ते आर्जवाने सांगत.

### पहिला व मोठा समतावादी ब्राह्मण

राष्ट्रवीराने त्यांच्या मृत्युलेखात 'साताऱ्याकडील ब्राह्मणांचा वाली गेला' म्हणून जो शेरा मारला आहे तो आकुंचित व हीनवृत्तीचा आहे. सातारा जिल्ह्यातील कोणत्याही माणसापेक्षा ते जास्त समतावादी होते, व ज्यांना जातिनिष्ठेचा यत्किंचितही अभिमान नाही अशा ब्राह्मणांपैकी ते पहिलेच ब्राह्मण होते. त्यांनी मागासलेल्या वर्गाकरिताच आयुष्यभर कार्य केले, व आपला पैसाही त्यांच्याकरिताच खर्च केला.

## (श्री. के. बा. गजेंद्रगडकर वकील यांची आठवण)

## हिंदुधर्मावर ग्रंथ लिहिण्याचा विचार

रा. ब. काळे यांचे गीतेचे अध्ययन फार खोल होते, व गीता–धर्म आचरणात आणण्याचा ते फार कसोशीने प्रयत्न करीत असत. गीताधर्म कौमुदी या नावाचा निबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार होता, व त्या दृष्टीने त्यांनी इंग्रजीत काही निबंध लिहिलेही होते. त्यातील महत्त्वाचा भाग बडोद्यास प्राच्य–विद्या–परिषद भरली असता तीत त्यांनी वाचूनही दाखविला होता, व पुढे हा निबंध सुप्रसिद्ध गीताभ्यासी म. गांधी यांजकडेही त्यांनी वाचनार्थ पाठवला होता. त्याचे भाषांतर प्रस्तुत लेखकाने 'किर्लोस्कर' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध केले आहे. हिंदुधर्मावरही एक पुस्तक लिहिण्याचा त्यांचा बेत होता, व त्या दृष्टीने त्यांनी जबर वाचनही

केले होते. अखेरच्या आजारीपणात मी त्यांना पुण्यास भेटण्यास गेलो असता 'मे (१९३६) महिन्यामध्ये हिंदुधर्मावर पुस्तक लिहिण्याचे काम मी हाती घेणार आहे व त्याकामी तुमची मदत मला पाहिजे आहे' असे त्यांनी मला पुन्हा पुन्हा बजावून सांगितले होते. पण लौकरच आपणास देवाघरी जावे लागणार आहे ही गोष्ट त्यावेळेस त्यांच्या ध्यानीमनीही नव्हती.

## [ श्री. शं. वा. किर्लोस्कर सं. किर्लोस्कर यांची आठवण ]

### मृत्युशय्येवरील पत्नी आणि टेबलावरील कामे

उत्कर्ष हे मनुष्यमात्राचे साध्य असून अविरत उद्योग हे ध्येयप्राप्तीचे साधन होय, या गोष्टीचे प्रत्यक्ष प्रमाण रावबहादुरांच्या चारित्र्यात सदैव पहावयास मिळे. आळस हा शब्दही त्यांना ठाऊक नव्हता. प्रापंचिक गैरसोय किंवा प्रकृतीची जिकीर या गोष्टी देखील त्यांच्या कामात व्यत्यय आणू शकत नसत. प्रत्यक्ष पत्नी मृत्युशय्येवर असताना, किंवा स्वतःस उभे राहण्याइतकीही तरतरी वाटत नसताना, त्यांनी किर्लोस्कर बंधू लि. कंपनीचे काम बाजूस ठेवले नाही. 'या गोष्टी चालायच्याच, आणि कामेही वेळच्या वेळी झालीच पाहिजेत,' असे ते म्हणत व लगेच कामासही लागत आणि ते हातावेगळे करीत !

## ( बॅ. वि. र. करंदीकर यांची आठवण )

### रावबहादुरांचे दादासोहबांवरील प्रेम

१९२९ साली दादा ( कै. दादासाहेब करंदीकर) विलायतेस जाण्यासाठी निघाले असता रावबहादुरांनी त्यांना दिलेल्या निरोपाचा प्रसंग अजून मला हुबेहूब आठवतो. किंबहुना तो मी कधीही विसरणार नाही इतके त्यात कारुण्य आहे. दादासाहेब आणि रावसाहेब हे दोघे तसे म्हटले तर एकमेकांचे अखेरपर्यंत सामान्यतः विरोधी म्हणूनच सर्वांना माहीत आहेत, परंतु दादांना निरोप देताना रावबहादुरांची स्थिति काय झाली हे ज्यांना ठाऊक आहे त्यांना हे सांगण्याचे मुळीच कारण नाही की

दादांच्या विषयी रावबहादुरांच्या अंतःकरणात अत्यंत आदर वसत होता, व उलटपक्षी दादांचेही त्यांजवर फार प्रेम होते. इंग्रजीत ज्याला आपण 'मॅथॅमॅटिकल् कॅलक्युलेशन' म्हणतो त्या प्रकारची रावबहादुरांची वागण्याची साधारण पद्धत असे. पण दादांच्या बाबतीत त्यांनी या पद्धतीचा कधीच अवलंब केला नाही. दादांचा सुखाचा प्रवास कसा होईल म्हणून या वेळी त्यांना इतकी चिंता लागली होती की तितकी खुद्द दादांनाही लागली नसेल. त्यांच्या त्या कळकळीने व तळमळीने इतरांनाही वाईट वाटले इतके लिहिले म्हणजे या काठिण्यपूर्ण प्रसंगाची यथार्थ कल्पना होऊ शकेल.

## ( श्री. विनायक महाराज मसूरकर यांची आठवण )

### जंगलात सांपडलेले रावसाहेब व वहिनीसाहेब

रा. व. काळे हे एकदा दक्षिण हिंदुस्थानात सहकुटुंब प्रवासाला गेले असता वाटेत काही आपत्तीमुळे त्यांना ती रात्र एका भीषण जंगलातच काढावी लागली. त्यावेळी रावबहादुरांना राम, व सीता ह्यांच्या वनवासाचे स्मरण होऊन ते आपल्या पत्नीस म्हणाले– 'आज आपण अगदी राम व सीता ह्यांच्यासारखे वनवासी आहोत. वनवासात असताही त्यांनी आपला काळ जसा आनंदात घालविला तसा आपणही आपला काळ आनंदात घालवू या.' सारांश कोणताही प्रसंग प्राप्त झाला असता आपल्या प्राचीन पूर्वजांच्या आठवणीशी साम्य पाहण्याची संवयच त्यांना जडून गेली होती.

## ( श्री. सरदार बाबासाहेब पंडितराव यांची आठवण )

### मी सरदारांचा प्रतिनिधि नसून शेतकऱ्यांचा आहे

बहुजन समाजाची प्रगति हीच खरी देशप्रगति असे रावबहादुरांचे दृढमत होते. एकदा मुंबई कायदे कौन्सिलात सरदार वर्गाबद्दल एक ठराव आणावयाचा होता, व तो रावबहादुरांनी आणावा अशी माझ्यासारख्या त्यांच्या काही स्नेही मंडळींची इच्छा होती, परंतु रावबहादुरांनी आम्हाला एकच उत्तर दिले की, "मी सरदारांचा प्रतिनिधि नसून शेतकऱ्यांचा प्रतिनिधि आहे, आणि तुमच्या सरदारांच्या ठरावात शेतकऱ्यांच्या हिताला

बाधक असे जर काही असेल तर मला तो ठराव मुळीच मांडता येणार नाही ! " पुढे सदर ठरावात शेतकऱ्यांच्या हितास विरोधी असा काही एक प्रकार नसल्याची जेव्हा त्यांची पुरी खात्री झाली तेव्हाच त्यांनी तो कौन्सिलात मांडला.

## ( श्री. द्वा. गो. वैद्य सं. सुबोधपत्रिका यांची आठवण )

### एक अपूर्व कीर्तन व कीर्तनकार

न्या. मू. रानड्यांबद्दल रावबहादुरांना अत्यंत आदर आणि अगत्य वाटत असे हे सर्वत्र प्रसिद्धच आहे; व त्यासंबंधाने एक गोष्ट विशेष लिहिण्यासारखी आहे. रावबहादुरांच्या सव्यसाचित्वाची प्रचीतीही वाचकांना या उदाहरणावरून आल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या मनाची ठेवण व घडण धर्मपर असल्याने त्यांच्या कीर्तनादिकात भक्ति, प्रीति व शांति यांचा सुंदर त्रिवेणी संगम आढळत असे. 'रानड्यांची सार्वजनिक पुण्यतिथि साताऱ्यास साजरी करण्याची प्रथा त्यांनीच प्रथम पाडली, आणि ती परवापर्यंत टिकविलीही. अशाच एका पुण्यतिथीचे प्रसंगी एका महान् विभूतीबद्दल एक उद्‌बोधक आख्यान लावण्यात आले आणि या उपयुक्त उपक्रमाचे भाविक श्रोतृवृंदानेही मोठे कौतुक केले. ही महान् विभूति म्हणजे दुसरी तिसरी कोणती नसून प्रीतीचे सागर व भक्तीचे आगर अशी शांतिमूर्ति न्या. मू. रानडे ही होय, व हे कीर्तनकार म्हणजे अन्य कोणी नसून रावबहादूर होत! आजवरचे कीर्तनकार पौराणिक व ऐतिहासिक कथा सांगत आले होते. परंतु त्याच्याही पुढे जाऊन आधुनिक कालातील रानड्यांसारख्या विभूतीवर झालेले हेच पहिले कीर्तन आणि असे कीर्तन करणारा रावबहादुर हाच पहिला कीर्तनकार होय.

## ( आणखी काही आठवणी व आख्यायिका )

### वेस्टर्न कंपनमिधील दोन परस्पराविरुद्ध प्रसंग

महाराष्ट्राला भूषणभूत झालेल्या वेस्टर्न इं. ला. इ. कंपनीची १९१३ साली स्थापना करण्यात ज्यांनी प्रामुख्याने भाग घेतला त्यात रा. ब. काळे

हे अग्रेसर होते. कै. वा. रा. ब. पाठक, श्री. दादासाहेब करंदीकर, नाना-साहेब आगाशे, काका जोशी, वामनराव गोवईकर, कृष्णराव कडुसकर व श्री. आण्णासाहेब चिरमुले, भाऊसाहेब सोमण, गणपतदास देवी, व लक्ष्मण-राव आपटे इ. अनेक पक्षाच्या मंडळींनी एकत्र बसून यासंबंधी जे बेत केले त्यातच रा. ब. काळे हे याप्रमाणे प्रमुख होते असे नसून कंपनीस सल्ला देणे व प्रत्यक्ष सहाय्य करणे यातही त्यांचे महत्त्वाचे अंग होते. श्री. अण्णासाहेब चिरमुले यांचे मितभाषित्व प्रसिद्धच आहे. त्यामुळे रा. ब. काळे हे कंपनीच्या अंतरंगातले असूनही कित्येकदा त्यांना श्री. चिरमुल्यांची धोरणे व योजना कळत नसत. अशा स्थितीत रा. ब. काळे यांस एकदा कंपनीच्या कामाच्या फैला-वाच्या दृष्टीने अण्णासाहेबांच्या योजना काय आहेत व त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर कंपनी पुढेही भरभराटीने चालण्याच्या संबंधात त्यांनी काय धोरण ठरविले आहे हे समजून घेण्याची संस्थेचा एक कळकळीचा हितचिंतक या नात्याने तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली. व या संबंधाचे श्री. अण्णासाहेबांचे विचार व तदनुषंगिक माहिती ही दोन्ही महत्त्वाची असल्याने लोकांपुढे येणे अवश्य आहे असे त्यांच्या मनाने घेतले. लोकांपुढे येणे जरूर असताही जी महत्त्वाच्या बाबीची माहिती त्यांचेसमोर येत नसेल ती अनेक मार्मिक प्रश्न विचारून सरकारकडून बाहेर काढण्यात पटाईत व सराईत असलेल्या रा. ब. काळयांनी कंपनीच्या भागीदारांच्या एका सभेत याच गोष्टीचा अवलंब करून आपली प्रश्नावलि त्यांना सादर केली. परंतु त्यांना जी उत्तरे मिळाली ती मात्र बहुतेक सारी "होय, नाही, बघू" अशा अर्थाचीच मिळाली. आधीच रावबहादुर थोडे रागीट व तापट, आणि त्यातच आपल्या कळकळीच्या इतक्या परिश्रमाना-आपला त्यात लोकहिताचाच सद्‌हेतु असता-हे फळ आलेले बघून रावबहादुर जे संतापले ते एकदम बाहेर निघून गेले. पण याच्याच बरोबर जेव्हा अण्णासाहेबांच्या गौरवाचा प्रसंग १९३१ मध्ये प्राप्त झाला तेव्हा तेच रा. ब. काळे तितक्याच तत्परतेने व कळकळीने, स्वतःच्या घरी त्याच दिवशी व वेळी जिल्हा लिबरल असोसिएशनची महत्त्वाची सभा असताही तिचे काम ठरल्या वेळेपेक्षा अगोदरच उरकून टाकून व इतर सर्व महत्त्वाची कामे बाजूस सारून, त्याला उपस्थित झाले. याचे कारण रावबहादुरांचे ठायी त्यांच्याबद्दल अस-

लेला आदर आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दलचा विश्वास हेच होय. ते स्नेही व सहकारी अण्णासाहेबांची योग्यता यथार्थतेने जाणीत होते हे जसे यावरून सिद्ध होते, तसेच ते मनाने फार थोर होते हेही चांगले सिद्ध होते. नुसते हजर राहूनही त्यांचे समाधान झाले नाही, तर त्यांनी अण्णासाहेबांच्या संबंधी एक छोटेसे गौरवपर भाषणही केले, व एकेकाळी स्वतःचे हाताखाली असिस्टंट पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून वागलेल्या अण्णासाहेबांच्या निस्पृहतेची निस्पृहपणे पाठही थोपटली !

### काटकसर कशाची करू नये ?

रावबहादुरांचा सार्वजनिक खर्चाच्या संबंधातील काटकसरीच्या बाबतीत फार कटाक्ष असे. परंतु त्यांच्या मते काटकसर न करिता येणाऱ्याही काही गोष्टी होत्या. त्या कोणत्या हे त्यांच्याच शब्दात देणे बरे. प्रसंग मेजवानीचा होता. कौन्सिलच्या सभासदांनी मुंबईचे एक वेळचे गव्हर्नर ना. साइक्स यांना ते सेवानिवृत्त होणार म्हणून दिलेली ती मेजवानी होती. याप्रसंगी मुख्य भाषण रावबहादुरांचे झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले– 'हल्लीचे दिवस काटकसरीचे आहेत खरे, परंतु काटकसर न करण्यासारख्याही काही गोष्टी आहेतच. सत्यभाषण, सत्याचरण, स्वार्थसंन्यास व प्रयत्नवाद याच त्या गोष्टी होत !'

### तू दुसरा डॉ. आंबेडकर झाला पाहिजेस

रावबहादुरांची अस्पृश्यतानिवारणाबद्दलची मते किती प्रगल्भ दशेस गेलेली होती हे सर्वांस सुपरिचितच आहे. या उदार विचारांमुळे व तदनुरुप सतत चाळीस वर्षे ( नाइट स्कूल काढणे इ. ) केलेल्या आचारांमुळेच ते दलित वर्गाची मने आकृष्ट करू शकले होते. यासंबंधी एकाच घटनेचा येथे प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. आपल्या भीमराव नावाप्रमाणे हिंदुधर्मावर परधर्मप्रवेशघोषणेची प्रचंड गदा उगारणारे डॉ. आंबेडकर हे श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड आदि अनेक थोर सज्जनांप्रमाणे रावबहादुरांचेही थोडेबहुत ऋणबद्ध आहेत. त्यांच्या शिक्षणादिकांस त्यांनी नुसते सहाय्यच केले होते असे नव्हे तर अनेक आंबेडकर ( त्यांच्यातील आजकालची अत्याग्रही वृत्ति सोडता ) निपजावेत अशीही त्यांनी महत्त्वा-

कांक्षा बाळगली होती. आणि या दृष्टीने त्यांनी येथील अडसूळ नावाचे एका अस्पृश्य विद्यार्थ्यास एकदा असे बोलूनही दाखविले होते की 'मी तुला सहाय्य अवश्य करितो, पण ते एका अटीवर; आणि ती अट म्हणजे तू दुसरा डॉ. आंबेडकर झाला पाहिजेस!'

**न. चिं. केळकर**

## निष्ठावंत शिष्यांची परंपरा

रा. ब. काळे हे न्या. रानडे व ना. गोखले यांचे कट्टे अनुयायी होते. रानड्यांचे निष्ठावंत अनुयायी ना. गोखले यांनी आपल्या गुरूच्या स्मरणार्थ सव्वालक्ष रुपये जमवून 'रानडे इकॉनॉमिक इन्स्टिटयूट' स्थापिली व त्यांचे स्मारक उभारले; तर ना. गोखले यांचे कट्टे अनुयायी रा. ब. काळे यांनी ना. गोखले यांच्या स्मरणार्थ भारतसेवक समाजाला सव्वालक्ष रुपयांची देणगी देऊन 'गोखले इकॉनॉमिक अँड पॉलिटिक्स इन्स्टिटयूट' ही संस्था स्थापिली, व त्यांचे स्मारक उभारले, यावरून या निष्ठावंत शिष्यांची उच्च परंपरा लक्षात येते!

**C. Y. Chintamani**

I met the late Rao Bhadur Kale for the first time in 1923 at the Servants of India Society's Home at Poona. Next some days later I was his guest at Satara and addressed, under his chairmanship, a public meeting in the interests of the Liberal party. There after I used to meet him almost every year either at sessions of the Liberal Federation or at meetings of its Council. The last time I met him was at Poona in the Christmas of 1934 at the session of the Federation, of the reception committee of which he was the chairman. Rao Bahadur Kale always impressed me by his zeal, earnestness and tenacity. I always respected him for these qualities. His death was deeply regretted by me as by numerous others who knew him and his work, as a great loss to the Liberal party and the country.

M. R. Jayakar

In his death we have lost a great, generous and benticent personality. I knew him for many years, and his cordiality and genial temperament made him particularly lovable. His benefactions had endeared him to the people of Maharashtra, and I have no doubt that his memory will survive long after his mortal remains have disappeared.

## चरित्रनायकाची वाङ्‌मयसेवा व मतप्रणाली

### चित्तवेधक विषयावरील मार्गदर्शक पुस्तक

रावबहादुरांनी जे अनेक उपयुक्त असे लहान मोठे इंग्रजी-मराठी ग्रंथ लिहिले त्यात त्यांचा "मुंबई इलाख्यातील जमीनधारापद्धति" (अर्थात् "लँड रेव्हिन्यू कोडाच्या १९२८ च्या बिल नंबर १४ च्या मसुद्याची चिकित्सा") हा ग्रंथ प्रामुख्याने मोडतो. सुप्रसिद्ध साहित्याचार्य श्री. न. चिं. केळकर यांनी त्याला विस्तृत व सटीक पुरस्कार लिहिला असून साऱ्याच्या आणि कराच्या प्रश्नावर भावी कौन्सिल निवडणुका लढविण्याचा सल्ला काही त्रिकालज्ञाकडून दिला जात आहे अशा सांप्रतच्या काली तर हे पुस्तक दीपस्तंभासारखे सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल. या पुस्तकाचे पुरस्कर्ते श्री. केळकर हे आपल्या 'पुरस्कारा'त म्हणतात:-- "आमचे मित्र रावबहादुर रावजी रामचंद्र काळे, एम्. एल्. सी. यांनी जमीनमहसुलासंबंधीचे लेखांक प्रथम बॉम्बे क्रॉनिकल पत्रात प्रसिद्ध करून व तदनंतर एकत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून, खरोखरच फार मोठी लोकसेवा केली आहे. जमीन-महसुलाविषयी सरकारचे धोरण व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ह्या विषयाइतका सर्व राष्ट्राचे चित्त वेधणारा असा दुसरा विषय चालू घडीस नाहीच म्हटले तरी चालेल. प्रांतनिहाय शेतकरी वर्गास शक्यतोवर स्वतःचे पायावर उभे राहून कौन्सिलातील आपल्या लोकप्रतिनिधींच्या सहाय्याने जमीन महसुलाचा कर आणि सेटलमेंट्स् ह्या प्रश्नांचा अखेर निकाल आपापल्या प्रांतिक सरकारकडून लावून घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. अशा परिस्थितीत रावबहादुर काळे यांचे हे सर्वांगपूर्ण टीकेचे लेख केवळ मुंबई इलाख्यातील

कायदेकौन्सिलच्या सभासदांनाच नव्हे, तर इतर प्रांतातील कायदे-मंडळाच्या सभासदांना देखील फार उपयुक्त होतील. कारण सर्व प्रांतात, आणि विशेषतः रयतवारी पद्धत सुरू असलेल्या प्रांतांत, जमीन महसुलाचा प्रश्न तत्वतः एकच आहे." एक मुरब्बी राजकारणी मुत्सद्दी या दृष्टीने प्रस्तुत अभिप्रायाचे महत्त्व निःसंशय निरतिशय आहे.

## जमिनिवरील मालकी सरकारची नव्हे, शेतकऱ्याची

रावबहादुर काळे यांनी आपल्या या पुस्तकातील पहिल्या लेखांकात असे दाखविले आहे की, "सरकारने प्रस्तुत बिल तयार करण्यात जॉइंट पार्लमेंटरी कमिटीचा सल्ला स्वीकारिला नाही व जमीनमहसुलाच्या कराबाबत सन १९२६ साली नेमलेल्या कमिटीतील लोकप्रतिनिधींच्या मताचीही पर्वा केली नाही; उलट मुलकी अधिकाऱ्यांनी जमीन महसुलाच्या व फेर-मोजणीच्या कारभारात गेल्या काही वर्षात रूढ केलेल्या सांप्रतच्या दोषपूर्ण पद्धतीचे कायद्यात रूपांतर करण्याचा प्रयत्न मात्र सरकारने केला आहे." दुसऱ्या लेखांकात त्यांनी जमिनीची मालकी सरकारची की जमीन धारण करणाऱ्याची ह्याचा तात्विक पण अति महत्त्वाचा ऊहापोह करून, व ह्या प्रश्नाचा इतिहास सारांशरूपाने देऊन 'जमिनीची मालकी सरकारची नाही व जनता सरकारास खंडरूपानें वसूल देण्यास मुळीच जबाबदार नाही' असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. हिंदु व मुसलमान राज्यकर्त्यांच्या वेळी अमलात असलेल्या जमीनधारा पद्धतीचा पूर्ण विचार केला तर रावबहादुरांचेच मत खरे असल्याचे दिसून येईल. 'जमिनीवर जर सरकारची मालकी नाही तर जमिनीतील उत्पन्नाचा कितवा हिस्सा सरकारास मिळणे इष्ट होईल?' ह्या प्रश्नाचे उत्तर रावबहादुरांनी फारच मुद्देसूद सिद्धान्ताच्या सहाय्याने असे दिले आहे की, "हा हिस्सा ठरविताना सरकारास जास्तीत जास्त कितवा हिस्सा वसूल करता येणे शक्य आहे, ह्या गोष्टीचा विचार न करता शेतकऱ्यास कितवा हिस्सा देणे झेपेल याचाच प्रामुख्याने विचार केला पाहिजे; अर्थात् हा हिस्सा शेतकऱ्याच्या सामर्थ्यावरूनच ठरविला पाहिजे." सेटलमेंट ऑफिसरांनी अवलंबिलेल्या मार्गासंबंधी संपूर्ण विवेचन रावबहादुरांनी पुस्तकातील तिसऱ्या लेखांकात केलेले आहे, व ह्या बाबतीत त्यांनी स्टँडिंग

अॅडव्हायसरी कमिटी नेमण्याची शिफारस केली आहे. सदरहू कमिटीचे काम म्हणजे सेटलमेंट ऑफिसरांनी सारावाढीबद्दल केलेल्या शिफारसी पारखून पाहणे व रावबहादुरांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे "सदर अधिकाऱ्यांचा जमाबंदीवसुलीचा स्क्रू पिळण्याचा जोर कमी करणे" हे होय. चौथ्या लेखांकात त्यांनी साऱ्याची सूट व तहकुबी ह्यांचा विचार केलेला आहे. जमिनीची मालकी शेतकऱ्यांची, सरकारची नव्हे हे साम्यवादी वाटणारे तत्त्वज्ञान साम्यवादी नसलेल्या पण शेतकऱ्यांच्या कैवारी असलेल्या रावबहादुरांनी या जिल्ह्यात आजकाल क्वचित् व किंचित् उदित होत असलेल्या साम्यवादापूर्वीच व साम्यवाद्यापूर्वीच-अध्यातपाच्याही पूर्वीच सरकारला रोखठोक शब्दात सांगून टाकलेले आहे.

## जमीनधारापद्धति पुस्तकाचा प्रत्यक्ष सुपरिणाम

पाश्चात्य राष्ट्रे इतर उद्योगधंद्यात इतकी पुढारलेली आहेत की, ती शेती हा धंदाच समजत नाहीत, तरीही सरकार योग्य रीतीने कृषिरक्षणाचे कर्तव्य पार पाडीत नाही असा त्यांचा कंठशोष चालूच आहे. १९२६ साली ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या कमिटीने शेतकी मालावर संरक्षक जकात बसविण्यास आपण विरुद्ध आहो असे आपले स्पष्ट मत देऊनही राष्ट्राची चलन पद्धति व सांपत्तिक स्थिति मजबूत पायावर उभारून ती स्थिर करण्याचा उपाय सुचविला होता, व शेवटी त्याचाच तेथे अवलंब करण्यात आला, हे या ओरडीचेच फळ होय. हिंदुस्थानातही रुपया व सुवर्ण यांचे किमतीबद्दल परस्पर प्रमाण ठरवून येथील चलन स्थिर करण्याचा अशाच प्रकारचा प्रयत्न सरकारने केला. परंतु असे करण्याने शेतकऱ्यांची स्थिति तर सुधारली नाहीच; उलट रुपयाच्या कृत्रिम किमतीमुळे शेतकऱ्यांवर शेकडा १२ टक्के धोंड मात्र बसली. मनुष्यास लागणारी आवश्यक धान्ये पिकविण्याकडे लागवडीच्या जमिनीचा उपयोग पुरेसा केला जात नाही, अशी इंग्लंडातील लोकांची तक्रार आहे. हिंदुस्थानात तशा तक्रारीस मुळीच जागा नाही. हिंदुस्थानातील प्रत्येक भागात धान्याची लागवड शेतकरी इतक्या मोठ्या प्रमाणावर करितो की, जनावरास पुरेशी चराऊ जमीन व पुरेसा चारा मिळत नाही. इंग्लंडात पदार्थांच्या किमती ठरवून शेतीचा प्रश्न सोड-

विला जातो, परंतु लागवडीच्या खर्चाची वाढ व शेतकऱ्यांना अगोदरच पुष्कळ बाबतीत न झेपणाऱ्या साऱ्याची वाढ ह्या दोन कारणास्तव हिंदुस्थानातील शेतीचा प्रश्न मात्र निव्वळ पदार्थांच्या किंमती वाढवून सुटत नाही. म्हणूनच की काय सरकारने शेवटी हे बिल सोडून दिले, व रावबहादुरांचा पूर्ण जय झाला ! याशिवाय त्यांची राष्ट्रीय शिक्षण, धर्मार्थ-दीपिका व शिक्षणाचा प्रश्न वगैरे पुस्तकेही अशीच अभ्यास, माहिती व भरीवपणा यांनी युक्त आहेत.

### ब्राह्मधर्म म्हणजे भागवतधर्म

हिंदुधर्म व भागवतधर्म यांचे विशदीकरण करण्यास्तव त्यांनी 'ऐक्या' त मागे एक विस्तृत लेखमाला लिहिली असून ती छापून प्रसिद्ध करण्याचे कार्य केवळ त्यांच्या आजारामुळे लांबणीवर पडून अखेर राहून गेले आहे. त्यांनी सनातनधर्मावर हा जो एक लहानसा मराठी ग्रंथ लिहून ठेविला आहे, व जो आजारी पडण्यापूर्वी काही मित्रास त्यानी दाखविलाही होता, त्या ग्रंथात ब्राह्मधर्माचे ध्येयच आजच्या काळास कसे सर्वतोपरी योग्य आहे व पश्चिम महाराष्ट्रात उच्च ध्येय जनतेपुढे ठेवण्याचे कसे प्रयत्न झाले आहेत यांचा उल्लेख आहे. रानड्यांचे धार्मिक ध्येय त्यानी पूर्णपणे आत्मसात केले होते; व ब्राह्मधर्म ह्या नावाने ओळखला जाणारा धर्मही भागवत धर्मच आहे, व धर्म व भौतिक शास्त्रे ह्यांचा विरोध नाही असे जे रानड्यांचे मत होते त्याचा पुरस्कार या पुस्तकात सुस्पष्ट रीतीने रा. ब. काळे ह्यांनी केला आहे. ते आपल्या गीतेवरील इंग्रजी प्रबंधात एकेठिकाणी लिहितातः-

### " प्रॉटेस्टंट हिंदुइझम् " कसा असावा ?

" Modern scientists are fond to proclaim that the Natural Sciences are not only not antagonistic but lend support to the religious sentiment in man and what the trend of modern thought is verging towards viz. the complete harmony between Religion and Science, is discernable in the teachings of the Bhagawatgeeta which emphasises the need of all our dealings and actions being prompted by

and permeated with a theistic attitude.". गीतेचे त्यानी जे विशेष अध्ययन केले होते त्याचा लाभ ते महाराष्ट्रास अलीकडे श्री. शं. वा. किर्लोस्करांचे आग्रहामुळे देऊ लागले होते. काही वर्षापूर्वी मुंबई येथे भगवद्गीतेतील एकेश्वरी धर्म या विषयावर त्यानी जे एक सुविचारपरिलुप्त व्याख्यान दिले होते त्यातील विचारास अधिक व्यवस्थित स्वरूप देऊन किर्लोस्कर मासिकासाठी गीताधर्मावर त्यानी कित्येक लेख लिहिले होते; व हे सर्व लेख एकत्र करून त्यांची सुधारलेली आवृत्ती छापून काढण्याचा त्यांचा विचार होता. रावबहादुरांच्या गीतेवरील या अप्रसिद्ध प्रबंधात "प्रॉटेस्टंट हिंदूइझम्" कसा असावा याचे मोठे चांगले विवेचन करण्यात आलेले आहे. त्यांच्या एकंदर आयुष्याच्या प्रगतीला त्यांची गीतेतील गति पुष्कळ अंशी पायासारखी कारणीभूत झालेली आहे यात संशय नाही. Introduction to Gita-Dharma-Kaumudi ह्या नावाचा त्यानी हा जो एक विस्तृत इंग्रजी लेख लिहिला आहे त्यात गीताधर्माचे स्पष्टीकरण करण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. हल्ली आपला देश संक्रमणावस्थेत आहे यावरून ते या प्रबंधात म्हणतात:-

### टिळक मताला पुस्तीसह मान्यता

"We are passing through the transitional period of our national life, and at this juncture the people at large need for their guide a scripture whose principles are in accordance with the democratic spirit of the persent times. These are contained in the Bhagavat-gita." सारांश आपल्या देशाने गीताधर्म स्वीकारला तरच लोकांच्या ठिकाणी राष्ट्रोद्धारास अवश्य अशा गुणांचा परिपोष होण्याचा संभव आहे असे ते वारंवार म्हणत. शेंदूर व तेल यांच्या थरामुळे मारुतीचे सत्य स्वरूप जसे लोपून जाते, तद्वत् गीतेवरील भाराभर टीका व भाष्ये ह्यांनी गीतेचा खरा अर्थ लोपवून टाकला आहे व लोक खऱ्या अर्थाला पारखे झाले आहेत, म्हणून टीकाकारांच्या टीकांच्या डोंगरास दुरूनच नमस्कार करावा असे ते सांगत असत. यासाठीच आपल्याला जो सरळ अर्थ वाटतो त्याच्या आधारे त्यांनी गीताधर्मावरील प्रवचने वगैरे तयार केली. टिळक आणि काळे हे दोघेही

गीताप्रेमी आणि गीतावादी. 'कोणत्याही चळवळीला ईश्वराचे अधिष्ठान पाहिजे हेच खरे धर्मरहस्य होय' हे टिळकांनी गीतारहस्यात उत्कृष्ट विशद केलेले तत्व काळ्यांना पूर्ण मान्य होते, फक्त हा कर्मयोग भक्तिपर असावा एवढेच त्यांचे म्हणणे होते.

## धर्मक्षेत्र म्हणजे धर्माचे व कुरुक्षेत्र म्हणजे कर्माचे क्षेत्र

वडोदे येथे १९३३ साली भरलेल्या प्राच्यविद्या परिषदेमध्ये रा. ब. काळे यांनी आपल्या गीताधर्म कौमुदीची 'गीताधर्माचे विवरण' नावाची ही प्रस्तावना वाचली होती. ती प्रस्तावना परिषदेस जमलेल्या विद्वान लोकांस पुष्कळच आवडली. या प्रस्तावनेत ते म्हणतात– "गीता हे सर्व जगात ज्ञात असलेले धर्म पुस्तक आहे. इंग्रजी भाषेमध्ये वॉरन हेस्टिंगजच्या सांगण्यावरून गीतेचे पहिले भाषांतर १७८५ साली विलकिन्स साहेबाने केले व नंतर फ्रेंच, जर्मन वगैरे जगातील सर्व भाषांमध्ये गीतेची भाषांतरे झाली. गीतेतील धर्म हा एका देशाचा धर्म राहिला नसून तो सर्व मानव जातीला लागू आहे. मनुष्यामधील धार्मिक प्रवृत्तीस आधुनिक शास्त्रे अधिक जागृत करतात असा आधुनिक शास्त्रज्ञांचा एक सिद्धान्त आहे. गीतेमध्येसुद्धा धर्म व शास्त्र यांची एकवाक्यता दिसते. 'सर्व कर्मे निष्कामपणे व ईश्वरार्पणबुद्धीने कर' असा गीतेचा संदेश आहे. गीतेमध्ये कोणत्याही एका धर्माचा सांप्रदाय सांगितला नाही. ख्रिश्चन, इस्लाम, सांख्य, योग, मीमांसा, बुद्ध, जैन या सर्व धर्मातील तत्वांचा गीतेत उल्लेख आहे. "मग अपेक्षित ते स्वीकारिती। शाश्वत ते" हे गीतेचे धोरण आहे. हल्लीच्या शिक्षणक्रमातून धार्मिक शिक्षण म्हणून गीताधर्माचा प्रसार करणे आवश्यक आहे. गीतेमधून ज्ञान, कर्म व भक्ति असा उपदेश पृथक्पणे आहे असे म्हणणे चूक असून गीतेचा खरा उपदेश म्हणजे ज्ञान, कर्म व भक्ति ही तिन्ही एकमेकावर अवलंबून असून तिन्ही मार्गांचे योग्य प्रकारे आचरण केले म्हणजे मनुष्यास मोक्ष मिळतो, हा आहे. गीतेतील पहिल्या श्लोकामध्ये गीता धर्माचे सार असून धर्मक्षेत्र ( धर्माचे क्षेत्र ) व कुरु क्षेत्र ( कर्माचे क्षेत्र ) या दृष्टीने भक्ति, ज्ञान व कर्म यांचे बाबतीत आपले कर्तव्य काय असा प्रश्न अर्जुनाने श्रीकृष्णास समरांगणावर विचारला असता त्याचे भगवंताने जे उत्तर दिले आहे त्या उत्तराचे सार

गीतेतील तिसऱ्या अध्यायाच्या ४ ते ९ श्लोकांमध्ये आहे. 'अर्जुना, तू अनासक्त होऊन आपले कार्य उपासनेच्या हेतूनेच कर' हा गीतेचा संदेश आहे." समर्थ मंदिराप्रमाणे एक गीतामंदिरही बांधण्याची त्यांची इच्छा होती ही त्यांच्या उत्कट गीताभक्तीची साक्ष होय.

## 'किर्लोस्कर' च्या अस्पृश्यतानिवारणांकातील प्रश्नोत्तरे

किर्लोस्कर मासिकाविषयी रावबहादुरांना परमावधीचे महत्त्व व ममत्व वाटे. या मासिकांनी पुढे ठेवलेले ध्येय व ते गाठण्यासाठी आखलेले धोरण हे रावबहादुरांच्या प्रागतिक विचाराशी जुळते असल्याने त्यास सहाय्य करण्यात त्यांना मोठा आनंद वाटे. त्यांच्या वाढीस चरित्रनायकाचे हे धोरण पुष्कळअंशी कारण झाले आहे. यापैकी सुप्रसिद्ध किर्लोस्कर मासिकाने १९३३ साली 'अस्पृश्यतेला अर्धचंद्र' या नावाचा जो एक विशेषांक काढला होता त्यावेळी किर्लोस्करच्या संपादकांनी महाराष्ट्रातील अनेक विचारी व विद्वान पुरुषांची या विषयासंबंधाची मते मागवून ती सदर अंकात प्रसिद्ध केली होती. यावेळी संपादकांनी रावबहादुरांनाही इतरांप्रमाणेच जे प्रश्न विचारले होते त्यांची त्यानी पुढीलप्रमाणे उत्तरे दिली होती :—

"**प्र. १.** अस्पृश्यतेच्या इष्टानिष्टतेबद्दल आपले स्वतःचे स्पष्ट मत काय आहे? **उ.** अस्पृश्यता अनिष्ट आहे असे माझे आज चाळीस वर्षांचे ठाम मत आहे.

**प्र. २.** अस्पृश्यतेविरुद्ध मत असण्याचे आपले मुख्य कारण काय? **उ.** मानव जातीत असा भेदाभेद असणे केव्हाही आणि कोणत्याही धर्मास लांछनास्पद आहे हे या मताचे मुख्य कारण होय.

**प्र. ३.** कोठवर सुधारणा झाली म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली असे आपण मानाल? **उ.** बोलणे—बसणे मिळून मिसळून होऊ लागले म्हणजे एकत्र सहवास व साहचर्य होऊन स्पृश्यास्पृश्याचा दर्जा बरोबर होईल; व तो तसा झाला की इतर गोष्टीही नाहीशा होतील. अर्थात् येथवर तरी सुधारणा होणे फार जरूर आहे.

**प्र. ४.** तुमचा एकादा मित्र अस्पृश्य वर्गातील आहे अशी कल्पना केल्यास त्याला आपली अस्पृश्यता दूर करण्यासाठी तुम्ही कोणता उपाय

सुचवाल ? उ. राहणी सुधारून व स्वच्छता राखून सर्व प्रकारे शुचिर्भूत होण्याचा यत्न करण्याचा उपाय मी त्याला सुचवीन.

प्र. ५. तुमच्या हाती अधिकार असता तर तुम्ही अस्पृश्यता कशी दूर केली असती ? उ. अस्पृश्याची दु:स्थिति सर्व प्रकारे सुधारण्याच्या कामी मी त्या अधिकाराचा उपयोग केला असता; आणि त्याला कोणताही व्यवसाय करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले असते."

## 'ऐक्या' चे जनक आणि दिग्दर्शक

वीरतेबद्दल रोमन संस्कृति प्रसिद्ध आहे. बुद्धिमत्तेबद्दल मिसर देश प्रख्यात आहे. पिरॅमिडस्‌बद्दल इजिप्तची तर विलासाबद्दल फ्रान्सची प्रसिद्धि आहे. उपयुक्ततावादाबद्दल व उत्कृष्ट राज्यघटनेबद्दल इंग्लंडची तर शोधकतेबद्दल आणि रसायन शास्त्राबद्दल जर्मनीची कीर्ति आहे. ललितकलाबद्दल जशी इटली तशी संपत्तीबद्दल अमेरिका प्रख्यात आहे, आणि सौंदर्य शास्त्राबद्दल आज प्रत्येकाच्या तोंडी जसे जपानचे नाव आहे तशी अध्यात्माबद्दल हिंदुस्थानची कीर्ति आहे. त्याचप्रमाणे ऐक्याबद्दल साताऱ्याची व त्याच्या रावबहादुरांसारख्या पुढाऱ्यांची प्रसिद्धि आहे. 'ऐक्य' ही संस्था कै. वासी रावबहादुरांचे वाङ्‌मयीन व राजकीय अपत्य आहे. तेच तिचे दिग्दर्शक व संस्थापक होत. या द्वादशवर्षीय बालकावर त्यांच्या, व त्यांच्या मागोमाग त्यांचे उजवे हात व ऐक्याचे आद्य संपादक कै. वासी वाग्भटराव देशपांडे यांच्या झालेल्या अकल्पित निधनाने जी आपत्ति-परंपरा कोसळली आहे तिचे शाब्दिक वर्णन न केलेलेच बरे. पण या सर्व आपत्तींना तोंड देऊन 'ऐक्या'ने आपले जीवित पूर्वीइतक्याच तत्वनिष्ठेने, कार्यव्यापृतत्वाने व सन्मानाने गेल्या वर्षभर कंठिले हा केवळ कै. वासी रावसाहेबांच्या पुण्याईचा प्रभाव होय. आणि जोपर्यंत त्यांची ही पुण्याई छत्ररूपाने त्याच्या पाठीशी आहे तोपर्यंत 'ऐक्य' आपले जीवित आजवरच्याच जोमाने, याहीपेक्षा कठीण आपत्ति ओढवल्या तरी त्यांना तोंड देऊन, टिकविल्यावाचून राहणार नाही. या पत्रासाठी रा. ब. काळ्यांनी केलेल्या मदतीला तोड नाही. ऐक्यातून त्यांनी आपले अनेक उत्कृष्ट लेखही वेळोवेळी जनतेला सादर केलेले आहेत.

## काळ्यांच्या दिवाणगिरीच्या आड आलेले ' ऐक्य ' !

सारा निद्रिस्त हिंदुस्थान ज्यांनी आपल्या अनेक आणि अपूर्व आंदोलनांनी जागृत केला त्या प. पू. रानडे, गोखले, टिळक व गांधीजी या धुरीणांची हिंदुस्थानच्या नकाशात बसविलेल्या ' ऐक्य ' या नावाच्या चारी बाजूस बसविलेली चित्रे आणि " संगच्छध्वं, संवदध्वं, संवोमनांसि जानताम् " ही ऋग्वेदातील ऋचा अशा प्रकारचा ऐक्याच्या मुखपृष्ठावरील ब्रीद-चित्राचा व ब्रीद शब्दाचा थाट पाहिला म्हणजे रावबहादुरांच्या ऐक्यभावा-बरोबर त्यांच्या कल्पकतेचे व नाविन्याचे देखील कौतुक करावेसे वाटते. भारतसेवक समाजाकडून आज जशी ज्ञानप्रकाश, सर्व्हंटस् ऑफ इंडिया, हितवाद इत्यादी नियतकालिके चालविली जात आहेत तसे ' ऐक्य ' ही चालविले जाणे अशक्य होते असे नाही. परंतु तसे झाले नाही हेच त्याच्या गेल्या एका तपाच्या जीवनाचे प्रमुख वैशिष्टय आहे. स्वपक्षीयांच्या दोषा-वर आवरण न घालणारे, परपक्षीयांच्या गुणांवर पांघरूण न घालणारे आणि सरकार आणि परपक्ष यांजवर स्वपक्षाबरोबरच सडेतोड व विधायक टीका करणारे पत्र म्हणून त्याची जी प्रसिद्धी आहे ती या वैशिष्टयामुळेच त्याला प्राप्त झालेली आहे. आणि प्रागतिकाना स्वार्थत्यागाचे आणि परा-क्रमाचे धडे देणारे नियतकालिक म्हणून जी त्याची कीर्ति आहे तीही त्यास त्याच्या या वैशिष्टयानेच मिळालेली आहे. " प्रागतिक मुखपत्र " न म्हणवता " स्वतंत्र विचाराचे नियतकालिक " म्हणून त्याने आपले पाऊल पुढे टाकले यातील इंगित हेच होय. ' ऐक्या ' त सरकारवर येणारी कडक पण यथार्थ टीका व ' ऐक्या ' शी काळ्यांचा असलेला दृढ संबंध हेही त्यांना प्रधानपद न मिळण्याचे एक महत्त्वाचे कारण होते. ' ऐक्या '-संबंधाने जागृत सातारा व मराठी वाङ्मयाची गेली ३५ वर्षे इत्यादी अनेक उत्कृष्ट पुस्तकातही उचित व यथार्थ असे वरील प्रकारचे गौरवपर उद्गार काढण्यात आले आहेत एवढे लिहिले म्हणजे ' ऐक्या ' च्या महत्त्वाची व वजनाची वाचकांना चांगली कल्पना येईल.

## संस्थानी प्रजेसाठी केलेली कामगिरी

### औंधच्या इतिहासात अजरामर होणारे नाव

श्रीमंत राजेसाहेब औंध, औंध दरबार, औंध प्रजाजन व पुढारी आणि औंध सं. सभा यांचा रावबहादुरांच्या कर्तृत्वावर इतका विश्वास व त्यांना त्याजबद्दल एवढा आदर होता की औंध कौन्सिलचे अध्यक्षपद ते सरकारनियुक्त असूनही त्याजकडे आरंभापासून अखेरपर्यंत होते. "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः" हेच खरे. या संबंधी श्रीमंत हे कै. काळे यांच्या निधनानिमित्त औंधास भरलेल्या शोकप्रदर्शक सभेतील भाषणात म्हणाले होते-'प्रा. सभेला आरंभ झाल्यावर तीत आमच्या प्रेमाचा, तसेच आमच्या कै. वडिलांविषयी आदरबुद्धी बाळगणारा एक सदस्य असावा असे आम्हास वाटले. काळे संस्थानाचे रहिवासी असते तर ते लोक-प्रतिनिधी म्हणून खात्रीने निवडून आले असते. आम्हाला कोणत्याही प्रसंगी संस्थानाविषयक वगैरे कसलाही सल्ला विचारावयाचा झाला की कै. रा. ब. काळे व कै. दादासाहेब करंदीकर यांचाच सल्ला आम्ही घेत असू. त्यांच्या-कडून आम्हाला खरा व योग्य तोच सल्ला मिळत असे. आम्हाला गोड वाटावे म्हणून खोटा सल्ला त्यानी कधीही दिला नाही. आनंदाच्या अगर दुःखाच्या प्रसंगी ते आम्हाला आपल्या सुखदुःखाचे सारखेच सहभागी करीत.' पं. सातवळेकर म्हणाले होते-'रा. ब. काळे यांचे नाव औंध संस्थानाला मिळालेल्या स्वराज्याच्या सनदेमुळे औंध संस्थानाच्या इतिहासात अजरामर राहील. कारण औंध संस्थानची स्वराज्याची सनद तयार करण्यासाठी नेमलेल्या कमेटीचे ते एक प्रमुख सभासद होते, व त्या बाबतीत त्यानी इतर सभासदापेक्षा अधिक अविश्रांत मेहनत घेतल्याचे मला माहीत आहे. संस्थानी प्रजा व संस्थान यावर त्यांचे अपरिमित ऋण आहे.'

### सांगलीसाठी केलेले लाखमोलाचे काम

या ऋणातून मुक्त होण्यासाठीच की काय त्यास श्री. औंधकरांनी आपल्या राज्यारोहणाच्या ज्युबिलीचे प्रसंगी सर्वोच्च प्रतीचे सुवर्णपदक देऊन सन्मानिले होते. ज्यावेळी श्रीमंत राजेसाहेब सांगली यांनी राव-

बहादुरांना सांगली रयत असेंब्लीमध्यें सरकारनियुक्त सभासद म्हणून नेमिले तेव्हा त्यांच्यासंबंधाने या श्रीमंत राजेसाहेबांनीही "रा. ब. काळे यांची विद्वत्ता, त्यांचे कायदेपांडित्य आणि त्यांचे पार्लमेंटरी कार्यपद्धतीचे ज्ञान ही सर्व बघून त्यांना या रयत असेंब्लीत नेमण्यात येत आहे; व त्यांच्या या गुणांचा व अनुभवाचा संस्थानास फायदा मिळेल अशी आशा आहे" अशा प्रकारचे सार्थ उद्गार काढले होते. रा. ब. काळे यांच्याच सूचनेवरून सांगली रयत असेंब्लीच्या अधिवेशनामध्ये आपल्या ऋणविमोचन बिलात इनकम- टॅक्समधून शेतकरी वर्गाच्या हितासाठी लहान मुदतीची कर्जे मिळावी व लोकोपयोगी कामे व्हावीत म्हणून ५०,००० रुपयांची निश्चित सोय होऊ शकेल अशी व्यवस्था केली व त्यांची ही कामगिरी त्या संस्थानी प्रजेचे मते लाखमोलाची आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. विधवांना मिळकतीत जास्त हक्क देण्याचे रा. ब. काळे यांचे क्रांतिकारक बिलही याच बैठकीत पास झाले. या बिलान्वये खालसापेक्षा संस्थानी हद्दीतील विधवा स्त्रीवर्गाची स्थिति कितीतरी सुधारणार आहे. नव्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्टाप्रमाणे मध्यवर्ति राज्ययंत्राचे बाबतीत लवकरच संघटनात्मक राज्यपद्धति खालसात अस्तित्वात यावयाची आहे. अशा वेळी छोटया संस्थानांचे राज्यकारभारा- तील अनेक बाबतीत विशेषतः संरक्षणाचे बाबतीत संघटन होऊन त्याचे दक्षिणेतील पूर्वपरंपरागत मुलकी व लष्करी बाबतीत महत्त्व वाढावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. व त्या दृष्टीने त्यांचा औंधचे दिवाण कै. वा. श्री. वा. ना. देशपांडे याजवर फारच भरंवसा होता.

## औद्योगिक कार्य

### स्वदेशी आंदोलनावेळची कामगिरी

समाजसेवेच्या हव्यासामुळे रावबहादुरांनी पडेल ती झीज सोसण्यास कधीही मागे पुढे पाहिले नाही. आपल्या राष्ट्राची, त्यातल्या त्यात महा- राष्ट्राची औद्योगिक प्रगति झाली पाहिजे, तेथे नवनवे कारखाने निघाले पाहिजेत, असे त्यांना नेहमी वाटे. आणि म्हणूनच १९२० साली किर्लोस्कर बंधूंनी लिमिटेड कंपनी सुरू करताना रावबहादुरांचे सहाय्य मागताच त्यांनी

ते दिले. किर्लोस्कर बंधूंशी सुरुवातीपासून जुळलेला स्नेहसंबंध रावबहादुरांनी केव्हाही शिथिल होऊ दिला नाही; उलट तो उत्तरोत्तर दृढतरच होत गेला. कंपनीच्या बोर्डाचे चेअरमन या नात्याने रावबहादुरांनी तिला गेली दहाबारा वर्षे जे सहाय्य केले ते कंपनीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्या–सारखे आहे. कंपनीच्या कारभारात कित्येकदा मोठे अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाले होते; पण रावबहादुरांसारखा कुशल व समतोल वृत्तीचा मार्गदर्शक असल्यामुळेच ते सर्व प्रश्न तिला योग्य प्रकारे सोडवता आले. १९०६ मध्ये म्हणजे स्वदेशी आंदोलनाच्या ऐन भरात कऱ्हाड येथे तत्कालीन सातारा–कलेक्टर मे. ऑर्थर यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या कऱ्हाड मॅच फॅक्टरीस रा. ब. काळे यांची नुसती आर्थिक मदतच केली असे नाही तर कै. दादासाहेब करंदीकरांसमवेत फॅक्टरीची सर्व आंखणी करून या संस्थेला बौद्धिक सहाय्यही पुष्कळ केले. सातारा जिल्ह्यातील ओगले कारखान्यास व सातारा स्वदेशी प्रदर्शनासही त्यांचे असेच सहाय्य असे; व एकदा त्यांनी या प्रदर्शनाचे अध्यक्षत्वही विभूषित केले होते. त्यांनी वेस्टर्न विमा कंपनीचे डायरेक्टर व डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन या नात्यांनी केलेले कार्य तर सर्वविश्रुतच आहे.

## चरित्राचा समारोप

### चरित्रपद्धति व लेखकदृष्टि

हे पुस्तक हातावेगळे करिताना त्याच्या समारोपादाखल येथे चार शब्द लिहिणे अवश्य आहे. चरित्रभूत व्यक्तीच्या जीवनाशी जो समरस झाला आहे असाच मनुष्य खरोखर त्या व्यक्तीचे चरित्र रेखाटण्यास समर्थ ठरेल हे उघड आहे. असे भाग्य प्रस्तुत लेखकास अर्थातच पूर्णत्वाने लाभलेले नाही; व त्या दृष्टीने हे चरित्र केव्हाही अपूर्णच ठरेल हे स्पष्ट आहे. चरित्र लेख–काची दृष्टी निरपेक्ष कुतूहलाची असावी, व चरित्र हे चरित्रनायकाच्या कर्तृत्वाचे विभागशः वर्णन असलेले न लिहिता ते ओघशील म्हणजे जसे जसे घडत गेले तसे तसे कथन केलेले असावे असाही काही चरित्र–वाङ्मय–निपुणांचा दंडक आहे. त्याही दंडकाचे, निदान त्याच्या उत्तरार्धाचे तरी या

पुस्तकात पालन झालेले आढळणार नाही. वेळ, पैसा, श्रम इत्यादि बळाची अडचण हे अर्थात् याचे मुख्य व वरील समजुतीशी मतभिन्नता हे याचे उपकरिण होय. चरित्रपुस्तक हे बोधप्रद दृष्टि ठेवून लिहू नये असेही उपरिनिर्दिष्ट पंडिताचे मत आहे; पण तेही वादग्रस्त आहे; व यात त्याचा अवलंब करण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा नव्हे की लेखक चरित्रनायकाला सर्वगुणसंपन्न मानतो. तो हे जाणतो की, मनुष्य जसा गुणपूर्ण असतो तसाच मनुष्य दोषपूर्णही असतो. परंतु निस्पृहतेचा भलताच बाणा राखण्यासाठी खरोखर असलेलेही गुण दाखवू नयेत, अगर खरोखर नसलेलेही दोष वर्णीत बसावे हे लेखकाचे मनाला पटत नाही. ही तज्ज्ञ मंडळी चारित्र्य शब्दाचा काय अर्थ करितात याचीच शंका येते. कारण साहित्याचा जसा 'स हितेन युक्तं साहित्यं' असा धात्वर्थ होतो तसाच चारित्र्य शब्दाच्या अर्थाचाही प्रकार आहे. सत्प्रवृत्ति, सद्‌वृत्ति, व सुकृति यांचे वर्णन म्हणजेच मुळी चारित्र्य आणि त्याच दृष्टीने हे चरित्र लिहिले गेले आहे. चरित्राच्या पद्धतीही अनेक आहेत. प्ल्युटार्क हा सारासारविवेचनयुक्त चरित्रकथनाबद्दल प्रसिद्ध आहे, तर बॉस्वेल हा नाट्यसदृश चरित्रलेखनाबद्दल विख्यात आहे. लिटनस्ट्राची हा व्यक्तिजीवन वर्णन करण्याबद्दल नामवंत झाला आहे तर लुडविगचे हेतु व परिस्थिति यांच्या विश्लेषणासह जीवनचित्र रंगविणे हे वैशिष्टय आहे. या पुस्तकात बॉस्वेलच्या पद्धतीपेक्षा इतरांच्या पद्धतीचीच थोडीबहुत छटा फारतर आढळून येईल.

## मेकर्स ऑफ सातारा !

कै. वासी रावबहादुरांचे नाव या जिल्ह्याच्या प्रगतीचा जो अर्वाचीन इतिहास यापूर्वी लिहिला गेला आहे त्यात " मेकर्स ऑफ सातारा " या मालिकेत अग्रस्थानी नमूद करण्यात तर आले आहेच; पण यापुढेही नुसत्या या जिल्ह्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्याही प्रगतीचा जो इतिहास लिहिला जाईल त्यातही त्यांचे नांव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. त्यांच्या दुःखद निधनाने महाराष्ट्राला, व विशेषतः या जिल्ह्याला, जे पोरकेपण आले आहे ते अल्पावधीत तरी नष्ट होण्याचा संभव दिसत नाही. त्यांच्या निधनापर्यंत जिल्ह्यात त्यांचे वैशिष्टयभूत असलेली जी सर्वपक्षीय

ऐक्याची भूमिका अस्तित्वात होती ती अवघ्या एका वर्षाच्या अवधीत शतशः विदीर्ण झाली आहे; व ती पुनरपि लवकर पूर्ववत् होण्याची चिन्हे दुर्दैवाने दिसत नाहीत. त्यांच्या निधनाने झालेल्या या जिल्ह्याच्या अतीव हानीचे याहून समर्पक असे प्रत्यंतर दाखविण्याचे कारण नाही. थोर महात्म्यांचे स्मृतिदिन हे नुसते त्यांच्या गुणगौरवाचे गायन करण्याचे प्रसंग नसून त्यांच्या कृतीच्या अल्पस्वल्प तरी अनुकरणाची प्रतिज्ञा करण्याचे मुहूर्त होत, असे रावबहादूर नेहमी म्हणत असत. ठरीव अंतराने ते (स्मृतीदिन) या कर्तव्याची जागृति करण्यासाठी सामान्य वृत्तीच्या जीवांना धक्का देतात, हे त्यांचे कार्य आहे. असा पहिला धक्का त्यांच्या (रावबहादुर यांच्या) आजच्या प्रथम स्मृतिदिनाने (१७ जानेवारी १९३७) आपणा सर्वांना दिला आहे. म्हणून आजच्या पुण्य प्रसंगी आपण मनाचा असा निश्चय करू या की, ज्या स्वार्थ-निरपेक्ष वृत्तीने रावसाहेबांनी आपल्या मातृभूमीची सेवा केली, ज्या निर्भय-तेने त्यांनी दीन जनतेची बाजू उचलून धरली, ज्या उच्च मनोवृत्तीने त्यांची दिनचर्या सदैव प्रेरित झालेली होती, व ज्या निष्कपटवृत्तीने व प्रामाणिक बाण्याने त्यांनी अखेरपर्यंत आपली जीवितयात्रा चालविली, त्या प्रत्येकाचे आपण यथाशक्ति व यथामति आचरण करू. रावबहादुरांचे शरीर गेले असले, तरी अंतर राहिले आहे आणि ते ऐक्याचे आहे ! त्यांची मूर्ति गेली असली, तरी कृति राहिली आहे आणि ती ऐक्याची आहे ! त्यांची काया गेली असली, तरी छाया राहिली आहे आणि ती ऐक्याची आहे !

## पुरुषोत्तम म्हणजे ईश्वरी ठेव

लेखकाने प्रथम चित्रिलेला भगतसिंग आणि आता चित्रिलेला पुरुषोत्तम यांच्यात साधनदृष्ट्या दक्षिणोत्तर ध्रुवाइतके अंतर असले तरी साध्यदृष्ट्या त्यांच्यात अंतर दाखविता येणे अशक्य आहे. उपास्य हे जितके एक तितकेच उपासना प्रकार अनेक, त्यापैकीच ही गोष्ट आहे. क्रांतीचा वृक्ष होतो तो तरी उत्क्रांतीच्या बीजापासूनच. वाचकांनी या चरित्राचे मनन याच दृष्टीने करावयाचे आहे व लेखकाला या उभय पंथापैकी कोणताच पंथ पूर्णतः मान्य नसताही त्याने हे चरित्र लिहले तेही याच दृष्टीने होय. क्षीरसागराचे मंथन करिता त्यातून जसे उच्चैश्रवासारखे अश्वरत्न

आणि ऐरावतासारखे गजरत्न प्राप्त झाले तद्वत् साताऱ्याच्या जीवन-सागराचे मंथन करिता त्यातून काळ्यासारखे मौक्तिक व करंदीकरांसारखे माणिक मिळाले अशी उपमा अगर असे रूपकही या प्रसंगी-चरित्र म्हणजे कादंबरी नसताही-सुचल्यावाचून रहात नाही. इराणात व ब्रह्मदेशात मौक्तिके व माणके मिळतात खरी पण ती बहिरालंकाराची होत, परंतु ही मौक्तिके व माणके म्हणजे राष्ट्रपुरुषाच्या अंतरालंकाराची होत. गुणसंपन्न पुरुष ही एक परमेश्वराची ठेव असते, ती परत नेल्याबद्दल परमेश्वरास दोष देण्यापेक्षा त्याने ती इतका काळ ठेवली याबद्दल परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत असे जे शेक्सपियरने म्हटले आहे त्याचे याप्रसंगी स्मरण करीत आणि पुरुषोत्तमाने रुग्णशय्येवरून " बाबांनो ! कार्यक्रम लहान का असेना, पण तो काही निश्चित स्वरुपाचा आखा. तुमच्या कार्यक्रमात भारा-भर बाजारबुणगे असण्यापेक्षा धडाडीने व एकदिलाने काम करणारे मोजकेच निष्काम कार्यकर्ते असले, तर तो कार्यक्रम पार पाडण्यास त्यांचा फार उपयोग होईल हे लक्षात ठेवा " असा जो उत्तेजक संदेश दिला आहे तो उद्धृत करीत हे चरित्र पुरे करितो.

• • •

# परिशिष्ट पहिले

## (१)

( मंगळवार दि. २१ जानेवारी १९३६ रोजी प्रसिद्ध झालेल्या "केसरी" तील मृत्युलेख)

### कै. रावबहादूर काळे

जन्म :- इ. स. १८६८ ) ( मृत्यु इ. स. १९३६

कळविण्यास अत्यंत खेद होतो की, साताऱ्चे सुप्रसिद्ध प्रागतिक पुढारी रा. ब. रावजी रामचंद्र काळे यांना गेल्या शुक्रवारी रात्री पुणे मुक्कामी ( त्यांचे जामात श्री. धनंजयराव गाडगीळ यांचे घरी ) देवाज्ञा झाली.

श्री. दादासाहेब करंदीकर कालवश झाल्यानंतर आठच महिन्यात रा. ब. काळे कालवश व्हावेत ही साताऱ्ची अपरिमित हानी होय. ती हानी साताऱ्यापुरतीच जाणवणारी नसून सर्वत्र महाराष्ट्रालाही जाणवल्याखेरीज रहाणार नाही. त्याचे कारण रा. ब. काळे यांचे सार्वजनिक कर्तृत्वही तसेच व्यापक होते हेच होय.

गेल्या शनिवारी त्यांच्या अंत्ययात्रेस जी सर्व पक्षातील पुढारी मंडळी उपस्थित होती व त्यांनी तेथे जी हार्दिक भाषणे केली त्यावरून हेच स्पष्ट होईल.

रावबहादूरांचा जन्म सातारा जिल्ह्यात विटे येथे १८६८ साली झाला. त्यांचे दुय्यम शिक्षण पुण्यास विश्रामबागेतील पूना हायस्कूलमध्ये झाले. बुद्धिवान व मेहनती विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति असे. संस्कृत विषयात तर ते विशेष प्रवीण होते. १८८५ साली मॅट्रिक परीक्षेत त्यांनी दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप् पटकाविली. पुढे डेक्कन कॉलेजात गेल्यावर इंटरमीजिएट व बी. ए. च्या परीक्षेत त्यांनी संस्कृत स्कॉलरशिप्स मिळविल्या. बी. ए. च्या परीक्षेत ते भाऊ दाजी प्राइझ मिळवून पहिल्या वर्गात पास झाले होते. बी. ए. झाल्यावर ते त्याच कॉलेजात फेलो झाले व पुढे

एल्फिन्स्टन कॉलेजात संस्कृताध्यापक म्हणून त्यांनी काही दिवस काम केले. १८९२ साली एल्एल्. बी. होऊन ते साताऱ्यास वकिली करण्यास गेले. तेव्हापासून गेल्या ४० वर्षांत आपल्या कर्तृत्वाने त्यांनी तेथले प्रागतिक पक्षाचे पुढारीपण मिळविले व टिकविले.

विद्यार्थीदशेत बुद्धिमत्तेच्या व व्यासंगाच्या जोरावर त्यांनी जे यश मिळविले तसेच त्यांनी आपल्या वकिलीच्या धंद्यातही मिळविले. श्री. दादासाहेब करंदीकरांच्या बरोबरीने ज्यांचा उल्लेख करावा लागेल असे ते दुसरे एकटेच वकील साताऱ्यात होते. किंबहुना दादासाहेबांच्या विरुद्ध पक्षकारांचे काळे वकील असावयाचे असे ठरूनच गेले होते. या वकिलीच्या धंद्यात त्यांनी अलोट पैसा मिळविला.कायद्यातील सूक्ष्म ज्ञान, विपुल अनुभव, तडफदार वृत्ति, अशिलाविषयी खरी कळकळ या गुणांमुळे तर न्यायाधिशांनाही त्यांच्याविषयी भीति आणि आदर वाटत असे. १९०२नंतर त्यांना सरकारतर्फे वकील नेमण्यात आले. १९२० नंतर मात्र त्यांनी धंद्यातले लक्ष पुष्कळच कमी केले व ही अखेरची १५ वर्षे तर बहुधा त्यांनी सर्वसाधारण सार्वजनिक कार्यातच व्यतीत केली असे म्हणावयास हरकत नाही. १८९६ साली म्हणजे वकीलीस सुरुवात केल्यानंतर चारच वर्षांनी त्यांनी सातारा येथे "लिबरल असोसिएशन"ची स्थापना केली व आज ४० वर्षे ती टिकविली. १९०० साली प्रान्तिक राजकीय परिषदेबरोबर सामाजिक परिषदही त्यांनी भरविली होती. १९२० साली ते सातारा जिल्ह्यातून प्रांतिक कायदेमंडळात प्रागतिक पक्षातर्फे निवडून आले. त्यानंतर १९२१ ते १९३५ या कालखंडात ते १२ वर्षेपर्यंत कायदेमंडळाचे सभासद होते. म्युनिसिपॅलिटया, लोकलबोर्ड इ. स्थानिक स्वराज्य खात्यातील निरनिराळया अंगाचा पुष्कळ अनुभव त्यांना असल्यामुळे कायदे-कौन्सिलातही त्यांची कामगिरी चांगली झाली. अगदी अलिकडे तर कौन्सिलातील सरकारविरोधी पक्षाचे पुढारीपणही त्यांना मिळाले होते.

पक्षाचा प्रश्न सोडला तर सार्वजनिक हिताच्या दुसऱ्या कोणत्याही कार्यात ते आपुलकीने सक्रीय मदत करीत. साताऱची कन्याशाळा, आर्यांग्ल वैद्यक विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, हरिजन कार्य यांना त्यांची किती आर्थिक

मदत झाली आहे हे प्रसिद्धच आहे. मसूरच्या ब्रह्मचर्याश्रमावरील ज़प्ती उठविण्याचे कामी त्यांचे परिश्रम बरेचसे कारणीभूत झाले. १९३० साली त्यांनी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीस सव्वा लाख रुपयांची देणगी देऊन पुण्यास अर्थशास्त्र विषयक व राजकारणविषयक संशोधन संस्था कै. ना. गोखल्यांच्या नांवाने काढली असो.

रा. ब. काळयांच्या मृत्यूने सातारा जिल्ह्याचीच नव्हे तर महाराष्ट्राचीही मोठी हानी झाली आहे. शनिवारी सकाळी त्यांची मोठी प्रेतयात्रा निघाली होती त्यावेळी महर्षि आण्णासाहेब कर्वे, श्री. न. चिं. केळकर, श्री. विनायकबुवा मसूरकर महाराज, भाऊसाहेब सोमण, रा. सा. काळभोर आमदार कामत वगैरे निरनिराळ्या पक्षातील सातारची व पुण्याची २००-३०० माणसे हजर होती. चितेस अग्नि देण्यापूर्वी प्रो. धोंडोपन्त कर्वे, न. चिं. केळकर, भाऊसाहेब सोमण, वासुकाका जोशी, विनायकमहाराज मसूरकर, बॅ. गाडगीळ व श्री. कामत यांची हृदयस्पर्शी भाषणे झाली.

## (२)

## ( समर्थ सातारा २०-१-१९३६ च्या अग्रलेखावरून )

सरकारी वकिलीचा पाश सुटल्यावर काळे यांनी जी सार्वजनिक कामे केली ती अत्यंत नेटाने व निस्पृहतेने केली. बहुजन समाजाशी त्यांचा एकजीव होऊ लागला. राष्ट्रीय सभेबद्दल त्याना अभिमान असे व त्यात त्याग करणाराबद्दल मतभेद असूनही आदर असे... प्रखर बुद्धिमत्ता, भरपूर माहिती व सडेतोडपणा हे त्यांच्या वकिलीचे वैशिष्टच होते. भागवत धर्मावर त्यांचा अढळ विश्वास असे... गीतेवरील त्यांचा व्यासंग मह्शूरच आहे. त्यांचे औदार्य अनुकरणीय आहे... संस्थानी प्रजेच्या हितासाठी ते सतत झटत... मुंबई कौन्सिलात त्यानी केलेले काम हे त्यांचे आयुष्यातील प्रमुख सार्वजनिक कार्य. १९२८ मध्ये सायमन कमिशनबद्दल अविश्वास व्यक्त करून बहिष्कार घालावा या अर्थाचा ठराव मांडून, वेळ आली म्हणजे सरकारशी असहकार करणे कसे भाग पडते ते दर्शवून राष्ट्रीयाकडूनही त्यानी शाबासकी मिळविली. १९३५ साली फर्मानशाही कायद्याना त्यानी विरोध केला व वॉक्

औट् करून सरकारचे धोरणाचा फोलपणा जनतेसमोर मांडला. अस्पृश्यांचा उद्धारक आणि प्रागतिकांचा सातारा जिल्ह्यातील आधारस्तंभ काळयांच्या मृत्युने नाहीसा झाला आहे.

(३)

( अभ्युदय कराड ३१-१-१९३६ च्या अग्रलेखावरून )

पाऊण एक वर्षापूर्वी सातारा जिल्ह्याचे संजीवक दादासाहेब करंदीकर यांचा कैलासवास झाला (२४ एप्रिल १९३५) तर गेल्या १७ (जानेवारी १९३६) तारखेस सनदशीर राजकारणाचे रणशूर रावबहादूर ( रावजी रामचंद्र ) काळे हे कालवश झाले ! स्वतःच्या मोठेपणाची फारशी पर्वा न करता आपण जे कार्य ज्या क्षेत्रात करतो; ते कार्य व ते क्षेत्र पहिल्या प्रतीचे व पहिल्या मानाचे झाले पाहिजे या हिय्याने रा. ब. काळयांनी अगदी विद्यार्थीदशेपासून मरेतोपर्यंत आयुष्य काढले आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या, कर्तृत्वाच्या आणि दातृत्वाच्या जोरावर सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या व मुंबई इलाख्याच्या आदरस्थानी अढळ बसविला. १८९२ सालीच हरिजनसेवेला आणि अबलोन्नतीला काळयानी सुरवात केली. १९२०ला माँटफोर्ड सुधारणा उगवल्यानंतर काळे प्रत्यक्ष राजकारणात शिरले आणि तेथे त्यानी आपले राजकीय गुरु न्या. रानडे व ना. गोखले यांची धिमी पण बाणेदार, मऊ पण स्पष्ट, सहकारी पण सडेतोड वृत्ती अशी जागृत ठेवली की विरोधीपक्षाचे पुढारीपण निर्विवादपणे काळयांच्याकडे आले... काळयांचा मोठेपणा "पडद्यामागील धीमेपणाच्या खऱ्या राष्ट्रीय बांधणीत" च आहे. न्यू इंग्लिश स्कूल ( सातारा ) टिळक हायस्कूल ( कऱ्हाड), कन्याशाळा, शाहू बोर्डिंग ( सातारा ) यांना काळयांनी लावलेला हातभार आणि विशेष म्हणजे राष्ट्रीय सभेशी आपले कितीही मतभेद असले तरी तिच्या सेवेपायी प्राणानिशी सादर होणाऱ्याच काय, पण कोणाही तरुणाचा तेजोभंग होऊ नये, म्हणून काळयांनी घेतलेली दक्षता काळयांच्या भागवत धर्मनिष्ठ मनाची श्रेष्ठता सिद्ध करतात.

—पु. पां. गोखले

# परिशिष्ट दुसरे

## रा. ब. रा. रा. काळे विश्वस्त निधी

रा. ब. रा. रा. काळे यांनी त्यांच्या ह्यातीत अनेक संस्थांना देणग्या दिल्या. त्यातील मोठी देणगी म्हणजे पुणे येथील सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी या संस्थेस "गोखले अर्थ शास्त्र संस्था" स्थापन करण्यासाठी १९३० जूनमध्ये दिलेली रु. १,२०,७०० ची देणगी होय. त्या संस्थेची वाढ आता खूपच झालेली असून त्यासंबंधीची माहिती या चरित्राचे शेवटी दिलेली आहे.

१९३१ च्या जुलैमध्ये त्यांनी आपल्या इस्टेटीची आपल्या मृत्यूनंतर कशी व्यवस्था व्हावी यासंबंधी एक व्यवस्थापत्र (मृत्यूपत्र) केले होते पण त्यानंतर १९३४ जुलै मध्ये झालेल्या त्यांच्या पत्नींच्या मृत्यूनंतर १९३५ च्या जूनमहिन्यात त्यांनी पहिल्या व्यवस्थापत्राला जोडूनच एक पुरवणी व्यवस्थापत्र तयार केले. त्यांच्या मृत्यूनंतर या व्यवस्थापत्रकानुसार विश्व-स्ताची नेमणूक होऊन "रा. ब. रा. रा. काळे धर्मादाय विश्वस्त निधीची" स्थापना होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणे विश्वस्तानी व्यवस्था पहावी असे नमूद केलेले आहे. हे व्यवस्थापत्र नोंदविण्यात आलेले नव्हते. फक्त दोन साक्षी-दारांच्या सह्या व त्यांची स्वतःची सही एवढे त्यात होते.

१७ जानेवारी १९३६ रोजी पुणे मुक्कामी त्यांच्या मुलीच्या घरी त्यांचे देहावसान झाले. विश्वस्त म्हणून चार जणांची नेमणूक करण्याची तरतूद व्यवस्थापत्रात केली होती कार्यकारी विश्वस्त म्हणून त्यांच्या कन्या सौ. प्रमिला गाडगीळ विश्वस्त नं. २ त्यांचे जामात प्रा. धनंजय रामचंद्र गाडगीळ, नं. ३ त्यांचे पुतणे श्री. सिद्धेश्वर गोविंद काळे व चौथे विश्वस्त म्हणून कन्येच्या मुलापैकी एक असे नमूद केलेले आहे.

त्यावेळी कन्येची मुले अज्ञान असलेने चौथ्या विश्वस्तासंबंधी काय-देशीर सल्ला घ्यावा असे ठरून प्रि. रा. रा. घारपुरे (प्रिन्सिपॉल, लॉ कॉलेज

पुणे) यांचे मत घेतले. व रावबहादुरांचे जिवलग स्नेही सरदार गो. कृ. उर्फ बापूसाहेब काळे (रिटायर्ड डि. जज्ज) यांची नेमणूक त्यांची संमति घेऊन करावी असे ठरले. त्यांचे कायद्याचे ज्ञान, गाडगीळ कुटुंबीयांबद्दल वाटणारी आपुलकी व अत्यंत चोख कारभार यामुळे विश्वस्त म्हणून काम करण्यास त्यांनी संमति दिल्याने अननुभवी अशा इतर विश्वस्तांना मोठाच दिलासा मिळाला. त्यांचे मार्गदर्शन ऑक्टोबर १९५२ पर्यन्त म्हणजे त्यांच्या मृत्यू-पर्यंत लाभले. त्यानंतर चौथी विश्वस्त म्हणून कु. सुलभा गाडगीळ हिची नेमणूक १९५३ साली करण्यात आली.

सदरील विश्वस्त निधी खाजगी असल्याने १९५० च्या पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली बसत नव्हता. पण सुरक्षिततेच्या दृष्टीने तो नोंदवावा असे विश्वस्तांना वाटल्यावरून १७ जुलै १९५४ रोजी सातारा येथील सब रजि-स्ट्रार यांचे कचेरीत तो नोंदविण्यात आला आणि पब्लिक ट्रस्ट ॲक्टप्रमाणे नोंदणी सर्टिफिकीट घेण्यात आले.

दरवर्षी चार्टर्ड अकाउन्टन्टकडून निधीचे हिशेब तपासून घेण्याची व्यवस्था सुरवातीपासूनच करण्यात आलेली आहे. विश्वस्त निधीचा वार्षिक अहवाल दि. १७ जानेवारी रोजी सातारा येथील कन्याशाळेत त्यांच्या श्राद्धदिनाचे दिवशी घेण्यात येणाऱ्या सभेत वाचून दाखविण्यात येतो व सातारा येथील वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी देण्यात येत असतो.

विश्वस्त निधीची रक्कम आता तीन लाखाच्या जवळपास असून त्या रक्मेवर येणाऱ्या व्याजाचा विनियोग, अनेक लोकोपयोगी संस्था आणि गरीब पण होतकरू व लायख असे विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना मदत म्हणून करण्यात येत असतो.

– प्रमिला गाडगीळ

# परिशिष्ट तिसरे

## रयत शिक्षण संस्था, सातारा

सातारा जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातीलच प्रसिद्ध कायदेपंडित, राजनीतिज्ञ, राजकारणी, सामाजिक व शैक्षणिक कार्यकर्ते व न्या. रानडे यांचे नि:स्सीम भक्त रा. ब. आर. आर. काळे यांचे निधन ता. १७-१-१९३६ रोजी पुणे येथे झाले व महाराष्ट्राचे फारच नुकसान झाले. तथापि त्यांच्या निधनाने बहुजन समाजाचा कैवारी व कळवळीने कार्य करणारा खंदा वीर हरपला व बहुजन समाजाची फारच हानि झाली.

कै. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून महाराष्ट्रामध्ये जो शिक्षण प्रसार केला, गोरगरिबांच्या झोपडी-पर्यंत ज्ञानाची गंगा पोचविली, त्या प्रसिद्ध रयत शिक्षण संस्थेच्या बाल्याव-स्थेत कर्मवीर आण्णांच्या खांद्याला खांदा लावून रा. ब. काळे यांनी कार्य केले होते, हे अनेकांना माहित नाही. कै. आण्णांचे व कै. रा. ब. काळे यांचे बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारा विषयीचे विचार एक होते. देशातील बहुजन समाज साक्षर झाल्याशिवाय देशाची सर्वांगीण उन्नति होणार नाही हे त्यांना पूर्णपणे माहित होते. यामुळे कर्मवीर आण्णा हे त्यांच्याकडे आकर्षित झाले. ज्या ज्या वेळी रा. ब. काळे हे मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीला उभे रहात त्यावेळी कर्मवीर आण्णा हे आपले बंधुच उभे राहिले आहेत असे समजून त्यांच्या प्रसाराच्या सभा शेकडोनी घेत, जिल्हा हादरून सोडीत. कष्टाची तमा न बाळगता एकाद्या शाहिराप्रमाणे आपल्या रांगड्या व तुफानी आवाजाने ते प्रचार करीत. कर्मवीर आण्णांचे हे कार्य पाहून रा. ब. काळे हे आण्णांच्या व्यक्तिमत्वाकडे अधिकच ओढले गेले व दोघांची घनिष्ट मैत्री जमली.

कर्मवीर आण्णांनी १९१९ मध्ये काले गांवी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. परंतु या गांवी या संस्थेचे कार्य म्हणावे तसे चालेना म्हणून त्यांनी या संस्थेचे कार्य सातारा येथे १९२४ मध्ये सुरु केले. प्रथम या संस्थेचे

कार्य वसतिगृह स्थापून सुरू झाले. अनेक जातीची व धर्माची मुले या वसतिगृहात ठेवली होती. सुरुवातीस सोमवार पेठेत भाड्याने घेतलेल्या इमारतीत हे वसतिगृह सुरु होते. काही विद्यार्थ्यांना आण्णा आपल्या घरीच जेवण देत. काही मुले त्यांच्या स्नेह्याकडे आळीपाळीने जेवावयास पाठवीत. परंतु विद्यार्थ्यांची संख्या जास्त वाढल्यावर गावातील खानावळीमध्ये यांची सोय केली. परंतु ही सर्व जातीची व विशेषत: अस्पृश्य समाजाची मुले पाहून त्यांना खानावळीत जेवण देण्यास कोणी धजेना. काही जण तयारी दाखवीत. परंतु अंगणात जेवावयास वाढीत. असा प्रकार आण्णांना आवडत नसे. परंतु त्यावेळी इलाज नव्हता. पुढे आण्णांनी साताऱ्च्या छत्रपति महाराजांकडून त्यांचे मालकीची 'धनिणीची बाग' व 'काकडे बाग' (सुमारे दहा एकर) ही खंडाने घेतली. व त्यामध्ये वसतिगृह हलविले. यानंतर या बागेतील सर्व शेतीची कामे विद्यार्थी करू लागले. स्वयंपाकाचे काम देखील विद्यार्थीच करु लागले. पुढे दरवर्षी विद्यार्थी मिळविण्यासाठी आण्णा गावोगाव हिंडू लागले. कर्मवीर आण्णांच्या ओळखीचे व माहितीचे जेवढे शिक्षक होते त्यांच्याकडे ते जात व हुषार विद्यार्थी निवडून ते वसतिगृहात ठेवणेसाठी घेऊन येत. विद्यार्थ्यांचा सर्व खर्च आण्णा करीत. परंतु वसतिगृहात अनेक जातीची व विशेषत: हरिजन विद्यार्थी आहेत हे पाहून मुलांचे पालक मुलगा आण्णांच्या बरोबर पाठविण्यास धजत नसत. परंतु मुलांचे गुरुजी व आण्णा पालकांची समजूत घालीत. व मुलगा वसतीगृहात पाठविण्यास राजी करीत. हे काम म्हणजे अत्यंत जिकीरीचे होई. अशी मुले त्यावेळी म्हणजे १९२६ चे सुमारास ५०।६० होती.

रयत शिक्षण संस्थेला सरकारी अनुदान नव्हते. ही अनेक जातीची मुले एकत्र रहातात व जेवतात म्हणून समाज या वसतीगृहाची 'महारामांगाचे बोर्डिंग' म्हणून हेटाळणी करी. यामुळे या वसतीगृहाला मदत करण्याचे तर राहोच परंतु या कार्यास अनेक विघ्ने आणून हे कार्य बंद कसे पडेल यादृष्टीने प्रयत्न करीत. यामुळे या वसतीगृहाला मदत मिळविणे कर्मवीर आण्णांना फार जिकीरीचे होई. आण्णांचे स्नेही सोबती व कार्याचे जें काही हाताच्या बोटावर मोजण्याइतपत चाहते होते त्यांचेकडून अल्पशी

मदत मिळे. परंतु त्याने खर्चाचा प्रश्न सुटत नसे. वारंवार उद्याची चिंता पडे. आण्णांच्या त्यागी पत्नी सौ. लक्ष्मीबाई पाटील या आण्णांना या कार्यात पूर्णपणे मदत करीत. इतकेच नव्हेतर जवळचे होते नव्हते ते यासाठी खर्च केलेच. परंतु अंगावरचे दागिने देखील या कार्यासाठी खर्च केले. असे सोने सुमारे ७०।८० तोळे खर्च केले. परंतु खाणारी तोंडे फार व जमा बाजू शून्य. यामुळे आण्णा व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई मेटाकुटीस आले. सगेसोयरे नावे ठेवू लागले. आई वडिलांनी दूर लोटले. समाजाने बहिष्कार टाकला. स्वत:ची पुंजी संपून गेली. रोज मिळवावे व मुलांना जेवू घालावे. अशारीतीने या दोघांनी वर्षानुवर्षे काढली. हाडाची काडे केली. घोर मन:स्ताप सोसला. परंतु ते या कार्यापासून काडीमात्र ढळले नाहीत. ही अनाथ बालके शिक्षण घेतात, गुण्यागोविंदाने रहातात, नाचतात, बागडतात हे पाहून या दोघांना धन्यता वाटे. सगळा श्रमपरिहार नाहीसा होई. याच पुंजीवर ते उभयता जगत होते म्हटले तर काहीच वावगे नाही. सन १९२७ मध्ये या कार्यास राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी भेट दिली. भेट दिली कसली आण्णांनी भेट घडवून आणली. ही भेट होऊ द्यावयाची नाही अशी खटपट समाजातील उच्चपदस्थ, परंतु कोत्या विचारांच्या मंडळींनी केली, परंतु हा बेत आण्णांनी कुशलतेने व बंडखोरीने हाणून पाडला. महात्मा गांधींनी वसतीगृहास भेट दिली. कार्याचे खूप कौतुक केले. "अनेक ठिकाणी फिरलो परंतु असे वसती-गृह जो समाज एकजिनसी व्हावा असे आम्ही इच्छितो या समाजाच्या स्थापनेकरिता झटणारे माझ्या पाहाण्यात नाही." असे म्हणाले. हरिजन व मुसलमान विद्यार्थी संस्कृतमध्ये पहिले आल्याचे ऐकून त्यांनी त्या मुलांच्या गळ्यात हार घालून कौतुक केले. नंतर आण्णांच्या मागणीनुसार महात्मा-जींनी त्यांच्या 'हरिजन सेवक वेल्फेअर फंडातून' वार्षिक रु. ५०० ची मदत या वसतीगृहास सुरू केली. हीच मोठी व कायम स्वरूपाची पहिली मदत रयत शिक्षण संस्थेस मिळाली.

यानंतर सरकारने या वसतीगृहास अनुदान देण्याचे नाईलाजाने ठर-विले. परंतु एक अट घातली. जर महात्माजीकडून येणारी मदत नाकारली तर ग्रॅन्ट सुरू करण्याचे योजिले. परंतु आण्णांनी सरकारला बाणेदारपणे

उत्तर दिले की, ' महात्माजींची मदत मी स्वीकारणारच ही मदत घेऊन जर आपण ग्रँन्ट देणार असाल तरच ती मी स्वीकारीन, नाही पेक्षा मला सरकारची मदत नको आहे ' अखेर सरकारला आपला गैर हट्ट सोडावा लागला व अनुदान सुरू करावे लागले.

हे कार्य करीत असताना आण्णा सातारा शहर व जिल्हा या मधील अनेक मोठ्या लोकांची मदत घेत. त्यांना वारंवार भेटत. यामध्ये प्रमुख जी मंडळी होती त्या पैकी रा. ब. काळे हे एक प्रमुख होते. कर्मवीर आण्णा यांनी काही काळ सत्यशोधक चळवळीत काम केले असल्यामुळे व त्यांचे विचार ब्राह्मण्याविरुद्ध असल्याने बहुतेक ब्राह्मणवर्ग त्यांच्यावर चिडून होता. आण्णांना जेणे करून त्रास देता येईल, कार्यात अडचणी उभ्या करता येतील तेवढा करण्याचा प्रयत्न करीत होता. तथापि या समाजातही काही विचार- वंत असे होते की सर्व समाज एकजिनसी झाला पाहिजे. व तो सर्व सुशिक्षित झाला पाहिजे. असे त्यांचे म्हणणे होते. अशी मंडळी आण्णांना मदत करीत. यापैकीच रा. ब. काळे हे एक थोर गृहस्थ होते.

रा. ब. काळे हे प्रसिद्ध वकील होते. त्यांचा राजकारणातही मोठा भाग होता. शिक्षण कार्याकडे त्यांचे फार लक्ष होते. आण्णांचे ते फार चहाते होते. यामुळे ते वारंवार संस्थेस भेट देत. आण्णांच्या कार्यास वळकटी येण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. सातारा नगरपालिकेचे अध्यक्ष असताना सातारा शहरात जो मातब्बर पाहुणा येईल त्यास आण्णांचे कार्य हटकून दाखवीत. ' सातारा शहरातील हे एक नमुनेदार कार्य आहे ' असे प्रत्येकास आवर्जून सांगत. पुढे पुढे आण्णांच्या कार्याशी ते इतके एकरूप झाले की प्रत्येक आठ- वड्यास संस्थेस भेट दिल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

एखादा पाहुणा त्यानी वसतिगृहात आणला व त्यास आण्णांनी माहिती देण्यास सुरवात केली की काळे अगदी बारकाईने लक्ष देत. हे उत्तम कार्य साताऱ्यात चालले आहे याबद्दल त्यांना अभिमान वाटे. आण्णा भाष- णात पददलित समाजाच्या उद्धाराविषयी पोटतिडकीने बोलत. अनाथ मुलांच्या भवितव्याचा विचार मांडीत. अस्पृश्यता नष्ट करणेसंबंधी सर्वांनी सहकार्य द्यावे याबद्दल आग्रह धरीत. त्यावेळी अक्षरशः काळे यांच्या

डोळ्यातून अश्रु ओघळत. इतके रा. ब. काळे रयत शिक्षण संस्थेच्या कार्याशी एकरूप झाले होते. स्वत:चे घरी पाहुणा आला तरी ते वसतिगृह दाखविल्या-शिवाय पूर्ण पाहुणचार झाला असे समजत नव्हते.

पुढे त्यानी व त्यावेळचे सातारा जिल्ह्याचें कलेक्टर मि हमीद ए. अली, आय. सी. एस. यांनी आण्णांच्या पाठीमागे लकडा लावला की आता हें तुमचे एकट्याचे प्रयत्न किती काळ चालणार! किती त्रास घेणार! आता संस्था ही रजिस्टर करा. संस्थेची घटना तयार करा व तिला कायदेशीर स्वरुप आणा. नंतर मि. हमीद ए. अली, रा. ब. काळे, कै. बारटक्के, श्री. बा. ना. नलावडे वकील, आर. आर. शिंदे, सरदार पंडितराव, सरदार राजाज्ञे वगैरे मंडळींनी एकत्र जमून संस्थेची घटना तयार केली व ती रजि-स्टर करणेकरिता प्राथमिक व पहिली संस्थेची बैठक ता. २५-४-१९३५ रोजी घेतली. यावेळी अर्थातच या सभेचे अध्यक्ष रा. ब. काळे हे होते. नंतर संस्था रजिस्टर झाली. व संस्थेचा कारभार घटनेनुसार सुरू झाला. संस्थेचें पहिले प्रेसिडेंट त्यावेळचे सातारा जिल्ह्याचे लोकप्रिय कलेक्टर मि. हमीद ए. अली झाले. परंतु हें अध्यक्षपद सरकारला रुचले नाही. त्यानी मि. हमीद अलीना कळविले की, " या संस्थेच्या अध्यक्षपदी आपणास राहाता येणार नाही. " नंतर त्यानी अगदी नाखुषीने संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. यानंतर संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा रा. ब. आर. आर. काळे यांच्या गळ्यात पडली व ती त्यांनीं समर्थपणे पुढे चालविली.

रा. ब. काळे अध्यक्ष झाल्यावर आण्णांनी आपल्या कार्याची कक्षा वाढविण्यास सुरवात केली. यावेळी संस्थेचा व्याप म्हणजे सातारा येथील श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस व पुणे येथील युनियन बोर्डिंग हाऊस हें होय. यानंतर आण्णांच्या मनात असा विचार येऊ लागला की जिल्हा लोकलबोर्डाच्या प्राथमिक शाळेवर बहुसंख्य शिक्षक अन्ट्रेंड आहेत. त्यामुळे मुलांना उत्तम प्रकारचे शिक्षण मिळत नाही. तेव्हा शाळेवरचे सर्व शिक्षक हे ट्रेंडच पाहिजेत. परंतु त्यावेळी सरकारची ट्रेनिंग कॉलेजेस सबंध प्रांतात एक दोनच होती. यामुळे दरवर्षी किती शिक्षक ट्रेंड होणार? म्हणून रयत शिक्षण संस्थेमार्फत ट्रेनिंग कॉलेज काढण्याची योजना आखली व ती

योजना रा. ब. काळे यांना पसंत पडली. तसेच मि. हमीद ए. अली यांनीही या योजनेस सर्वोतोपरी मदत करण्याचे ठरविले. यावेळी पंचम जॉर्ज बादशहा यांच्या राज्यारोहणाची सिल्व्हरज्युबिली सर्व ब्रिटिश साम्राज्यभर साजरी करण्यात आली. मि. हमीद ए. अली यांनी सातारवासीयातर्फे धनिणीचे बागेत म्हणजे श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस येथे सिल्व्हरज्युबिली साजरी केली. त्यावेळी रा. ब. काळे यांनी रु. १००० व मि. हमीद ए. अली यांनी रु. ५०० मदत दिली. यानंतर या ट्रेनिंग कॉलेजला सिल्व्हरज्युबिली रयत रुरल ट्रेनिंग कॉलेज हे नाव देण्यात आले. अशा रीतीने संस्थेच्या कार्याचा गाडा रा. ब. काळे हे समर्थपणे चालवीत असतानाच ते एकाएकी आजारी पडले व समाजाच्या दुर्दैवाने त्यातच त्यांचा अंत झाला. या आजारात आपण वाचत नाही याची त्यांना कल्पना होती. ते पुण्यास औषधोपचार घेत होते. त्यावेळी त्यांनी आण्णांना बोलावून घेतले. प्राथमिक बोलणी झाल्यावर ते म्हणाले, " भावी पिढीचे शिक्षण - विशेषतः खेड्यापाड्यातील जनतेचे शिक्षण चांगले झाल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणेच शक्य नाही, यासाठी तुम्ही संस्थेचे कार्य चालविले आहे, ते उत्तम आहे. या कार्यास माझी मदत सतत चालू रहावी असा उद्देश आहे. करिता मी रुपये १०,००० चा ट्रस्ट करीत आहे. या ट्रस्टचे रकमेचे व्याज सतत संस्थेला मिळत राहील. "

यावरून रा. ब. काळे यांना बहुजन समाजाच्या उद्धाराची किती कळकळ लागून राहिली होती हे दिसून येईल. हे आणखी काही वर्षे जगते तर त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वाढीसाठी फारच खटपट केली असती व त्यांच्या मनाला सात्विक समाधान लाभले असते. परंतु विधिलिखित वेगळेच होते. त्यांच्या निधनाने रयत शिक्षण संस्थेचा फार मोठा आधार नाहीसा झाला.

तथापि रा. ब. काळे हे संस्थेस मोठा आधार ठेवून गेले. त्यांचे जामात प्रि. ध. रा. गाडगीळ हे वारंवार सातारला येत. त्यावेळी रयत शिक्षण संस्थेची माहिती त्यांना मिळे. रयत शिक्षण संस्थेचे कार्य, ध्येय व धोरण पाहून तेही मोहित झाले. त्यांचे विचार देखील रा. ब. काळे यांचेशी मिळते जुळते होते, पुढे पुढे तेही संस्थेच्या कार्यात रस घेऊ लागले. आण्णा

वारंवार त्याचेकडे जात व संस्थेच्या कार्याची माहिती देत व जरूर तेथे मार्गदर्शन घेत. रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीमध्ये कै. धनंजयरावांचा मोठा हिस्सा आहे.

विशेषत: १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या खुनानंतर संस्थेची जी ग्रँट बंद झाली व संस्था नामशेष करण्याचा कुटिल डाव काही हितशत्रूंनी मांडला, त्यावेळी आपल्या समाजाची फिकीर न करता डॉ. गाडगीळ हे हिमालया–सारखे संस्थेच्या व आण्णांच्या पाठीशी उभे राहिले. ही त्यांची कामगिरी संस्थेच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखी आहे. तसेच आण्णांच्या निधनानंतर ते त्यांच्या स्वत:च्या मृत्यूपर्यंत ते संस्थेच्या कार्यात इतके समरस झाले की ते म्हणत, " मी कितीही कार्यमग्न असलो तरी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यासाठी माझा दरवाजा चोवीस तास खुला आहे " इतके त्यांचे मन संस्थेच्या कार्यात मग्न होते.

विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतसरकारच्या नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदातून ते निवृत्त झाल्यावर काय करावयाचे हा विचार त्यांचे मनात सारखा येत होता. त्यावेळी त्यांनी ठर–विले होते की आता उरलेले सर्व आयुष्य रयत शिक्षण संस्थेच्या कार्या–साठीच खर्च करावयाचे ! असा बेत ठरवूनच ते दिल्लीहून पुण्यास यावयास निघाले होते. परंतु हा त्यांचा बेत परमेश्वरास तडीस नेऊ द्यावयाचा नव्हता. त्यांचे रेल्वे गाडीतच पालघर ते मुंबई दरम्यान प्राणोत्क्रमण झाले. संस्थेच्या कार्यास मोठा जबरदस्त धक्का बसला.

पूर्वीपासूनच रा. ब. काळे यांच्या कन्या व डॉ. गाडगीळ यांच्या पत्नी प्रमिलाताई या संस्थेच्या कार्यात मधून मधून लक्ष घालीत असत. प्रि. गाडगीळ हे भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदी गेल्यावर प्रमिलाताई यांना संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलमध्ये घेण्यात आले. यानंतर त्यांना संस्थेचे उपाध्यक्ष करण्यात आले. अशा रीतीने त्याही संस्थेच्या कार्यात आतापर्यंत लक्ष घालीत आहेत. रा. ब. काळे यांनी संस्थेस सुरवातीपासून मदत करण्याचे जे लोण सुरू केले ते आजतागायत चालू आहे, असे आप–णास दिसून येईल. यावरून रा. ब. काळे यांच्या विचाराची व आचाराची

पूर्ती परमेश्वराने अशारीतीने आजतागायत चालू ठेवली आहे, हे पाहून नवल वाटते समाधान वाटते.

रा. ब. काळे यांच्या निधनानंतर संस्थेचे अध्यक्ष दि. ब. मो. बा. मुथा झाले. संस्थेची सर्व धुरा आण्णाच वहात होते त्यामुळे इतरांना तसा फारच त्रास नसे. नव्हे काही करतो म्हटले तरी ते शक्य नव्हते. इतके हे कार्य त्रासाचे, कष्टाचे, मानहानीचे व त्यागाचे होते तेव्हा या फंदामध्ये त्याकाळी पडणारी मंडळी विशेष कोणी नव्हती.

## दुय्यम शिक्षण

प्राथमिक शिक्षक प्रशिक्षित करण्याचा प्रश्न सातारा येथे १९३५ साली एक ट्रेनिंग कॉलेज सुरू करून सोडविल्यानंतर दुय्यम शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या डोळ्यापुढे उभा राहिला. वसतिगृहातील मुले शहरातील इतर हायस्कूलमध्यें शिक्षणास जात होती. परंतु आपले संस्थेचे हायस्कूल असावे असे आण्णांना वाटू लागले. तेव्हा त्यांनी सातारा येथे ' महाराजा सयाजीराव फ्री अॅन्ड रेसिडेन्सियल हायस्कूल' १९४० मध्ये सुरू केले, या शाळेचे वैशिष्टच असे की, विद्यार्थ्यांनी २४ तास वसतिगृहात राहिले पाहिजे. रोज ठराविक तास शारीरिक श्रम केलेच पाहिजेत. यामुळे सर्वच विद्यार्थ्यांवर शिक्षक वर्गाची देखरेख होऊ लागली. विद्यार्थ्यांना श्रमाची प्रतिष्ठा वाटू लागली. विद्यार्थ्यांना फी ची माफी अगर सवलत देण्यात आली. परंतु प्रत्येक विद्यार्थ्याने श्रम केलेच पाहिजे हा दंडक घालणेत आला. हे विद्यालय अत्यंत नमुनेदार रीतीने चालू लागले. संस्थेतून तयार झालेला तरुणच शिक्षक म्हणून विद्यालयास लाभला. यामुळे हे सर्व शिक्षक वेळेचे बंधन न ठेवता विद्यालयाचे काम सतत करू लागले. यामुळे विद्या–लयाचा निकाल, क्रीडानैपुण्यपारितोषिके याबाबत जिल्ह्यात वरचा क्रमांक मिळू लागला. अशा रीतीने ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी मुलांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, हे सिद्ध झाले. मात्र त्यांना संधी मिळावयास हवी.

शहरामध्ये वसतिगृह अगर शाळा सुरू करून ग्रामीण भागातील मुलामुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटणे कठीण आहे, असे आण्णांना वाटू

लागले. कारण शहरात मुलगा पाठवावयाचा म्हणजे त्या मुलाच्या पालकास काहीना काही खर्च येणारच. शिवाय या मुलाची मदत त्याचे पालकास त्यांच्या दैनंदिन कामात होती, ती होईनाशी झाली. यामुळे शिक्षण-प्रसाराला गति येत नाही, हे आण्णांनी जाणले. तेव्हा मोठे गाव निवडावयाचे, तेथे तेथील प्रमुख लोकांची बैठक घ्यावयाची व शाळा सुरू करण्याचा मनोदय जाहीर करावयाचा. नंतर शिक्षक पाठवून द्यावयाचे, मिळेल ती जागा पत्करावयाची व शाळा सुरू करावयाची. पुढे हळूहळू शाळेच्या अडचणी जनतेपुढे ठेवून देणगी मिळवावयाची. धान्यरूपाने देणगी घ्यावयाची, योग्य जमीन देणगी म्हणून मिळवावयाची व मग इमारत उभी करावयाची. अशा रीतीने काही वर्षातच शाळेच्या मालकीची इमारत, क्रीडांगण व इतर सोयी ग्रामस्थांच्या सह-कार्यानेच पुऱ्या करावयाच्या, असा आण्णांचा कार्यक्रम असे.

आण्णांचे कार्य हे आपल्याच मुलामुलींच्या कल्याणासाठी आहे, याची जाणीव गावकऱ्यांना असे. आण्णा हे स्वतः पैशाला हात लावीत नसत. सर्व पैसा मुख्याध्यापक हाताळीत असे. संस्थेचा सेवक वर्ग सचोटीने, त्यागाने, मिशनरी वृत्तीने, काम करणारा असे. आपला सर्व वेळ तो विद्यालयाचा विकास करण्यात खर्च करीत असे. यामुळे या सर्वांची ग्रामस्थांवर छाप पडे. शिक्षक वर्गास जो पगार ठरला असे तो खात्याच्या नियमाप्रमाणे मिळे. यामध्ये चुकूनहि कधी गैरप्रकार घडत नसे. यामुळे सर्व सेवकवर्ग अत्यंत आपुलकीने विद्यालयावर काम करीत. हेच सेवकवर्ग विद्यालयाची संपूर्ण जबाबदारी पार पाडीत. केव्हा केव्हा आजुबाजूच्या खेड्यात जाऊन हा शिक्षक वर्ग शिक्षणाचा प्रचार करीत. हायस्कूल सुरु करण्यास ग्रामस्थांना प्रोत्साहन देत. नंतर "अमुक गावी हायस्कूल सुरू करण्यास ग्रामस्थ तयार आहेत. आपण लवकर यावे" असे ते आण्णांना कळवीत. यानंतर आण्णा येत व ग्रामस्थांची बैठक घेत व शाळा सुरु करण्याचा निर्णय घेत. अशा रीतीने आण्णांनी दरवर्षी दुय्यम शाळा सुरु करण्याचा सपाटा चालविला.

जेथे शेती जमीन मिळेल तेथे विद्यार्थ्यांना शेतीवर काम देण्यात येऊ लागले. मुलांच्या पालकाची परिस्थिती पाहून काही सवलती देण्यात येऊ लागल्या. अशा रीतीने दुय्यम शिक्षणाचा प्रसार वाढत चालला.

या कार्यासाठी आण्णांना त्यांचेच विद्यार्थी शिक्षण घेऊन त्यांच्या कार्यासाठीच मिळू लागले. यामुळे हे विद्यार्थी काळ वेळ पगार याची तमा न बाळगिता काम करू लागले. हे या संस्थेच्या कार्याचे फार मोठें वैशिष्टय आहे. विद्यार्थी शिकवून तयार करावयाचे व त्यांनाच या कार्यासाठी वाहून घेण्यास प्रवृत्त करावयाचे. विशेष म्हणजे याबाबत आण्णांनी कोणावरही सक्ती केली नाही. आण्णांचे व्यक्तिमत्व, कार्याचे महत्त्व जाणूनच विद्यार्थी या कार्यात स्वतःहून उडी घेत. अशा रीतीने हजारो कार्यकर्ते आण्णांना आपोआप मिळाले.

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली अशा त्यागी कार्यकर्त्यांचा संस्थेस आजन्म वाहून घेण्याचा शपथविधी ऑक्टोबर १९३७मध्ये सातारला झाला होता. त्यावेळी बारा पदवीधरांनी या संस्थेत आजन्म राहून संस्था देईल तो पगार व देईल ते काम स्वीकारण्याची तयारी दाखविली. कर्मवीर आण्णांना अल्पावधीत असे त्यागी पदवीधर मिळाल्याचे पाहून कर्मवीर शिंदे यांना अचंबा वाटला व ते सहज उद्गारले "मला हयातीत जे यश लाभले नाही ते आण्णांना अल्पावधीत लाभले हे पाहून मला धन्यता वाटते. आण्णांच्या हातून यापुढे बहुजन-समाजाचा उद्धार होईल अशी मला खात्री वाटते." कर्मवीर शिंदे यांचे हे भाकीत पुढे अक्षरशः खरे ठरले. समाजसेवा ही अक्रोडच्या झाडासारखी असते.

**प्राथमिक शाळा :**

खेडोपाडी जिल्हा स्कूल बोर्डामार्फत प्राथमिक शाळा सुरु होत्या. परंतु अशी हजारो खेडी होती की तेथे मराठी शाळा नव्हत्या. त्या गावचे लोक लोकलफंड देत होते. परंतु त्यांच्या गावच्या मुलामुलींच्या शिक्षणाची काळजी कोणी करीत नव्हते. अशा गावी प्राथमिक शाळा सुरू करणे जरुर आहे, असे आण्णांना वाटू लागले-

राजे धर्मशील म्हणविती ।
आतां का रे मागे घेती ।
विद्या द्यावी पट्टी पुरती ।
धिक्कारूनी सांगे जोती ॥

तेव्हा त्यांनी एकेक खेड्यात जाऊन तेथील ग्रामस्थांची बैठक घेतली. त्यांना विनंती केली की, "तुम्ही फक्त मुले शाळेत पाठवा. आमचा शिक्षक या मुलांना शिकवील. शाळेस योग्य जागा कोणी तरी द्या. नसेल तर सार्वजनिक देवालयात शाळा भरेल" आण्णा बरोबर शिक्षकास घेऊनच जात. हा शिक्षक देवालयात आपले सामान ठेवी व तेथेच राही. जेवणाचा प्रश्न पडे. परंतु आण्णा ग्रामस्थांना सांगत की "याचो जेवणाची सोय ग्रामस्थांनीच करावी. प्रत्येकाने एकेक दिवस याची जेवणाची सोय करा. म्हणजे कोणालाच जड जाणार नाही." खेड्यातील मंडळींना पैसा देण्याचे अवघड वाटते. परंतु जेवण अगर धान्य देणे अवघड वाटत नाही. अशा रीतीने शिक्षकाच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटल्यावर शाळेचे काम व्यवस्थित चाले.

अशा रीतीने शेकडो वर्षे ज्यांना शिक्षण माहित नाही, त्यांना ज्ञानाची गंगा दारात आल्याचे पाहून आनंद झाला. गुरुजीस सर्वतोपरी मदत करू लागले. आपापली मुले मुली शाळेत पाठवू लागले. ज्यांना आलेले कार्ड वाचण्यासाठी पंधरा मैलावर जाऊन वाचून घ्यावे लागे, त्यांचा सर्वच प्रश्न सुटला. सदर गुरुजी गावाला सर्वच दृष्टीने मार्गदर्शन करू लागला. यामुळे गावातील अज्ञानाचा अंधार जाऊन ज्ञानाचा सूर्योदय झाला. गावामध्ये नव–चैतन्य निर्माण झाले. एका गावात असा प्रकार झाल्याबरोबर इतर गावेही आपल्या गावी शाळा सुरु व्हाव्यात म्हणून आण्णांच्याकडे धाव घेऊ लागली. शाळा सुरु करणेस आण्णांनाही प्रोत्साहन मिळू लागले. मात्र ही गांवे अगदी आडवळणी, डोंगरकपारीत, येण्याजाण्याची सोय नाही अशा ठिकाणी असत. डोंगरातून दऱ्यातून १५–१५ मैल चालावे लागे. औषधपाण्याची सोय नाही इतर कसलीही सोय नाही. जेवण देखील शेतकऱ्यांकडून मिळेल ते खावून या शिक्षकांनी अत्यंत पोटतिडकीने काम चालविले. अशा शाळा संस्थेने ५७८ पर्यंत सुरू केल्या. परंतु मुंबई सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात प्राथ–मिक शिक्षण सक्तीचे व मोफत केल्यानंतर संस्थेने या सर्व शाळा स्कूल बोर्डाकडे वर्ग केल्या. या शाळावर ज्या शिक्षकांनी काम केले त्या सर्व शिक्ष-कांना संस्थेने 'ट्रेंड' केले व त्यांना स्कूल बोर्डात नोकरीस जाणेस सुवर्णसंधी दिली. अशारीतीने त्यांच्याही सेवेचे चीज केले.

## उच्च शिक्षण

वसतिगृहे सुरू करून गोरगरीब मुलांच्या राहण्याचा व शिक्षणाचा प्रश्न सोडविला. ज्याना गावी राहून व शेती सांभाळून शिक्षण घ्यावयाचे आहे, त्यांच्या गावी प्राथमिक व दुय्यम शाळा सुरू केल्या. अशा रीतीने आणांनी प्राथमिक, दुय्यम व ट्रेनिंगच्या शिक्षणाची सोय केली. खेडोपाडी शाळा सुरू झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी एस. एस. सी. होऊन कॉलेजचा दरवाजा ठोठावू लागला. ज्याची ऐपत आहे तोच कॉलेज शिक्षण घेऊ लागला. बाकीचे नोकरीच्या शोधात राहू लागले. यामुळे या मुलांच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न आपण सोडविला पाहिजे, असे आण्णांना वाटू लागले. या समयी कोल्हापूर, पुणे, मुंबई व बडोदा या ठिकाणीच उच्च शिक्षणाची सोय होती. इतरत्र नव्हती. त्यामुळे या शहरी जाऊन शिक्षण घेणे म्हणजे निव्वळ धनिकांच्या मुलानाच शक्य होते. हा निकडीचा प्रश्न ध्यानी घेऊन एकदा आण्णांनी एका सभेत घोषणा केली की, 'मी सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने महाविद्यालय सुरू करणार आहे, आणि तेहि फ्री अॅन्ड रेसिडेन्सियल.' ही घोषणा म्हणजेच शिक्षण क्षेत्रामध्ये एक चर्चेचा व एकप्रकारे चेष्टेचा विषय झाला.

अगोदर रयत शिक्षण संस्थेला महाविद्यालय काढता येणे अशक्यच. त्यामध्ये ते फ्री अँड रेसिडेन्सियल हे तर त्याहून अशक्य. तेव्हा कर्मवीर हे काही तरीच घोषणा देऊन बसलेत, असे लोक म्हणू लागले. आतापर्यंत संस्थेने जे काम केले ते या संस्थेच्या आवाक्यात होते. परंतु महाविद्यालय सुरू करणे हे या संस्थेच्या आवाक्याबाहेरचे काम आहे असे लोक उघड बोलू लागले. परंतु आण्णांच्या कामाचा खाक्या वेगळाच आहे. ते प्रथम मनात विचार करीत. निर्णय घेतला की कुठल्यातरी सभेत एकदम जाहीर करीत व त्याची पूर्ती करण्यासाठी ते रात्रंदिवस खपत.

तेव्हा छत्रपति शिवाजी कॉलेज सुरू करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात दौरा सुरू केला. देणगी जमविणेचा प्रयत्न चालविला. त्यांनी गोरगरीबांच्याकडून एकेक रुपया जमविण्यास सुरूवात केली. एवढ्यात एका धनिकाने आण्णांना कळविले की, "मी सुचवितो ते नाव कॉलेजला देत असाल

तर मी आपण म्हणाल ती देणगी देतो." या पत्रास आण्णांनी उत्तर पाठविले की, "मी काढणाऱ्या कॉलेजला छत्रपति शिवाजी महाराज यांचेच नाव देण्याचे योजिले आहे. यामध्ये मी बिलकूल बदल करणार नाही. माझ्या वडिलांचे नाव एकवेळ बदलेन पण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव कदापि बदलणार नाही."

नंतर या कॉलेज–उभारणीस आण्णांना अतिशय त्रास पडला. लाखो रुपये जमा केले, परंतु तेहि सामान्य वर्गाकडून. आण्णांची श्रद्धा ही सामान्य वर्गावरच होती. त्यांनी या वर्गाकडूनच जास्तीत जास्त देणगी व त्यांची श्रद्धा मिळवली.

अशा रीतीने हे कॉलेज सातारा येथे १९४७ मध्ये सुरू केले व तेहि फ्री अॅन्ड रेसिडेन्सियल. हे प्रत्यक्ष घडल्यानंतर महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ञांना धक्काच बसला. या कॉलेजमधील विद्यार्थी रोज शारीरिक श्रम करतात हे पाहून तर शिक्षणक्षेत्रामध्ये नवलाईची लाटच उसळली. या पद्धतीने आण्णांनी जेव्हा चार वर्षे कॉलेज चालविले त्यावेळी लोकांना वाटले हे कॉलेज आता नक्की टिकणार. बंद होत नाही.

तेव्हा उच्च शिक्षणामध्ये 'कमवा व शिका' (Earn and Learn) ही नवीन योजना आण्णांनी अमलात आणल्याचे पाहून अनेक शिक्षणतज्ञांचे या आण्णांच्या कार्याकडे लक्ष वेधले. भारत सरकारचे तज्ञ येऊन कौतुक करून गेले, व या सरकारतर्फे काही खास अनुदानहि पाठविले. हरिजनोद्धाराचे या संस्थने आतापर्यंत केलेले काम लक्षात घेऊन या संस्थेस खास अनुदान दिले. तसेच संस्थेने सर्व जाती जमातींच्या मुलासाठी सुरू केलेल्या श्री छत्रपति शाहू बोर्डिंगला मुंबई सरकारने खास अनुदान (इफिसियन्सी ग्रॅन्ट) १० वर्षे दिली. अशा रीतीने आण्णांनी पश्चिम महाराष्ट्रात शिक्षणाचे नवीन दालन सुरू केले.

विशिष्ट वर्गानी विशिष्ट वर्गाकरिता ठराविक पद्धतीने चालविलेल्या शिक्षण कार्यामध्ये आण्णांनी स्वविचाराने नवनवीन प्रयोग करून सर्व

विचारवंतांना चकीत केले. यामुळे या कार्याकडे महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष आपोआप वेधले गेले.

संस्थेच्या कार्याचा व्याप जसजसा वाढू लागला, तसतसे आण्णांचे कार्यकर्ते ( आजीव सभासद ) हिरीरीने कामास लागले. आण्णांना दरवर्षी अनेक पदवीधर येऊन मिळू लागले. यामध्ये हिंदू, मुसलमान, जैन, ख्रिश्चन, ब्राह्मण सर्व जातीचे कार्यकर्ते होते. कोणी संस्थेचा सेवक खेड्यात आला की त्याच्यावर बिनघोर श्रद्धा ठेवून लोक मदत करू लागले. अशारीतीने जे स्वप्नात होते ते प्रत्यक्षात घडू लागले. पुढे या संस्थेला धनिक वर्गही मदत करू लागला. राजेरजवाडेही पुढे येऊ लागले. फलटणचे राजे श्रीमंत मालोजीराव निंबाळकर, कोल्हापूरचे छत्रपति शहाजी महाराज, ग्वाल्हेरचे जिवाजीराव शिंदे सरकार यांनी आपल्या लाखो रुपयांच्या मिळकती आण्णांना देऊन टाकल्या. दर गावी तीन चार एकर जमीन मिळू लागली. इमारती होऊ लागल्या. अशा रीतीने या संस्थची मुळे ( संस्थेचे बोधचिन्ह वडाचे झाड आहे. ) खोलवर रूजू लागली. The bended twigs take root in the ground and daughters grow around the mother tree मिल्टनचे हे शब्द या संस्थेच्या वटवृक्षास अक्षरशः लागू पडतात. जनतेच्या मनात या संस्थेविषयी अपार प्रीती निर्माण झाली.

महात्मा गांधी यांच्या खुनानंतर ( ३०।१।१९४८ ) रयत शिक्षण संस्थेवर फार मोठे गंडांतर आले. महात्मा गांधींची हत्या महाराष्ट्रीय ब्राह्मण श्री. नथुराम गोडसे यांनी केल्यामुळे देशामध्ये या जातीविरुद्ध आगीचा डोंब उसळला. विशेषतः महाराष्ट्रात क्रोधाग्नि अधिकच भडकला. तेव्हा मुंबई सरकारला याबाबत काळजी वाटणे व त्याबाबत इलाज करणे स्वाभाविक होते. त्यामुळे काही गैरसमजाने मुंबई सरकारने रयत शिक्षण संस्थेची ग्रँट बंद केली.

---

**It is a unique insitution and deserves the support of every man who cares for the best interest of the nation.**

**Dr. B. R. Ambedkar.**

परंतु सेवकांनी विना मोबदला काम करण्याचा निर्धार केला. जनतेने पैशाचा पाऊस पाडला. महाराष्ट्रातील अनेक लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी सरकारला याबाबत जाब विचारावयास सुरवात केली.तसेच या संकटकाळी डॉ. धनंजयरावांनी मोलाचे साहाय्य केले. तेव्हा सरकारला ग्रँन्ट पूर्ववत सुरू करणे भाग पडले. या कटू प्रकारामुळे संस्थेची भरपूर प्रसिद्धी तर झालीच. परंतु आण्णांचे कार्य म्हणजे बावनकशी सोने आहे हे सिद्ध झाले.

आण्णांनी आपल्या चरितार्थासाठी संस्थेचा पैसा घेतला नाही. माजी विद्यार्थ्यांचेकडून आलेल्या मदतीतून आपला चरितार्थ चालविला. संस्थेमध्ये मानाची जागा पत्करली नाही. पैशाला हात लावला नाही. निर्मळ स्वच्छ जीवन ठेवले. कोणापुढे याचना केली नाही. लाचारी दाखविली नाही. ते मानाने राहिले. नेहमी ताठ मान ठवली. " मोडेन पण वाकणार नाही. " I Shall break but shall not bend हे आपले गुरु राजर्षि शाहू महाराज यांचे ब्रीद स्मरून तसा बाणा ठेवला. धनिकापुढे अगर अधि-

---

" मला शिक्षणतज्ञ म्हणून थोडा अभिमान वाटत असे. परंतु कर्मवीर भाऊराव यांचे कार्य,विशेष करुन त्यांचा मानवता स्वभाव, ऋषितुल्य जीवन, गरीबाची कणव, गोरगरिबाना अल्पखर्चात शिक्षण देणे व मुलाना श्रम करण्याची गोडी लावणे हे पाहिल्यानंतर माझा अहंकार तर पळालाच,परंतु या थोर कार्यकर्त्यापुढे माझे मस्तक आपोआप झुकले आणि याबद्दल मला मुळीच खंत वाटत नाही, उलट मला आनंदच वाटतो. आम्ही शिक्षणतज्ञानी कर्मवीर भाऊरावांच्या चरणी बसून त्यांच्या शैक्षणिक प्रयोगावरून आमच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे पुनर्मूल्यन केले पाहिजे असे माझे मत बनले आहे.."

**मि. सी. सी. कोप**

कॅलिफोर्निया (अमेरिका)

कान्यापुढे नमले नाहीत, परंतु माणुसकीचा ओलावा दिसला तर तेथे कर जुळविले. ज्या त्या भागातील सच्चे कार्यकर्ते शोधून या कामास प्रेमाने जुंपले. ते आजतागायत काम करत आहेत. संस्थेस त्यांचा मोठा आधार आहे. पैशासाठी सत्व व स्वाभिमान घालविला नाही. अन्याय दिसेल तेथे बोट ठेवले. कितीही मोठी असामी असली तरी वावगे दिसल्याबरोबर काळ वेळ स्थळ न पाहाता त्याची कानउघाडणी केली. ठराविक चाकोरीतून जायचे त्यांना माहित नव्हते. मधून मधून राज-कारणातही भाग घेण्याची त्यांना उर्मी येत असे. निष्कारण अरिष्ट ओढवून घेतले असे लोकांना वाटले. परंतु सत्य तेच केले. संस्था टिकविण्या-साठी आपल्या विचारात व आचारात केव्हाही ढोंगीपणा येऊ दिला नाही. एखाद्या तपस्व्याप्रमाणे मानाने जीवन जगले.

त्यांच्या कार्याचे कौतुक जनतेने कर्मवीर पदवी देऊन, पुणे विद्यापीठाने डी. लिट पदवी देऊन व भारत सरकारने पद्मभूषण पदवी देऊन केले.

सातारा जिल्हा विद्यार्थ्यांनी एक लाख अकरा हजार रुपयांची थैली व शेव्हरलेट कार देऊन गौरव केला. सदरचा समारंभ संत गाडगे महाराज यांचे अध्यक्षतेखाली नोव्हेंबर १९४८ साली झाला. संस्थेच्या कार्याचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. त्यावेळी सरकारने ( महाराष्ट्र ) दोन लाख रुपये देणगी दिली. हे कार्य करीत असताना संस्थेच्या कामाची जबाबदारी आण्णांनी आपल्या विद्यार्थ्यांवरच सोपविली. कोणी मोठी देणगी दिली म्हणून त्यास संस्थेत स्थान दिले नाही. राजकारणी मंडळींना व धनिकांना संस्थेत डोकावू दिले नाही. संस्था, या सर्वांपासून अलिप्त ठेवली. असे कार्य करीत करीत ते ९-५-१९५९ रोजी पुणे येथे ससून हॉस्पिटलमध्ये वारले. अशा रीतीने महाराष्ट्राचा हा शिक्षण भगिरथ ज्ञानेश्वर व कर्मयोगी, अधुनिक विश्वामित्र, कैलासवासी झाला.

आणांचे निधनानंतर लोक हळहळले. ते पोरके झाले. गोरगरिबांची सावली एकदम नष्ट झाली. लोकांना चिंता वाटू लागली ही संस्था आता कशी टिकणार ? लोक म्हणत हा एक खांबी तंबू आहे आता हा निश्चित कोलमडणार. परंतु आण्णांनी या कार्याची पाऊलवाट इतकी मजबूत करून ठेवली होती की त्याची चिंता करण्याची विशेष गरजच नव्हती. संस्थेचे सर्व

कार्यकर्ते हा रथ ओढण्यास समर्थ होते, परंतु आण्णांचे सिंहासन मोकळे झाले. यामुळे कार्यात पोकळी वाटू लागली. थोडी भयाणता दिसू लागली, ही भरून काढणे जरूरीचे होते. यासाठी महाराष्ट्रातील नामवंत पुढारी व अखिल भारतीय कीर्तीचे नेते सन्माननीय नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मे १९६० मध्ये अध्यक्ष केले. त्यांच्या अध्यक्षपदाखाली संस्थेची प्रगती एकसारखी चालू आहे. संस्थेच्या कार्यकर्त्यांमध्ये एकजूट आहे. कामाची जिद्द आहे. या कार्याविषयी जनतेमध्ये प्रीती आहे. आदर आहे. यामुळे हे कार्य जोपर्यंत याची जनतेस जरूरी आहे, तोपर्यंत चालू राहील यात शंका नाही.

संस्थेचा व्याप सध्या (१९७४–७५) खालीलप्रमाणे आहे.

संस्थेचे कार्य अहमदनगर, बीड, पुणे, ठाणे, कुलाबा, मुंबई, नासिक, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी व बेळगाव या जिल्ह्यात सुरू आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | महाविद्यालये | १९ |
| २) | माध्यमिक विद्यालये | ३१२ |
| ३) | अध्यापन विद्यालये | ७ |
| ४) | प्राथमिक व पूर्वप्राथमिक शाळा | ७ |
| ५) | वसतिगृहे | ७५ |
| ६) | इतर शाखा | १६ |
| ७) | सेवकवर्ग | ६,०३१ |
| ८) | विद्यार्थीवर्ग | १,०२,३३३ |
| ९) | अंदाजे खर्च | रु. ४,३५,००,०००–०० |

इ. स. १८१८ साली पुण्याच्या शनिवारवाड्यावरून हिंदवी स्वराज्याचा हुरमुजी रंगाचा ( भगवा नव्हे ) ध्वज खाली खेचण्यात आला व त्या ठिकाणी इंग्रजांचे 'युनियन जॅक' फडफडू लागले. ही घटना ऐतिहासिक होती. कष्टकरी कामकरी जनतेची ती मृत्यूघंटाच होती. या घटनेनंतर नऊ वर्षांनी भारत भाग्यविधाते महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांनी अवती भवतीची गरिबांची दैन्यावस्था पाहिली. सर्व अधोगतीचे मूळ

म्हणजे अज्ञान अशी त्यांची पक्की खात्री पटली व म्हणून त्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाचे पहिलेच वाक्य अनन्यसाधारण महत्त्वाचे ठरले.

"विद्येविना मति गेली, मतिविना गति गेली, गतिविना नीति गेली, नीतिविना वित्त गेले, वित्तामुळे शूद्र खचले, इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले"

त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७४ मध्ये पुण्यात केली. वरील वाक्य म्हणजे सत्यशोधक समाजाच्या ध्वजावरील तेजस्वी ब्रीद वाक्यच होते, व म्हणूनच व्हिक्टोरीया राणींचा नातू ड्यूक ऑफ कॅनॉट पुण्यास आला असता, म. फुल्यानी एक खास स्वागत-कमान उभारली होती व त्यावर खालील ओळी कोरल्या होत्या.

"Tell your grandma that we are a happy nation, but nineteen crores are without education."

महात्मा ज्योतिबांची जीवन ज्योत नोव्हेंबर १८९० मध्ये निमाली व शूद्रातिशूद्रांच्या उद्धाराच्या त्याच्या अपुऱ्या राहिलेल्या कार्याची ध्वजा राजर्षि छत्रपति शाहू महाराजांनी आपल्या समर्थ खांद्यावर घेतली. याचवेळी बहुजन समाजातून एक तेजस्वी ब्रह्मर्षि उदयास आला, तो म्हणजे महर्षि कर्मवीर विठ्ठल रामजी उर्फ आण्णासाहेब शिंदे.

राजर्षि छत्रपति शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या रचनात्मक कार्यास आपला सक्रिय पाठिंबा दिला व शूद्रातिशूद्रांच्या शैक्षणिक उद्धारासाठी आपल्या राजधानीत अनेक वसतिगृहे उभारली. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची ती मंगल पहाट होती.

राजर्षि छत्रपति शाहू महाराजांचे मानसपुत्र म्हणजेच आपल्या संस्थेचे संस्थापक कर्मवीर आण्णा हे होत. त्यांनीही सत्यशोधक चळवळीत सक्रिय भाग घेतला होता व सारा महाराष्ट्र आपल्या पहाडी आवाजाने दणाणून टाकला होता.

"Karmaveer Bhaurao is a roaring lion on the public platform." हे कै. शंकरराव मोरे यांनी आण्णांचे केलेले वर्णन अगदी सार्थ होते.

सत्यशोधक चळवळीचे मूलस्रोत अज्ञसमाजाची शैक्षणिक प्रगति त्याच्या विशुद्धस्वरूपात जाणून घेऊन त्याला रचनात्मक स्वरूप देणाऱ्या

थोर समाजसेवकामध्ये कर्मवीर आण्णांचा क्रमांक फार वर लागतो. स्वावलंबी शिक्षण, वसतिगृहात्मक जीवनावर भर, श्रमाचे महात्म्य, जात-गोत, धर्म पथ भेद यांना मूठमाती, सामाजिक न्यायाचा पाठपुरावा, राष्ट्रीय स्वातंत्र्या करिता आमरण खपण्याचे व्रत व कसल्याही ऐहिक लाभाची अपेक्षा न करता बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचे अग्निकंकण बांधून सतीचे वाण घेऊन, आमरण काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक अभेद्य तटबंदी निर्माण करण्याचा अतुलनीय संकल्प सोडून तो सिद्धीस गेल्याचे 'याचि देही याचि डोळा' पहाण्याचे देव दुर्लभभाग्य आम्हा रयत सेवकांचे Spiritual Father कर्मवीर आण्णा यांना लाभले. त्यांच्या तालमीत तयार झालेले हे आधुनिक 'भिक्कू' 'बहुजन हिताय। बहुजन सुखाय।' हा मंत्र उद्घोषून महाराष्ट्रात एक आगळेच धर्मचक्र प्रवर्तन करीत आहेत हे पाहून या सर्व पुण्यात्म्यांना स्वर्गीय आनंद होत असेल.

आज संस्थापक आण्णा जाऊन १५ वर्षे पूर्ण होतात. गेल्या पंधरा वर्षांत संस्थेपुढे अनेक अडचणी उभ्या राहिल्या, संकटे आली, पण परमेश्वरी कृपेने रयतेच्या सहकार्याने, कर्मवीर आण्णांच्या आशीर्वादाने व आम्हा छोटया छोटया कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळे हा 'जगन्नाथाचा रथ' मोठ्या डौलाने पुढे पुढेच मार्ग आक्रमीत आहे, ही सात्विक समाधानाची बाब आहे.

"My Institution is born out of a historic necessity—namely the spread of self-reliant and self-supporting education of the down-trodden masses, and so long as that necessity lasts the Rayat Shikshan Sanstha also endures" हे कर्मवीर आण्णांनी ससून इस्पितळात मृत्युशय्येवर काढलेले उद्गार किती सार्थ आहेत बरे !

("बहुजन समाजामध्ये स्वाभिमानी व स्वावलंबी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उच्च ध्येयाच्या ऐतिहासिक गरजेतून रयत शिक्षण संस्था जन्मास आली आहे, व जोपर्यंत ही ऐतिहासिक गरज अस्तित्वात आहे, तोपर्यंत माझ्या संस्थेस मरण नाही.") कर्मवीर आण्णांच्या या पंधराव्या पुण्यतिथी प्रसंगी आम्ही सर्व रयत सेवक आमच्या संस्थेच्या रचनात्मक कार्यास पुनरपि नेटाने वाहून घेण्याची धीर गंभीर प्रतिज्ञाच घेत आहोत.

# परिशिष्ट चवथे

## गोखले अर्थशास्त्र संस्था– पुणे

१९३० साल. भारतातील राजकीय उत्थानाचा हा काल. भारतातील समाजव्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करावा आणि सामाजिक– राजकीय– आर्थिक परिवर्तनाची दिशा स्पष्ट व्हावी हे अगत्याचे होते. अशा रीतीने वस्तुनिष्ठ व वास्तव अभ्यास करण्यासाठी खास प्रयत्न होणे जरूरीचे होते. पण त्या विषयाला वाहून घेण्यासाठी बुद्धिमान आणि निष्ठावंत अभ्यासकांची आवश्यकता होती. या काळात बुद्धिवान तरुण सरकारी नोकऱ्याकडे प्रामुख्याने आकृष्ट होत असल्याने हे तितकेसे सोपे नव्हते. तसेच अशा अभ्यासासाठी आवश्यक अशी साधनसामुग्री विशेषतः संपन्न असे ग्रंथालय आणि किमान आर्थिक पाठबळ याचीही जरूरी होती. पुणे येथे १९०६ साली स्थापन झालेल्या " Servants of India Society " या संस्थेशी सातारचे प्रागतिक पक्षाचे पुढारी रा. ब. रा. रा. काळे यांचा अॅसोशीएट सभासद म्हणून अनेक वर्षे संबंध होता. संस्थच्या वार्षिक सभेसाठी ते दरवर्षी जूनमध्ये आवर्जून पुण्यास येत. योगायोगाने १९३० साली सुरत येथील कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून काम करीत असलेले त्यांचे जामात प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचा तेथील कॉलेजात ५ वर्षे काम करण्यासंबंधीचा करार संपत आला होता. प्राचार्य पदाची जबाबदारी आणखी १५ वर्षे सांभाळावी असा तेथील मंडळींचा आग्रह होता. पण संशोधनकार्याची आवड असल्याने दुसरीकडे विशेषतः पुण्यात एखाद्या संस्थेत काम जमल्यास पहायचे यासंबंधी गाडगीळांचे विचार चालू होते.

केंब्रिज विद्यापीठात अर्थशास्त्रातील शिक्षणक्रम व संशोधन पुरे करून भारतात परतल्यावर भारतीय अर्थशास्त्राचे अध्ययन, अध्यापन व संशोधन यास वाहून घेण्याची, विशेषतः वस्तुनिष्ठ संशोधन करण्याची प्रा. गाडगीळ यांची इच्छा होती. असे काम करण्यासाठी भारत सेवक समाजाची भव्य व प्रशांत वास्तू आणि तेथील उत्कृष्ट ग्रंथालय असा आदर्श परिसर पाहून रा.

रा. काळे यांच्या मनात, देशातील मूलभूत प्रश्नांच्या अभ्यासास वाहून घेईल अशी खास संस्था स्थापन करता आल्यास पहावे असे विचार आले. त्यादृष्टीने भारत सेवक समाजातील कार्यकर्त्यांबरोबर त्यांनी विचार विनिमय केला. अशा संस्थेसाठी आर्थिक मदत मिळाल्यास संस्था स्थापन करण्याची तेथील कार्यकर्त्यांची तयारी दिसल्यावरून अशा संशोधन संस्थेच्या स्थापनेसाठी रा. रा. काळे यांनी एकलाख, वीसहजार, सातशे रुपयांची देणगी देण्याचे जाहीर केले. अशा रीतीने रा. रा. काळे यांनी संस्थेसाठी उपलब्ध केलेला आवश्यक निधी आणि प्रा. गाडगीळ यांच्यासारखा निष्ठावंत संशोधक यांची अजोड सांगड जमून या संस्थेची निर्मिती १९३० च्या जून-मध्ये झाली. आणि भारत सेवक समाजाचे संस्थापक नामदार गोखले यांचे नाव संस्थेस द्यावे असे ठरले. संस्थेचे नाव कागदोपत्री "Gokhale Institute of Politics & Economics Founded by R. R. Kale of Satara." असे असावे असा निर्देश करारनाम्यात केलेला आहे.

संस्थेच्या संचालक पदाची जबाबदारी प्रा. गाडगीळ यांनी पत्करली व संस्थेचे सर्वसामान्य व्यवस्थापन करण्यासाठी बोर्ड ऑफ मॅनेजमेंटची तरतूद करण्यात आली. रा. ब. काळे यांनी संस्थेसाठी दिलेली देणगी विश्वस्त निधीच्या रूपाने भारत सेवक समाजाच्या स्वाधीन केलेली होती. बोर्ड ऑफ मॅनेजमेंटमध्ये भारत सेवक समाजाचे अध्यक्ष हेच बोर्डाचे अध्यक्ष, भा. से. समाजाचे तीन सदस्य आणि गोखले अर्थशास्त्र संस्थेतील मुख्य प्राध्यापक व प्रारंभी स्वतः रा. रा. काळे यांचा सभासद म्हणून समावेश होता. रा. ब. काळे यांच्या निधनानंतर त्यांनी शैक्षणिक मदतीसाठी स्थापन केलेल्या धर्मादाय निधीच्या विश्वस्तापैकी एक विश्वस्त, सभासद म्हणून बोर्डावर असतात.

प्रा. गाडगीळ यांनी १९३० सालापासून गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या संचालक पदाची जबाबदारी स्वीकारली, ती १९६६ साली सेवानिवृत्त होईपर्यंत अत्यंत निःस्पृहपणे व एकनिष्ठेने पार पाडून संस्थेस भारतातील अग्रेसर संशोधन संस्था हे स्थान प्राप्त करून दिले.

संस्थेच्या संस्थापनेची प्रमुख उद्दिष्टे दोन :- (१) भारताच्या आर्थिक व राजकीय समस्यांचे शास्त्रीय संशोधन करणे (२) असे संशोधन करण्यासाठी योग्य ते शिक्षण देऊन शास्त्रज्ञ तयार करणे.

प्रारंभी संस्थेमध्ये श्री. वा. रा. गाडगीळ आणि श्री. गोगटे हे दोघे सहकारी आणि टंकलेखन कामासाठी श्री. पेंडसे एवढीच मंडळी होती.

संस्थेच्या स्थापनेपासून एम्. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी अर्थशास्त्र विषयाचे वर्ग तसेच प्रबंध लिहून एम्. ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संशोधनातील मार्गदर्शन; आणि वस्तुनिष्ठ अशा संशोधनाचे काम सुरू करण्यात आले होते. प्रा. गाडगीळ सुरुवातीपासून एम्. ए. चे अध्यापन, संशोधनात मार्गदर्शन, स्वतःचे अध्ययन आणि संशोधन ही सर्व जबाबदारी सांभाळीत. १९४९ सालापर्यंत ही संस्था मुंबई विद्यापीठास जोडलेली होती व १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ती पुणे विद्यापीठास संलग्न आहे. या संस्थेत वस्तुनिष्ठ संशोधनांची परंपरा प्रा. गाडगीळ यांनी परिश्रमपूर्वक निर्माण केली. देशातील लहानमोठ्या आर्थिक समस्याचे स्वरूप व कारण परंपरा समजून घेण्यासाठी आणि त्यातील विभिन्न घटकांच्या अन्योन्य संबंधांची उकल करण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवरील वस्तुनिष्ठ आर्थिक अभ्यासावर प्रा. गाडगीळ यांचा विशेष भर होता. संशोधनातील शास्त्रशुद्ध अभ्यासपद्धति आणि चिकित्सक विश्लेषण तसेच संशोधनाची तर्कशुद्ध बैठक यावर त्यांचा कटाक्ष असे. कोणत्याही अभ्यासामध्ये सर्व तपशील परिश्रमपूर्वक व काटेकोरपणे गोळा करून त्याचा यथायोग्य पडताळा घेऊन त्याचे सम्यक् विश्लेषण करून, सामाजिक आर्थिक प्रश्नाची उकल करण्याचा पायंडा घालून गोखले अर्थशास्त्र संस्थेतील संशोधनास भारतात व भारताबाहेरही मान्यता मिळत गेली.

गोखले अर्थशास्त्र संस्थेने पहिले आर्थिक पहाणीचे काम 'पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री' हे १९३१ साली हाती घेण्यात आले. त्यानंतर पुरी केलेली "पश्चिम महाराष्ट्रातील मोटार वाहतुकीची पहाणी" (१९३२) हे महाराष्ट्रातील अनियमित मोटार वाहतुकीचे उत्कृष्ट चित्रण आहे. मोटार वाहतुकीतील समस्यांचे वस्तुनिष्ठ विवेचन या अभ्यासामध्ये

केलेले आढळेल. १९३७--३८ मध्ये गो. अ. संस्थेच्या वतीने प्रा. गाडगीळांनी वाई तालुक्यामध्ये शेती व्यावसायिकांच्या आर्थिक जीवनाचा आणि ग्रामीण समाज--अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने एक संशोधनपर पहाणी केली. ह्या पाहणीमध्ये शेतीव्यवसायातील जमाखर्चविषयक तपशीलवार माहिती गोळा करण्याच्या अभ्यासपद्धतीची रूपरेषा तयार करण्यात आली. शेतीच्या विकासासाठी हाती घेण्यात येणाऱ्या सिंचन प्रकल्पाचे यथायोग्य मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने १९३९–४० मध्ये गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या वतीने प्रवरा व गोदावरी कालव्याच्या क्षेत्रातील सिंचित शेतीव्यवसायाचा व त्या भागातील कोरडवाहू शेतीचा तौलनिक अभ्यास करण्यात आला. सिंचन प्रकल्पाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायद्यांचे शास्त्रशुद्ध मापन करण्याचा प्रयत्न या अभ्यासामध्ये केला गेला. नागरी अर्थशास्त्राच्या क्षेत्रामध्ये १९३६-३७ साली पुणे शहराचा नागरी विकास, तेथील उद्योगधंदे, व्यापार व अन्य अर्थ व्यवहार, सामाजिक संस्था, लोकसंख्या, व्यवसाय, शिक्षण, मिळकत, उत्पन्न, राहणीमान, निवास व नागरी सोयी इत्यादींचा तपशीलवार अभ्यास करून या संस्थेने नगरांच्या सामाजिक- आर्थिक पाहणीचे नवीन दालन उघडले. त्याच पद्धतीने कोल्हापूर व सोलापूर या शहरांची पाहणी संस्थे–मार्फत करण्यात आली.

अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या घटकामधील विविध प्रकारच्या अर्थ-व्यवहारासंबंधी भारतामध्ये फारशी काही वस्तुनिष्ठ माहिती व आकडेवारी उपलब्ध नव्हती. अशा काळामध्ये स्थानिक पातळीवरील संशोधनपर अभ्या-साची सुरुवात गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये प्रा. गाडगीळांच्या पुढाकाराने झाली. अशा अभ्यासांची व्याप्ती मर्यादित असली तरी असे अभ्यास अर्थ-व्यवहार व सामाजिक संबंध यांच्या स्वरुपाबाबतचे अनेक बारकावे स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त ठरतात. सम्यक् अर्थव्यवस्थेचे सखोल व आशयपूर्ण आकलन होण्याच्या दृष्टीने अशा वस्तुनिष्ठ संशोधनावर प्रा. गाडगीळ यांनी भर दिला व अशा संशोधनाचा उपयोग त्यांनी देशातील आर्थिक समस्याचे विवेचन आणि धोरणमीमांसा करताना सतत केलेला आढळतो.

आर्थिक अभ्यासाबरोबर प्रारंभीच्या काळात राजकीय समस्यांचा अभ्यासही संस्थेमार्फत हाती घेण्यात येत होता. १९४५-४८ ह्या काळामध्ये भारतीय संघराज्याच्या निर्मितीचे प्रश्न आणि भारतीय राज्यघटना याविषयी चिकित्सक ग्रंथ (लेखक प्रा. गाडगीळ) संस्थेमार्फत प्रसिद्ध करण्यात आले; आणि राज्यशास्त्रातील मूलभूत समस्येवरील चर्चेत महत्त्वाची भर घातली. या विषयाची चर्चा डॉ. अंबेडकर, श्री. वझे व प्रा. वेंकट रंगय्या यांनी आपल्या रा. रा. काळे यांचे स्मरणार्थ होणाऱ्या व्याख्यान मालेतील व्याख्यानात केली आहे.

वस्तुनिष्ठ संशोधनातील पाहणी, तंत्र व त्यातील माहिती आधार व अभ्यासित समस्याचे विश्लेषण या विषयी गोखले अर्थशास्त्र संस्थेने भारतामध्ये प्रायोगिक व मूलभूत स्वरूपाचे काम केले आहे. संस्थेने प्रस्थापित केलेले संशोधन तंत्र कोणत्याही सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यास उपयुक्त होते. संस्थेच्या या वैशिष्टयामुळे मुंबई सरकारने शिक्षणविषयक काही समस्यांचा अभ्यास करण्याचे काम संस्थेस दिले; प्राथमिक शिक्षणाविषयीची पाहणी सातारा जिल्ह्यात संस्थेतर्फे पुरी करण्यात आली व पाहणीचा अहवाल १९५५ साली प्रसिद्ध झाला.

प्रारंभीच्या काळापासून देशातील प्रचलित आर्थिक समस्या, आर्थिक विकास व आर्थिक नियोजन या विषयीचे विविध प्रश्न संस्थेमध्ये अभ्यासिले जात होते. तसेच लोकसंख्याविषयक प्रश्नाबाबत संशोधनपर अभ्यास हाती घेण्यात येत होते. भारतातील विविध आर्थिक सामाजिक समस्यांचा मूलभूत अभ्यास संस्थेमार्फत सातत्याने पुरा केला जात होता. त्याचे निष्कर्ष पुस्तकाद्वारे प्रसिद्ध होत. संस्थेच्या कामास भारतामध्ये मान्यता मिळून शासकीय व निमशासकी संस्था विशिष्ट कामासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेची मदत घेऊ लागल्या. आर्थिक संशोधनातील संस्थेचे कायम स्वरूपाचे स्थान व कामाचा व्याप या दृष्टीने संस्थेतील संशोधक इतर अनुषंगिक वाढ होणे महत्त्वाचे होते. सन १९४३ मध्ये मुंबई सरकारने प्रथमच संस्थेला शेती अर्थशास्त्रात संशोधन करण्यासाठी थोडी मदत मंजूर केली. त्यानंतर १९४७ पासून दरवर्षी रु. १०,००० चे अनुदान मिळू लागले. सन १९४६

मध्ये सर दोराबजी टाटा विश्वस्त निधीमधून संस्थेला शेती अर्थशास्त्र विभागासाठीच पाच वर्षांसाठी दरसाल रु. १५,००० आणि त्यानंतर आणखी पाच वर्षांसाठी दरसाल रु. २०,००० असे अनुदान मिळत गेले. भारताबाहेरील तज्ञांचे संस्थेला भेट दिल्यानंतर विशेष अनकूल ग्रह झाल्याने १९५१ साली अमेरिकेतील रॉकफेलर फौंडेशनतर्फे पाच वर्षे काम करण्या–करता म्हणून प्रथम रु. ८०,००० चे अनुदान मंजूर झाले व त्यावेळी संशोधकांचा खर्च करण्याकरता म्हणून संस्थेस पाच वर्षांकरता दरवर्षी रु. ५००० प्रमाणे अनुदानही मिळाले त्यानंतर १९५३ सालापासून भारत सरकारने वार्षिक रु. ८००० चे अनुदान संस्थेच्या कामासाठी मंजूर केले.

इतकी वर्षे संस्थेचे काम भारत सेवक समाजाने दिलेल्या मर्यादित जागेत चालत असे. कामाचा व्याप मात्र बराच वाढला होता. अशावेळी १९५५ साली मुंबई सरकारने नवीन स्वतंत्र इमारतीसाठी म्हणून संस्थेस रु. १,००,००० ची भरीव देणगी दिली; आणि कामाचा वाढता व्याप सांभाळण्याच्या दृष्टीने मोठीच मदत झाली. सर दोराबजी विश्वस्त निधी–मधून पुन्हा एक लाखाची देणगी मिळाली. त्यानंतर रॉकफेलर फौंडेशनतर्फे १९५५ साली संस्थेच्या संशोधन कार्याला स्थैर्य लाभावे या दृष्टीने एक लाख पन्नास हजार डॉलर्सची मोठी देणगी मिळाल्याने कामाची व्याप्ती वाढविणे शक्य झाले. त्यानंतर विद्यापीठ अनुदान मंडळाकडूनही देणग्या मिळत गेल्या. १९५८ साली फोर्ड फौंडेशनने पुढील पाच वर्षांसाठी खर्च करण्याकरता म्हणून पुन्हा पाच लाख डॉलर्सची भरीव देणगी दिली आणि त्यामुळे संस्थेला नियोजन व विकास या क्षेत्रात संशोधन सुरू करता आले. या काळात भारताबाहेरही संस्थेच्या कामासंबंधी बरीच प्रसिद्धी झाल्याने अमेरिकेतील विद्यापीठातील काही प्राध्यापक संशोधनासाठी म्हणून वर्ष दोन वर्षांकरता आवर्जून गोखले अर्थशास्त्र संस्थेत येऊन गेले. फोर्ड फौंडेशनने १९६३ साली आणखी पाच वर्षांकरता म्हणून तीन लाख डॉलर्सची देणगी दिल्याने वाढत्या कामासाठी लागणाऱ्या नवीन इमारती आणि ग्रंथालयासाठी भव्य इमारत उभारणे संस्थेला शक्य झाले. याच सुमारास विद्यापीठ अनुदान मंडळाने संस्थेला "अर्थशास्त्राच्या प्रगत अभ्यासाचे केंद्र" (centre of Advanced Study in Economics) म्हणून मान्यता दिली.

१९६६-६७ साली नियोजन मंडळ व विद्यापीठ अनुदान-मंडळ यांचे मदतीने वन-अर्थशास्त्र विभाग सुरू करण्यात आला. विद्यापीठ अनुदान मंडळाने द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळात राष्ट्रीय उत्पादन व विकास-नियोजन, नागरी अर्थशास्त्र, व्यावहारिक संख्याशास्त्र, ग्रामीण समाज व्यवस्थाशास्त्र हे विभाग संस्थेमध्ये सुरू केले. तृतीय पंच वार्षिक योजनेच्या काळात "भारताची आर्थिक रचना" हा विभाग सुरू केला.

सन १९५९ पासून संस्थेने आपले स्वतःचे त्रैमासिक 'अर्थविज्ञान' सुरू केले. संस्थेतील संशोधकानी केलेले संशोधन या त्रैमासिकात प्रसिद्ध केले जाते त्याचप्रमाणे इतर लेखकानी लिहिलेले संशोधनपूर्ण लेखही प्रसिद्ध केले जातात. संस्थेच्या ग्रंथालयात आज दीड लाखाच्या वर ग्रंथ आहेत व एक हजार नियत कालिके येत असतात. U.N.O यूनेस्को, एफ् एओ; आय् एल ओ, इंटर नॅशनल कोर्ट ऑफ जस्टिस या संस्थांची प्रकाशने ग्रंथालयात येतात. निरनिराळ्या पहाणी मधून संस्था जी आकडेवारी जमा करते त्यावर प्रक्रिया करण्यासाठी संस्थेजवळ आधुनिक गणयंत्रेही आहेत.

१९५५ नंतर संशोधक, सहाय्यक संशोधक, संशोधक विद्यार्थी इत्यादी मध्ये वाढ होत गेली. संस्थेतील संशोधकाच्या मार्गदर्शनाखाली Ph. D. साठी विद्यार्थी काम करतात. संस्थेमार्फत ६० इंग्रजी प्रकाशने आणि १६ मराठी पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली आहेत; तसेच १८ टंकमुद्रित अहवाल प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आतापर्यंत ७५ विद्यार्थ्यांचे Ph. D. चे काम पुरे झाले.

१९३७ सालापासून संस्थेमध्ये रा. ब. रा. रा. काळे स्मृति व्याख्यान-माला सुरू करण्यात आली आहे. भारतातील विविध आर्थिक-सामाजिक किंवा राजकीय प्रश्नावर त्या त्या क्षेत्रातील अग्रेसर अभ्यासकास व्याख्याना-साठी निमंत्रण देऊन संस्थेतर्फे ही व्याख्याने प्रसिद्ध करण्यात येतात. या मालेतील ३५ व्याख्याने प्रसिद्ध झाली आहेत. रा. रा. काळे यांच्या स्मृतीस उचित अशी अभिवंदना या व्याख्यानमालेद्वारे दिली जात आहे. भारत सेवक समाजाच्या आवारातील ग्रंथालयाच्या नवीन इमारतीतील मोठ्या हॉलला "काळे सभागृह" असे नाव देण्यात आले असून ही व्याख्याने आता त्याच हॉलमध्ये दिली जातात. व्याख्यानाचा दिवस "संस्थापक दिन" म्हणून मानला जातो.

# परिशिष्ट पाचवे

## कारखानदारी व नियतकालिके आणि
## रा. ब. काळे यांची सामाजिक दृष्टी

( कै. शं. वा. किर्लोस्कर यांचे आत्मचरित्रात आलेला मजकूर पृष्ठ १९५–१९६ )

" वास्तविक पाहता साहित्य हा औद्योगिक क्षेत्रापासून फार दूरचा विषय आहे असे एकाद्यास वाटेल; तथापि आजकाल साहित्यप्रकाशन हे लोकमत अनुकूल करून घेण्याचे व प्रसिद्धीचे एक बलाढ्य साधन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. एवढ्यासाठीच युरोप अमेरिकेतले कारखानदार जाहिरातीचा भरपूर प्रमाणात उपयोग करतात. तसेच आपल्या मालकीची नियतकालिकेही ते प्रकाशित करतात असे आढळून येते. तीच प्रथा आपल्या मासिकांनी उचलली आहे.

गरीब व श्रीमंत, स्त्रिया व पुरुष, शहरवासी व ग्रामीण, महाराष्ट्रातले व महाराष्ट्राबाहेरचे अशा सर्वांकडे ही मासिके जातात. त्यांनी फार मोठी लोकप्रियता मिळविली आहे. त्यामुळे कारखान्याच्या प्रसिद्धीचे काम होऊन, असंख्य व्यक्तींचा किर्लोस्कर–वाडीबरोबर स्नेह जोडण्याचा कार्यभाग ही मासिके पार पाडत आहेत. तसेच महाराष्ट्रात जो विद्वानांचा व विचार–वंताचा वर्ग आहे, त्याच्याशी संबंध जुळवून आणून त्यांच्या सहानभूतीचा लाभ ही मासिके आपल्या कंपनीस मिळवून देतात. इतके करून ती आत–बट्ट्यात चालली आहेत असेही नाही. सारांश, कोणत्याही दृष्टीने पाहता ही मासिके आपल्या कंपनीला उपयुक्त व फायदेशीर अशीच बाब आहे.

तसेच काम सद्यस्थितीमध्ये समाजापुढे जे जे निराळे प्रश्न उपस्थित होत आहेत, त्यांचा निर्णय लावून समाजाला आपल्या प्रगतीचा मार्ग अधिक स्पष्ट दिसण्यास मदत व्हावी या हेतूने अशा प्रश्नांचाही या मासिकात

vants of India Society 1930. Has endowed several local Institutions in Satara of which he is President. Publications : Pamphlets on various subjects including those on " National Education " " Bombay Land Revenue Policy " and " Hindu Religion and Philosophy ".

Address- Satara.

From :

WHO'S WHO

in

Western India

The Sun Publishing House, Poona.

( 1st October, 1934 )

Edited by : THOS PETERS

# आवश्यक टीपा

१) "पुरुषोत्तम" हा चरित्र ग्रंथ कै. श्री. चं. ह. पळणिटकर यांनी इ. स. १९३७ मध्ये प्रसिद्ध केला तेव्हा त्याच्या पृ. ८, १२, १९, ५५, ७१ ७७, ९२ वगैरे ठिकाणी जेथें जेथे आज, आता, चालू, हल्ली असे व अशा अर्थाचे शब्द आले आहेत तेथे तेथे इ. स. १९३७ व त्याच्या आसपासचा काळ संदर्भाने समजावयाचा आहे. तसेच 'येथे' चा अर्थ सातारा शहरात (पृ. २७, ३४, ९४) असा घ्यावयाचा आहे. त्याप्रमाणेच या जिल्ह्यात (पृ. ७९, १०४, १३२) याचा अर्थ सातारा जिल्ह्यात असा समजावयाचा आहे.

२) पृ. ३ ओळ शेवटाकडून दुसरी व पृ. ८ पहिली ओळ यातील व अन्यत्रीचे "विटे (सातारा)" हे सन १९४८ पासून विटे (सांगली) झाले आहे.

३) पृ. ८ शेवटची ओळ-- "येथील गावातील राहत्या घरी" म्हणजे सातारा शहरातील रा. ब. काळयांच्या राहत्या वाड्यात आज येथे कन्याशाळा आहे तो भवानी पेठेतील वाडा.

४) पृ. ११ ओळ ७ "भवानीपति" या शब्दातील भाषा = शास्त्रदृष्ट्या असलेली चूक भव + अवनिपति. याचा समास भवावनीपति असा व्हावयास हवा. भवानीपति असा पार्वतीचा पति शंकर या अर्थाचा संस्कृत शब्द आहे. त्याचे संबोधनसुद्धा भवानीपति असे व्हायचेच नाही. ते भवानीपते होईल.

५) पृ. १६ ओळ १५ पुत्राच्या चिरवियोगानंतर म्हणजे इ.स. १९२५ नंतर पृ. १६ ओळ १६ पत्नीच्या मृत्यूची आपत्ती = सौ. सत्यभामाबाई काळे यांच्या १९३४ त झालेल्या निधनाचे संकट.

पृ. १९ ओळ १० प्रतोद पत्रावरील खटला पृ. २५ वर पहा.

पृ. २० ओळ १७ औंध कमिशन = औंध संस्थानचे अधिपतींचे फिनॅन्स सेक्रेटरी म्हणून १८९८ ते १९०१ श्री भवानराव काम पहात पण औंधचे अधिपति श्रीमंत श्रीनिवासराव दिवंगत झाल्यावर औंध संस्थानला वाढते कर्ज होऊ लागले तेव्हां एकंदर कारभाराची चौकशी करण्यासाठी त्यावेळचे (१९०५) सातारा कलेक्टर, श्री. ऑर्थर यांच्या नेतृत्वाखाली जे कमिशन नेमले गेले ते औंध कमिशन होय

चांगली तीन वर्षे या कमिशनचे काम चालले. आणि त्यातून कारभारी जेकब बापूजी यांच्यावर मारेकरी घातल्याचाही कट झाल्याचे काही पिऱ्या मांगादिकांच्या हालचालीवरून अनुमान निघू लागले. त्यावेळी श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव यांची बाजू रा. ब. काळे यांनी मांडली होती परिणामतः १९०९ साली श्री भवानराव पंतप्रतिनिधी झाले.

पृ. २० ओळ १८ शिगावची दुहेरी खुनाची केस = पृ. २७ व पृ. २८ वर पहा.

पृ. २९ ओळ ८ " लखनौ ॲक्ट " नव्हे लखनौ पॅक्ट असे वाचावे.

पृ. ३८ तळापासून ७ वी ओळ जागृत सातारा = सातारा जिल्ह्याचा पु. पां. गोखले यांनी लिहिलेला इतिहास या पुस्तकाची १९६५ अखेरचे सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक जीवन रेखाटणारी दुसरी आवृत्ती १९६६ मध्ये प्रसिद्ध झाली आहे.

पृ. ६० ओळ ७-८ नगरदेवतेचे = सातारा नगरपालिकेचे ( " नगर देवते, म्युनिसिपालिटे, माधव तुज वंदन, करितसे घालुनि लोटांगण " या कै. माधवराव जोशी, नाटककार यांच्या 'स्थानिक स्वराज्य' नाटकातील पद्यावरून )

पृ. ६१ तळापासून ४थी ओळ. आमच्या येथे = हिंदुस्तानात

पृ. ७९ ओळ १२ खाजगी शाळा = श्री. दत्तोपंत जोशी यांनी चालविलेले कोचिंग क्लासेस.

पृ. ८६ ओळ ९ वी बाळराजे = कै. शाहू महाराज, सातारा.

पृ. १०३ ओळ १८ पद = मंत्रिपद

पृ. १०५ सोलापूर मार्शल लॉ = १९३० च्या चळवळी दडपण्यासाठी ब्रिटिश रियासतीने सोलापुरास पुकारला होता तो.

पृ. ११६ ओळ १२. परवापर्यंत = १९३४ अखेर

पृ. १३१ ओळ ३ गेल्या दहा बारा वर्षात = १९२५ ते १९३७.

पृ. १३२ ओळ २२. जिल्ह्याच्या प्रगतीचा सर्वांगिण इतिहास = जागृत सातारा.

पृ. १३३ ओळ १० आजच्या स्मृतिदिनाने = १७ जानेवारी १९३७

पृ. १४३ ओळ १२ " श्रमपरिहार नाहिसा होई " यात 'नाहिसा' शब्द रद्द समजावा.

# सूची


अखिल भारतीय प्रागतिक परिषद ३५, ३८
अखिल भारतीय महिला विद्यापीठ १२
अखिल भारतीय लिबरल फेडरेशन १०२
अठराशे अठ्याऐंशी ७, ११
,, अडुसष्ट ३, ७, १३५
,, एक्क्याण्णव १२
,, चोपन्न ७१
,, नव्याण्णव ७९
,, पंचाऐंशी १०, १३५
,, पंचाण्णव १०७
,, ब्याऐंशी ७१
,, ब्याण्णव १२, ३६, १३६, १३८, १६७
,, शहाऐंशी-सत्याऐंशी ६७
,, शहाण्णव ८४, १३६
,, सत्याऐंशी ११
,, सत्त्याण्णव ७४
अडसूळ ११९
अथेनियन युवक ४९
अनाथ बालिका-आश्रम ८२ ते ८५
अनाथ बालिकाश्रम मंडळ ८४
अब्दुलरहिम (सर) ६७
अभ्युदय १३८
अमृतसर काँग्रेस १०५
अमेरिका ४३, ५०
अरविंद (योगी) १
अस्पृश्यतेला अर्धचंद्र १२६
अहमदनगर १५७
आगाशे (डॉ.) भाऊराव ६२
आगाशे (डॉ.) मो. ना. ९३
आगाशे (ना. कृ.) नानासाहेब ११७
आगाशे सौ. सत्यभामाबाई १७
आचरेकर ५२, ६१
आढाव ५१
आनंदमठ ७४
आपटे लक्ष्मणराव ११७
आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब ११८, ११९, १६२
आयुर्वेद प्रसारक मंडळ ९१ ते ९३
आयुर्वेद विद्या प्रसारक मंडळी ९०
आर्यांग्ल वैद्यक विद्यालय १५, ९१, १३६
आर्यांग्ल वैद्यक शाळा ९०
इंग्रज (सरकार) ४०, ४५
इंग्लंड ४५, ५३, ६१, ७२, ७४
Introduction To Geeta Dharma Kaumudi १२४
इराण १३४
इसलामपूर १६, २५, १०३

उत्तम पुरुष ३
ऋग्वेद १२८
एकेश्वरी ३
एकोणिसशे ३०, १३६, १६७
एकोणिसशे अकरा ५०, ९३
,, अठरा ३५ ३७, ७३, ७८, ९०
,, अठ्ठावीस ३८, ५२, ६०, १२०, १३७, १६७
,, अठ्ठेचाळीस १४७, १५४, १५६
,, आठ १७, ३६, ८०
,, एक ७८, १०४
,, एकतीस ४३, ६१, ६२, ९२, ११७, १३६, १३९, १६०
,, एकवीस १७, २२, ५०, ९०, १६७
,, एकोणतीस ६२, ८२, ९५, १६७
,, एकोणपन्नास १६०, १६४
,, एकोणसाठ १५६
,, एकोणीस ३८, ८६, ९४, १४१
,, चवऱ्याहत्तर पंचाहत्तर १५७
,, चार ७१
,, चाळीस १४८
,, चोपन्न १४०
,, चोवीस ३८, ७८, ८२, ९०, १०४, १०६, १४१
,, चौतीस १७, ३५, ५०, ५२, ८२, १०३, ११९, १३९

एकोणीसशे छत्तीस ४, ८७, १३५, १३७, १३८, १३९, १४१, १६१
,, तीस ५२, ७६, ७८, १३७, १३९, १५८, १५९, १६७, १६८
,, तेरा ७, ३५, ९०, ११६, १६७
,, तेवीस ५१, ५२, ५५, ५६, ६२, ७३, ७८, ९१, १०४, ११९
,, तेहतीस ९, १२५, १२६
,, त्रेचाळीस १६२
,, त्रेपन्न १४०
,, त्रेसष्ट १६३
,, दहा (अकरा) ७१, ७८
,, दोन ७, १९, १३६, १६७
,, नऊ ८०
,, पंचवीस १०, १७, १८, ७८, ९२, ९३, ९५
,, पंचावन १६२, १६४
,, पंचेचाळीस १६२
,, पंधरा ८, ७८
,, पन्नास १४०
,, पसतीस ५०, ६०, ८३ ते ८५, १३६ ते १३८, १३९, १४८
,, पाच ७४, १०७

एकोणीसशे बत्तीस ६१, ६२, ६९, ७१, ७३, १०६, १६०
,, बावन १४०
,, बावीस ६१, ६३, ८२
,, वीस ७, १९, ५१, ६१, ६२, ९०, ९५, १०३, १०८, १३०, १३६, १३८, १६७
,, सत्तावीस ३८, ६२, ६३, ७०, ८२, ९२, १३७, १४३
,, सत्तेचाळीस १५३, १६२
,, सदतीस १८, १५०, १६१, १६४
,, सव्वीस ५२, ५३, ५५, ५७, ६३, ७०, ९१, ९२, १०६, १२१, १२२, १४२
,, सहा १३१, १५८
,, सहासष्ट १५९, १६४
,, साठ १५७
,, सेहेचाळीस १६३
,, सोळा ८२, ९०
एल्फिन्स्टन् १२, ४२
एल्फिन्स्टन् कॉलेज १३६, १६७
ऐक्य ७२, १२७, १२८
ऐक्य संपादन मंडळ १५
ओगले कारखाना १३१
औंध ९, १२, १२९
औंध्र कमिशन २०
औंधकर (श्रीमंत) २०, १२९
औंधचे राजेसाहेब १२, १२९
औंध दरबार १२९
औंध प्रजाजन १२९
औंध सं. सभा १२९
औंध स्टेट असेंब्ली १६७
औरंगाबाद ८
कडूसकर ११७
कॅनडा ४३
कन्याशाळा (सातारा) १५, ८२, ८३, ८५, १०४, १३६, १३८, १४०
करंदीकर दादासाहेब २, १९, २२, २५, ३०, ५०, ५३, ५९, ७९, ८२, ९६, ११४, ११७, १३१, १३४ते १३६
करंदीकर वि. र. ११४
कर्ण ९७
कर्वे (महर्षि) अण्णासाहेब १३७
कऱ्हाड ३३, १०४, १३१, १३८
कऱ्हाड मॅच फॅक्टरी १३१
कलकत्ता ३८
काकडे ९३
कॉंग्रेस ३५, ३६, ३८, ५१, ५४ते ५९
कामत (आमदार) १३७
कालिदास १४
काळे १४१
कावसजी १०९
काळभोर (रा. सा.) १३७
काळे आबासाहेब ९
काळे गोविंदराव ८, ९, ८१
काळे जानकीबाई ८, १७

काळे दांपत्याचे वैशिष्ट्य १७
काळे बंधूंची लायब्ररी ८१
काळे (गो. कृ.) बापूसाहेब (सरदार) १२, १४०
काळे बाबासाहेब (राजारामपंत) १०, १७, १८
काळे यमुना ८
काळे रामचंद्रपंत ८
काळे राव (साहेब) बहादुर रावजी (पुरुषोत्तम) रामचंद्र १ ते ६४, ६९ ते ७७, ९४ ते ९९, १०१ १०३ ते १२४, १२६, १२९, १३३ ते १३८, १४१, १४४ ते १४६, १५८, १५९, १६२, १६४ ते १६८
काळे शंकर ८
काळे ( सौ. ) सत्यभामाबाई ( वहिनीसाहेब ) ९, १४ ते १७, ३४, ८३, ८४, ९५
काळे ( सौ ) सत्यभामाबाई-शिक्षणमंदिर ८३
काळे सुशिलाताई ( ताईसाहेब ) १०, १८
काळे स्मारक मोफत वाचनालय ८७
किर्लोस्कर बंधु १५, १६, ११४, १३०, १६७
किर्लोस्कर ( मासिक ) १२६
किर्लोस्कर शं. वा. ११४, १२४, १६५
कुंडली ( सायन ) ४
कुदळे भाऊसाहेब ८६, ११०
कुलाबा १५७
कूपर ( खानबहादुर ) ५१, ५२, १०७ ते १०९
केंब्रिज ७८
केसरी ५४, १३५
केळकर न. चि. ५९, ११९, १२०, १३७
कोकण ९
कोल्हापूर १५२, १५४, १५७, १६१
Crown of Hinduism ३५
क्वीन्स कॉलेज ७८
खरसुंडी केस २०
खेड्याची चावडी ४२ ते ४४
ख्रिस्ती धर्म ३५
गजेंद्रगडकर के. बा. ११३
गाडगीळ अजित (राजाराम) १८
गाडगीळ आप्पासाहेब १२, १३७
गाडगीळ (प्रि.) धनंजयराव १८, ७६ ते ७८, ८९, १३१ १३५, १३६, १४७, १५५, १५८ ते १६४
गाडगीळ (सौ.) प्रमिलाबाई १०, १८, १४०, १४७
गाडगीळ व्ही. आर. ७६, ७७, १६०
गाडगीळ श्रीधरपंत ८
गाडगीळ कु. सुलभा १४०

गांधी (महात्मा) १२८, १४३, १४४, १५४
गायकवाड सयाजीराव ११८
गार्डिनर ५३
गीता २, ३, ३२, १२४ ते १२६, १३७
गीताकार २
गीताधर्म कौमुदी ११३, १२५
गीता रहस्य ६, १२५
गोखले (नामदार) ४६, ६०, ६२, ७१, ७४, ७५, ८७, ९७, ११९, १२८, १३७, १३८, १५९
गोखले अर्थशास्त्र आणि राज–कारण संशोधन मंडळ (गोखले इन्स्टिटयूट् ऑफ् पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स) ७६, ७८, ९६, १००, ११९, १३९, १५८, १६० ते १६४, १६८
गोखले पु. पां. १३८
गोगटे एल्. व्ही. ७६, ७७, १६०
गोचर ग्रहफळे ७
गोध्रा ६२
गोलमेज परिषद् ४१
गोवईकर वामनराव ११७
ग्रँट डफ ४४
ग्वाल्हेर १५४
घारपुरे (प्रि.) १३९
चतर्जी रामानंद ४९
चंदावरकर कमेटी ७१, ९०
चव्हाण (ना.) यशवंतरावजी १५७
चाफेकर के. व्ही. ८
चाफेकर ना. गो. १२
चिंतामणि (सी. वाय्.) १०४, ११९
चिरमुले अण्णासाहेब ११५, ११८
चिरोल सर व्हॅलेंटाईन ७४, ७५
चुनिलाल (सर) मेहता १०९
छत्रपति महाराज १४२
छत्रपति शहाजी महाराज १५४
छत्रपति शिवाजी कॉलेज १५२
जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति १०, ११
जमीन तुकडेपट्टी ६२
जयकर (बॅ.) एम्. आर्. १२०
जवाहर (लाल नेहरू) १००
जव्हेरे सीतारामपंत ३३, ३४
जागृत सातारा ५२, ५३, १२८
जातिनिष्ठ धोरण ३६ ते ३९, ४२
जाधव (ना.) भास्करराव १२, ५१, ५२
जिल्हा लिबरल लीग १०४
जोशी काका ११६
जोशी (कु.) मथुराबाई १७, ३४
जोशी (रा. ब.) ३४
जोशी वासुकाका १३७
जोशी श्री. वि. (तात्यासाहेब) ९१
टागोर महर्षि देवेंद्रनाथ १९
टागोर सत्येंद्रनाथ ३३
टॉलस्टाय ९७

टिळक (लो.) ५, ६, ४६, १२४, १२५, १२८
टिळक डेमॉक्रॅटिक स्वराज्यपक्ष ५१
टिळक हायस्कूल कऱ्हाड १३८
ट्रस्टी सरकार ३९ ते ४१, ४८
ट्रान्स्लेशन ( Lessons in English Translation ) ८
ठाकरसी (लेडी) ९४
ठाणे १५७
डकेट केस २०
डिस्काउंट पायस ४३
डिस्ट्रिक्ट लिबरल असोसिएशन ३०, १६७
डिस्ट्रिक्ट व सिटी म्युनिसिपॅलिटीज् अॅक्ट ६२
डी. ई. ए. सो. ९, ७९, ८१, ८२, ९५
डीन इंग २९
डेक्कन कॉलेज ११, १२, ९५, १३५, १६७
डेक्कन सभा (पुणे) १०४
तासगांव कोर्ट प्रकरण १०५
दक्षिणा फेलोशिप् १२
दातार तात्यासाहेब (मिरजकर) ९
दातार मनुबाई ९
दासबोध ३
दिन वर्ष पद्धति ७
दीक्षित के. एस्. ८६
दीक्षित ज. दा. ३३
दुधगाव शिक्षण मंडळ ८९
देवधर गो. कृ. (बाबासाहेब) ७४, ९४, ९७
देवधर सीतारामपंत ८०, ८१
देवल (नाट्याचार्य) ५४
देवी गणपतदास ११७
देशपांडे (डॉ.) १०७
देशपांडे डॉ. कमलाबाई ८२, ८३, ८५
देशपांडे (ल. म.) ५२, ५३
देशपांडे वाग्भट ना. ८५, १२७, १३०
देसाई (ना.) हरिलाल ९२
देहलवी ७०
द्रविड न. अ. ७४
धनंजय (गाडगीळ) १०१
धमार्थदीपिका
धार्मिक ट्रस्ट ६३
नगर १०४
नलवडे बा. ना. १४५
नाईक भीमभाई ६२
नागपूर ७८
ना. दा. ठाकरसी विद्यालय ८२
नाशिक ११, १५७
निंबाळकर मालोजीराव १५४
नूतन वैद्यक विद्यालय ९१
नेमस्त २९
नेहरू (पं.) मोतिलाल ९७, १०६
नेहरू रिपोर्ट ३८

नोव्हेस्कोशिया ४३
नौरोजी दादाभाई ४६, ६७
न्यू इंग्लिश स्कूल पुणे १०, ११
न्यू इंग्लिश स्कूल सातारा ९, १८, ८१, ८२, १३६, १३८
न्यूयॉर्क ५०
पंचम जॉर्ज बादशहा ८६
पटवर्धन अ. वि. ७४
पटवर्धन हायस्कूल ७८
पटेल ॲक्ट ७३, ८९
पंडितराव सरदार बाबासाहेब ८६, ११४, १४५
पंढरपूर ९
पंत प्रतिनिधि बाळासाहेब ( औंधकर श्रीमंत पहा )
पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १४०
पब्लिक सर्व्हिस कमिशन ६७
परांजपे (डॉ.) ५१, ५४, ७४, ९०, १०९
पॅसिफिक समुद्र ४३
पाटकर सी. सु. १२, ८४
पाटणकर नीलकंठ ११
पाटणकर (सरदार) ५२
पाटील भाऊराव (आण्णा) ८६, ८९, ९०, १००, १४१ ते १५७
पाटील (सौ.) लक्ष्मीबाई १४३
पाठक मास्तर ( रा. ब. ) वि. ना. ७९, ९५, १०१, ११७
पाठक (सौ.) यमुनाबाई ९५
पाठक रखमाबाई ९५
पिट् ५३
पुणे १०, १२, १८, ३०. ३५, ४७, ७७ ते ८०, ८९, ९५, ११४ ११९, १३५, १३७, १३९, १४१, १४६, १५२, १५७
पुणे प्रार्थना समाज ३५
पुणे विद्यापीठ १५६, १६०
पुरुषोत्तम (काळे रा. ब.) १, २, ३, १०, १७
पुसेगाव ९
पूना हायस्कूल १०, ११, १३५
पेठ (नेरले) ९
पेंडसे १६०
पेशवे ४२
प्रतियोगी सहकार ४६
प्रतोद १९, २५
प्रागतिक २९, ३५.
प्रागतिक पक्ष २८, ३५, ३६, ४६ ते ४८, ५२, ५४, १०४
प्राच्यविद्या परिषद ११३, १२५
प्रॉटेस्टंट हिंदुइझम १२३, १२४
प्रांतिक प्रागतिक परिषद १०४
प्रांतिक सामाजिक परिषद १०४
प्राथमिक शिक्षण परिषद ७१
प्रार्थना समाज २, ३, १५, २७ ते ३५
प्रार्थना समाज तत्त्वे ३४

प्रार्थना समाज धर्म ३५
प्रार्थना समाजवादी ३
प्रेसिडेन्सी एरिया सिक्यूरिटी १६२
प्ल्यूटार्क १३२
Farquhar S. N. ३५
फ़णसळकर एल्. के. ९४
फर्मानी कायदे ६०
फ़लज्योतिष ५, ६
फलटण १५४
फलटणकर राजेसाहेब ९३, १५४
फॉक्स ५३
फाटक (प्रा.) न. र. ३५
फ़ॉसेट २५
फिनलंड ८७
फेगन २५
फ्रँक्स एम्. एस्. ४२
बॅंक बे रेक्लेमेशन स्कीम ६८
बंकिमचंद्र ७४
बंगलोर १११
बंगाल ४६, ५७
बडोदे १२५, १५२
बद्रुद्दिन तय्यबजी ४६
बॅप्टिस्टा (बॅ.) ५३, ५४
बर्कन् हेड (लॉर्ड) ४७
बर्न्स (डॉ.) ७८
बाण भट्ट १२
बापट नारायणराव ८
बापट (से.) पां. म. ५९
बारटक्के १४५
बॉस्वेल १३२
बाळाजी आवजी ९३
बीड १५७
बुधगावकर (श्रीमंत) ९
बुधाची राशि ४
बेझंट बाई ४६
बेळगाव ८, १५७
बोस (सर) बिपिन (चंद्र) ७५
ब्रॅन्सन् (बॅ.) २०
ब्रह्मदेश १३४
ब्राह्मधर्म १२२
ब्रिटिश लोक ४१
भगत्सिंग १३३
भगवद् गीता (गीता पहा) १२३, १२४
भवानीपति ११
भाऊदाजी प्राईज ११, १३५.
भागवतधर्म ३२, ३३.
भांडारकर (डॉ. प्रो.) ११, १२
भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ ९६
भारत सरकार १५६
भारत सेवक समाज ३०, ७४, ७६, ८२, ११९, १२८, १५८, १५९
भिडे (हु. डे. क.) १०७
भीष्माचार्य २१
भुत्तो (ना.) ११२

मॅटर्निटी होम २५
म. ठा. वा. कॉलेज ७८
मणसगाव १०
मद्यपान निरोधन ३०
मद्रास ३८
मराठ राज्यांची संयुक्त संघटना ४३ ते ४५
मराठी वांग्मयाची गेली २५ वर्षे १२८
मसूर ९६
मसूरकर विनायकबुवा ९६, १३७
मसूर ब्रह्मचर्याश्रम मसूराश्रम ९६, १३७
महाकाली १०
महाराजा सयाजीरव हायस्कूल १४८
महाराष्ट्र १, २, ३५, ७७, ८९, १३०, १३२, १३५, १३७, १३८, १४१, १६५
महाराष्ट्र गोसंवर्धन परिषद १०४
महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटी ५९
महिलासदन ८३
महिला विद्यापीठ ८४, ८५, १६८
महिला विश्व विद्यालय ७८
मांट फर्ड सुधारणा (मांटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा) २२, ३५, ४७, ५०, ९०, १३८
मॉडर्नरिव्ह्यू ४९
मिथुनराशि ४, ५
मुकादम वामनराव ६२
मुथा (रा. ब.) मोतीलाल बा. ८६, १४८
मुंबई १२, १०६, १२४, १५२, १५७
मुंबई इलाखा ४६, ५२, १३८
मुंबई इलाख्यातील जमीनधारा पद्धति १२१
मुंबई (कायदे मंडळ) कौन्सिल ५१, ६०, ११४, १३७, १६७
मुंबई (प्रार्थना) समाज ३५
मुंबई युनिव्हर्सिटी (विद्यापीठ विश्वविद्यालय) १०, ५२, ७८, ९६, १६०, १६८
मुंबई सरकार १७, १८
मुंबई हायकोर्ट २३, २८
मुस्लीमलीग ३८
मुळे वामनराव ९
मेथा (मेहता) सर फेरोजशहा ४६, ७५, ९७
मेस्टन् सेटलमेंट ६४
मोतीलाल (नेहरू पहा) १०१
मोर्ले (लॉर्ड) ३६, ५०
मोर्ले मिंटो सुधारणा ३७
युनिअन बोर्डिंग (पुणे) १४५
युनिव्हर्सिटी बिल ६२
रघुवंश १२
रत्नागिरी ८, १५७
रयत परिषद १६

रयत रूरल ट्रेनिंग कॉलेज १४६
रयत शिक्षण संस्था सातारा १५, ८६, ८८, ८९, १०४, १४१ ते १४३, १४५
राउंड टेबल कॉन्फरन्स ४१
राजापूर ९
राजा राममोहनरॉय ४६
राजाज्ञे (सरदार) १४५
राजेसाहेब सांगली १३९
रानडे अर्थशास्त्र संशोधन मंडळ, रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूट ९६, ११९
रानडे गो. अ. १११
रानडे (न्या.) म. गो. १, २, ३०, ३१, ३५, ४४, ४६, ४७, ८७, ८९, ९७, १०१, ११६, ११९ १२२, १२८, १३८, १४१
Ramachandra Ballal Kale—Memorial charitable Ayurvedic Dispensary Fund ९१
रामदास मंडळ ७५
रा. ब. काळे विश्वस्त निधि १३९
रावजी (काळे रा. ब. रा. रा. पहा.)
राष्ट्रीय प्रागतिक पक्ष ४६
राष्ट्रीय शिक्षण ३०
राष्ट्रीय सभा (कॉंग्रेस पहा)
रिफॉर्म्स इन्क्वायरी कमिटी ३८
रूरल ट्रेनिंग स्कूल ८६
लखनौ पॅक्ट ३९
लॅंडरेव्हेन्यूकोड दुरुस्ती ६२
लॉ कॉलेज पुणे १३९
लार्गडिया एफ् ५०
लाहोर ७४
लिटनस्ट्राची १३२
लिब (गोवे) ८
लिबरल असोसिएशन ११७, १३६
लिबरल पक्ष ४८, ११९
लिबरल फेंडरेशन ४५, ११९
लिबरेलिझम् ४५ ते ४७
लुडविन १३२
लोकल बोर्डस् अॅक्ट ६२
लोक शिक्षण लघु ग्रंथमाला ७८
वझे १६२
वतन अॅक्ट दुरुस्ती ६२
वरजीवनदास माधवदास स्कॉलरशिप ११
वहिनीसाहेब (काळे सौ. सत्यभामाबाई पहा)
वाई प्रा. स. उत्सव ३५
वॉकर २५
वॉरन हेस्टिंग्ज १२५
विटे ३, ८, १३५
विल्किन्सन् १२५
विवेकानंद १३
विश्वधर्म ३३

वुइलिंग्डन कॉलेज ९५
वेंकट रंगय्या १६२
वेद ३२
वेलिनकर (बॅ.) १३
वेल्बि कमिशन ६७, ७४
वेस्टर्न इंडिया (ला. इ.) कंपनी ९३, ११६, १६७
वैद्य जनुभाऊ ९
वैद्य द्वा. गो. ३१, ११६
व्याकरण १०
व्यापारेश्वर १०
शाकुंतल १२
शास्त्री (ने. ना. श्रीनिवास) १०४, ११२
शाहू बोर्डिंग १५, ८६, १३८, १४५, १५३
शाहु महाराज (राजर्षि) १५५
शिगांवची दुहेरी खुनाची केस २०
शिंदे जिवाजीराव १५४
शिंदे (रामभाऊ) ५२, १४५
शिंदे (म.) वि. रा. ३४, १५०
शिवाजी भोसले ४४
सक्तीचे प्राथमिक शिक्षण ६२
सतराशे पंचाऐंशी १२५
संत गाडगे महाराज १५६
संतानसंघ ७४
सत्याग्रहान्दोलन ३०
समर्थ (रामदास) ३, ३२
समर्थ (साप्ताहिक) १३७
समर्थ साहित्य ३
Servants of India / Servants of India Socity / सर्व्हंटस ऑफइंडिया सोसायटी ४७, ११९, १२८, १५८
संस्कृत ५, १० ते १३
सहस्रबुद्धे ब. श्री. ७९
साइक्स (गव्हर्नर) ११८
साउथ बरो कमिटी ३७
सांगली ९५, १२९, १५७
सांगली रयत असेंब्ली १३०
सांगली स्टेट असेंब्ली १६८
साठे शि. ह्. ७४
सातवळेकर (पं.) १२९
सातारा ९, १०, १२ ते १४, १९, २२, ३० ते ३७, ६४, ७९, ८६, ८९, ९६, ९७, १०१, १०४, १०७, ११६, ११९, १२७, १३५ ते १३७, १४० ते १४२, १४४, १४८, १५०, १५३, १५८
सातारा इतिहास-संशोधन मंडळ १०४
सातारा जिल्हा १, २, ७, १७, २४, २६, २९, ३०, ५० ते ५२, ५४, ७५, ७७, ९०, १३१, १३५, १३८, १४१ १४४, १४५, १५७

सातारा जिल्हा रयत परिषद १०३
सातारा जिल्हा लोकल बोर्ड ७३, १६७
सातारा जिल्हा विद्यार्थी १५६
सातारा तालुका काँग्रेस कमिटी ५७, ५९
सातारा नगरदेवता ६०
सातारा बार २३
सातारा म्युझिअम् १०४, १६८
सातारा म्युनिसिपालिटी ७३, ८९, ९१, १६७
सातारा रयत असेंब्ली १३०
सातारा सोशल रिफॉर्म असोसिएशन १०४
सातारा स्वदेशी प्रदर्शने १३१
सातारा हायस्कूल ९, १०
साम सत्याग्रह-शुद्ध सत्याग्रह ५९
सायमन कमिशन ३६, ६०, १३७
सार्वजनिक सभा ४७
सुबोध पत्रिका ११६
सुरत ७८, १५८
सेटलवाडर (सर) चिमणलाल १०४
सेल्बी (प्रि.) ११
सेवा सदन (पुणे) ४७
सेवासदन (सातारा) १५, १७, ९४, १०४
सोमण भाऊसाहेब ५१ ते ५३, ९६, ११७, १३७
सोलापूर १५७, १६१
सोलापूर माशल लॉ १०५
सोळंकी (डॉ.) ६९
सौ. सत्यभामाबाई काळे स्त्री शिक्षण मंदिर १४
स्वदेशी प्रसार ४९, १३०
स्वदेशीमुळे स्वराज्य १७
स्वराज्य पक्ष ५१, ५२
हमीद ए. अली १४५, १४६
हरिजन सेवक वेल्फेअरफंड १४३
हरिजन सेवा संघ १०४
हर्षचरित १२
हायकोर्ट (मुंबई हायकोर्ट पहा)
हितवाद १२८
हिदायतुल्ला (ना. सर) १०९
हिंदी प्रागतिक पक्ष ४१
हिंदी प्रागतिक सभा (अ. भा. प्रागतिक परिषद पहा)
हिंदी फॉक्स ५३
हिंदु धर्म ३३, ३५
हिंदु महासभा ३८
हिंदुस्थान १, ३६, ते ३८, ४०, ४२ ते ४७, १२७, १२८
हिंदुस्थान सरकार ३७
हेराल्ड लास्की (प्रो.) ४५
हैद्राबाद ८
हैद्राबाद (सिंध) ९४
ज्ञानप्रकाश १२८